ग्रं. सं. ठाणे

REFBK-0012292

दा. मा.
१२२९२

३४२६९

24/9/63

१४२६९

# शास्त्रीय तत्त्वज्ञान

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ... वि: ... निबंध
अनुक्रम ३४२६९ ... नो. दि. ... २५-१-६३
क्रमांक १४२६ ...

लेखक

**नारायण देसाई**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १२२९२

अभिन ... बई १२.

REFBK-0012292

किंमत चार रुपये

प्रकाशक : वामन विष्णु भट
अभिनव प्रकाशन, ७ अंबा सदन,
जेरबाई वाडिया रोड, परळ, मुंबई १२.

प्रथमावृत्ति : ऑगस्ट १९६२

मुद्रक : ग. द. पराडकर
आनंद मुद्रणालय,
खाडिलकर रोड, मुंबई ४.

# प्रस्तावना

'शुद्ध बीजापोटीं फळें रसाळ गोमटीं' हें सत्वचन तत्त्वज्ञान ह्या विषयाला अगदीं बरोबर लागू आहे. आपण आपलें तत्त्वज्ञान जर शुद्ध करून घेतलें नाहीं तर सामाजिक आणि वैयक्तिक प्रगति साधण्याचा आपला साराच खटाटोप व्यर्थ ठरेल. म्हणून आधीं शुद्ध तत्त्वज्ञान म्हणजे काय व तें कोणतें हा महत्त्वाचा प्रश्न सोडवणें आवश्यक आहे.

आमच्या मतें शुद्ध तत्त्वज्ञान म्हणजे शास्त्रीय किंवा वैज्ञानिक तत्त्वज्ञान हें होय. आमच्या इतस्ततः स्वैर भरकटणाऱ्या विचारांपैकीं ज्या विचारांना भौतिक किंवा वास्तविक पाया आहे तेच विचार शास्त्रीय तत्त्वज्ञानांत मोडतात. शास्त्रानें शुद्ध केलेले तात्विक विचार स्वभावतःच समाजहिताचे, राष्ट्रहिताचे व मानवहिताचे विचार असतात.

वास्तविक, प्रत्येक मनुष्य हा जात्याच तत्त्वचिंतक असतो. जीवनविषयक कांहींना कांहीं विचार हे त्याचे ठरलेलेच असतात. तेव्हां तत्त्वचिंतक होणें किंवा न होणें हा सवाल आज आमच्या समोर नाहीं. शास्त्रशुद्ध तत्त्वज्ञान आत्मसात करून आपल्या भवितव्याचा आपण कारागीर बनणें वा अशास्त्रीय तत्त्वज्ञान उराशीं बाळगून नियतीच्या ( अराजकाच्या ) हातांतलें बाहुलें बनून राहाणें हें मात्र आमच्या इच्छाशक्तीच्या प्रांतांतलें आहे.

प्राचीन तत्त्ववेत्त्यांना राजा हा तत्त्वपारंगत असणें विशेष महत्त्वाचें वाटे. कारण राजानें लोकनियंत्रण करणें हें स्वाभाविक व योग्य आहे असेंच त्यांचें मत होतें. त्याच दृष्टींतून राज्ययंत्र तत्त्ववेत्त्याच्या हातीं येणें जोंवर शक्य नाहीं तोंवर भूतलावर आदर्शभूत राज्य अस्तित्वांत येणें शक्य नाहीं असें प्लेटो व त्याचे अनुयायी मानीत आले आहेत. परंतु लोकशाही आणि विशेषतः समाजवादी विचारसरणीनुसार प्रत्येक नागरिक हा शास्त्रशुद्ध विचारसरणीनें विचार करणारा बनणें समाजाच्या उच्च हिताकरतां फार आवश्यक असतें. शास्त्रीय तत्त्वज्ञान हें वैज्ञानिक समाजवादाचा तर पायाच आहे.

समाजाकडे किंवा समाजांतील घटनांकडे पाहण्याच्या व्यक्तीच्या अशास्त्रीय दृष्टिकोनामुळें समाजाची फार हानी होते व विशेषतः बहुजन समाजाचा

तर घातच होतो. समाजाकडे पाहण्याचे आमचे परंपरागत विचार अशास्त्रीय असल्यामुळें समाजोद्धाराच्या कामांत ते निरुपयोगी ठरावेत हें साहजिकच आहे. कारण ह्या विचारांत समाजाचें अर्थोत्पादन कसें होतें, उत्पादनसाधनें म्हणजे काय, वर्गकलह किती भयानक असतो, बहुजन समाजाचा योगक्षेम कसा चालतो व समाजविकासाचे नियम काय आहेत वगैरे गोष्टींचें योग्य ज्ञान अंतर्भूत झालेलें नव्हतें.

'भगवंताला भक्ताच्या योगक्षेमाची चिंता' किंवा 'असेल हरी तर देईल खाटल्यावरी' अशा प्रकारच्या भोंगळ विचारांनीं भारतीय समाजाचा उत्कर्ष कधींकाळीं शक्य होईल काय? तसेंच भांडवलदारी समाजांतील बहुजनांचें दारिद्र्य आणि मागासलेपणा केवळ आदर्शवादी, मानवतावादी किंवा भूतदयावादी विचारांनी दूर होणें संभवनीय आहे काय!

रामकृष्ण परमहंस हे अत्यंत दयाळू व थोर पुरुष होते. परंतु त्यांचे विचार शास्त्रशुद्ध नसल्यामुळें ते परिणामकारी ठरले नाहींत हें कबूल करावयास मुळींच हरकत नाहीं. त्यावेळीं कलकत्याला धनकुबेर राणी रासमणी देवीचे रामकृष्ण परमहंस आश्रित होते. एकदां ही मंडळी यात्रेला निघाली. वाटेंत वैद्यनाथजवळच्या एका खेड्यांत भीषण दारिद्र्य पसरलेलें पाहून परमहंस व्याकुळ झाले. त्यांच्याच्याने तें पाहवेना. त्यांच्याबरोबर त्यांच्या मालकांचे जांवई माथूरबाबू हे होते. माथूरबाबूंना ते म्हणाले, 'तूं तर आईचा कोठीवाला! तिचीं लेकरें अशीं दुःखांत आणि तूं का संपत्ति सांठवून ठेवणार? या सर्वांना एकेक वस्त्र दे, त्यांना चांगलें जेवण घाल आणि तेल मीठ दे' माथूरनें म्हणे त्याची आज्ञा पाळली आणि यात्रा करून सगळी मंडळी परतली. (पाहा. 'आधुनिक भारत महर्षि' ले. यदुनाथ थत्ते. पृ. १६)

ग्रामीण विभागांत पसरलेल्या भीषण दारिद्र्याचीं कारणें काय होतीं, किसानांच्या दारिद्र्याचा व जमीनदारीचा संबंध काय असतो, तसेंच ब्रिटीश साम्राज्यवाद आणि भारतीय दारिद्र्याचा काय संबंध होता व हे संबंध बदलावयाचे कसे ह्या विषयीं कांहीहि ज्ञान परमहंसाना नव्हतें. म्हणून किसानांकडूनच हिरावून घेतलेलें अन्न, वस्त्र, तेल, मीठ परमहंसांनी माथूरबाबूंकडून परत त्यांना एक वेळ देवविलें व ते निघून गेले.

माणूस हा स्वभावतःच स्वार्थी असून दुःख हेंच त्याच्या पाचवीला पुजलेलें आहे; दुःखभोगांतूनच माणूस विवेकी बनून बाहेर पडतो; ( दुःखम् एव सर्वम विवेकिना-योगसूत्र ) संसाररूपी भवसागरांतील अग्निपरीक्षेला उतरतो तोच खरा नर व ईश्वराच्या कृपेने हा भवसागर तरून जाणें हेंच नराचें भवितव्य; वगैरे विचारहि समाजाच्या प्रगतीला बाधक आहेत. कारण जीवनाच्या मूल उन्मेशालाच हे परावलंबी विचार शिथिल करतात.

वर्गीय समाजरचना भारतांत बद्धमूल होण्यापूर्वी जीं उपनिषदें रचलीं गेलीं त्यांत जीवनाच्या ह्या मूलभूत उन्मेशाला प्राधान्य मिळालें असून मानवी प्राण किंवा आयुष्य हेंच ब्रह्म असें स्पष्ट म्हटलें आहे.

'तैत्तिरीय' उपनिषदांत पहिल्या वल्लींत नवव्या आणि दहाव्या अनुवाकांत इतरांचीं मतें सांगून अकराव्या अनुवाकांत उपनिषदकार स्वतःचें मत सांगतो. आत्माद्वैत म्हणजे मनुष्यांतील आत्मा एकच आहे असें जाणणाऱ्यास हें उपनिषद् शेवटीं अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि शेवटीं आनदमय आत्म्याजवळ जाण्याचा उपदेश करतें. ह्याचा अर्थ मनुष्यानें भरपूर अन्न खाऊन प्राणाची जोपासना करावी, मन शुद्ध ठेवावें, आवश्यक तें शास्त्रीय ज्ञान मिळवावें आणि या रीतीनें आत्यंतिक आनंद मिळवावा हा कर्मज्ञान समुच्चय तें उपनिषद सांगतें.

नंतर मात्र वर्ग भेदांवर आधारलेल्या समाजरचनेच्या परिणामीं उद्भवलेल्या चातुर्वर्णीय व जातीयवादी समाज परिस्थितींत भारतीय तत्त्वज्ञानें भ्रष्ट झालीं. तथापि ह्या परिस्थितींतहि भारतीय समाजविकासाला लागलेलें ग्रहण जनतेच्या जीवनोन्मेशाला पुरतें गिळूं शकलें नाहीं. परंतु त्याला अविद्येने झांकाळलें. 'अविद्या' 'माया' 'नश्वरवाद' 'जडत्व' 'क्षणभंगुरत्व' जर कशाला म्हणावयाचें असेल तर असल्या परलोकवादी अशास्त्रीय तत्वप्रणालींना होय.

मनुष्याच्या वासना, कामना, तृष्णा ह्या क्षणिक असतात म्हणून त्या असत्य, नाशिवंत, तथ्यशून्य ठरत नाहींत. तृष्णा, तहान तसेंच तृष्णातृप्ति व तज्जन्य आनंदप्राप्ति निरर्थक किंवा त्याकडे उदासीनतेनें पाहण्याजोगी गोष्ट ठरत नाहीं. कारण ज्या क्षणीं तृष्णावासनेचा उद्भव होतो त्या क्षणींच तृष्णातृप्तिप्रीत्यर्थ माणसाचा विधायक उन्मेश जागा होतो व तृष्णातृप्तीनें संतुष्ट होईपर्यंत तो कार्यरत असतो. तृष्णातृप्तीनें तृष्णावासनेच्या प्रारंभापासून तृष्णातृप्ती-

पर्यंतचे सारे कार्यमग्न क्षण सार्थ झालेले असतात व मानव त्यावेळेपुरतें अमृत अनुभवूं शकतो. जीवनांतल्या अशा सार्थ क्षणांची गोळाबेरीज म्हणजेच दीर्घ कालीन सुखाची प्राप्ति होय. आयुष्यांतील असे लक्षावधी क्षण वासनातृप्तीनें सार्थ करीत जाणे किंवा वासनाप्रीत्यर्थ होणारी लाख कर्मे सफल बनवणें म्हणजेच मानवी जीवन समृद्ध, सुखी, सार्थ व सफल बनवणें होय. मनुष्य जीवनांतील लाखो कोटी क्षणांची हीं सार्थकता म्हणजेच जीवनसार्थक्य होय व जीवन सार्थक्य हेंच जीवनाचें तथ्य व सार आहे. असें जीवन निःस्सार व तथ्यशून्य आहे असें कोण म्हणेल ! असें जीवन सारगर्भ व तथ्यपूर्णच आहे.

मानवी जीवनाच्या पातळीवर आलेल्या भौतिकतत्वाची सारी प्रेरणा तथ्यानुसारिणी असल्यामुळें ती मूलतः विधायकच असते. मानवाच्या ह्या जीवनोद्धारक प्रेरणेला सार्थकतेची फळें येण्याऐवजीं जर सतत निरर्थकतेची फळें आलीं तरच मनुष्याच्या कर्मवैफल्यांतून परलोकवादी, दुःखवादी, असारवादी, क्षणभंगुरवादी तत्वज्ञानें संभवतात. कर्मसफलता हेंच सार्थ व सफळ जीवनाचें गमक आहे. अशा जीवनाला आदि अंत नसून सतत विकास हीच त्याची एकमेव दिशा होय.

शोषणाधिष्ठित वर्गीय समाजरचनेच्या कालांतच मानव संस्कृतीची बांधणी झालेली आहे. त्यामुळें माणसाच्या विचार कोषांत अनेक वृथा, खोट्या जीवनद्रोही व जीवनाच्या उज्ज्वल भवितव्यावर श्रद्धा नसलेल्या तत्वप्रणालींची अडगळ सांचलेली आहे. ही अडगळ हीच माणसाला छळणारी एक मोठी बाधा होय. ह्या बाधेला आम्ही इतिहासबाधा म्हणूं शकतो. ह्या इतिहासबाधेविरुद्ध अविरत लढा दिल्याशिवाय नवमानवाचा जन्म सुकर होणें शक्य नाहीं. खरीखुरी समाजवादी क्रांतीच हा तात्विक लढा यशस्वी रीत्या देऊं शकते. ह्या महान क्रांतीचा अंशभाग म्हणूनच प्रस्तुत पुस्तकासारखीं कांहीं पुस्तकें अल्पसा कार्यभाग साधूं शकतील.

श्रमिक वर्गामध्यें शिक्षणाच्या अभावीं इतिहासबाधा कमी मुरलेली असल्यामुळें त्या वर्गांना शास्त्रीय तत्वज्ञानाचे निष्कर्ष आकलन करणें तेवढें कठीण जात नाहीं. परंतु शाळा कॉलेजांतून व इतरत्र जुनाट विचारांचेच दृढ संस्करण ज्या वर्गावर करण्यात आलें त्यांना शास्त्रीय तत्वज्ञानाचे निष्कर्ष सकृद्दर्शनीं किंचित बेढब आणि चमत्कारिक वाटण्याचा संभव आहे. म्हणून ह्या वर्गांतील लोकांनी शास्त्रीय तत्वज्ञानाचा अधिक कसून अभ्यास केला पाहिजे.

जगांत अमुक अमुक विचार बरोबर आहेत आणि अमुक अमुक विचार चूक आहेत एवढेंच सांगणें शास्त्रीय तत्वज्ञानाचें काम आहे असें आम्ही समजत नाहीं मानवी मनांत वास्तव्य करून असलेले बिनबुडाचे विचार कसे दीर्घकाल-पर्यंत निर्माण झाले व अजूनहि ते कां तगून आहेत तें सविस्तर सांगणें हेंहि शास्त्रीय तत्वज्ञानाचें कार्य आहे असें आम्हांला वाटतें. ह्या दृष्टीने प्रस्तुत पुस्तकांतील 'परमेश्वर' हा भाग वाचकांनीं मुद्दाम वाचून पाहवा.

सुलभापासून कठिणाकडे अशा क्रमानें ह्या पुस्तकांतली मांडणी आहे. म्हणूनच तत्त्वज्ञानांतला अत्यंत कठिण भाग जो गत्यात्मक भौतिकवाद, त्याचें विवेचन शेवटीं केलें आहे. परंतु दुर्दैवाने त्या भागांतच मुद्रणदोष कमालीचे अधिक राहिले आहेत. ह्याबद्दल आम्ही (लेखक व प्रकाशक) खजील आहोंत. सर्व पुस्तकच आम्ही अकिंचन लोकांनीं केलेल्या शिकस्तीच्या प्रयत्नांचें फळ असल्यामुळें केवळ ज्ञानतृष्णेने प्रेरित होऊन वाचणारे वाचक आम्हांला क्षमा करतील अशी आशा आहे.

'शास्त्रीय तत्त्वज्ञान' हें अमुकवादी तत्वज्ञान आहे असें नाहीं. संपूर्ण मनुष्यजातीच्या प्रयत्नांचें तें फळ आहे. सर्व मानवी बुद्धीचें तें सारसर्वस्व आहे. परंतु तत्वज्ञानाला महर्षि कार्ल मार्क्स व फ्रेडरिख एंगल्स ह्या महाबुद्धि पुरुषांनींच विज्ञानाच्या पातळीवर आणलें हें मात्र कबूल केलेंच पाहिजे. तसेंच शास्त्रीय तत्वज्ञानांतील सारे निष्कर्ष ह्या भूतलावर अत्यंत समृद्धीनें फुलावे, फळावे म्हणून योग्य तीं पावलें फक्त मार्क्सवादी क्रांतीच उचलूं शकते हेंहि कबूल केलें पाहिजे.

मानव हा उत्पादन साधनें बनवणारा प्राणी आहे खरा, पण आपला इतिहास आपण बनवण्याचें स्वातंत्र्य अजून त्याला लाभूं शकलें नव्हते. समाजवादी शक्तींच्या वाढत्या प्रभावानेंच तें स्वातंत्र्य आतां अगदी नजीक येऊन ठेपलें आहे. लौकरच माणूस आतां आपल्या भवितव्याचा कर्ता-धर्ता बनणार आहे व शास्त्रीय तत्वज्ञान हें त्याचें जग उभारण्याचें साधन आहे. मावळत्या जगानें शास्त्रीय तत्व-ज्ञान निर्माण केलें तर उगवत्या जगामध्यें समता, न्याय व शांतीच्या परिसरांत तें मुक्ततेनें खुलणार आहे. असें आहे आम्हां सर्व मानवांचें तत्त्वज्ञान—**शास्त्रीय तत्त्वज्ञान !**

अनुक्रम : पृष्ठ


| | | |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ३ ते ८ |
| २ | शास्त्रीय तत्त्वज्ञानच कां ? | ९ ते ४८ |
| २ | आपण माणसें, विश्व व विश्वांतील आपलें स्थान | ४९ ते ५९ |
| ३ | भौतिक जग | ६० ते ७२ |
| ४ | परमेश्वर | ७३ ते १२५ |
| ५ | गत्यात्मक भौतिकवाद | १२६ ते १४८ |

# शास्त्रीय तत्त्वज्ञान

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थ
अनुक्रम ३४२६९ दि: १०/१०/
क्रमांक ९४२६ नों दि:
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १२२९२
ग्रंथ शाखा

१

# शास्त्रीय तत्वज्ञानच कां ?

भारतीय तत्वज्ञानाला जगानें भव्योदात्त म्हटलें आहे. शिकंदराच्या वेळेपासून भारत केवळ दौलतीसाठींच नव्हे तर तत्वज्ञानासाठींहि प्रसिद्ध होता. युनानी किंवा ग्रीक तत्वज्ञानाचें प्लेटोच्या नवीन तत्वज्ञानांत रूपांतर करण्याचें बरेचसें श्रेय भारतीय तत्वज्ञानालाच आहे.

परंतु असें असलें तरी आमचें तत्वज्ञान सब ठीक आहे व त्याकडे टीकेच्या दृष्टीनें पाहतां नये असें मात्र नव्हे, उलट सतत टीकात्मक दृष्टीनें न पाहिल्या-मुळेंच आपल्या तत्वज्ञानांतील दोष दूर न होतां वाढत गेले व समाजाला निकोप आणि समृद्ध बनवण्याचें जें तत्वज्ञानाचें कार्य तें ह्या तत्वज्ञानाकडून घडलें नाहीं. अर्थात्, केवळ तत्वज्ञानानें समाजक्रांति होत नसते हें खरें असलें तरी अचूक तत्वज्ञानाचें महत्व कमी होत नाहीं. निसर्गाचीं शास्त्रें जाणणारें, समाज-विकासाच्या नियमाचें ज्ञान झालेलें व मनाच्या शक्तीचें योग्य आकलन करणारें तत्वज्ञान जनमनाचा ताबा घेऊन मानव समाजाला व मानवाला बदलूं शकतें. परंतु भारतीय तत्वज्ञानाचा पाया प्रगल्भ असूनहि तें बहुतांशीं कालग्रस्त व गतिहीन राहिलें.

आमच्या तत्वज्ञानांतील मायावाद, दैववाद, निराशावाद, रहस्यवाद, दुःखवाद, लोकोत्तरवाद वगैरे मिथ्या वादांनीं जनतेच्या स्वोद्धाराच्या मार्गांत जबर

अडथळे निर्माण केले. ठराविक आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितींनें हे वाद किंवा ह्या प्रवृत्ति निर्माण केल्या.

जिथें भूमि शोषित जनतेला असंतुष्ट ठेवते; परस्पर संघर्ष, युद्धें, दुर्भिक्ष, महामारी वगैरे कारणांमुळें जीवन कटू बनतें; समाजांतर्गत घाण जीवनाला अस्थिर करते; सुखवस्तु वर्गाच्या समृद्धिभोगाला 'चंचल लक्ष्मी' चे तडाखे बसतात, तिथें दुःखवादी तत्वज्ञानें जन्म घेतात. आणि एकदां का असलें तत्वज्ञान निर्माण झालें कीं मग परिस्थिति बदलली तरी त्यांतल्या चुकीच्या प्रवृत्ति भूतकालाचे भाररूपी दगड बनून प्रगतीचा मार्ग रोखूं शकतात, म्हणूनच प्रत्येक तत्वप्रणालीचें सतत समालोचन होणें जरूरीचें असतें. ज्या तत्वज्ञानाचा पाया व्यवहार असतो त्या तत्वज्ञानाचें असें समालोचन आपोआपच चालू राहतें. परंतु व्यवहारापासून एकदां का तत्वज्ञानाची फारकत झाली म्हणजे तें केवळ तर्कबाजी बनून पडून राहातें व सडत जातें. मृत माणसाच्या सडक्या प्रेताला आपण अग्नि देऊन तरी शुद्ध करूं शकतों, परंतु सडके विचार मात्र शतकानुशतकें समाजांत घाण पसरवीत असतात. म्हणून तत्वज्ञानाचें निर्भय, निस्पृह समालोचनहि तत्वज्ञानाच्या विकासाची गरज असते.

आमच्या तत्वज्ञानाला जगानें भव्योदात्त म्हटलें आहे; मग प्रत्येक भारतीयाला तें मान्य करण्यांत वास्तविक अभिमान वाटावयाला पाहिजे, असें कांहीं म्हणतील. परंतु दुर्दैवानें तत्वज्ञान ही अभिमान बाळगण्याची निव्वळ दिखाऊ चीज नसून अचूक तत्वज्ञान ही सुखमय जीवनाची एक अट आहे. राष्ट्रीय दुरभिमानानें देश सुखी, समृद्ध होण्याऐवजीं दुःखी, कष्टी, कंगाल बनत जातो. म्हणून राष्ट्रीय दुरभिमान जर सर्वांत अधिक दूर कुटल्या क्षेत्रापासून ठेवायचा असेल तर तो तत्वज्ञानाच्या क्षेत्रापासून होय.

निसर्गशास्त्रांचें अज्ञान व भरीला पडलेला सामाजिक वर्गीयतेचा उद्भव ह्या गोष्टींमुळें खिस्तपूर्व सात आठ शतकें भारतांत उपनिषदांचा किंचितसा रहस्यवाद नव्यानें जन्म घेत होता. मग बौद्ध, जैन वगैरे तत्वज्ञानांच्या मान्यानें व वर्गीय परिस्थितीच्या प्रभावानें सर्वांत अत्यंत अनर्थकारक जो शंकराचार्यांचा मायावाद किंवा विवर्तवाद, तो पुढें आला. ह्या तत्वज्ञानानें पुढें कित्येक शतकें भारताचा अवसानघात केला.

विवक्षित तत्वप्रणालीच्या उत्पत्तीला व वाढीला तशींच विवक्षित कारणें समाजजीवनांत असावीं लागतात व शंकराचार्यांच्या वेळीं तशीं तीं होतींहि. तीव्र वर्गीय शोषणामुळें जनतेचा प्रपंच-ताप इतक्या थराला गेला होता कीं जीवन सत्य आहे आणि तें नरकासमान आहे असें सरळ सरळ मानण्यापेक्षां जें काय आहे तें सारें मायावत् आहे असें मानणें अधिक सांत्वनात्मक ठरलें होतें. समाज जीवनाची मानसिक गरजच होती ती. ह्या गरजेंतूनच आम्हीं योगदर्शन, वेदान्त, शैव, पांचरात्र, महायान, तंत्रयान, भक्तिमार्ग, निर्गुणमार्ग, कबीरपंथ, नानकपंथ, सुफीसमाज, ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज वगैरे नाना मार्ग चोखाळले; परंतु वास्तवाशीं अधिकांत अधिक जुळणारें असें एकहि तत्वज्ञान निर्माण करणें आम्हांला साधलें नाहीं.

वैष्णवधर्मीय संतांनीं व्यावहारिक व लोकाभिमुख असा एक मार्ग रूढ केला खरा, परंतु त्याचें अधिष्ठान अध्यात्मवादी किंवा परलोकवादी असल्यामुळें जीवनाची नग्न भेसूर वास्तवता एकीकडे व हे साधुसंत आणि भोळी भाबडी जनता एकीकडे असें सांकडें बनलें. वास्तव जीवनांत दारुण विषमता, क्रूर नैर्घृण्य, घोर जुलुम यांचें काळनृत्य घणाणत होतें. तें काळीज सुकवणारें नृत्य बंद पाडून माणसाला एका उच्च संस्कृतीचा लाभ करून देण्याकरितां समाज-विकासाच्या नियमाचें ज्ञान किंवा वास्तवतेची जी योग्य जाणीव हवी होती ती ह्या साधुसंतांच्या खटाटोपांत बिलकूल आढळत नाहीं.

संतोपदेशाची स्थिति, हुबेहुब रोग कोंकणांत तर औषध देशावर, अशी होती. विषमतेनें गांजलेला समाज अस्पृश्यतेनें छळला जात आहे ना, मग विषमता आणि अस्पृश्यता नाहीं असें मनानें माना म्हणजे सारें ठीक होईल ! समाज दरिद्री आहे ना? पण तुम्ही दरिद्री-श्रीमंत हा भेद मानूंच नका म्हणजे सुंठीवाचून खोकला जाईल. सारें भूतजात एकच चिद्स्वरूपी आहे असें मनानें समजा कीं हा प्रश्न संपेल. '**विषम जगामाजी पाहतां, बुडाली विषमाची वार्ता चिद्‌ा भासतां सर्वत्र.**' ( एकनाथ )

समजुतीच्या आदर्शानें किंवा आदर्श समजुतीनें वास्तवतेशीं मुकाबला करणें हें तत्व संतोपदेशांत अंतर्भूत आहे. वास्तव परिस्थितीचीं वास्तव कारणें शोधून

काढून ती वास्तवांत दूर करणें हा जो सत्याच्या अधिकांत अधिक जवळ पोहोचण्याचा मार्ग तो न पाहतां कल्पनेंत वास्तवाचें मनाला रुचेल तसें चित्र काढावयाचें व त्या चित्रालाच आदर्श मानून चिकटून राहावयाचें हा तोडगा आदर्शवादानें सांगितला. वास्तव कितीहि भेसूर चालेल, त्या वास्तवाचें आमचें मानसिक चित्र तर आदर्श आहे ना ? बस्स, आदर्शवादी तत्वज्ञानाचें काम तिथें खलास.

वास्तवांतला संसार-ताप इतका विलक्षण दाहक कीं त्याची कथा जो ऐकेल त्याला धगधगीत निखाऱ्यावर निजणाऱ्याप्रमाणे दुःख होईल असें ज्ञानेश्वरांनीं एके ठिकाणीं वर्णन केलें आहे. " **मृत्यु लोकीं सुखाची कहाणी। ऐकिजेल कवणाचिये श्रवणीं । कैंची सुखनिद्रा आंथुरणीं। इंगळाच्या ॥** " तथापि, मृत्यु लोकांतला हा व्यक्तीचा, कुटुंबाचा, समाजाचा ताप वास्तवांत नाहींसा करावयाचा मार्ग किंवा तशी वास्तविक जाणीव मात्र संत-प्रणालींत आढळत नाहीं. परंतु म्हणूनच संतांनीं केलेलें कार्य आम्ही कमी लेखतों असें मात्र नव्हे. तत्कालीन घोर परिस्थितींतसुद्धां पुरोहित-पंडितांच्या शोषक, समता-द्रोही विचारांना शह देऊन जनतेच्या भाव-जीवनाला आधार देण्याचें कार्य संतानींच केलें आहे. संत-साहित्य हें प्रामुख्यानें रंजलेल्या गांजलेल्यांचें साहित्य होय. शास्त्रीय तत्वज्ञानाच्या उदयापूर्वीची दलित, शोषित, पीडित जनतेची वैचारिक चळवळ किंवा शोषक वर्गाशीं लढण्याचें हत्यार म्हणजे संत साहित्य होतें हें निर्विवाद आहे. परंतु वास्तवता ती वास्तवता! शास्त्रीय तत्वज्ञान तें शास्त्रीय तत्वज्ञान! त्याची सर संतसाहित्याला कशी येणार ? शास्त्रीय तत्वज्ञान म्हणजे संतांनीं जें जें इच्छिलें त्याची मानवाला प्रत्यक्ष प्राप्ति. आणि तीही याच देहीं याच डोळां. ह्या दृष्टीनें संतांच्या विचारप्रणालीचें दोषदिग्दर्शन करतांना कठोर बनलेंच पाहिजे. वास्तवतेची ती अट आहे. संतांनंतर आमचें भाग्यशाली नवजीवनजागृति युग ( रेनासेन्स ) सुरू होतें. ह्या युगानें भारतांत फार मोठीं माणसें निर्माण केलीं. त्यांच्या व्यक्तिमहत्वांतून नवविचारांचे स्त्रोत ह्या पुराण्या भूमींत धो धो वाहूं लागले, पाश्चात्य विचारांनीं व विशेषतः इंग्रजी नवभांडवलदार वर्गाच्या स्वतंत्र विचारांनीं आमचा नूतन आंग्लशिक्षितवर्ग प्रेरित झाला होता. हा वर्ग प्रामुख्यानें जमिनदार वर्गांतून व किंचितसा भांडवलदार वर्गांतून आलेला होता. मग हळूहळू मध्यमवर्गहि पुढें येत चालले.

भारतीय नवजीवनजागृतीचें प्रचंड कार्य इतिहासानें ज्या वर्गांवर व व्यक्तींवर टाकलें होतें त्यांना त्या कार्याची जाणीव असो वा नसो, परंतु तेवढी महत्ता आपल्या लोकांत होती एवढें मात्र खरें.

राजा राम मोहन रॉय, केशवचंद्र सेन, ईश्वरचंद्र विद्यासागर, देवेन्द्रनाथ टागोर, रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, दयानंद सरस्वती, महर्षि रानडे, भांडारकर, चंदावरकर, लो. टिळक, आगरकर, महात्मा फुले, रवीन्द्रनाथ टागोर, महात्मा गांधी व डॉ. आंबेडकरांपर्यंत कितीतरी नवजीवन जागृतीचे धनी ह्या भारतभूमींत होऊन गेले. परंतु तत्वज्ञानाच्या प्रांतांत वास्तवतेचें वास्तव आकलन व तदनुसारी तत्वज्ञाननिर्मितीचें काम मात्र एकालाहि पुरें झेपलें नाहीं.

अंधारांतून प्रकाशाकडे जाण्याची जबरी महत्वाकांक्षा हजारों वर्षे धरूनही शांत आणि सुखी समाजरचना निर्माण करण्याइतपत स्वच्छ प्रकाश पाहण्याचें भाग्य आम्हांला लाभलें नाहीं. नवजीवनजागृति युगाच्या प्रारंभापासून व्यवहारांत मात्र आम्ही पाश्चात्यांच्या किंचित प्रगतिपर अशा नव्या भांडवलदारी विचारांशीं तडजोड करून राहिलों. विरोध झाला, हात रक्ताळले, परंतु अखेर भांडवलदारी विजेत्यांचीं व्यावहारिक मूल्यें आम्ही बेमालूम स्वीकारून मोकळे झालों. व्यवहारांतल्या ह्या तडजोडीबरोबर तत्वज्ञानांत सुद्धां योग्य सुधारणा करण्याचें धैर्य किंवा स्वातंत्र्य ( संस्कार मुक्तता ) मात्र आमच्या विचारवंतांत फारच कमी दिसून आलें.

ज्या पाश्चात्य विचारधारेच्या आघातानें ही नवजीवन-जागृति आगेकूच करीत होती ती विचारधारा भांडवलशाहीच्या वर्गीय दोषांनीं परिप्लुत होती व त्यांतहि आम्ही पडलों इंग्लंडच्या आधिपत्याखालीं !

इंग्रज हे कमालीचे मवाळ व पुराणपंथी! जगांत जोंपर्यंत इंग्रजांचा वसाहतवाद चालेल तोंपर्यंत धूर्त इंग्रजांना मूलभूत तत्वसंशोधन परवडणेंच शक्य नाहीं. अशा परिस्थितींत पायाभूत विचारशुद्धीचा प्रश्न आमच्या इथें उठणें शक्य नव्हतें. नव तत्वज्ञानांची बांधणी किंवा मोलाचें तत्वज्ञान बनवणें सोडाच परंतु त्या दिशेनें एक कणहि आम्ही जगाला देऊं शकलों नाहीं.

व्यक्तिवाद व आप्पलपोटेपणा हा त्या वेळचा आमचा फार मोठा शत्रू होता. सामुदायिक कृतींच्या कल्पनेला वरिष्ठ वर्ग भीत होता. जो तो आपापलें पाहण्यांतच गर्क होता. अशा वेळीं व्यक्तिवादावर जबर प्रहार हाणणें जरुरीचें होतें. महर्षि रानड्यांनी हें काम केलें. भारतीय अर्थशास्त्रावरील आपल्या विख्यात निबंधांत ते लिहितात, ' आधुनिक विचार अशा निष्कर्षाकडे जात आहेत कीं व्यक्ति आणि तिचें हित हें तत्वज्ञानाचें केंद्र नसून ज्या समाजाचा ती व्यक्ति घटक असते तो समाज हें तें केंद्र होय. आमचें तत्वज्ञान जर मनोराज्यवादी बनवावयाचें नसेल तर सामुदायिक संरक्षण, समुदायहित, सामाजिक शिक्षण आणि कर्तव्य हीं तत्वज्ञानाचें केंद्र बनणे आवश्यक आहे. ' सध्यां मालमत्तादार प्रवृत्तीचे कांहीं विद्वान ज्या व्यक्तिवादी विचारांचा फैलाव करताहेत त्या विचारांशीं महर्षींच्या ह्या विचारांची तुलना करून पाहिल्यास स्वातंत्र्योत्तर कालांत विचारवंतांचा एक वर्ग किती घसरत चालला आहे त्याची कल्पना येईल.

अध्यात्मबद्धतेच्या चौकटींत राहूनहि स्वामी विवेकानंद सुद्धां बरेच प्रकाश दाखवूं शकले. तेहि होते आदर्शवादीच. परंतु अधून मधून त्यांना वास्तवतेची जाग येत असे, व त्याबरोबर ते महान वास्तव सत्यें बोलून जात. ' दरिद्री नारायण ' हा शब्द प्रथम त्यांनींच रूढ केला. ते म्हणत, 'देशांतील अज्ञान आणि दारिद्र्य घालवणें म्हणजेच ईश्वराची खरी सेवा आहे हें ध्यानांत घ्या. ईश्वर ह्या कोट्यवधि लोकांतच आहे. तो दरिद्री नारायणाच्या रूपानें भारतांत वास करीत आहे त्याला ओळखायला शिका. ' स्वामी रामतीर्थहि असेंच म्हणाले, ' भारतीयांनो, कुंडल्या आणि ग्रह तुमचें रक्षण करणार नाहींत, शब्दांच्या ओढाताणींत गुरफटूं नका. हिंदुस्थानच्या आजच्या दुःस्थितीचें कारण जीवंत आत्म्याला प्राचीन ग्रंथांच्या शब्दांचे गुलाम बनवण्याचा प्रयत्न हेंच आहे. '

नवजीवन जागृति कालांतील एक महत्वाचा सोपान म्हणजे लो. टिळकांचें ' गीतारहस्य ' होय. लो. टिळक एक महान राजकारण धुरंधर तर होतेच, शिवाय ते एक श्रेष्ठ दर्जाचे तत्ववेत्तेहि होते. कर्मयोगी विचारधारेचे जनक म्हणून त्यांचें स्थान अनन्यसाधारण आहे. समाजसुधारणेच्या बाबतींत मुख्यतः आगरकर व इतर सुधारकांच्या मानानें जरी ते मागासलेले वाटत असले, तरी

उदासीन भारताच्या सामुदायिक जीवनांत जी सामुदायिक कृतिप्रवणता त्यांनीं ओतली तिला तोड नाहीं. भगवद्गीता ही तत्कालीन भारतीय तत्वज्ञानाचें संश्लेषण आहे. गीतेंत मूळचे अस्सल श्लोक किती, मागाहून घुसडलेले किती वगैरे वादग्रस्त मुद्दे बाजूला सारून लो. टिळकांच्या 'गीतारहस्या' चें मूल्यमापन केल्यास टिळकांपर्यंतच्या साऱ्या भारतीय आणि बऱ्याचशा पाश्चात्य वर्गीय तत्वधारेचें तें संश्लेषण आहे असें म्हणावें लागेल.

मानवांची कर्मासक्ति दृढ करणें, त्यांना आशावादी बनवणें, त्यांना स्वोद्धारार्थ संघटित कार्य करावयाला प्रवृत्त करणें, जीवन सुधारण्याकरतां सामुदायिक कृतीचा अवलंब करणें वगैरे गोष्टी जगाच्या पाठीवर कुठेंहि झाल्या तरी त्या महत्वाच्याच ठरल्या असत्या. विशेषतः भारतांत तर ह्या गोष्टींची फारच गरज होती. कर्मयोग शिकवून ही गरज भागवणारा एक जिवंत ग्रंथ लोकमान्यांनीं रचला. अन्यायाच्या प्रतिकारार्थ उठलेल्या जनसमुदायाच्या हातांतील तें एक प्रभावी हत्यार ठरलें. अर्थात्, ब्रिटिश अधिपत्याखालीं गेलेला भारत कांहीं लोक समजत होते तसा बर्फांचा निपचित पडलेला थंड गोळा होता व वाघिणीचें दूध प्यालेल्या आंग्लशिक्षित लोकांनीं त्यांत प्राण ओतला असें आम्ही समजतों असें नव्हे. वाघिणीच्या दुधाची कथा जनतेकडे पाठ फिरवणाऱ्या आंग्लशिक्षितांच्या स्वभावांतून निर्माण झालेली एक भूल होय. वस्तुस्थिति तशी नव्हती. कारण जनता कधीं संन्यासहि घेत नाहीं; किंवा थंडहि पडत नाहीं. ती जशी अमर असते तशीच ती सदैव जीवनोन्मुख कर्मासक्तच असते. आपलें शोषण व अन्याय नष्ट कसे करावे ह्या शोधांत ती नेहमीच असते व भारतीय जनतेंतसुद्धां अन्यायाविरुद्ध धुसमणारा विद्रोहाग्नि सतत धगधगत होता.

१८५७ सालांतलें स्वातंत्र्य-समर हें एकुलतें एक पर्व नव्हतें. त्याच्या आगें मागें कितीतरी भावंडें होतीं. म्हैसूरचें शेतकरी बंड ( १८३० ) पन्नास हजार संथाल शेतकऱ्यांचा उठाव ( १८५५–५६ ) निळीच्या शेतावर राबणाऱ्या कामगारांचा हरताळ ( १८६० ) पबना आणि बोगऱ्याच्या बंगाली शेतकऱ्यांचें बंड ( १८७२ ) अहमदनगर व पुण्याच्या शेतकऱ्यांचीं बंडें ( १८७५–७६ ) मोपल्यांचीं अनेक बंडें ( १८३६–१८९६ ) वगैरे संघर्ष सतत चालू होते.

वरिष्ठ व सुशिक्षित-मध्यमवर्ग मात्र एका बाजूनें हतबल व दुसऱ्या बाजूनें इंग्रजी विद्येच्या व सत्तेच्या अभिमानानें धुंद झाला होता. साम्राज्यसत्तेचा जुलूम आणि शोषण ह्यांत भागिदारी करण्यांत तो गुंतला होता. दुर्दैवी परिस्थितीनें हा वर्ग जनताविन्मुख, आप्पलपोटा व कर्तव्यशून्य बनला होता. अशा प्रसंगीं लो. टिळकांच्या कर्मयोगानें इंग्रजांच्या भांडवलशाही रचनेंत उदयाला येणाऱ्या ह्या वर्गाला नेमकें घेरून त्याला सामुदायिक कृतीची दीक्षा दिली. हें एक महान कार्य लोकमान्यांनीं पार पाडलें. हें कार्य करण्याकरतां शुष्क ज्ञानमार्गाचें खंडन करून ज्ञान–कर्म–समुच्चय त्यांना मांडावा लागला. ज्ञानदेवांसारख्या योगी संतांना सुद्धां दृश्य विश्व मिथ्या नाहीं असा चिद्विलास-वाद मांडावा लागला होता. शंकराचार्यांच्या विवर्त व मायावादाला व्यवहारांत मुरड घालण्याची जरुरी लोकमान्यांनाही भासली. कारण त्याशिवाय भारतांत सामुदायिक कृतीचा विकास होणें शक्य नव्हतें.

योगी अरविंदांपासून जशा राजकारणांत, तशा तत्वज्ञानांतहि फार अपेक्षा होत्या. परंतु त्या पुऱ्या झाल्या नाहींत. उलट एक विलक्षण गूढवाद त्यांनीं निर्माण करून ठेवला. ते म्हणतात, 'योग तोच कीं ज्यामुळें विश्वातीताचा शोध लावून परत विश्वांत उतरतां येतें. आणि या ज्ञान-सोपानानें विश्वापासून विश्वातीतापर्यंत अशी खालींवर उतर चढ करणें शक्य आहे.'

उतरण्या चढण्याच्या कसरतींत मेंदूला होणाऱ्या व्यायामाचे सुपरिणाम सोडल्यास ह्या योगाच्या करामतींत तथ्य फार थोडें आहे हें शरीर–मानसशास्त्रानें सिद्ध केलें आहे. शिवाय ज्या विश्वातीताकडे जायचें त्याचें अस्तित्व सिद्ध झालेलें नाहीं. विश्वाच्या पलीकडच्या अस्तित्वाची कल्पनाच शास्त्रशुद्ध नाहीं. कारण विश्वाच्या पलीकडचें एकदां मनुष्याच्या आकलन-कक्षेंत आलें कीं तेंहि विश्वच बनतें. विश्वातीत हेंहि विश्वच असतें. फक्त तें हळूहळू मानवी कक्षेंत येत चाललें आहे एवढेंच. शिवाय योगाचा हा अवाढव्य खटाटोप कुठल्या थरावरची आणि किती माणसें करूं शकतील हा प्रश्नच आहे व ह्या मार्गानें बहुजनसमाजाचा उद्धार कसा होणार तें खुद्द अरविंदानांहि ठाऊक नव्हतें व त्यांचा त्या गोष्टीवरील विश्वासहि उडाला होता.

योगमहर्षि आपल्या योगसामर्थ्यानें मानवतेला उद्धरूं शकतात असें म्हणण्याला अनुभवाचा दुजोरा नाहीं. इतिहासकालांत ह्या भूमीवर अनेक योगमहर्षि होऊन गेले आहेत, पण म्हणून जनतेचें हित त्यामुळें झालें असें कुणी समजत नाहीं. जगाचा उद्धार सोडाच, घटकाभर सबंध भारताचाहि उद्धार बाजूला ठेऊं या; परंतु ज्या भूमीवर अरविंदांनी अपार प्रेम केलें त्या वंगभूमीची दशाहि सुधरत नव्हती ह्याची खंत त्यांनीं बारिंद्राला पाठविलेल्या पत्रांत व्यक्त केली आहे. ते म्हणतात, 'जनतेची हळूहळू अवनति झाली, तिची जीवनशक्ति क्षय पावली. आपल्या स्वतःच्या प्रदेशांत बंगाली माणसाची काय स्थिति झाली ? खायला पुरेसें अन्न नाहीं व ल्यायला वस्त्र नाहीं; सर्वांवर घबराट पसरला आहे. सारी संपत्ति, उद्योगधंदे, जमीन, मिळकती इतकेंच काय शेतीची भूमीसुद्धां इतरांच्या घरांत जाऊन राहिली आहे.' ('महायोगी अरविंद'–ले. रंगराव दिवाकर पृ. १८८ )

योगी अरविंदांचें युगकार्य संपलें. त्यांचें महाप्रस्थान होऊनहि कांहीं वर्षे लोटलीं. परंतु त्यांच्या योगपराकाष्टेच्या परिणामीं कमीतकमी बंगाली समाज-जीवनाला तरी उभार मिळाला असें कोणी म्हणूं शकेल काय ? उलट त्या मानधन भूमीचीं दोन शकलें झालीं. वंगसंस्कृति, वंगसाहित्य, वंग देशाभिमान अपरिमित दुखावला गेला व जें कांहीं शिल्लक राहिलें त्याची दुर्दशा कोण वर्णन करणार ? कविवर्य टागोरांसारखा प्रति कविवर्यच तें करूं जाणे ! आम्हांला उघड्या डोळ्यांनीं जें दिसतें तें हें कीं बंगाल आणि भूकंप्रळ., बंगाल आणि विप्लव, कलकत्ता आणि कमालीची बेकारी, कलकत्ता आणि सार्वत्रिक हरताळ, कलकत्ता आणि भयानक गोळीबार, कलकत्ता आणि मोताद जीवनाची किंमत चुकवण्याकरतां तरुणांनीं केलेलें अमाप रक्तदान !

योग्यांचा साक्षात् प्रत्यय हा कितीहि समृद्धशाली व प्रामाणिक असला तरी तो त्यांच्या स्वतःपुरताच उपयोगी होत असेल. योगज्ञान स्वतःच्याच वेगवेगळ्या मानसिक अवस्थांचें ज्ञान असतें. तें सखोल सूक्ष्म जरूर असेल परंतु तें स्वतःविषयक व वैयक्तिक असतें.

कांहीं लोकांचा असा समज आहे कीं योगसाधनानें प्राप्त झालेलें ज्ञान हें आत्मज्ञान असून श्रेष्ठ दर्जाचें व सत्यस्य सत्यं असें असतें. परंतु

वस्तुस्थिति तशी नाहीं. मोहनिद्रेनें वश केलेल्या माणसाचें इंद्रियज्ञानहि आश्चर्यकारक असतें. जें आमच्या जागृतावस्थेंतील इंद्रियांकडून होणें शक्य नाहीं, तें आमचीं तींच इंद्रियें मोहनिद्रावस्थेंत करूं शकतात हें प्रयोगसिद्ध आहे. परंतु त्याचें कारण असें आहे कीं मोहनिद्रावस्थेंत फक्त ठराविक सूचनांप्रमाणेंच मनाच्या सार्‍या शक्ति एकवटून एकाच सूचनेवर केंद्रित होत असतात व जें मन जागृतावस्थेंत चहूं दिशांकडे फेरफटका मारीत असतें, तें मोहनिद्रावस्थेंत स्वयंकेंद्रित होऊन कार्य करतें म्हणून त्या त्या इंद्रियाची शक्ति वाढलेली असणें साहजिक असतें. हेंच योगावस्थेंतहि घडतें. समाधीमुळें बुद्धि केंद्रित व्हायला मदत होते. परंतु हें जें ज्ञान मिळतें तें कशाचें ? तें स्वतःच्या मानसिक अवस्थांचें व तेंहि अलग अलग असें असतें. परंतु आमचें जागृतावस्थेंतील ज्ञान अधिक वस्तूंचें व वस्तू-वस्तूमधील परस्पर संबंधांचें असतें. जागृतावस्थेंतील ज्ञानाचा आवाठ फार मोठा परंतु गुणवत्ता किंवा खोली कमी. तर योग-ज्ञानाचा प्रदेश संकुचित, स्वतःच्या मनापुरता व खोली मात्र जास्त असण्याचा संभव असतो.

परंतु मानवाच्या सुखपूर्तीकरतां लागणारें वस्तुसत्य एकांगी, सूक्ष्म, सखोल असून उपयोगाचें नाहीं, तर तें सर्वांगपरिपूर्णहि असलें पाहिजे. ह्या दृष्टीनें आमच्या व्यवहारांत आम्हाला होणारें इंद्रियज्ञानच असें सर्वांगपरिपूर्ण सामाजिक सुखपूर्तीच्या व जीवन—सार्थक्याच्या दृष्टीनें अधिक बरोबर असतें.

कांहीं लोक असेंहि म्हणतील कीं आमचें व्यावहारिक ज्ञान कमी दर्जाचें म्हणून फसवें आहे व योगद्वारा झालेलें ज्ञान सखोल उच्च दर्जाचें म्हणून भरवंशालायक आहे. परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं. खरें म्हणजे ह्या दोन प्रकारच्या ज्ञानप्रकारांत विरोध नाहीं. हे दोनहि प्रकार एकाच मनाच्या आकलन शक्तीचे आहेत. योग साधनांत अतिमानवी, अतिनैसर्गिक अतिमानसिक असें कांहीं नाहीं. जसें पूर्वीचें पदार्थविज्ञान व आतांचें अणुविज्ञान ह्यांत विरोध नाहीं; तर तीं दोन्हीं एकमेकांना पूरक व दोन्हीं व्यवहारांतून निघालेलीं व व्यवहार समृद्ध करणारीं आहेत, तसेंच साधें

व्यावहारिक ज्ञान व योगज्ञान ह्यांत मूलभूत फरक नाहीं. बरें, इंद्रियांना दिसणारें तें योगसमाधिस्थांना मिथ्या वाटतें असेंहि नव्हे. पातंजल योगांत असला वस्तुमिथ्यत्वाचा प्रकार नाहीं व आधुनिक योग्यांनीं सुद्धां अति-नैसर्गिकाच्या प्रकाराला प्रोत्साहन दिलेलें नाहीं. कोणत्याहि क्षेत्रांत कांहीं जरासें असाधारण आढळलें रे आढळलें कीं तें ईश्वराला किंवा विश्वातीताला नेऊन भिडवायची प्रवृत्तीच योगशास्त्राच्या विकासाच्या आड येत आहे.

परमेश्वराबाबतच्या पूर्वग्रहामुळें भारतीय शास्त्रांचा विकास होऊं शकला नाहीं. युरोपांत रोजर बेकन, विल्यम ऑफ ओकाम, फ्रान्सिस बेकन, कोपर्निकस, ब्रुनो, डार्विन वगैरे निस्पृह शास्त्रज्ञांनीं विज्ञानाला ईश्वर, बायबल, पोप वगैरेंच्या कचाट्यांतून मुक्त केलें म्हणूनच विज्ञानाची तिथें अनन्यसाधारण वाढ झाली.

शास्त्रीय तत्वज्ञान, योगशास्त्रांतला नैसर्गिक प्राकृतिक–मानसिक भाग मान्य करून शारिरीक व मानसिक आरोग्याकरतां योगाचा अवलंब करण्यास उत्तेजन देतें. जें काय तथ्य योगविद्येंत आहे तें मनोविज्ञानाच्या सहाय्यानें आपण समजूं शकतों. अतिनैसर्गिक, अतिमानवी, विश्वातीत वगैरे त्यांत कांहीं नसून केवळ ईश्वर–कल्पनेच्या पूर्वग्रहामुळें ह्या कल्पिताला मान्यता मिळत गेली आहे

योगी अरविंदांना भारतीय जनोद्धाराचें योग्य तत्त्वज्ञान बनवणें साधलें नाहीं. त्यांचा ‘ अतिमानसाचा विज्ञान योग ’ देशांतील प्रतिगामी शक्तींनाच अधिक उपयुक्त ठरण्यासारखा निघाला. ज्या वर्गांत ते जन्माला आले त्या वर्गाच्या जनविन्मुख गूढवादावर ते ताण करूं शकले नाहींत.

‘ धि ह्यूमन सायकल ’ ह्या आपल्या ग्रंथांत नवयुगाच्या अवताराचें भाकित वर्तवतांना ते म्हणतात, ‘ या नवयुगांत जीवन–संघर्ष राहणार नाहीं, अरिष्टें दूर होतील आणि जगदैक्य प्रस्थापित होईल असा विश्वास आहे. ’ परंतु हें सारें घडवण्याकरतां करा काय, तर श्रद्धायुक्त अंतःकरणानें प्रतीक्षा करा. **सामुदायिक कृतीला विशेष प्रोत्साहन न देणारा असला हा नपुंसक उपदेश हें वरिष्ठवर्गीय तत्वज्ञानाचें खास लक्षण आहे.** त्या

**तत्वज्ञानाची हीच तर खरी खुबी आहे. कल्याणमय स्वप्नाची श्रद्धामय प्रतीक्षा तिथें दिसेल परंतु तें स्वप्न साकार करण्याकरतां बहुजन समाजाला तदनुसारी सामुदायिक कृतीची हांक मात्र असणार नाहीं.** मानवतेवर प्रेमकरणारीं आदर्शवादी सारीं तत्वज्ञानें बहुजन समाजाच्या सामुदायिक कृतीला थरकांप भीत असतात !

तथापि भारताच्या नवजीवन–जागृति कार्यात योगी अरविंदांनीं हि फार मोलाची भर टाकली असें म्हणावयाला पाहिजे. कांहीं मोलाचे विचारहि ते भारताला देऊन गेले आहेत. एके ठिकाणीं ते म्हणतात, “ आपल्या पुराण्या योगदर्शनांत अध्यात्म आणि जीवन यांच्यांत एकता व समन्वय साधतां आलीं नाहींत. दृश्य जगाचा, या योगद्रष्ट्यांनीं ईश्वराची ती लीला आहे, माया आहे असें म्हणून निकाल लावला. याचा परिणाम भारतीय जीवनांतील उत्साह व सामर्थ्य हीं विरून गेलीं, भारताचा ऱ्हास झाला... युरोपकडे जरा दृष्टि वळवा. दोन गोष्टी प्रामुख्यानें दिसतील. विचार सागराचें सतत मंथन आणि त्याच्या जोडीला सान्या शक्तींचा विनियोग करून निर्माण होणारी अखंड क्रियाशीलता. युरोपचें सारें सामर्थ्य यांत सांठविलेलें आहे. आजचे युरोपियन लोक हे प्राचीन तपस्व्यांसारखे आहेत— कीं ज्यांच्या तपःसामर्थ्याला पाहून देवांना भीतीनें थरकांप सुटावा आणि त्यांच्या आज्ञेपुढें त्यांनीं माना वांकवाव्या. लोक म्हणतात, युरोप देश विनाशाकडे धांव घेत आहे. मला मात्र तसें वाटत नाहीं. आजही जी उत्क्रांति होऊन राहिली आहे, जें भौतिक परिवर्तन दिसून येत आहे, त्यांतच नवयुगाचीं प्रारंभ बीजें आहेत. ” ( ‘ महायोगी अरविंद ’ ले. रंगराव दिवाकर. पृ. १७९–१८० )

नरजात म्हटली म्हणजे पापकर्दमांत रुतलेली; तिचा उद्धार शक्य नाहीं; मानवी स्वभावच मूलतः स्वार्थी आहे; तो सुधारणें शक्य नाहीं; जग होतें व आहे तसेंच पुढेंहि राहणार. असल्या दुःखवादी, निराशावादी विचारसरणीला योगी अरविंदांनीं जोराचा धक्का दिला व मानवाचा उद्धार आज ना उद्यां अटळ आहे हें त्यांनीं बजावलें. जगांत ईश्वराचा अवतार

( डिस्सेंट ) होत नसून मानवाचा उद्धार ( ॲस्सेंट ) होतो हें त्यांनीं स्पष्ट सांगितलें. ह्या विचारांचें भारतांत विशेष महत्व आहे. एक म्हणजे वरिष्ठवर्गीय व परभूत समाजजीवनाची स्वाभाविक परिणति जो फॅसिझम त्याला ह्या आशावादी विचारांनीं पायबद बसला. **फॅसिझमचें तत्वज्ञान जनताविरोधी असल्यामुळें तें संपूर्ण जीवनाचा द्वेष करतें. मानवतेला हीन लेखतें.** मानव हा स्वभावतः नरकगामी आहे म्हणून मानवजातच नाहींशी करा असें फॅसिस्ट आचार्यांचें तत्वज्ञान आहे. शोपनहार नांवाच्या एका जर्मन तत्ववेत्त्यानें मानवजातीनें आत्मनाश ( कॉस्मिक सुइसाइड ) करून नष्ट होणें हाच मानवमुक्तीचा एकमेव उपाय सांगितला. हा तत्ववेत्ता म्हणे उपनिषदें वाचून फार खुष झाला होता ! जीवनोन्मेष आणि जीवनसौख्य हें ज्या उपनिषदांचें सार, त्या उपनिषदांची स्तुति करणारा हा पाश्चात्य गृहस्थ जगताला उपाय काय सुचवितो तर विश्वहत्या !

दुसरा एक जर्मन पंडित स्पेंग्लर म्हणतो, ‘ फक्त स्वप्नाळू लोकच आशावादी होऊं शकतात. आशावाद हा भेकडपणा आहे, ( मॅन अँड टेकनिक्स ) ‘ माणूस हा गिधाडासारखा प्राणी आहे. जो द्वेष करूं शकत नाहीं तो माणूसच नाहीं आणि इतिहास हा तर माणसांचा बनलेला असतो. ’ असेंहि ते शिकवतात. हे लोक सुधारणावाद, प्रगतिवाद, समाजवादाचे कट्टे विरोधक असतात. फॅसिस्ट विचार-धारेचा उद्‌गाता नित्शे म्हणतो, ‘समाजवाद कनिष्ठ आणि मूर्ख लोकांचा आत्यंतिक जुलूम आहे. ख्रिस्ती धर्म, मानवतावाद, फ्रेंच क्रांति आणि समाजवाद हे सगळे एकाच माळेचे मणी आहेत. ’ ( धी वुइल टु पॉवर )

वरील विचारांचे सूत्र जनतेवर प्रेमाचा अभाव व जनकर्तृत्वावर विश्वासाचा अभाव हें आहे. ह्याच्या उलट भारतीय नवजीवन जागृति-युगांतले सारे रथी महारथी जनतेवर प्रेम करणारे होते व जनकर्तृत्वावर त्यांचा तेवढा अविश्वास नव्हता. म्हणून वरील धोकेबाज विचारांपासून ते कोसभर दूर राहिले. आज मात्र आमच्याकडेहि अमेरिका युरोपांतील मरणोन्मुख भांडवलदारी ऱ्हासाच्या अनुषंगानें कुजक्या सडक्या वैफल्यवादी विचारांची लागण सुरू

आहे. आमचा नवजीवन जागृति काल ह्या दृष्टीनें फार सकस व निकोप होता असेंच म्हणावें लागेल.

लो. टिळकांनंतरचा सर्वांत अधिक प्रभावी कालखंड म्हणजे महात्मा कालखंड होय. मालमत्तादारी, पतित पाश्चात्य तत्वज्ञानाचा प्रभाव व देशांतील दयनीय दुर्बलता ह्यांतून मार्ग काढीत काढीत महात्मा गांधीजी देशाला सामुदायिक विचारांत व चळवळींत सतत पुढें नेत राहिले. निःशस्त्र सेनेचा एवढा कुशल सेनानायक जगानें ह्यापूर्वी पाहिला नव्हता. गांठीशीं अपार जनप्रेम असूनहि पुराण्या भारतीय आणि भरीला नेमस्त इंग्रज-संस्कारामुळें तत्वज्ञानाच्या प्रांतांत मात्र गांधीजी जनोद्धाराचें शास्त्रीय तत्वज्ञान निर्माण करूं शकले नाहींत. जनोद्धाराची जनताभिमुख दिशा त्यांना स्पष्ट दिसली होती हें खरें आहे. परंतु जनोद्धाराची शास्त्रीय विचारसरणी स्वतः निर्माण करण्याचें सोडाच परंतु जी जगांत हळूहळू वाढत होती ती सुद्धां ते समजूं शकले नाहींत.

कुशल राजयोगी गांधीजी आणि ज्ञानयोगी गांधीजी ह्यांत बरीच तफावत उरली. राजयोगी लेनिन व ज्ञानयोगी लेनिन हे एकाच पातळीवरचे ठरतील. परंतु गांधीजींच्या बाबतींत तसें ठरलें नाहीं. कदाचित गांधीजींच्या अंगीं तत्वज्ञानाला लागणारी अभिजात प्रज्ञा कमी होती असेंहि असेल. गांधीजींचे निस्सीम चहाते व एक विद्वान तत्वमीमांसक संत धर्मानंद कोसंबी यांनीं या बाबतींतल्या मार्क्सच्या प्रज्ञेचें कौतुक केलें आहे. त्यांनीं मार्क्सला समाजशास्त्र जाणणारा जगांतला अद्वितीय तत्ववेत्ता असेंहि म्हटलें आहे व गांधीजी प्रज्ञेच्या बाबतींत मार्क्सहून तोकडे होते असें आपलें स्पष्ट मत ‘ भारतीय संस्कृति आणि अहिंसा ’ ह्या पुस्तकांत नमूद केलें आहे. तथापि समाजपरिवर्तनाबाबतचे गांधीजींचे कांहीं विचार सच्च्या भारतीय क्रांतिकारकांना अजूनहि स्फूर्तिदायक ठरत आहेत. भांडवलशाहीचा अंत गांधीजींना हवा होता. अर्थात साधुसंतांच्या भूमिकेवरून ते भांडवलशाहीकडे बघत असल्यामुळें ती नाहींशी करण्याची त्यांची उपाययोजना आदर्शवादी म्हणजे अवास्तव ठरणें साहजिकच होतें. **भांडवलशाही काय आहे, समाजविकासाच्या गतीचे अटळ नियम काय आहेत, ह्या**

**नियमांची अटळता केव्हां व कशी नाहींशी होते आणि निसर्गाचा व समाजाचा विरोधविकास काय आहे, वगैरे गोष्टी जर गांधीजींनीं समजून घेतल्या असत्या तर त्यांचे विचार अधिक शास्त्रशुद्ध ठरले असते. परंतु तसें झालें नाहीं.**

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं गांधीजी लिहितात, ' मला असें भविष्य दिसत आहे कीं या युद्धाचा अंत म्हणजे भांडवलशाहीचा अंत होय. गरीबांच्या राज्याचा दिवस उगवत आहे असें मला दिसत आहे. ' ( हरिजन १–१–४२ ) ' अमेरिकेच्या रॉकफेलरपेक्षां भारतीय रॉकफेलर चांगला असें मानणें चूक होईल. ' ( १९०८ हिंदी स्वराज्य ) ' जो आजीविकेपेक्षां अधिक धन घेतो तो कळत अगर नकळत दुसऱ्याची आजीविका हरण करतो. ' ( १२–९–२९ हि. न. जी. ) ' कोणत्याहि स्वास्थ्य असलेल्या समाजांत धडधाकड माणसांजवळ पैसा केंद्रित होणें आणि लाखों बेकार होणें हा महान् सामाजिक अपराध-रोग आहे. **त्यावर तात्कालिक उपाय-योजना झाली पाहिजे.** ' ( जाड टाईप आमचा ) वरील उद्गारांत गांधीजींची नवजगनिर्मितीची तळमळ, आशा, आकांक्षा, प्रतीक्षा स्पष्ट दिसते. परंतु इप्सित नवजगनिर्मितीचें शास्त्रज्ञान किंवा त्याची अंधुक रेषाहि त्या उद्गारांत किंवा इतरत्र केलेल्या विवेचनांत आढळत नाहीं.

जागतिक रणांगणाच्या पटावर तसेंच राष्ट्रांतर्गत कोणत्या शक्ति लढत होत्या, त्यांची शोषक आणि वर्गीय ताकद काय, त्यांचें उत्पादनांतलें स्थान कोणतें, जुन्या विचारांत जुन्या समाजरचनेचें अंग किती व नवविचार वास्तवांत प्रभावी ठरावा म्हणून शासन संस्थेनें काय करावयाला हवें; कोणत्या प्रकारची शासनसंस्था समाजपरिवर्तनाचें कार्य इमानदारीनें करूं शकते; कोणती शासनसंस्था समाजपरिवर्तनाच्या कामांत अडथळे निर्माण केल्याशिवाय राहणार नाहीं; समाजांत समाजपरिवर्तनाच्या दृष्टीनें कार्योत्सुक झालेले वर्ग कोणते व त्यांचें ऐतिहासिक कार्य काय; त्यांची शक्तिस्थानें कोणतीं, मर्में कोणतीं; जे वर्ग क्रांतीविरोधी भूमिका घेतल्याशिवाय जगूं शकणार नाहींत त्या वर्गाची प्रतिक्रिया काय होऊं शकते; इतिहासानें ज्या श्रमिकांच्या हातीं क्रांतीची

धुरासोपाविली आहे त्यांचें आघाडीवरलें नेतृत्व कसें असावयाला हवें; ह्या नेतृत्वांत धोके कोणते असतात वगैरे शेकडों गोष्टींचें शास्त्र जें अत्यावश्यक होतें तें ते बनवूं शकले नाहींत.

एका ठिकाणीं गांधीजी लिहितात, ' नव्या दिल्लींतील राजमहाल आणि गरीब मजुरांची झोंपडी यामध्यें जी विषमता आहे ती स्वतंत्र भारतांत एक दिवसहि टिकणें शक्य नाहीं. ' ( बारडोली १३।१२।४१ ) सचें मूलभूत समाजपरिवर्तन ही काय चीज आहे व त्याची तयारी कशी करतां येईल ह्याची पुसट जाणीवहि त्यांना अखेरपर्यंत झाली नाहीं ! समाजपरिवर्तनाच्या बाबतींतला साधासीधा मनोराज्यवादी आदर्शवाद ते मांडित राहिले. तो पूर्ण फसगार होता ह्याविषयीं कोणालाहि संशय नव्हता. परंतु राजकारणाचीं मिळणारीं स्वस्त फळें चाखण्याच्या उद्देशानें त्यांच्या नांवाचा उपयोग करून घेण्याचें त्यांच्या कांहीं खऱ्याखोट्या भक्तांनीं मात्र पसंत केलें एवढेंच.

समतेचें जग असावें, दुःखें नाहींशीं व्हावींत असें गांधीजींना मनोमन वाटत होतें. परंतु वास्तवांतील दुःख इतकें विपुल किंवा तुकारामाच्या शब्दांत ' सुख जवा पाडें दुःख पर्वताएवढें ' व तें नष्ट करण्याचा मार्ग इतका अरुंद कीं वास्तवसृष्टींत दुःख नाहींसें होण्याची शक्यता गांधीजींना सुद्धां कधीं कधीं कमीच वाटत असावी. म्हणून त्यांनींही संत—धर्मानुसार दुःख-विस्मृति व दुःखपूजेचा मार्गच सांगितला आहे. ते म्हणतात " सतींनों, आपलें दुःख सांभाळून ठेवा. तें दुःख नाहीं. सुख आहे. तुमच्या नामोच्चारानें कितीतरी लोक तरून गेले आहेत आणि जातील. " ( हि. न. जी. २।७।२५ )

जेव्हां दुःख नवारणाचा वास्तवांतला मार्ग बंद होतो तेव्हां त्याची भरपाई दुःखविस्मृतीनें, दुःखपूजेनें करण्याचा उपाय बिचाऱ्या मानवी मनाला फार पूर्वीपासून अवगत आहे. त्याचाच अवलंब साधुसंत करीत आले. परंतु त्याला वास्तवांतील दुःखमार्जनाची सर कशी येणार ? असल्या प्रकारच्या आदर्शवादी दुःखोपचारांनीं पीडिताला सुटकेचा निःश्वास मिळाल्यासारखें वाटेल परंतु तो एक आभास असतो. तें एक स्वप्न असतें व हें स्वप्न भारताच्या रोमरोमांत पूर्णपणें भिनलेलें आहे. महाविख्यात जर्मन तत्ववेत्ता हेगेल

लिहितो, 'भारतांत जो आदर्शवाद आहे तो संपूर्ण अस्तित्व-सर्वस्वाला कालातीत बनवून केवळ काल्पनिकांत विरवून टाकतो. प्रियकर जसा प्रेयसीकडे एका धुंद दृष्टींतून पाहतो तसा भारतीय जगताकडे कल्पनामधुर धुंदीनें पाहत असतो.' ( पहा 'धी फिलॉसॉफी ऑफ हिस्टरी' पृ. १३९ ) खुद्द गांधीजींसारखा महान् व्यवहारचतुर मुत्सद्दीसुद्धां ह्या कल्पनामधुर आदर्शवादांतून सुटूं शकला नाहीं.

वेश्यावृत्तीसारख्या एका प्रामुख्यानें आर्थिक, सामाजिक असलेल्या रोगाबाबत गांधीजींची तत्वमीमांसा तपासण्यासारखी आहे. ते म्हणतात, 'जोंपर्यंत स्त्रियांमधूनच असाधारण चारित्र्यवान स्त्री निर्माण होऊन ती ह्या पतित भगिनींचा उद्धार करण्याचें कार्य आपल्या हातीं घेणार नाहीं तोंपर्यंत वेश्यावृत्तीचा प्रश्न सुटणार नाहीं.'

गांधीजी महात्मा पुरुष होते ह्याविषयीं कोण संशय घेईल ? स्त्री–जातीच्या प्रेमानें ते कळवळत होते हें कोण नाकारील ? लेनिनहि स्त्री-जातीच्या प्रेमानें कार्यरत होते. परंतु रशियांतील स्त्रीजातीच्या खऱ्याखुऱ्या उद्धाराचे ते शिल्पकार ठरले. असाधारण चारित्र्यवानच नव्हे तर साधारण रशियन स्त्री ही आजच्या महान् सोविएत राज्याची आधारस्तंभ आहे. ती सोविएत संस्कृतीची मानदंड बनली आहे. ऑलिंपिक कीर्तीची, वर्तमान जगांत सर्वांत अधिक शक्तिमान्, अधिक सुसंस्कृत, अधिक स्वतंत्र, अधिक निर्भय, अधिक सुखी स्त्री सोविएत स्त्री ठरली आहे. जगाच्या उभारणींतील तिचें कर्तृत्व जगजाहीर आहे. कांहीं क्षेत्रांत पुरुषांपेक्षांहि स्त्रियाच अधिक कर्तृत्ववान आहेत व हें कार्य कांहीं दोन चार चारित्र्यवान् स्त्रियांनीं केलें असें नव्हे. शास्त्रीय विचारसरणीची ती करणी आहे. रशियांत वेश्या-व्यवसाय नाहीं हें शेंकडों सज्जन निरीक्षकांनीं वेळोवेळीं कबूल केलें आहे. तो वादाचा विषय उरलेला नाहीं.

अर्थप्राबल्यावर आधारलेल्या वर्गीय संस्कृतीची दिवाळखोरी भर बाजारांत मांडणारा एक अनर्थ म्हणजे वेश्याव्यवसाय. त्याचीं मूळ कारणें

आर्थिकसामाजिक असून त्याच्या दुय्यम चिल्लर कारणांत नैतिकता, लैंगिकता वगैरे गोष्टी येतात हें झाडून जगांतील साऱ्या समाजशास्त्रज्ञांनीं कबूल केलें आहे. अल्बर्त लँन्द्रीस हा विख्यात फ्रेंच शास्त्रज्ञ लिहितो, 'भूकहीच वेश्याव्यवसायाचा पाया होय.' तसेंच मानववंशविज्ञान विश्व कॉंग्रेसचे सदस्य डॉ. जेर्मान कुरेया म्हणतात, 'सैद्धांतिक आणि सर्वसाधारण दृष्टीनें सुद्धां वेश्याव्यवसाय आणि चरित्र–पतनाची मूळ कारणें परिस्थिति आणि दारिद्र्य हींच होत.' ( प्रोस्तितुइसांव इ प्रोफिलाक्सीआ आंतिव्हेनेरीआ-ले. जेर्मान कुरेया )

समाजवादी रचना सोडल्यास साऱ्या भांडवलदारी जगांत हा हिडीस-प्रकार दिवसेंदिवस वाढत आहे. अशा ह्या रोगावर गांधीजींची मासलेवाईक उपाययोजना काय, तर कांहीं असाधारण चारित्र्यवान् स्त्रियांची गरज ! अर्थात गांधीजींनीं इतरत्र ह्या विषयावर फार चांगलेंहि लिहिलें आहे. यंत्रें व इतर बाबतींतले स्वतःचे अशास्त्रीय विचार त्यांनीं नंतर बदललेहि आहेत. कोणाच्याहि विचारांचा अनादर करण्याचा आमचा हेतु नसून शास्त्रीय तत्व-ज्ञान व आदर्शवादी तत्वज्ञान ह्यांतला फरक किती मोठा आहे तें स्पष्ट करणें एवढाच आमचा हेतु आहे.

लेनिनची स्त्रीविषयक तळमळ शास्त्रीय तत्वज्ञानावर आधारलेली असल्यामुळें सार्थ ठरली; तर गांधीजींची तेवढीच तळमळ शास्त्रीय तत्व ज्ञानाच्या अभावीं मोफत स्वप्न ठरलें. आमच्या शहरांतून रस्त्यारस्त्यावर, गल्लींगल्लींत, घरादारांत दिसणाऱ्या स्त्रीचें वर्णन कवि-प्रतिभेशिवाय कोण करूं धजणार ? वास्तववादी कवि शरच्चंद्र मुक्तिबोधांचे हे उद्गार पहा :

**नारी ? माता ? दिसे ध्येयांत शोभून**
**मूठ धान्य द्या अन् साडी घ्या फेडून ॥**

( नवी वाट )

हिंदी कवि मैथिलीशरण गुप्त ह्यांचे पुढील उद्गार प्रसिद्ध आहेत :

**'हाय नारी ! यही तेरी कहानी**
**आँचलमें है दूध और आंखोंमें पानी'**

आपल्या भारतीय दर्शन संपुटांत सारें आहे. दारिद्र्य, कळवळा, आक्रोश, मानवतावाद, भूतदयावाद आणि इतर सारे वादविवाद व तर्कवितर्कांची भरमार आहे; परंतु समाजाकडे पाहण्याची वास्तवाधिष्ठित शास्त्रीय दृष्टि नाहीं. त्यामुळें आम्ही जीं कृत्यें करतों, जो प्रयत्न करतों त्यांच्या परिणामीं इष्ट फळ मिळण्याऐवजीं त्यांतून दुसरें कांहीं तरी निघतें व मग येतो आमचा दैववाद, प्रारब्धवाद, प्राक्तनवाद !!

कर्म-वैफल्याची ही वस्तुस्थिति एका विचित्र तत्वज्ञानाला जन्म देते. तें तत्वज्ञान म्हणजे, कर्म करा परंतु फलाची आशा धरूं नका. कां रे बाबा ? कर्म जर मी करणार आणि मी तें करावयालाच हवें तर त्या कर्मफलाची आसक्ति धरणेंहि स्वाभाविक नाहीं काय ? तें जर सहजासहजीं मिळत नसेल तर तशी अनुकूल परिस्थिति निर्माण करणें हें आपलें कर्तव्य ठरतें. कर्मांचें रास्त फळ मिळण्याचा जर संभव कमी असेल तर तो वाढवण्याचें आणखी कर्म आम्ही करावयाला हवें. केवळ वैयक्तिक कर्में शीघ्र फलदायी होणें अशक्य असतें. कारण व्यक्तीव्यक्तींतले अंतर्विरोध फलनिष्पत्तीच्या आड येत असतात. अशा परिस्थितींत कर्म सोडणे हें जसें चुकीचें तसेंच फलाची आसक्ति सोडणे हेंही चुकीचें आहे. वैयक्तिक कर्में व्यक्ती व्यक्तींतील अंतर्विरोधामुळें जर रास्त आणि इष्ट फलदायी होत नसतील तर त्याचा अर्थ असा कीं कर्मांच्या वैयक्तिक पातळीबरोबरच सामुदायिक पातळीवरील कर्मेंहि स्वीकारायला हवींत. कारण वैयक्तिक अंतर्विरोध समाजांत विरले जातात. एवढेंच नव्हे तर सामाजिक संघटनेच्या सहाय्यानें कर्मांचीं फळें जवळ आणलीं जातात. तात्पर्य हें कीं कर्मफळें मिळण्यांत ज्या अडचणी आहेत त्यांचा शास्त्रीय अभ्यास करून त्या दूर करण्याकरतां आणखी कर्में किंवा वेगळ्या प्रकारचीं कर्में किंवा वैयक्तिक पातळीप्रमाणेंच सामाजिक पातळीवरचीं कर्में वाढवलीं पाहिजेत. असें मानण्याऐवजीं कर्में करा परंतु फलासक्ति मात्र ठेऊं नका हा आदर्शवादी मामला अशास्त्रीय व सर्वथैव चुकीचा आहे.

"**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन**" ह्या वचनाला एकाच प्रकारचीं वैयक्तिक कर्में माहित होतीं. लढाईसारखीं व इतर

राज्यकारभाराचीं कर्में करणाऱ्यांची त्या कर्मांकडे पाहण्याची दृष्टि प्रामुख्याने आत्ममोक्षार्थ किंवा स्वर्गप्राप्तीकरतां असल्यामुळें तीं कर्मेंहि वैयक्तिकच ठरतात.

प्रत्येक माणसाच्या दैनंदिन कर्मांची योग्य रास्त फळें त्याच्या पदरांत पडावीं म्हणून सामाजिक प्रकारचीं सामुदायिक कर्में करणें जरूर आहे, हें त्या वचनानें गृहीत धरलेलें नाहीं. कर्म जसें करावयालाच हवें तसेंच कर्माचें रास्त फळहि त्याला मिळावयालाच हवें. तो त्याचा उचित कर्मसिद्ध हक्क आहे. हा हक्क शाबित करणाऱ्या सामाजिक पातळीवरल्या कर्मांचें योग्य ज्ञान व अपेक्षा शास्त्रीय तत्वज्ञानानें निर्माण केल्या आहेत. हें शास्त्रीय तत्वज्ञानाचें ठळक वैशिष्ट्य आहे.

केवळ कर्म करा एवढेंच नव्हे; कर्म तर कराच, परंतु प्रत्येक कर्माचें रास्त फळ मिळावें म्हणून न्यायनिर्माण, शोषणनिवारण व क्रांति वगैरे जीं जीं काय दुसरीं सामुदायिक कर्में आहेत तींहि करा, ह्यालाच खरा योग म्हणतात. योग म्हणजे कर्मयोग हें लो. टिळकांनी दाखवून दिलें आहे. ‘ कर्मसु कौशलम् ’ म्हणजे कर्म करण्याची आणि सुखी होण्याची जी खुबी ती सुद्धां सामुदायिक कर्मांच्या योग्य ज्ञानांतच आहे. शास्त्रीय तत्त्वज्ञान हें असल्या योग्य शास्त्रावर आधारलेलें आहे व तीच त्याच्या अंतिम यशाची हमी आहे.

बहुजनांना त्यांच्या उचित कर्मांचीं रास्त फळें मिळवून देणाऱ्या समाज-परिवर्तनाची योग्य माहिती ज्या तत्त्वज्ञानांना नव्हती किंवा समाजपरिवर्तन रुचत नव्हतें, तीं तत्वज्ञानें कर्म करा परन्तु फलासक्त ठेऊं नका असेंच सांगत सुटलीं ! शिवाय ह्या तत्वज्ञानांनीं निर्फळ कर्मानें वैतागलेल्या जीवाला शेवटीं कर्मसंन्यासहि शिकवण्याला मागेपुढें पाहिलें नाहीं. कर्मांचीं रास्त फळें मिळण्याचीं जिथें व्यवस्था नसते तिथें अशा प्रकारचीच वांझोटीं तत्वज्ञानें निपजावयाचीं. त्याला दुसरा मार्गच नव्हता.

‘ कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन् ’ ह्या वचनाचा जो चालू अर्थ आहे व ज्याप्रमाणें सामाजिक सेवेचें अविरत कर्म आपण करीत जावें व तात्कालिक मोबदल्याकडे पाहूं नये असें आपण म्हणतों, त्याला मात्र

आमचा विरोध नाहीं. समाजसेवेच्या बाबतींत सतत सेवा करीत राहावें फलनिष्पत्तीकडे स्वतःच्या मोबदल्याचे दृष्टीने पाहूं नये हें ठीकच आहे. समाजसेवेच्या अनुषंगानें वरील अर्थ पुरोगामी आहे हे आम्ही कबूल करतों.

ज्ञानकर्मसमुच्चयाच्या बाबतींतील चुकीच्या समजुतीमुळें व वर्गीय समाज संघटनांमुळें निराशावाद, दैववाद, ईश्वरी लिलावाद, कर्मसंन्यास, भूत–दयावाद वगैरे भ्रामक विचार पुढें आले. आमच्या भूतदयावादाचेंच उदाहरण घेऊं या. माणसांनीं हलाखींत दिवस काढावे, त्यांच्या जीवनांतील संघर्ष पराकोटीला जावा; संसारविवंचनेनें रात्रंदिवस त्यांना पोळून काढावें; जीवन-सौख्याची राखरांगोळी व्हावी; व्यक्तींचें मानसिक स्वास्थ्य नष्ट व्हावें; त्यांनीं रोगजर्जर व्हावें; जीवनाची मौज व उल्हास त्यांना घटकाभरहि लाभूं नये; त्यांची कृतिप्रवणता निराशावादाच्या सागरांत किंवा फुकटच्या दैववादांत गढून संपुष्टांत यावी; दारूण परिस्थितीमुळें गंडे, दोरे, जादूटोणा, गोसावड्या, भोंदुबुवाच्या नादीं त्यांनीं लागावें; कुटुंबांतला क्षोभ पराकोटीला जाऊन क्षोभाच्या परिणामी माणसें सौजन्य–परान्मुख होऊन गुन्हेगार प्रवृत्तीचीं बनावीं; भावानें भावाला, मुलानें बापाला ओळखूं नये; असंख्य माणसांच्या जीवनाची धूळधाण अविरत चालू असावी व माणसांची नैतिक अधोगति झाल्यानंतर, धिक जिणें लाजीरवाणें असलें भिक्षापात्र त्यांनीं अवलंबिल्यानंतर मग त्या बेशरम बनलेल्या माणसांच्या नरोटीत भूतदयावादी कांहीं पै पैसा घालण्याचा विचार करणार ! असा आहे एकंदरींत आमचा भूतदयावाद किंवा तथाकथित मानवतावाद ! आर्थिक समतेविना मानवतावाद फोल आहे. मानवतेचें कंबरडेंच म्हणजे आर्थिक समता !

सध्यां माणसाला दैव, धर्म, देव, कोरा मानवतावाद वगैरे गोष्टींचा काडीचाहि उपयोग होणें शक्य नसतें. माणसाने बहुजनांचा मार्ग पत्करून संघटनेच्या बळावर आपली सामुदायिक परिस्थिति सुधारायला पाहिजे आणि व्यक्तिवादी विचारसरणी धोकेबाज आहे हें जाणलें पाहिजे.

शास्त्रीय तत्त्वज्ञानावर आधारलेल्या समाजवादाच्या प्रकाशांत वरील सत्यें लख्ख दिसूं लागतात. वाद ह्या शब्दाला भारतीयांनीं बिचकून जाण्याचें

कारण नाहीं. वाद म्हणजे तत्वजिज्ञासेनें प्रेरित झालेली चर्चा हा परंपरागत अर्थ आहे. वादाची भारतीय परंपराहि फार प्राचीन आहे. सच्चा समाजवाद मनोराज्यात्मक समाजवादापासून भिन्न कसा आहे हे दाखविण्यासाठीं अशा समाजवादाला **वैज्ञानिक समाजवाद** असें म्हणतात.

**शास्त्र किंवा विज्ञान** म्हणजे अनुभव व विचार या साधनांनीं मिळालेलें एखाद्या विषयाचें व्यवस्थित संकलित ज्ञान; आपल्याकडे शास्त्र म्हणजे ' अधिकार वाणीने उच्चारलेले वाक्य, ' ' शब्द प्रमाण ' असा जुना अर्थ आहे. तत्वमीमांसेची वाढ सूत्रें, भाष्य, टीका, वगैरे स्वरूपानें आपल्याकडे झाली. युरोपांतील शास्त्रीय विवेचनपद्धतीनें झाली नाहीं. शास्त्र म्हटलें म्हणजे वर्णन, वर्गीकरण व अर्थविवरण किंवा विश्लेषण, सहबंधन व समावेशन अशा पद्धतीनें जावे लागतें. तसेंच शास्त्रांत एका गोष्टीचा दुसऱ्या अनेक गोष्टींशी असलेला संबंध फार बारकाईनें व समर्पकतेनें पाहावा लागतो. विज्ञान किंवा शास्त्र हें कधींहि भावनांना आवाहन करीत नाहीं. चिकित्सक व परीक्षणात्मक अशा विचारांवर विज्ञानाची रचना आधारलेली असते. वैज्ञानिक स्पष्टीकरणांत घटनांचें नैसर्गिक व वास्तविक स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न असतो; वैज्ञानिक नियम व वैज्ञानिक कारणें यांचा शोध घेतलेला असतो. अवास्तव, केवळ तार्किक व कल्पित गोष्टींवर भर दिला जात नाहीं.

अशास्त्रीय तत्वज्ञान प्रामुख्यानें अध्यात्मबद्ध होतें. अध्यात्मबद्ध स्पष्टीकरण अयथार्थ, कल्पनाप्रधान व अनुभवनिरपेक्ष असतें. उलट शास्त्रीय तत्वज्ञान मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र व साऱ्या सृष्टिशास्त्रांवर आधारलेलें असतें. शास्त्रीय विचार करणाऱ्यानें वस्तूंच्या वरकरणी देखाव्यानें भुलून जातां नये. शास्त्रांचें उद्दिष्ट वस्तूंचें खरें स्वरूप जाणून घेणें हें आहे. आणि वस्तूंचें खरें स्वरूप त्यांच्या गतींत असतें. ही गति आंतरिक असून वातावरणाशीं असलेल्या संबंधांत अन्तर्निहित असतें. परिस्थिति व परिगतींतील विरोधानें ती नियमित व विकसित होत जाते. गतीच्या ऐवजीं वस्तूंत व प्रक्रियांमध्यें स्थिति किंवा अपरिवर्तनशीलता पाहणें हें अध्यात्मबद्धतेचें लक्षण होय.

आपले विचार व भावना वस्तूंवर न लादतां त्यांची वास्तविकता पाहणें म्हणजे शास्त्रीय दृष्टिकोण स्वीकारणें होय. आपल्या भावना वस्तूंवर लादल्यास वस्तूंचें स्वरूप विकृत होऊन जातें. आपला निसर्गविषयक दृष्टि-कोन जर खात्रीलायक हवा असेल तर वस्तुनिष्ठ सत्याची कास धरणें आवश्यक आहे. वास्तव सत्यांचा शोध हें विज्ञानाचें एक प्रमुख लक्षण आहे.

विज्ञानाला दोन कार्यें करावयाचीं असतात, किंवा दोन आघाड्यांवर लढावयाचें असतें. एक कार्य म्हणजे वस्तुस्थितीला धरून बसावयाचें, परन्तु केवळ बाह्य देखाव्याला भुलून जायचें नाहीं. वस्तुस्वरूपें गोळा करावयाची परन्तु केवळ वस्तुस्वरूपांतच घोटाळत न राहतां वस्तुस्वरूपांचे सिद्धांतहि बनवायचे असतात. हे सिद्धांत बनवितांना तर्कबाजीविरुद्ध लढावें लागतें. ह्या बाबतींत गॅलिलेवचें वचन फार मार्गदर्शक आहे. तो म्हणतो, " वस्तु-स्वरूपांच्या बाबतींत सर्वसाधारण देखाव्याला बळी न पडतां आम्हीं बुद्धीच्या साधनाने पुढें जात असतों."

भारतीय तत्वज्ञानाची अध्यात्मपरता बुद्धिविकासाच्या आड येत राहिली. अर्थात संपूर्ण भारतीय तत्वज्ञान असें नव्हतें. आधिभौतिकताहि त्यांत भरपूर होती. परंतु ही आधिभौतिकता विकसित निसर्ग शास्त्रांच्या अभावी पुरेशी कार्यरत झाली नाहीं, उत्पादनाची साधनें जुनींच राहिलीं व त्यामुळें समाजांतील वर्गसंघर्ष नाहींसा करून समाजसंघटनेचा पुढील टप्पा गांठ-ण्याचें श्रेय भारताला लाभले नाहीं. उलट वर्गसंघर्ष ह्या भूमींत इतका गोठला गेला कीं, त्यांतून महाअनर्थकारक चातुर्वण्यसंस्था किंवा जाति-संस्था निर्माण झाली व सारी भारतीय संस्कृति ही पुरी शोषणसंस्कृति बनून राहिली. ह्यामुळें भारतीय तत्वज्ञानाचे जीवनदायी स्वरूप भ्रष्ट झालें.

प्रत्यक्ष उत्पादनांत भाग न घेतां जगणारे ब्राह्मण व युद्ध (म्हणजे लुटीचा धंदा) करणारे क्षत्रीय, अतिशय बहुसंख्यांक असे जे वैश्य व शूद्र त्यांचें शोषण करीत आले. राष्ट्राचें खरें उत्पादन वैश्य आणि शूद्र ह्या वर्गावर अव-लंबून होतें. म्हणूनच तर मनूची राजाला अशी स्पष्ट आज्ञा होती कीं, राजानें

ह्या दोन्ही वर्गांना आपआपलें काम करावयाला बळजबरीनें भाग पाडायला हवें; कारण त्यांनीं काम सोडल्यास सगळाच गोंधळ होईल. वैश्य म्हणजे व्यापारीवर्ग व तो धनिक होता अशी जी समजूत आहे ती चुकीची आहे. वैश्यवर्ग हा विशेषतः कारागीर लोकांचा शोषित वर्ग होता. ह्या दोन वर्गांवरच कराचा मुख्य भार पडत असे, असें महामहोपाध्याय पां. वा. काणे यांनीं आपल्या 'धर्म-शास्त्राच्या इतिहासांत' म्हटलें आहे.

आमच्या भारतांत गुलामी होती हें निर्विवाद सिद्ध झालेलें आहे. (पहा- 'इंडिया' ले. श्री. अ. डांगे, 'स्लेव्हरी इन एन्शन्ट इंडिया' ले. देवराज चनाना, 'रामराज्य और मार्क्सवाद-' ले. महापंडित राहुल सांस्कृत्यायन.) परन्तु ब्राह्मणाला मात्र गुलाम म्हणून घेतां येत नसे. ('एज ऑफ इंपीरियल युनिटी', ले.बेनी प्रसाद) 'शतपथ ब्राह्मणांत' तर 'क्षत्रीय हा शेतकऱ्यांचा खाणारा व शेतकरी क्षत्रीयांचें खाद्य' असें म्हटलें आहे. पाटणा कॉलेजचे रामशरण शर्मा म्हणतात, 'प्राचीन भारताचा राजकीय इतिहास म्हणजे भिन्न राज्यांचा आपआपसांतल्या शासकवर्गीय लढ्यांचा इतिहास होय.' (पहा. 'सम इकॉनिमिक ॲस्पेक्टस ऑफ दि कास्ट सिस्टम इन एन्शन्ट इंडिया.')

भारतीय समाज जसा शोषणानें ओतप्रोत भरलेला होता तसें भारताचें पुरोहिती—पंडिती तत्वज्ञान पुरेपूर शोषणानुकूल बनत गेलें होतें. अर्थात शोषित जनता आपले विचार मांडित होतीच परन्तु संत-साहित्य जमेला धरूनहि असें म्हणणें भाग आहे कीं, शोषक तत्वज्ञानानेंच आतांपर्यंत मैदान मारलें आहे. भारतांत मोठीं माणसें खूप होऊन गेलीं. आणि कालानुसार महान तत्वज्ञानेंहि त्यांनीं मानवाला प्रदान केलीं. परन्तु हीं तत्वज्ञानें शास्त्राच्या कसोटीला उतरत नाहींत. हजारों वर्षांची मुदत मिळूनहि ह्या तत्वज्ञानांना जग काडीभरहि सुधारतां आलें नाहीं. उलट बहुजन समाजाच्या रास्त सुखाच्या मार्गांत त्यांनीं अडथळेच अधिक निर्माण केले व अजूनहि करताहेत. बुद्ध तत्वज्ञानासारखें एवढें प्रगल्भ तत्वज्ञानसुद्धां शेवटीं कुचकामी ठरलें. जगाच्या बाबतींत खरी परिस्थिति होती ती बुद्धानें स्पष्ट सांगितली, 'सब्बं दुःखं, सब्बं अनिच्चं, सब्बं

अनत्ता', दुःख पर्वताएवढें, जग परिवर्तनशील, जग अनात्म, जगाचा नियंता म्हणून ईश्वर वगैरे कुणी नाहीं हें—सारें ठीक होतें. परंतु जग बदलावें कसें ह्याची वस्तुनिष्ठ, ऐतिहासिक, शास्त्रीय मीमांसा गौतम बुद्धाला झेपली नाहीं व त्या कालांत तें शक्यहि नव्हतें.

पहिल्या शतकांत होऊन गेलेला शून्यवादाचा प्रणेता नागार्जुन व चौथ्या शतकांत होऊन गेलेले विज्ञानवादाचे प्रणेते असंग व वसुबंधु ह्यांनीहि तत्वज्ञानांत भर घातली. 'प्रामाण्य वर्तिक'चा कर्ता धर्मकीर्ती हा तर भारताचा 'कान्ट' मानला जातो. बुद्धतत्वप्रणालीनें फार मोठे तत्ववेत्ते निर्माण केले. युरोपीय तत्वज्ञानाच्या विकासांत जें कार्य महान जर्मन तत्ववेत्ता हेगेलनें केलें, तेंच कार्य बुद्ध तत्वज्ञानाने केलें आहे. हेगेलच्या तत्वज्ञानांतून पुढें मार्क्सवादाचें शास्त्रीय तत्वज्ञान निपजलें. बुद्ध तत्वज्ञान मात्र शेकडों वर्षे तसेंच राहिलें. परंतु शास्त्रीय किंवा मार्क्सवादी तत्वज्ञानाकडे नेणारी शिडी बुद्धतत्वज्ञानाने भारतांत उभारून ठेवली आहे ही गोष्ट नाकारतां येत नाहीं. बुद्धतत्वज्ञानाला शास्त्रीय तत्वज्ञानाचें फळ येऊं शकलें नाहीं ह्याचें कारण सृष्टि-शास्त्रांच्या विकासाचा अभाव हें होतें.

महर्षि कार्ल मार्क्सनेंच पहिल्या प्रथम समाजशास्त्राच्या आधारानें जगांतील दुःखपरंपरा व त्याचीं खरीं कारणें उघडकीस आणलीं. त्यानेंच समाजविकासाचे नियम शोधून काढले, वर्ग—विग्रह समाप्तीचा सिद्धांत विशद केला आणि वर्गीय व विशेषतः भांडवलदारी अर्थशास्त्राचें रहस्य उजेडाला आणलें, तसेंच इतिहासाचा भौतिक सिद्धांत प्रस्थापित करून त्रिकालाबाधित वाटणारीं मानवी जीवनाचीं सत्यें त्यानेंच जनतेला खुलीं केलीं.

मार्क्स व त्याचा प्रज्ञावंत सहकारी एंगल्स ह्यांनीं समाजाकडे वरवर पाहून निष्कर्ष काढले नाहींत, तर त्यांनीं समाजाच्या शरीर—मानसांतील अंतर्गत गतिप्रवाह तपासून पाहिले. समाजाचें शरीरविज्ञान ( ॲनाटामी ) व इंद्रियविज्ञान ( फिजिऑलॉजी ) प्रथम त्यांनींच नीट तपासलीं व त्यांतील शोषण—स्थान शोधून काढलें. समाजाची अर्थप्रक्रिया उघड करून खरे क्रांतिकारी वर्ग हेरले. त्या वर्गांचें ( श्रमिक वर्गांचें व मुख्यतः कामगार वर्गाचें ) विश्लेषण केलें, आणि खऱ्या तत्वज्ञानाची त्या वर्गाशीं सांगड घालून दिली.

मार्क्सपूर्वींची स्थिति अशी होती: आधीं खरें तत्वज्ञानच बनलें नव्हतें. खर तत्वज्ञान म्हणजे निसर्ग, समाज व मन ह्या मूलवस्तूंच्या अधिकाधिक वास्तव कल्पना व त्यांचें संश्लेषण. मार्क्सपूर्व तत्वज्ञान निसर्ग व समाज ह्या दोन्ही बाबतींत अवास्तव आहे. जी काय प्रगति दिसते ती मनाच्या कल्पनेबाबतींत. परंतु ह्या दृष्टीनेंसुद्धां मानसशास्त्रीय पातळीवर येतील अशा कल्पना फारच थोड्या. शिवाय अशा दर्शेंतलें जें काय तत्वज्ञान होतें तें सुद्धां खऱ्या क्रांतिकारी वर्गाशीं निबद्ध नव्हतें. क्रांतिकारी वर्गहि भांडवलशाही समाजरचनेंत जसा तयार होतो तसा क्रांतिकारी स्वरूपांत तयार झालेला नव्हता. अशा परिस्थितींत मार्क्स व एंगल्सनें खरें तत्वज्ञान खऱ्या स्वरूपांत सच्चा क्रांतिकारी वर्गाशीं अस्सल संबंधानें निगडित केलें. आणि ह्या साऱ्या अतिप्रचंड खटाटोपाला नांव कांहींहि दिलें तरी ही गोष्ट बिलकूल सत्य आहे की ह्या खटाटोपाला यश येऊन जग बदलत गेलें; आज तें वेगानें बदलत आहे व सर्व जग एका अननुभूत अशा उच्चावस्थेंत पदार्पण करण्याची शक्यता आज निर्माण झाली आहे.

समाजजीवनांत एवढा पायाभूत बदल घडवून आणण्याची शक्ति जगांतील एकाहि तत्वज्ञानाला अजून लाभली नव्हती. आजवरच्या धार्मिक तत्वज्ञानांनीं उलथापालथी केल्या; विजय मिळवले; धर्मांच्या नावानें साम्राज्येंहि स्थापन केलीं; देशामागून देश पादाक्रांत केले; प्रचंड प्रमाणावर रक्तपात केले; परंतु मानवी जीवन-संबंधांना हात घालणें, त्यांतलें शोषण नाहींसें करणें त्यांना शक्य झालें नाहीं. शोषणावर आधारलेले भूतकालांतले सारे मानवी संबंध मुळापासून बदलण्याचें कंकण फक्त मार्क्सवादी तत्त्वज्ञानच बांधून उभें आहे. भूतकालांत कधींहि न पाहिलेला मानव निर्माण करण्यांत मार्क्सवाद गुंतला आहे. हें इतकें मूलगामी तत्वज्ञान असूनहि त्याला इतक्या लौकर एवढें प्रचंड यश मिळावें हें मार्क्सवादाच्या अघोरी विरोधकालासुद्धां विचार करावयास लावणारें आहे.

मग मार्क्सतत्वज्ञानाच्या भरमाप यशाचें कारण काय? कारण एकच. मानवाचीच चिंता करणारें व तेंहि समाजाच्या दृष्टींतून करणारें तत्वज्ञान मार्क्सपूर्वी एकहि उगवलें नव्हतें. **धर्मसंस्थापकांनीं मानवाची चिंता केली नाहीं असें नव्हे. परंतु ईश्वराची चिंता त्यांना माणसांपेक्षां अधिक होती.** आणि

जगाची चिंता एक तर त्यांनीं ईश्वराकडे सोपविली किंवा स्वतः केलीच तर कल्पित ईश्वराच्या दृष्टींतून; जिवंत हाडामांसाच्या व प्रामुख्यानें समाजांत वावरणाऱ्या माणसाच्या दृष्टींतून नव्हे. कवि रेव्हरंड टिळक एका ठिकाणीं म्हणतात, 'जगाची ह्या चिंता करी तूंच स्वामी। सांगितल्या कामीं ठेवी मज' ॥ अशा प्रकारची परावलंबी विश्वचिंता किंवा परमेश्वरचिंतन सचें मानवी चिंतन ठरणें शक्य नव्हतं. त्यांत तेवढी उर्मि, तेवढी मानवतेची ऊब येऊंच शकली नाहीं म्हणूनच त्यांचें तत्वचिंतन मानवी जगांत निर्णायक व इष्ट परिवर्तन घडवून आणून मानवाला सुखी करूं शकलें नाहीं.

मानवाला परकी असलेल्या ह्या ईश्वरचिंतनामुळें आतांपर्यंत हजारों वर्षे मानवी बुद्धि बरीच वायां गेली. एवढें कशाला, ज्ञानेश्वरच घ्याना. प्रभुपाशीं आपलें पसायदान मागतांना ते विनवतात,

**आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।**
**तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ॥ ( १७९३ )**
**जे खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रति वाढो ।**
**भूतां परस्परें पडो मैत्र जीवाचें ॥ ( १७९४ )**
**दुरितांचें तिमिर जावो । विश्वस्वधर्मसूर्यें पाहो ।**
**जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥ ( १७९५ )**

ज्ञानेश्वराची ही मनधरणी देवानें धुडकावून लाविली व अतिशय दारुण दुःखाचे प्रहार महाराष्ट्राला सोसावे लागले. ज्ञानेश्वरीच्या शेवटीं ज्या रामराव यादवाचा धर्मनिष्ठ, न्यायपोषक श्रीरामचंद्र म्हणून गौरवपूर्ण उल्लेख ज्ञानेश्वरांनी केला, तोच न्यायपोषक राजा १२९४ व त्यानंतर १३०६ त पराभूत झाला व पुढें मग १३१८ त स्वराज्यच नामशेष झालें. ही झाली ज्ञानेश्वरांच्या पुस्तकी क्रांतीची फलश्रुति !

वांछापूर्ति राहिली दूर. पोटाची खळगी भरण्याची पंचाईत ब्रह्मसमंधासारखी आजतागायत आमच्यामागें लागली आहे. वांछापूर्ति ही गोष्ट कोणी दान देण्याची चीज नसून मानवानेंच त्याच्याकरतां इतिहासाला धरून सामुदायिक प्रयत्न करावयास हवेत. मानव-सुखाला भक्षण करणारें कांहीं मूठभर माणसांनीं

चालवलेलें शोषण नाहींसें केलें पाहिजे. इतिहास बदलावयाला पाहिजे. जीवनाची दिशा व्यक्तिवादाकडून समाजवादाकडे वळवायला पाहिजे. परिस्थिति शोषणाला प्रतिकूल बनवून मानवी मनांतली शोषणाची कल्पना धुवून काढली पाहिजे. ह्या गोष्टी माहित नसल्यामुळें संत ईश्वरापाशीं दान मागते झाले.

ज्ञानेश्वर योगीराज होते, तुकाराम सदेह स्वर्गाला जाते झाले वगैरे किती तरी गोष्टी सांगण्यांत येतात. परंतु संतांचा योग, ध्यान धारणा वगैरे संतांकरतांच असतात. अध्यात्मिक प्रताप इतिहासाला, समाजाला बदलूं शकत नाहींत. कारण जग बदलणें ही सामाजिक गोष्ट, तर संतांची करामत ही त्यांची वैयक्तिक बाब. वैयक्तिक बाबी ठराविक मर्यादेपलीकडे मनरंजन किंवा आत्मप्रतारणा ह्या पलीकडे फारसें कांहीं साधूं शकत नाहींत. आक्रोश आणि प्रार्थना हीं ज्या चिंतनाचा गाभा आहेत तें तत्वचिंतन मानवाला काय सुखी करणार? फत्तर! तें मानवाचें तत्वज्ञानच नव्हे. तें तत्वज्ञान मानवाला परकें आहे. फक्त तें त्याला अजून पुरतें उमगलें नव्हतें एव्हढेंच.

परंतु आज हजारों वर्षें असल्या प्रार्थना करणाऱ्या तत्वज्ञानानें मानवाच्या मनाचा जो ताबा मिळविला तो कसा? अर्थात ह्याचें उत्तर असें: इतिहास-कालांतील ठराविक टप्प्यांतला माणूसच ह्या परक्या चिंतनाला बळी पडला. हा टप्पा म्हणजे मानवी इतिहासांतला वर्गीय समाजरचनेचा टप्पा होय. ह्या टप्प्यांत नाना धर्म निर्माण झाले. हे सारे धर्म परस्परविरुद्ध वर्गीय हितसंबंधांनुसार वेगवेगळे व आपआपसांत लढणारे असले तरी शास्त्रीय दृष्ट्या त्या सर्व धर्मांचें मूलतत्व एकच,–**विषमतेची उग्रता स्वप्नाच्या पेल्यांत बुडवणें, वास्तवतेच्या वज्र–काठिण्याला कल्पिताच्या कैफांत विरघून टाकण्याचे प्रयत्न करणें.**

मार्क्स आणि एंगल्स हेच जगांतले पहिले शास्त्रीय तत्ववेत्ते होते, ज्यांनीं माणसांची चिंता माणसांकरितां वाहिली व तीहि मानवी सुखाच्या स्वाभाविक दृष्टींतून व पूर्ण वस्तुनिष्ठ पद्धतीनें. म्हणूनच आपलें जग काय आहे, ह्या जगांत मानवाचें स्थान काय, मानवाचा स्वभाव काय ह्याचें स्पष्ट दर्शन ते जगाला घडवूं शकले. सुखाच्या आशेचा, स्वसामर्थ्याचा, पौरुषाचा एक नवा मार्ग ते प्रस्थापित करूं शकले. हा मार्ग आज राजरस्त्यासारखा प्रशस्त मार्ग बनला आहे. हितसंबंधवाले,

भांडवलदारांचे कांहीं बुद्धिजीवी आश्रित व पुराणपंथी लोक अजूनहि बुरशीचीं तत्वज्ञानें व जुने विचार उगाळीत बसलेले आहेत. हे मूठभर लोक सोडले तर सारी मानवता मार्क्सच्या शास्त्रीय तत्वज्ञानाच्या मार्गानें जावयाला आतुर झाली आहे.

कट्टर ईश्वरवादीसुद्धां हें मानायला तयार होतील कीं त्यांचा परमेश्वर जर कुठें कानाकोपऱ्यांत असलाच तर तोहि प्रामुख्याने फक्त मानवाचीच चिंता करणाऱ्या मानवतावाद्यांना आधीं पावेल. कारण, 'न मानुषात् श्रेष्ठतरंहि किंचित्' मानवापेक्षां श्रेष्ठ दुसरें कांहींच नाहीं असें खुद्द महाभारतांतच म्हटलेलें आहे.

आमच्या पूर्वाचार्यांना वर्गीय समाजरचनेने निर्माण केलेल्या मानवद्रोही वातावरणांत वावरत असून सुद्धां ईश्वर चिंतेच्या परकीपणाचा अधूनमधून संशय यंत होताच. विपरीत जाणीवेच्या रूपाने ईश्वर-चिंतनाचा हा परकेपणा त्यांनाहि अधून मधून जाणवल्याशिवाय राहिला नाहीं.

फार पुरातन चिनी धर्मकार कन्फ्युशस म्हणतो, 'आम्हाला अजून धड माणसांची सेवा करतां येत नाहीं असे आम्ही ईश्वराची सेवा काय करणार !' ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं प्रच्छन्न संशय घेणारे कमी लोक होऊन गेले नाहींत. बुद्धधर्म, जैनधर्म बोलून चालून अनिश्वरवादी. खुद्द वेदान्ताचें ईश्वर मानणें वरपांगीच होतें. वेदान्तानुसार ईश्वराचें काम जगाची सृष्टि, धृति आणि संहार करणे. परंतु त्यांचें ब्रह्म मात्र निष्कल्प आणि निष्क्रीय !

शंकराचार्य प्रच्छन्न बुद्धच होते. त्यांनींच बुद्धाला 'योगिनां चक्रवर्ति' असें म्हटलें आहे. निरीश्वरवादी सांख्य प्रसिद्धच आहेत. त्यांच्याबद्दल भगवद्गीतेंत खुद्द भगवानच सांगतात, 'सिद्धानां कपिलो मुनिः' (सिद्धापैकी कपिल मुनि तो मीच.) आणि महामुनि कपिल तर ईश्वराला असिद्ध मानणारे.

चार्वाकहि एकटा नव्हता. निरीश्वरवाद्यांची एक लोकायत परंपराच भारतांत होती.

वर्गीय समाजरचनेतील मर्यादित ज्ञानविज्ञान विकास वगैरे गोष्टींमुळें मानवाला मानव परका होऊन परकी ईश्वर आपला झाला. उलट मार्क्सवादी वर्गहीन समाजरचनेत मानवाला प्रामुख्यानें मानव आपला होऊन ईश्वरकल्पना परकी झाली आहे.

मार्क्सवाद पोकळ तर्क मानीत नाहीं. तो असलें अनुमान किंवा तर्क मानतो ज्याचें समर्थन वस्तु करतात. 'प्रमाणमभिसंवादि ज्ञानम्'. शास्त्र ( विज्ञान ) फक्त तर्कसिद्ध गोष्टीला मान्यता देत नाहीं, तर प्रयोगसिद्ध गोष्टी मानतें; 'अर्थ क्रिया समर्थयत् तदर्थ परमार्थ सत्', म्हणून मार्क्सवाद केवळ उपयोगवादी (प्रॅगमॅटिस्ट) आहे असें मात्र नव्हे. उपयोगवाद वस्तूंचें मनाबाहेरील अस्तित्व मानीत नाहीं. उपयोगवाद वरवर दिसावयाला जरी मार्क्सवादासारखाच प्रगत बुद्धिनिष्ठ भासला तरी तो तसा नाहीं. कारण चिंतनाच्या गाभ्यांत तो आदर्शवादी किंवा आत्मवादीच ( सब्जेक्टिव्ह आयडियालिस्ट ) आहे.

मार्क्सवादविरोधी तत्वज्ञानें सत्याला लपवितात, चेपतात, जुमानत नाहींत. वास्तवतेला स्वप्नमयतेंत विरवून टाकण्याची खटपट करतात. वस्तुसत्य सत्य नाहीं असें सांगून वास्तवतेशीं प्रतारणा करतात. बरोबरच आहे, अप्रिय सत्याला बगल देण्याच्या खटपटींतूनच आत्मवाद निघाला आहे.

शास्त्रीय तत्वज्ञान वास्तवतेला शिरोधार्य मानतें. वास्तवतेची छाननी करून तें त्यांतील गति नियंत्रित करणारें द्वंद्व किंवा अंतर्विरोध हुडकून काढतें. परंतु तें तिथें थांबत नाहीं. अंतर्विरोधाचा पुरोगामी जिवंतपणा हेरून अंतर्विरोधाची मरणोन्मुख प्रतिगामी अवस्थाहि तें तपासतें व त्याप्रमाणें प्रगत व्यवहाराद्वारें मिळवलेल्या ज्ञानानें वस्तुच्या प्रक्रियेंत हात घालून ती वस्तु किंवा ती प्रक्रिया बदलणें हा मार्क्सवादी किंवा शास्त्रीय तत्वज्ञानाचा आशय आहे. अशा रीतीनें ती वस्तु किंवा ती प्रक्रिया किंवा घटना माणसाच्या उपयोगांत आणली जाते. माणसाचें जीवन तेवढ्यापुरतें समृद्ध केलें जातें, सार्थक केलें जातें, म्हणजे मुक्त केलें जातें. व्यवहारोत्पन्न ज्ञान माणसाला त्या त्या वासनेपुरतें, त्या त्या घटनेपुरतें मुक्त करीत जातें. मार्क्सवादी ज्ञान जीवनाच्या क्षणाला व हळूहळू संपूर्ण जीवनाला सार्थक करीत जातें. वस्तूंच्या प्रक्रियेंत हात घालून वस्तूला व घटनेला वास्तवांतच बदलण्याच्या पुरुषार्थानें शास्त्रीय तत्वज्ञान किंवा मार्क्सवाद जग सुखी करूं शकतो. उलट वस्तूंतील अंतर्विरोधाला बगल देऊन सत्य कसेंहि असो; बरें असो किंवा वाईट असो, मी तें माझ्या आत्मशक्तीनें पचवणार ह्या असामाजिक बुद्धीनें अमार्क्सवादी लोक जगाला अधिक दुःखी बनवत आले आहेत. आसक्तिप्रवण

कर्मयोगानेच खरें ज्ञान व खरी सार्थकता प्राप्त होते ती अशी. वस्तुत्व बदलून मानव त्या त्या वस्तू किंवा घटनेपुरता स्वतंत्र मुक्त होतो. 'ज्ञानान्मोक्षः' ह्याचा मार्क्सवादी अर्थ असा आहे. अनिवार्यतेपासून वास्तव स्वतंत्रता म्हणजे मोक्ष होय अशी मार्क्सवादाची धारणा आहे व अर्थशक्तीच्या गुलामगिरींतून मुक्त झालेला माणूस ह्या खऱ्या मोक्षाच्या जगांत पदार्पण करणार आहे असें मार्क्सवादी तत्व आहे. मार्क्सवादी कर्मयोगाची ती अटळ फलश्रुति आहे. म्हणूनच मार्क्सवाद हें मानवाच्या तत्वज्ञानाचें सार्थक्य आहे असें आम्हीं म्हणतों.

अशा तत्वज्ञानाला देश विदेश लागत नाहीं. तें सार्वदेशिक असतें. तथापि मार्क्सवादा, विदेशी आहे असें म्हणणारे लोक आहेतच. यांचें कारण उघड आहे. जींत माणसाला आपुल्की वाटते, तिला तो आपली म्हणतो व आपुल्की वाटत नाहीं तिला परकी कृत्रिम समजतो. हितसंबंधी वर्गाला मार्क्सवाद आपलासा वाटणे एकंदरीत असंभवच आहे. शिवाय दुसऱ्या एका कारणामुळेंहि मार्क्सवाद कांहींना आपलासा वाटत नाहीं. तें कारण म्हणजे मार्क्सवादाच्या उत्पत्तीविषयींचें अज्ञान.

मार्क्सवाद किंवा शास्त्रीय तत्वज्ञान हें कुठल्या एका व्यक्तीने किंवा एका देशाने निर्माण केलेलें तत्वज्ञान आहे काय ? मुळीच नाहीं. मार्क्स–एंगल्स हे जन्मभूमीने जर्मन तर कर्मभूमीने कांहींसे इंग्रज. मार्क्सवादाचा प्रयोग जिथे चालू झाला तो देश रशिया. जिथे मार्क्सवाद अतिवेगाने वाढतो आहे तो चीन आशिया-खंडांतला देश. मार्क्सवादी लेनिनवादी राष्ट्रं जगाच्या त्रितियांश भागावर समाजवाद निर्माण करीत आहेत. जिथें मार्क्सवादी लेनिनवादी पार्ट्या वावरताहत त साऱ्या जगाचें क्षेत्रफळ. मार्क्सवादी तत्वज्ञानाचा पुरुषार्थ जिथें चिन्हांकित केला गेला तो अंतराळांत फिरणारा चंद्र ! तेव्हां अशा विश्वव्यापी तत्वज्ञानाला परकें म्हणणं हे अप्रबुद्धपणाचें लक्षण नाहीं काय ?

मार्क्स तत्वज्ञानाचं बीज जर्मन तत्वज्ञानांत आहे ही गोष्ट जगजाहीर आहे. जर्मन तत्वज्ञान–फ्रेंच समाजवाद–इंग्रजी अर्थशास्त्र ह्यांचा परिपाक म्हणजे मार्क्स-वाद. जर्मन तत्वज्ञान हें जागतिक तत्वज्ञानाचें शिखर होय असेंच सर्वसाधारण मानण्यांत येतें. मग ह्या तत्वज्ञानाचा किंवा तत्कालीन जर्मन विद्येचा विशेष

कोणता तें पहावयाला पाहिजे. लो. टिळकांचे उद्गार अजून आम्ही विसरलों नाहीं. ते म्हणाले होते, कीं संस्कृतचा जर का परिपूर्ण अभ्यास करावयाचा असेल तर भारतीयांनासुद्धां जर्मनींतच जावें लागेल. भाषाशास्त्राच्या विद्यार्थ्यांना हें माहित आहे कीं भाषाशास्त्राला, विशेषतः तौलनिक भाषाशास्त्राला शास्त्राच्या पायरीवर जर कोणी नेऊन ठेवलें असेल तर तें जर्मनीने. भाषाशास्त्राच्या विद्यार्थ्यांना आतां आतांपर्यंत ग्रीम व बॉप ह्यांचे नियमच घोकावे लागत असत. जर्मनींतले बहुतेक तत्वज्ञ भाषाशास्त्रज्ञ होते, किंवा इतर भाषांतलें ज्ञान त्यांनीं आत्मसात् तरी केलें होतें. अन्यदेशीय तत्वज्ञानांप्रमाणें जर्मनांनी आमच्या भारतीय तत्वज्ञानाचाहि कसून अभ्यास केला होता. त्या वेळचें जर्मन तत्वज्ञान भारतीय तत्वज्ञानांत मुरलेलें होते असें म्हटलें तरी चालेल. १९ च्या शतकांत फ्रिडरीख श्लेगलने 'भारतीय भाषा आणि ज्ञान' हा ग्रंथ लिहिला. जैकब ग्रिमने 'देवभाषा व्याकरण' लिहिलें. तसेंच बॉप, रैस्क, हंबोल्ट, स्लाइशर वगैरे विख्यात बहुभाषाविद जर्मनींत होऊन गेले. तीच गोष्ट चिनी तत्वज्ञानाच्या अभ्यासाची. एका टाओ ग्रंथाचे ९ अनुवाद जर्मन भाषेंत होते. जर्मनींत इतर पौर्वात्य देशांतील तत्वज्ञानांच्या अभ्यासाचीहि तशीच सोय होती.

जर्मन तत्वज्ञान हें जागतिक तत्वज्ञानावर पुष्ट होऊन वाढलें होतें. निसर्गशास्त्रांचा विकास व जागतिक तत्वज्ञानाचा अभ्यास ह्यांच्या संगमांतून जर्मन तत्वज्ञानांत गुणपरिवर्तन घडून आलें होतें. हेगेलच्या तत्वज्ञानांत हें गुणपरिवर्तन प्रकट झालें. तत्कालीन तत्वज्ञानाचा सर्वश्रेष्ठ ज्ञानसागर ज्याला म्हणतां येईल तो हेगेलच होता आणि तोच मार्क्स एंगल्सचा गुरू होता.

मार्क्स–एंगल्सनीं आपल्या गुरूचें तत्वज्ञान घेऊन त्यांत आमूलाग्र बदल केला. सृष्टिशास्त्राचें वाढतें ज्ञान, जागतिक इतिहासाचें समालोचन, अर्थशास्त्राचें गंभीर अध्ययन, गणिताचा जबरा व्यासंग, अनेक भाषांचें ज्ञान, अनेक साहित्यांत अवगाहन, सार्वदेशिक जनसंघटनांचा अनुभव वगैरे गोष्टींच्या मंथनांतून जगदुद्धारक तत्वज्ञान किंवा क्रांतिकारक कृतीचें शास्त्र निर्माण झालें. अशा विश्वव्यापी तत्वज्ञानांत किंवा सार्वजनिक कृतिशास्त्रांत कोणत्या संस्कृतीचा किती भाग व कुठल्या देशाचें किती ऋण हें ठरविणे महाकठीण कर्म आहे. म्हणूनच मार्क्सतत्वज्ञान सगळ्या देशांचें व सगळ्या लोकांचें आहे. त्याला परकी मानणें हें देशाच्या प्रगतीला विघातक आहे.

अखेरच्या आठ दहा शतकांतील भारतीय विचारांचें ठसठशीत वैशिष्ट्य म्हणजे जीवनाच्या ऐहिकतेकडे बेपर्वाईनें पाहणें हें होय. ह्यावरून भारतीय समाज वास्तवांत असा बेपर्वाईने जगला असें मात्र नव्हे. ऐहिकतेची ओढ व भोगांची जबर आस्था भारतीय समाजालाहि असणें साहजिकच होतें. परंतु विचाराच्या प्रांतांत मात्र सुतकीपणा व पारलौकिकता सरांस आढळून येते. अर्थात ह्या वस्तुस्थितीला वर्गीय समाजाचा केवळ तात्पुरता ऱ्हासच नव्हे तर भारतीय समाजाचें गतिशून्य अवस्थेंत दीर्घकाल पडून राहणें व भारतीय संस्कृतीची विशिष्ट घडण ह्या गोष्टी जबाबदार आहेत.

चीनमध्येंहि वर्गीय समाजरचनाच होती. परंतु त्यांची वैचारिक ऐहिकता नष्ट झाली नाहीं. कितीहि वेगवेगळे विचारक असोत, (लाओत्से, चुंआंगत्से, कन्फ्युशस, मेन्सियुश, मोत्से वगैरे) परंतु त्या सगळ्या विचारकांनीं ऐहिकतेवर भरच दिला आहे. ही ऐहिकताहि केवळ निर्गुण निराकार नव्हे तर ह्या ऐहिकतेचा आशय मानवतावादी असून आकार जनताभिमुखी होता. ईश्वर वगैरे विचारांना चीनी तत्वज्ञानांत नेहमींच दुय्यम स्थान मिळालें आहे. चीनी तत्वज्ञान कितीहि खोल किंवा उंच जावो, तें तत्वज्ञान मुख्यतः पृथ्वीवर मानवाचे प्रश्न सोडवणारें असेंच आहे. सत्पुरुषांचीं लक्षणें सांगतांना कन्फ्युशसला जेव्हां त्सेकुंगने एक प्रश्न विचारला कीं 'मानवाचा कल्याणकर्ता आणि मदतगार अशा माणसाला तुम्ही सत्पुरुष म्हणाल काय?' त्यावर त्याने उत्तर दिलें, 'असा पुरूष केवळ सत्पुरूषच नव्हे तर तो दिव्यदृष्टीचा महर्षि आहे.' परंतु असें असूनहि तो देश समाजविकासाच्या नियमांप्रमाणे भूदास पद्धतींत थिजला जाऊन मग साम्राज्यशाहीच्या दाढेंत गेलाच. हें उदाहरण देण्याचा हेतु एवढाच कीं जवळच्या एका अतिप्राचीन महान देशाच्या उदाहरणावरून आमच्या तत्वज्ञानाच्या घडणीवर प्रकाश पडावा. आमच्या तात्विक पारलौकिकतेचीं पुष्कळ कारणें आहेत. दीर्घकालीन वर्गीय समाजरचनेनें निर्माण केलेलें कर्मवैफल्य किंवा जीवनकुंठा हें त्यांतील एक प्रधान अंतर्मानसिक कारण होय. सामाजिक कारणांत जातीयवाद ही मानवी अवनतीची परमावधी होती व असा दुर्दैवी समाज ऐहिकतेकडे डोळे उघडून कसा पाहूं शकणार?

भारतीय संस्कृतीच्या घडणींत दोन आर्येतर विचारपरंपरा मिसळल्या

आहेत असें दिसतें. एक सेमेटिक किंवा बाबिलोनियन व दुसरी द्राविडी. सेमेटिक विचारपरंपरेचा ज्यु, ख्रिस्ती आणि महंमदी धर्मांवर फार परिणाम झालेला आहे. ही परंपरा निसर्गाच्या भयाणतेंतच वाढलेली आढळते. वारंवार होणारे जलप्रलय, जीवन कोळपून टाकणारीं अरेबियन वाळवंटें वगैरे अनेक भौगोलिक संकटांच्या घाल्याला सेमेटिक जनतेला तोंड द्यावें लागलें आहे. निसर्गाच्या कोपाला त्यांना सतत बळी पडावें लागलें आहे. त्यामुळे जीवनाबाबतचा त्यांचा दृष्टिकोन भूताने पछाडल्यासारखा विलक्षण दुःखवादी, ईश्वरावलंबी किंवा परलोकवादी ठरला असल्यास नवल नाहीं. मेडिटेरेनियन समुद्राच्या लहरीवर ज्यांचें जीवन–मरण अवलंबून होतें असे लोक ह्या शाखेंत येतात. बेइमान धरित्रीने त्यांना आकाशाकडे फेकलें होतें. निसर्गमातेने त्यांचा कडेलोट केला होता. त्यांना धरतीच्या कवनांपेक्षा दूरदूर असणारें कल्पित आकाशकाव्य अधिक परवडलें. तथापि त्यांची ऐहिकता पुरी नष्ट झाली होती असें मात्र नव्हे. ऐहिकता ही चीज कधींच नष्ट होत नाहीं; ती भ्रष्ट होते. मानवसंस्कृती या सेमेटिक शाखेंत ती अधिक भ्रष्ट झालेली आढळते.

भारतीय संस्कृतींत मिसळलेली दुसरी परंपरा द्राविडी होय. ही परंपरा सुद्धां बरीचशी पारलौकिकाकडे झुकलेलीच होती. ह्या लोकांना सागर सतत गिळंकृत करीत आला आहे. हे लोक मूळ ऑस्ट्रल म्हणजे दक्षिण खंडांतले. ज्या मानाने उत्तर खंडें वरवर येत गेलीं त्या मानाने दक्षिण खंडें किंवा ऑस्ट्रेलेशियन खंडें सागरांत बुडत गेलीं व हे दक्षिणखंडी लोक हळूहळू भारतद्वीपाच्या दक्षिणेकडे वरवर चढूं लागले. हे सागरग्रस्त लोकहि ह्या कारणामुळें कमी रसिक किंवा निरिच्छ होते असें मात्र नव्हे. जीवनाची ऐहिकता तशी कोणालाच कधी सोडीत नाहीं. दक्षिण खंडी लोकांनीं मोठमोठी राज्यें रचलीं असण्याचा संभव आहे. मोहनजोदाडो, हराप्पा वगैरे ह्या लोकांचीच कामगिरी असावी असें म्हणण्यास हरकत नाहीं. मातृसत्ताक पद्धति ह्या लोकांत सर्रास चालू होती. एका प्रचंड वर्गीय संस्कृतीची उभारणीहि त्यांनीं केली असण्याचा संभव आहे व त्या संस्कृतीचा नाशहि त्यांनीं त्याच वर्गीयतेमुळें ओढवून घेतला असणें शक्य आहे. वर्गीय समाजांत निर्माण

होऊं शकणारें ज्ञानविज्ञानहि त्यांनीं उपभोगलें असण्याचा संभव आहे. ह्यावरून एकेकाळीं भारतहि ज्ञानविज्ञानांत पुढें होता असें म्हणणे धाष्ट्र्याचें ठरणार नाहीं. परंतु हें सारें होतें वर्गीय स्वरूपाचें आणि म्हणूनच तें अंतर्विरोधानें रसातळाला गेलें. द्राविडी शास्ता वर्ग वर्गीयतंत्त मुरलेला होता. हिंदुधर्माचे प्रकांड आचार्य द्राविड देशांतले. त्यांनी उत्तरेला आपल्या तत्त्वज्ञानाच्या प्रभावांत आणून जबर पारलौकिकता भारतीय संस्कृतींत ओतली असावी असें दिसतें.

साऱ्या जगांतच तत्वज्ञानाचा घोटाळा हा एक ब्रह्मघोटाळा होता व ह्या घोटाळ्याचा फायदा शोषकवर्ग पुरेपुर उठवीत आला आहे. अशा दशेंत मार्क्स-एंगल्सने एका भव्य जगाच्या उभारणीचें तत्वज्ञान जगाला दिलें आहे. कारुण्यमय जगाची करुणा, संतांचीं समतेचीं स्वप्नें वगैरे सारें भव्य व दिव्य, प्रेयस व श्रेयस मार्क्सवादांत अंतर्भूत आहे. परंतु मार्क्सवादाचें यश मात्र केवळ ह्या गोष्टींवर अवलंबून नाहीं. कारण प्रारंभापासूनच मानवता आपल्या भल्याकरतां रडते आहे, लढतेहि आहे. परंतु केवळ मानवतावादी भव्यतेच्या प्रभावामुळें न्यायी रचना आपोआप उगवणार आहे असें मात्र नव्हे. तर चालू अन्यायी समाजरचनेचा पाया भांडवलशाहीकडून घातला गेला व ही समाजरचना वर्गीय अंतर्विरोधामुळें पोखरली जाऊन कोलमडत आहे. अर्थात विचारांना महत्व आहेच. परंतु तें निर्णायक नव्हे. निर्णायक महत्व असतें वस्तुस्थितीला. वस्तुस्थितीला धरून असणारे विचारच विजयी होतात. मार्क्सवादी मानवतावादाचे विचार सामाजिक वस्तुस्थितीला धरून आहेत म्हणजे ते वास्तव आहेत, म्हणूनच सामर्थ्यवान आहेत.

जी अर्थशक्ति भांडवलशाहीने नव्यानेच उदयाला आणली तिचा अटळ परिणाम म्हणजे क्रांति होय. समाजाला जीवनदायी अशी जी अर्थशक्ति तिचा पुढील विकास भांडवलशाही होऊं देत नाहीं. आपणांला खोट येऊं नये म्हणून खाजगी मालकीच्या बंधनांत तिला ती जखडून टाकते त्यामुळें समाजांत दुर्दशेचा कहर होतो आणि म्हणून क्रांतीला सुईणीचे काम करावें लागतें. हे काम शांतीच्या मार्गानें करतां आलें तर एकहि मार्क्सवादी तें हिंसेने करण्याचा आग्रह धरणार नाहीं.

अर्थात क्रांतीचा मार्ग हिंसा की अहिंसा हें भांडवलशाहीच्या करणीवर अवलंबून असतें. वस्तुतः भांडवलशाहीच समाजवादाचा हा मार्ग रक्तांकित करीत असते. कांहीं विरोधक मार्क्सवाद आणि हिंसा ह्या दोन गोष्टींचा अभेद्य संबंध आहे असें समजतात. परंतु सुदैवानें देशांत कांहीं सज्जन विरोधक असून ते हा भांडवलदारी प्रचार खोटा आहे हें जाणतात व तसें जाहीरहि करतात.

मार्क्सवादाकडे क्रांतिकारक कृतीचें तत्वज्ञान व क्रांतिकारक तत्वज्ञानाची कृति अशा दोन्ही दृष्टींतून पाहतां येतें. ह्या दोन्ही दृष्टींची एक अपूर्व एकता मार्क्सवादांत आढळते. मार्क्सवादाच्या सूक्ष्म चिकित्सेंत मार्क्सवादांतले हे दोनहि पीळ स्पष्ट दिसूं लागतात. परंतु ह्या दोन पीळांनी विणला गेलला मार्क्सवादाचा रज्जू इतका मजबूत आहे कीं त्यांत भव्य कृति कोणती व भव्य कृतीचें अचूक तत्वज्ञान कोणतें तें समजणें विरोधकांना कठीण जातें. कारण मार्क्सवाद हें इतर तत्वज्ञानांप्रमाणे केवळ चिंतनशील तत्वज्ञान नव्हे हें ते विसरतात. सामुदायिक कृति हें मार्क्सवाद्यांचें प्रथम कर्तव्यच नव्हे तर ती त्यांची अटळ प्रेरणा असते. ज्ञानकर्मसमुच्चय हा त्यांचा जीवनरस असतो. केवळ तत्वचिंतनाकरतां तत्वचिंतन, सत्यतृष्णा, नुसती ज्ञानलालसा वगैरे गोष्टी मार्क्सवादांत बसत नाहींत. त्याच-प्रमाणे मी माझ्या ग्रंथाद्वारें सत्य प्रकाशित करून अमर होईन वगैरे पुस्तकी अभिलाषाहि मार्क्सवादांत बसत नाहीं. ही अभिलाषा अज्ञाणतेपणाचें खास लक्षण आहे. कारण सत्य गतिमान असल्यामुळें कोणालाहि कायमचें अमर सत्य माहित असणे शक्य नसतें. म्हणूनच शब्दप्रामाण्य, पोथीनिष्ठा वगैरे गोष्टींना मार्क्स-वादाचा सख्त विरोध आहे व त्यामुळें मार्क्सवाद सदासर्वदा नवनवोन्मेषशाली असतो व अंतीं व्यक्तिपूजेचा समूळ नाश करणारें तत्वज्ञान ठरतो.

मार्क्सवादापर्यंतचें जनतेचें तात्विक जीवन धर्मसंस्था व्यापून राहिली होती. धर्म दोन फुफ्फुसांवर जगत असतो. एक फुफ्फुस प्रकृतीचें अज्ञान हें व दुसरें फुफ्फुस सामाजिक विषमता हें. मार्क्सवादाचें शास्त्रीय तत्वज्ञान प्रगत विज्ञानावर आधारलेलें असल्यामुळें धर्माचें एक फुफ्फुस केव्हांपासूनच जायबंदी होऊन राहिलेलें आहे. धर्माचें दुसरें फुफ्फुस जें वर्गीय समाजरचना तें आज जगाच्या अर्धांगावरून वेगानें नाहीसें होत आहे. प्रश्न आहे तो बाकी भांडवलदारी

अर्धांगाचा. जगाच्या ह्या भांडवलदारी अर्धांगालाच आज शास्त्रीय तत्वज्ञानाची अधिक गरज आहे.

गांधीजी एकदां म्हणाले होते, कीं आपण खुद्द माणसालाच बदलून त्याकरवीं परिस्थिति बदलूं पाहतों तर मार्क्स परिस्थिति बदलून माणसाला बदलतो. वरवर पाहिल्यास हा फरक महत्त्वाचा वाटतो. कारण मार्क्सवाद परिस्थिति बदलण्याची पराकाष्ठा करतो हें खरें आहे. परंतु तत्त्वमीमांसेच्या दृष्टीने हा फरक दिशाभूल करणारा आहे. शब्दांनी गांधीजी कांहीं म्हणाले तरी, परिस्थिति बदलल्याशिवाय केवळ उपदेशाने माणूस बदलेल असें त्यांनाहि वाटत नव्हतें. म्हणूनच ते म्हणतात, 'कोट्यवधी लोक बेकारीमुळें उत्तरोत्तर अधिकाधिक पतित होत आहेत. त्यांची आत्ममर्यादा नष्ट झाली आहे आणि त्यांची ईश्वरावर कांहीं श्रद्धा राहिलेली नाहीं. कल्पना करा, 'किती भयानक संकट आहे! त्याना ईश्वराचा संदेश ऐकवण्याची हिंमत मी करूं शकत नाहीं.' ( सर्वोदय १५–१०–३१ )

आठ वर्षांनंतर ते परत म्हणाले, 'जो भुकेला आणि बेकार आहे त्याला भगवान केवळ एकाच स्वरूपांत दर्शन देण्याची हिंमत करूं शकतो. तें स्वरूप म्हणजे काम आणि वेतनाचें आश्वासन.' ( सर्वोदय, जानेवारी १९३९ ) शिवाय परिस्थिति बदलल्याशिवाय माणूस बदलूं शकतो म्हणजे तो चांगला, नीतिमान, निर्भय, विवेकी, न्यायी, निःस्वार्थी, परहिततत्पर व सुखी होऊं शकतो असें जर मानलें, तर एवढ्या महत्प्रयासानें महात्माजींना व इतर महापुरूषांना वेळोवेळीं पारतंत्र्याची, अन्यायाची अस्पृश्यतेची परिस्थिति बदलण्याची गरजच कां भासली ह्याचा मार्क्सवादाच्या विरोधकांनीं जरूर विचार करावा.

शिवाय मार्क्सवादीहि केवळ परिस्थिति बदलल्यानें माणूस बदलतो, त्याला शिक्षणाची, सदाचाराची बिल्कूल जरूरी नाहीं असें समजत नाहींत. संयम, नीति, सदाचार वगैरे गोष्टींबाबत मार्क्सवाद उदासीन आहे असें जें कांहीं विरोधकांना वाटतें त्याचें कारण त्यांचें अज्ञान व बराचसा अपप्रचाराचा परिणामहि होय. समाजाच्या मार्क्सवादी रचनेंत स्वेच्छाचार नाहीं. एवढेंच नव्हे तर संयम, शिस्त, परहिततत्परता वगैरे सारे राष्ट्रीय व मानवतावादी गुण प्रकर्षाने वाढवले जातात.

केवळ परिस्थितीकरतां परिस्थिति बदलण्याचा हव्यास मूर्खपणाचा ठरला असता. परिस्थिति बदलून जीवनमूल्यें बदलणें हें मार्क्सवादी क्रांतीचें उद्दिष्ट आहे.

शास्त्रीय दृष्ट्या मानव आणि परिस्थिति ह्यांत परस्परविघातक द्वंद्व नाहीं. तीं एकमेकांना बदलणारीं आहेत. बाह्य आंतरिकाला बदलत असतें तर आंतरिक बाह्याला बदलत जातें. तेव्हां हीं दोन तत्वें सुटीं काढून एकाला बदलण्यावर भर देण्याचा प्रकार मार्क्सवादांत नाहीं. हां. विशिष्ट समाजरचनेत टराविक कारणांमुळें परिणामकारी काय व अपरिणामकारी काय हा विवेक मार्क्सवादांत तें जनतेचें तत्वज्ञान असल्यामुळे आपोआपच आलेला असतो. हा विवेक किंवा ही तीक्ष्ण जागरूकता मार्क्सवादाच्या जननिष्ठेचें अपत्य आहे. श्रमिकांच्या वर्गजात जाणीवेमुळें चालू शोषण-परिस्थितींत उपदेशवाद हा पोकळ व कुचकामी आहे हें मार्क्सवादाला सहज समजलेलें आहे. परंतु कोणत्याहि परिस्थितींत उपदेशवाद किंवा शिक्षण हीं निरूपयोगी आहेत असें मार्क्सवाद मानीत नाहीं. उलट चालू असलेली क्रांति ही शेवटची क्रांति असून जगाचें भावी परिवर्तन हें उत्क्रांतीने होत जाणार व त्याकरतां शांति व हृदयपरिवर्तन हींच साधनें इतिहास स्वीकारणार आहे असें मार्क्सवादाचें प्रतिपादन आहे.

मार्क्सवादानुसार चालणारी शासनसंस्था समाजहिततत्पर राष्ट्रबांधणी व शीलसंवर्धन ह्यांचें शिक्षण देणारी प्रमुख संस्था बनते. जनतेच्या हातांतलें हमखास परिवर्तनाचें तें एक हत्यार बनतें. म्हणून मार्क्सवादी शासनसंस्थेची परिवर्तनकारी क्षमता अजब असते. परिणामीं 'कुटुंब संस्थेचें पावित्र्य जर कुठें पहावयास मिळत असेल तर तें रशियांतच होय' असे उद्गार कॅन्टरबरीचे डीन डॉ. ह्युलेट जॉन्सन ह्यांना काढावे लागले. आंरी बार्बुस, रोमां रोलां, एच. जी. वेल्स, बर्नाड शॉ व जगभर पसरलेल्या कैक श्रेष्ठ मानवतावाद्यांना रशियाची तारीफ करावी लागली. रशियांतच आपलीं स्वप्नें साकार होत आहेत असें कविवर रवीन्द्रनाथ टागोरांना स्वच्छ म्हणावें लागलें. 'लेनिनचें कार्य अमर आहे तें नाहींसें होणार नाहीं' असें खुद्द गांधीजींनाही कबूल करावें लागलें. अर्थात हितसंबंधीयांचीं वर्तमानपत्रें व त्यांचा जंगी प्रचार आम्हीं विसरत आहोंत असें नव्हे. परंतु तो प्रचार भाडोत्री असून अल्पजीवी आहे हें निश्चित.

खुद्द मार्क्स-एंगल्स हे अत्यंत नीतिमान व श्रेष्ठ त्यागी पुरुष होऊन गेले. संयमाविना साम्यवादाची उभारणी होणें शक्य नाहीं ही लेनिनची युवकांना शिकवणूक आहे. संपूर्ण राष्ट्राला खरी मानवतावादी नीति शिकवून एक महान राष्ट्र उभवणारा लेनिनएवढा संयमी महापुरुष जगाने प्रथमच पाहिला हें कोण आंधळा नाकबूल करील ? परंतु स्वतः संयमाने वागून राष्ट्राला संयम शिकवणे वेगळें व संयमाचें भांडवल करून राजकीय वैदुगिरी करणें वेगळें. मार्क्सवादाच्या विरोधकांना संयमाचें खुळ किंवा संयमपूजा जी हवी आहे ती मात्र मार्क्सवादी विचारसरणींत आणि मार्क्सवादी व्यवहारांत तिळप्राय आढळणें शक्य नाहीं. कारण एकच. मार्क्सवाद हें शास्त्रीय तत्वज्ञान आहे. मार्क्सवादाची तत्वमीमांसा कामचलाऊ, उपदेशवादी, स्वप्नाळू, भाविक, स्वप्नरंजनवादी नसून ती ऐतिहासिक व वैज्ञानिक असल्यामुळें तिची धारणा अशी आहे कीं चांगला बनलेला माणूस तर ठीक वागेलच परंतु चांगला न बनूं शकलेला, शोषणाला सोकावलेला, अनीतीच्या मार्गाला लागलेला, गैरशिस्त बनलेला माणूसहि गैर गोष्टींना आवश्यक असणारी परिस्थिति बदलल्यामुळें ठीक वागणेंच पसंत करील व चारी बाजूंनीं सदाचाराला योग्य परिस्थिति निर्माण झालेली असली तर दुराचारीहि हळूहळू सदाचारीच होईल आणि नवीन वातावरणांत व नवीन शिक्षणानें दुराचार दुर्मिळ होत जाईल हें निश्चित. समाजवादी समाजरचनेंत गैरवर्तनाला थाराच मिळूं नये व गैरवर्तन अगदीं अल्पजीवी ठरावें अशी मजबूत व शास्त्रशुद्ध बांधणी मार्क्सवाद करीत जातो व तो यशस्वी होत चालला आहे हें जगाला दिसत आहे.

वेश्येकडे जाऊं नकोस, तें कृत्य वाईट आहे एवढें सांगून मार्क्सवाद थांबत नाहीं. उपदेश तर तो जरूर करतोच परंतु त्यापुढें जाऊन दुर्वर्तनाला अनुकूल असणारी परिस्थिति बदलण्याचीहि तो अधिक खटपट करतो. म्हणजे व्यक्तीच्या सहज प्रेरणांना अनुकूल वातावरण तो निर्माण करतो. म्हणजे व्यक्तिविकासाच्या नैसर्गिक प्रेरणेनुसार समाजाला वळण देण्याची परिणामकारी खटपट तो करतो.

प्रत्येक व्यक्तीच्या विकासांत समाजाचा विकास व समाजाच्या विकासांत प्रत्येक व्यक्तीचा विकास हें समाजपरिवर्तनाचें मार्क्सवादी सूत्र आहे. व्यक्ति-

स्वतंत्रता, परस्परतंत्रता, आणि समाजतंत्रता ह्यांचा उत्कृष्ट समतोल ह्या सूत्रांत साधला गेला आहे व ह्या सूत्रानुसार समाजाचे हितसंबंध व्यक्तींत व व्यक्तीचे हितसंबंध समाजांत गुंतलेले राहतील अशा प्रकारची शास्त्रीय समाजरचना मार्क्सवाद निर्माण करतो. इतकेंहि करून ह्या प्रयोगाच्या प्रथमावस्थेंत कांहीं विकृति राहिल्याच (त्या जरूर राहतील) तर त्यांचें संशोधन सुरू राहतें व इलाज करण्याची व्यवस्थाहि असते. कारण मार्क्सवादांत सिद्धांतापेक्षां व्यवहाराचीच किंमत अधिक असते. त्यानुसार गुन्हेगार हा जेलखान्यामधला प्राणी नसून आरोग्यधामाचा तो विषय राहतो. अशी शास्त्रीय धारणा व व्यवस्था मार्क्स-वादी विचारसरणींत अंतर्भूत आहे.

इतकें होऊनहि इतिहासाच्या घाणेरड्या वारशामुळें जर एखादा गैर वागूं लागला तर लगेच तो सुधारतो. उदाहरणार्थ, एखाद्या माणसाला जर स्त्रीकडे सन्मानानें पहाण्याची दृष्टि प्राप्त झाली नसेल किंवा त्याची दृष्टि निवळली नसेल तरी तो वेश्येकडे जाऊं शकत नाहीं. कारण वेश्या, वेश्या राहिलल्या नसतात व स्त्री जातीची भाग्यवान नवी पिढी त्या धंद्याकडे ढुंकूनहि पाहणे शक्य नसतें. जिथें श्रम पवित्र आहेत व मुबलक मोबदल्याला वाव आहे, सच्या नीतीला आकाश ठेंगणे आहे, अशा दुराग्रहमुक्त, नैसर्गिक व सामाजिक स्वातंत्र्याच्या वातावरणांत पैशाकरतां देह विकण्याचा धंदा कोण करील? हीच गोष्ट चोरी वगैरे इतर दुर्वर्तनाबाबत लागू होते. हें समाज-चित्र शब्दांनीं किंवा युक्तिवादांनीं मांडण्यापेक्षां समाजवादी जगांत चालू असलेली समाजवादी जगाची बांधणी व त्याची फलनिष्पत्ति पाहणे हेंच अधिक उपयुक्त आहे. मार्क्सवाद कृतीने बोलत असतो. अमूर्त वस्तूंच्या घासाघाशीपेक्षां मार्क्सवादी समाजाची मूर्तिमंत बांधणी हेंच शास्त्रीय तत्वज्ञानाचें श्रेष्ठ गमक आहे. तेव्हां असे राष्ट्रोद्धारक विचार व महान सामुदायिक कृति करण्याची शक्ति अंगी यावी म्हणून शास्त्रीय तत्वज्ञानाचीच आज भारताला जरूरी आहे. 'शास्त्रीय तत्वज्ञानच कां?' ह्या प्रश्नाला—तें अशा जीवनदायी पुरुषार्थाकरतां—हें आमचें उत्तर आहे.

२

# आपण माणसें विश्व व विश्वांतील आपलें स्थान

तत्वज्ञान म्हणजे काय व तत्वज्ञान शास्त्रीय असूं शकतें काय, ह्या प्रथमदर्शनी प्रश्नाचा अलग विचार करण्यापूर्वी शास्त्र व तत्वज्ञान ह्यांची चर्चा करणारीं व ह्या गोष्टी समजून घेणारीं जीं आपण माणसें ती आम्हीं खरोखरच आहोंत काय? त्याचबरोबर ज्या विश्वांत आपण जगतों त्या विश्वाचें अस्तित्व सिद्ध करणारा खात्रीलायक पुरावा आमच्यापाशीं आहे काय? तसेंच ह्या विश्वांत आपलें स्थान आम्ही जाणलें आहे काय? या प्रश्नांची चर्चा करणें अवश्य आहे.

तत्वज्ञान शास्त्रीय असूं शकतें काय? ह्या प्रश्नाचें उत्तर वरील तीन प्रश्नांशीं अत्यंत निगडीत आहे. शिवाय हे तीनही प्रश्न इतके अन्योन्याश्रयी, परस्परावलंबी किंवा एकजीव आहेत कीं कोणत्याही इतर दोन प्रश्नांचा विचार केल्याशिवाय तिसरा प्रश्न सुटणारच नाहीं. म्हणजे ह्या तीनही प्रश्नांत आंतरिक एकता आहे. मानवी विचारांचा शास्त्रशुद्ध प्रारंभ हा असा तिहेरी आहे. आपण माणसें म्हणजे आपला समाज आणि आपलें वातावरण. वातावरण म्हणजे आपला निसर्ग किंवा विश्व; आपल्या 'स्व'चें विश्वांतील नक्की स्थान कोणतें व आपल्याला मिळवायचें काय असतें ह्याची कल्पना म्हणजे आपलें मनस्वरूप. समाज-निसर्ग-मन हा तत्वज्ञानाचा पाया आहे. तेव्हां तत्वज्ञान म्हणजे काय व तें

शास्त्रीय असूं शकतें काय, ह्या प्रश्नाचें उत्तर वरील तिहेरी प्रश्नांच्या उत्तराबरोबर पुढील विवेचनांत परिणत होत गेलें आहे.

तत्वसंशोधनाला 'मी' पासून सुरवात करणें हें पूर्वीचे लोक ठीक समजत असत! परंतु आतां 'सारीं माणसें' हा तत्वजिज्ञासेचा आरंभबिंदू मानणें अधिक सयुक्तिक ठरतें. कारण समाजांत राहूनच व्यक्ति माणूस बनत असते. समाजाबाहेर जंगलांत वगैरे अलग वाढलेले मनुष्यप्राणी जनावरासारखे बनलेले आढळतात. कांहीं लांडग्या-मुलांचीं उदाहरणें तर सर्वांनाच ठाऊक आहेत. तेव्हां मनुष्य हें समाजजीवनाचें फळ आहे. व्यक्ति म्हणजेच समाजांतर्गत व्यक्ति असें समजावयाला हवें. समाजाचा दुवा सोडून केवळ 'मी' व 'विश्व' किंवा 'मी' व 'विश्वेश्वर' ह्याबाबतचें चिंतन भ्रममूलक ठरलें असल्यास नवल नाहीं. कर्तुम अकर्तुम अशा संघटीत समाजशक्तीची योग्य दखल न घेणाऱ्या तत्वचिंतनाला विश्वांतील आम्हां माणसांचें स्थान ठरवण्यांत अपयश यावें हें क्रमप्राप्तच होतें. सामाजिक सत्य आचरण्याचा अटळ परिणाम जो आनंद त्यापासून आतांपर्यंत मानवसमाज वंचित राहणे हेंहि समजण्यासारखें आहे.

आमच्या वेदसाहित्यांत, उपनिषदांत व इतर तत्वग्रंथांत प्राथमिक स्वरूपाचे कांहीं चौकस प्रश्न उपस्थित करण्यांत आले होते. 'कोअहम्' मी कोण आहें? अंतःसृष्टींत खोल बुडी मारल्यानंतर माणसाला 'मी' ( अहम ) म्हणून जें भान होतें तें कोणाचें? आम्ही कोणत्या कारणापासून उत्पन्न झालों, कोणामुळें आम्ही जिवंत रहातों, आमचा आधार कोठें आहे, कोणाच्या प्रेरणेने आम्ही सुखदुःखांत प्रवृत्त होतों? किं कारणं ब्रह्म कुतः स्मजाता जीवाम केन क्वच संप्रतिष्ठाः अधिष्ठाताः केन सुखेतरेषु वर्तामहे ब्रह्मविदो व्यवस्थाम ॥ वगैरे श्वेताश्वतर उपनिषदांतले प्रश्न ह्याच धर्तीवर आहेत. नासदीय सूक्त आणि यजुर्वेदाच्या अंतिम अध्यायांत तत्वजिज्ञासेची छायाहि दिसते. आम्ही व आम्हाला अभिप्रेत असणारी सृष्टी हीं स्वयंभू आहेत कीं यांचा कोणी कर्ता आहे? व कर्ता असेल तर त्याचें स्वरूप काय? त्याचा मी व ही सृष्टी यांच्याशीं संबंध काय? तो आम्हा दोघांहून निराळा आहे कीं आमच्यांत आहे? वगैरे विपुल प्रश्न भारतीयांनी आणि इतरांनीं स्वतःला विचारले व त्यांचीं समर्पक उत्तरें देण्याचा प्रयत्नहि

१२२९२

केला. ह्या प्रयत्नाला तत्वज्ञान म्हणण्यात यावें हें बरोबरच आहे. परंतु हें तत्वज्ञान सनातन अंतिम आहे असें मानण्यांत यावें हें मात्र भारताचें दुर्दैव होय.

वास्तविक माणसें ह्या विश्वांत जगत असतांना त्यांना विश्ववस्तूचें अवलोकन होतें किंवा विश्वाशीं होत असणाऱ्या व्यवहारानें त्यांनां विश्ववस्तूचें ज्ञान होत जातें. ज्ञानाच्या अवस्थेच्या मानानें माणसें स्वतःसमोर कांहीं प्रश्न उभे करीत असतात व प्राप्तज्ञानाच्या अवस्थेनुसार स्वनिर्मित प्रश्नांचीं उत्तरें हुडकून काढतात. असे प्रश्न व तज्जन्य उत्तरें ज्ञान–प्रक्रियेचें प्रथमांग आहे. सृष्टीचें माणसांना झालेले जें ज्ञान त्या ज्ञानाच्या ठराविक अवस्थेवर व प्रमाणावर वरील प्रश्न अवलंबित असतात. सृष्टिज्ञानाची अवस्था आणि प्रमाण बदलून जेव्हां माणसांचें सृष्टिज्ञान उच्चावस्थेंत पदार्पण करतें तेव्हां माणसें आपले तद्विषयक प्रश्नहि बदलतात किंवा त्यांनीं ते बदलावयाला हवेत.

आपण ह्या विश्वांत जगतों किंवा सृष्टींत जगतां असें म्हणूंया. सृष्टीच आमच्या व्यवहारप्रदेशाच्या टप्प्यांत अधिक आलेली असते. तेव्हां वस्तुजात, वनस्पतीजात, प्राणीजात हें सारें आमच्या दृक्प्रदेशांतच येतें. ह्या सगळ्या मनुष्यबाह्य अस्तित्वाला परिस्थिती असें आपण म्हणूं शकतों. परंतु ही परिस्थिति गतिमान असल्यामुळें तिला परिगति म्हणणेंच अधिक शास्त्रशुद्ध ठरतें. ह्या परिगतीचे परिणाम अंतर्गत वस्तुत्वावर, सर्व जीवनमात्रावर व उत्तरोत्तर मनुष्य-पातळीवर आलेल्या आपणांवर सतत होत असतात. हे परिणाम माणसांचे बाबतींत जेव्हां इंद्रियाद्वारें घडतात तेव्हांच ते आम्हाला समजतात, एरवीं नाहीं. ते जेव्हां आमच्या मनावर प्रतिबिंबित होतात तेव्हां त्यांना आपण संस्कार म्हणतों. ज्यावर हे संस्कार होतात त्याला आपण पुरुष किंवा क्षेत्रज्ञ किंवा ज्ञाता म्हणूं शकतों. ज्या वस्तुमात्राचें, परिस्थितीचें किंवा परिगतीचें हें संस्करण असतें त्याला आपण प्रकृति किंवा क्षेत्र किंवा ज्ञेय म्हणूं शकतों. **ज्ञाता आणि ज्ञेय ह्यांच्या मिलाफांतून ज्ञानसंभव होतो.**

ज्ञाता आहे पण ज्ञेय नाहीं किंवा ज्ञाता-ज्ञेय ही जोडी आहे पण ज्ञानफल मात्र नाहीं असें कधींच होत नाहीं. कारण फक्त अभ्यासाच्या सोयीकरतां

ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान ह्या वेगवेगळ्या गोष्टी कल्पिल्या जातात. परंतु वास्तवांत ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान ह्या ज्ञान-प्रक्रियेच्या तीन अंगांत आंतरिक एकताच आहे.

संपूर्ण ज्ञान–प्रक्रिया गतिशील आहे. कारण ज्ञाता व ज्ञेय हीं गतिशील आहेत. शिवाय ज्ञाता व ज्ञेय ह्यांचा व्यवहार–संबंधहि गतिशील आहे. अशा ह्या गतिशील दृष्टींतून आपण जर उपरोल्लेखित प्रश्नांकडे पाहिलें तर आपणाला लगेच आढळून येईल कीं कोणतेच प्रश्न व कोणतीच उत्तरं अंतिम असू शकत नाहींत. परंतु प्रत्येक टप्प्यावरील माणसांनीं उपस्थित केलेलीं प्रश्नोत्तरें त्या त्या टप्प्यापुरतीं अंतिम आहेत असें वाटणें मात्र साहजिक आहे.

दुसरी गोष्ट अशी कीं एकदां एक प्रश्न समोर आला कीं त्या प्रश्नानुसार त्याचें उत्तरहि त्या प्रश्नाला वाट पुढीतच ठरत जातें. भौतिकवादी तत्वज्ञ फ्रान्सिस बेकनच्या मताप्रमाणें नीट मांडलेला प्रश्न हा अर्धें उत्तर असतो हें जितकें खरें तितकेंच चुकीचा प्रश्न हा चुकीच्या उत्तराची अर्धी तयारी असतो हेंही खरें मानावयाला हरकत नाहीं.

समजा, पाणी कुणी केलें, असा प्रश्न जर आपणाला कोणी केला तर आपण प्रथम किंचित गोंधळून जाऊं. परंतु प्रत्येक गोष्टीचा कर्ता हा असणारच असें जर आपले पूर्व ग्रह आपणाला सांगत असले तर आपण भांबावून जाऊं. शिवाय छत्रीचा कर्ता कारागीर, रेनकोटाचा कर्ता कारखानदार, नळाचा कर्ता आणखी कोणीतरी तेव्हां पाण्याचा कर्ताहि असणारच असें जर कोणी सुनावलें तर आपण पुरे गांगरून जाऊं व आपल्या पूर्वग्रहांनुसार म्हणूं कीं पाण्याचा कर्ता पाण्याची देवता किंवा सर्व विश्वाचा जो कर्ता तोच पाण्याचाहि कर्ता. परंतु हीं उत्तरेंच निखालस चुकीचीं आहेत असें नव्हे, तर प्रश्नच मुळांत चूक आहे. आणि ह्या चुकीच्या प्रश्नानें चुकीच्या उत्तराची अर्ध्याहूनही अधिक तयारी केली आहे. छत्री, रेनकोट, नळ वगैरे गोष्टी निसर्गाचे धर्म जाणून घेऊन माणसांनीं तयार केलेल्या वस्तु आहेत. परतु पाणी किंवा पाऊस ह्या नैसर्गिक प्रक्रिया केल्या जात नसून त्या निसर्गधर्मानुसार होत असतात. तेव्हां पाऊस कोणी केला हा प्रश्नच मुळांत चुकीचा असून पाऊस कसा होतो असा प्रश्न विचारायला हवा. सृष्टिशास्त्र जाणणारे त्याचें उत्तरहि देऊं शकतात. तेव्हां जे सृष्टिविषयक प्रश्न

असतात त्यांचीं उत्तरें सृष्टिव्यवहाराची वैज्ञानिक माहिती असणारे देऊं शकतात. तिथें आमच्या साध्या दैनंदिन व्यवहारांतील तर्क चालावयाचे नाहींत. तर्कज्ञान हें प्रथमावस्थेंत ठीक असतें. घड्याळ ही वस्तु आहे, घड्याळाचा कुणी तरी कर्ता आहे. तसाच अग्नि, जल, वायु वगैरे वस्तूंचाहि कुणी तरी कर्ता असणारच हा सरळ तर्क आहे. हा तर्क प्रयोगसिद्धतेंत उतरला कीं तो वैज्ञानिक ठरतो. अशा ह्या विज्ञानावर आधारलेल्या तत्वसंशोधनाला शास्त्रीय तत्वज्ञान असें म्हणावयाला हरकत नाहीं.

**जगांत ज्या वस्तु आहेत त्यांचें वस्तुत्वस्वरूप (एस्सेंस) किंवा गतिशून्यता हीं दिखाऊ असून त्यांची सतत गतिशीलता ही वास्तव आहे.** हा अस्तित्वासंबंधी वैज्ञानिक सिद्धांत आहे. हा केवळ तर्क नव्हे. हा आपण मानण्याचा किंवा न मानण्याचा प्रश्न नव्हे. हें मूर्तिमंत वस्तुनिष्ठ सत्य आहे. पुराण्या अध्यात्मवादी तत्वज्ञानाची पायाभूत चूक इथेच आहे. अध्यात्मवादी लोक ह्या वस्तुत्वस्वरूपाला गतिशून्य ठोस वस्तु मानीत आले. म्हणून ह्या गतिशून्य तत्वांत गति फुंकणाऱ्याची जरुरी त्यांना प्रथमपासूनच भासूं लागली. एवढेंच नव्हे, तर हा गति फुंकणाराच काय तो पूर्णत्वानें आहे असें गृहीत धरूनच ह्या तत्वसंशोधनाला सुरवात झाली आणि ह्या गति फुंकणाऱ्याचें सामर्थ्य सिद्ध करण्याच्या खटाटोपांतून आजवरचें अध्यात्मवादी किंवा परतत्ववादी तत्वज्ञान निर्माण झालें.

आपल्या भोंवतालचें जग समजून घेऊन तें आपल्या जीविताशीं सुसंवादी बनवणें हा जो तत्वसंशोधनाचा हेतु तोच मुळीं ह्या खटाटोपांत लुप्तप्राय झाला. शिवाय ह्या तर्कपद्धतीबाबत सांगावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं जें शोधावयाचें तें मूळतत्व ( ईश्वर, परब्रह्म वगैरे ) अध्यात्मवाद्यांना आधींच गवसलेलें ! कसें ? तर सत्याच्या साक्षात्कारानें ! प्रमाण ? कांहीं नाहीं. जिथें शब्द संपतात तिथें प्रमाण कसलें ? 'यतो वाचो निवर्तन्ते'. पण मग ह्या तत्वज्ञानाचें प्रयोजन काय ? तर परमात्मतत्व किती परम परम आहे तें ( सिद्ध न करतां ) घोकावयाचें. बस. एवढेंच !

सुदैवानें आमचें भारतीय तत्वज्ञान सगळेंच्या सगळें परलोकवादी आहे असें मात्र नव्हे. ज्या नासदीय सूक्ताचें अत्यंत प्रगल्भ, स्वतंत्र, मूळाला हात

घालणारें, मानवी मनांतील सुप्त ईश्वरी सत्तेचें व्यक्तीकरण करणारें, सर्वात जुनें असें वर्णन अनेक पाश्चात्य पंडितांनीं व खुद्द लोकमान्यांनी आपल्या गीतारहस्यांत केलें आहे तें सूक्त सुद्धां ईश्वरी अस्तित्वाची ठाम खात्री देऊं शकलें नाहीं. त्या सूक्ताचा महत्वाचा भाग हा असा आहे :

इयं विसृष्टिर्यत आवभूव
यदि वा दधे यदि वा न दधे ।
यो अस्याध्यक्षः परमे व्योमन्
सो अंगवेद यदि वानवेद ॥ ७ ॥

अर्थ :– हा पसारा जेथून झाला किंवा तो निर्मिला गेला अगर न गेला, तें परम आकाशांत असणारा या जगाचा जो अध्यक्ष तो जाणीत असेल किंवा नसेलहि. ( कोणी सांगावें ? )

इथें सूक्तकार ऋषीची साशंकताच स्पष्ट दिसते. निरीश्वरवादी, संशयवादी, भौतिकवादी विपुल तत्वज्ञान भारतानें निर्मिलें आहे. केवळ वर्गीय कारणांमुळेंच वेदान्त केसरी मैदान मारूं शकला हें विसरतां कामा नये. ह्या नवीन दृष्टीनें भारतीय तत्वज्ञानाचें पुनर्मूल्यांकन होणें जरूर आहे. असें पुनर्मूल्यांकन केल्यास प्रत्येकाला अभिमान वाटावा असें तत्वज्ञान भारतानें निर्माण केलें होतें असेंहि आढळून येणें शक्य आहे.

सृष्टिकर्ता ईश्वर गृहीत धरूनच अध्यात्मवाद विस्तारला व अंतींसुद्धां हें गृहीत त्याला कधींच सिद्ध करतां आलें नाहीं. ही उणीव लपवण्याकरतां हजार पळवाटा त्याला काढाव्या लागल्या आहेत. वेदान्त म्हणजे ह्या पळवाटांचें मंडन आहे. जें माहित नाहीं तेंच शोधावयाचें असतें. परंतु अध्यात्मवादी स्वतःच मानतात तें खरें धरल्यास धडधडीत सूर्यप्रकाशाइतका माहीत असलेला भगवानच परत परत ते शोधीत बसले ! अध्यात्मवादाचीं प्रेरक वर्गीय कारणें सोडून देऊन त्याच्या फक्त तात्विक अंतरंगाचें परीक्षण करावयाचें झाल्यास असें म्हणावें लागेल कीं वस्तुत्वांतील सुप्त गति न दिसल्यामुळें विश्वांत गति किंवा चेतना फुंकणारा परमेश्वर त्यांना कल्पावाच लागला. परंतु भौतिकवाद्यांना हें अनावश्यक प्रमेय विश्वांत घुसडण्याची जरूरच भासली नाहीं. कित्येक शतकापूर्वी विलियम

मराठी ग्रंथ संग्रहालय ... ३४२६९ ... क्र. १४२६९ ... नों. दि. ...


ऑफ ओकाम ह्या नांवाने प्रसिद्ध असलेला प्रख्यात तत्ववेत्ता आपल्या वस्तऱ्यानें हीं अनावश्यक प्रमेयें कापून टाकून मोकळा झाला !

'वस्तु किंवा क्रिया ज्याविना समजूं शकतात तें गृहीत धरूं नये.' असा त्याचा आदेश आहे. जें समजण्यासारखें होतें तें ईश्वर कल्पनेविनाहि मानवाला समजत गेलें व जें त्या काळीं समजण्यासारखें नव्हतें तें ईश्वर गृहीत धरूनहि समजूं शकलें नाहीं. म्हणूनच तर आमच्या पूर्वाचार्यांना 'नेति नेति' आठवलें.

ला प्लास ह्या फ्रेंच ज्योतिषी गणितज्ञाने त्यावेळीं ज्ञात असलेल्या सर्व आकाशाचा ग्रह, तारे दाखवणारा एक नकाशा तयार केला. पण या नकाशांत ईश्वर कुठें आढळत नाहींसे पाहून नेपोलियननें त्याला विचारलें, 'काय रे, या नकाशांत ईश्वर तर कुठेच दिसत नाहीं!' ला प्लास उद्गारला, 'ही मानवी गोष्ट आहे साहेब! तिची मला जरुरी नाहीं.' डार्विनने सुद्धां असेंच म्हटलेलें आहे कीं जर माणसाची उत्पत्ती माकडावरून 'एप' वर व 'एप' वरुन माणसांत झालेल्या उत्क्रांतींत स्पष्ट दिसते आणि सिद्ध करतां येते तर त्याला खास ईश्वराने निर्माण केला असें मानण्याची काय जरुरी ?

जे लोक पूर्वीपासून भौतिक तत्वाला विश्वाचा पाया मानीत आले त्यांना अध्यात्मवादी लोक जडवादी ह्या निंदाव्यंजक आडनांवाने संबोधित आले. भारतीय पुरातन परंपरा असलेलें जें 'लोकायत' तत्वज्ञान त्या तत्वज्ञानाच्या एका महान पुरस्कर्त्याला ह्या लोकांनी 'चार्वाक' ही शिवी दिली. चार्वाक ह्या शब्दाचा अर्थ चावण्यात वस्ताद म्हणजे खादाड. महापंडित राहुलजी आपल्या दर्शन–दिग्दर्शन ह्या ग्रंथांत "चार्वाक हें मतसंस्थापक व्यक्तीचें नांव नव्हे तर पुनर्जन्म, दैववाद वगैरे जे मानीत नव्हते त्यांना दिलेली ही शिवी होती," असें म्हणतात. वास्तविक शास्त्रीय दृष्टिकोणाचें बीज प्रथम चार्वाकनेच पेरलें असा निर्णय मानवी विचारांच्या समग्र इतिहासाचें परिशीलन करणाऱ्यास द्यावा लागेल. अशा ह्या संन्याशाला भलताच सुखवादी ठरवण्यांत आलें. कांहींशी अशीच दशा पाश्चात्यांनी ग्रीक एपीकुरसच्या तत्वज्ञानाची केली. एपीकुरस म्हणजे भोगवादी असें समीकरण त्यांनीं ठरवून टाकलें. 'मिथ्याचारी, ढोंगी लोक जडवादाचा अर्थ अधाशीपणा, दारूबाजी, कामुकता, आढ्यताखोरी, मस्ती, लालसा, परिग्रह,

लोभ, फसवेगिरी–स्वतः हे लोक ज्या व्यसनांत बरबटलेले असतात तीं सारीं व्यसनें असा करतात.' असें तत्वज्ञ एंगल्सनें आपल्या फायरबाक भाष्यांत म्हटलें आहे.

मार्क्सवाद्यांचें 'भौतिकतत्व' हें जड म्हणजे चैतन्यरहित नसून उलट विकासक्रमानें चराचर सृष्टीपासून सजीव, सूक्ष्म, अतिसूक्ष्म मानव्यालाहि जन्म देणारें, स्वयंभू, नवनवोन्मेशशाली तत्व आहे. बीज–विकास दृष्टीनें सुद्धां हें 'भूततत्व' आत्मतत्वाहून अधिक समृद्ध ठरतें. परंतु मुद्द्याचा प्रश्न आहे तो हा कीं, जगाच्या घडणींत 'भूततत्व' हें पायाभूत कीं आध्यात्मवाद्यांचें 'आत्मतत्व' हें पायाभूत? मार्क्सवादी भूततत्वालाच पायाभूत मानतात. 'गतिमान भूततत्वाचा पसारा म्हणजे आमचें जग' असें लेनिननें म्हटलें आहे.

जग ही एक विराट प्रक्रिया आहे. ती एक प्रवाही चीज आहे. विश्वाच्या ह्या प्रक्रियेंत हजारों लाखों अगणित अंतर्प्रक्रियांचा अंतर्भाव होतो. अशी ही जंगी विश्व-प्रक्रिया कोणी केली हा प्रश्नच संभवत नाहीं. कारण प्रक्रिया कोणी करीत नसून त्या होतात. जर त्या होत्यात, तर त्या कशा होतात? हें उत्तर दिलें पाहिजे. आणि सद्यज्ञानानुसार त्यांचीं उत्तरें देण्यांत वैज्ञानिक यशस्वी होत आहेत. अर्थात अंतिम म्हणजे गतिशून्य कांहींच नसल्यामुळें हीं उत्तरेंहि अंतिम असणें शक्य नाहीं हें ओघानेंच आलें. परंतु म्हणून तीं विश्वासार्ह नाहींत असें मात्र नव्हे.

ज्ञानप्रक्रियेंत तर्कज्ञान ही अगदींच प्रारंभीची पायरी आहे व प्रायोगिकता आणि प्रमाणसिद्धता ही विश्वासार्ह वरची पायरी आहे. परंतु प्रायोगिक ज्ञानहि बदलत जातें. म्हणजे पूर्वीचें ज्ञान पूर्ण खोटें ठरतें असें नव्हे, तर सुधरत जातें. आइन्स्टाइननें न्यूटनचा सिद्धांत अपूर्ण ठरवला, खोटा ठरवला नाहीं. व खुद्द आइन्स्टाइनच्या सिद्धांतांतील दोषहि आतां दाखवले जात आहेत.

ह्या वस्तुस्थितीवरून कांहीं लोक असा निष्कर्ष काढतात कीं ज्ञान जर सतत बदलत जाणारें आहे तर प्राप्त ज्ञानाच्या सत्यासत्यतेबद्दल शाश्वति काय? शंका रास्त आहे. परंतु त्यांत तथ्य कमी आहे. कारण आमच्या ज्ञान-विज्ञान विकासांतील अवस्थांना लावून अजमावतां येईल अशी कमी अधिक खरेखोटेपणाची कसोटी आमच्यापाशीं आहे. मुळींच नाहीं असें नव्हे.

समजा, आमच्यासमोर आतां हें लिहिण्याचें टेबल आहे. ह्या वस्तूचें आमचें ज्ञान पहिल्या दिवशीं, पहिल्या नजरेंत जेवढें मिळालें त्याहून तें मग कितीतरी वाढत गेलें. प्रथम आमचें ज्ञान फक्त इंद्रियजन्य होतें. परंतु ज्या मानानें टेबलाचा उपयोग आम्ही करीत गेलों, म्हणजे टेबलाशीं व्यवहार करीत गेलों, त्या मानाने बौद्धिक ज्ञानही वाढत गेलें. वस्तूंचा उपयोग करण्यांत हेतु तर साधतोच शिवाय ज्ञान वाढत जातें व ज्ञानाच्या खरेखोटेपणाची कसोटीहि मिळते. कारण वस्तूंचा आम्हाला हवा तसा उपयोग करतां येणे हीच वस्तू व आम्ही ह्यांच्या व्यवहारात्मक व ज्ञानात्मक मिलाफाची एकमेव कसोटी होय. आमच्या कृतींना मिळणारें यश हें सिद्ध करतें कीं आमचा वस्तूंशीं होणारा ज्ञानात्मक व्यवहार बरोबर असून वस्तूंचें वास्तविक ज्ञान आम्हाला होऊं शकतें.

आमचें ज्ञान अपुरें असल्यास वस्तूंच्या उपयोगांत बाधा येणार. अर्थात, वस्तूंचा उपयोग करतां येणें ही झाली ज्ञानाची प्रथम पायरी. परंतु वस्तूंत आपणाला हवें असलेलें स्थित्यंतर घडवून आणतां येणें ही ज्ञानाची वरची पायरी. म्हणजे क्रमाने इंद्रियज्ञान, उपयोगज्ञान, स्थित्यंतरज्ञान व वस्तू नव्याने बनवण्याचें नवनिर्माण-ज्ञान ह्या बौद्धिक ज्ञानाच्या वाढत्या पायऱ्या झाल्या. वस्तूंचें नव–निर्माणज्ञान वस्तुज्ञानाची पूर्ण विश्वासार्ह अवस्था म्हणावयाला कसलीच हरकत नाहीं. जी वस्तू आम्हाला बनवतां येते त्या वस्तूचें आमचें ज्ञान पूर्ण असतें.

ज्ञान–प्रक्रिया अखंड गतिमान व म्हणून चिरसापेक्ष असली तरी ती तेवढ्याकरतां क्षणिक, फसवी, बिनभरंवशाची, मायाजाल निर्माण करणारी आहे असें समजणें चूक आहे. शंकराचार्यांचा मायावाद किंवा दार्शनिक परिभाषेंतला विवर्तवाद मानवाची दिशाभूल करणारा ठरला आहे. लौकरच त्याची प्रतिक्रिया भयंकर स्वरूपांत इतर आचार्यांच्या विरोधांतून निर्माण झाली. कर्मयोगी लोकमान्य टिळकांना सुद्धा ह्या मार्गाला डावलूनच भारताला कर्मयोग शास्त्र शिकवावें लागलें. आम्हीं खरोखरच आहोंत काय, हा प्रश्न लोकमान्य टिळकांना पडलाच नाहीं. आम्ही आहोंत हें स्वप्न नसून तें सत्य आहे व आम्ही खरे आहोंत कीं नाहीं हा संशयच मिथ्या आहे असेंच वेदान्त-केसरी लोकमान्यांनासुद्धा वाटलें, म्हणूनच त्यानीं आम्हाला ‘ ज्याअर्थी कर्मे हीं करावयालाच पाहिजेत त्याअर्थी फलासक्ति

सोडून तीं करा ' असें सांगितलें. अर्थात त्यांच्या कर्मयोग शास्त्र-विवेचनांत वास्तवतेच्या जाणीवेची जेवढी प्रखरता दिसून येते तेवढी त्यांच्या पुढील अध्यात्म-निरूपणांत दिसून येत नाहीं. तथापि लोकमान्य, ब्रह्म हें जेवढें सत्य तेवढेंच जगतहि सत्य, असेंच मानणारे होते हें निश्चित.

विश्व हें मिथ्या अधिरोपरूपी मानण्याची अध्यात्मवादाची सारी खटपट वाया गेली आहे. खुद्द स्वामी विवेकानंदांसारख्या वेदान्तशिरोमण्याला सुद्धां शंकराचार्यांच्या मायावादाला मुरड घालावीच लागली आहे.

माणसांची जीवनविषयक आस्था, त्याची रास्त सुखासक्ति खोटी व वाईट ठरवून त्यांचे न्याय्य समाजरचना निर्माण करण्याचे प्रयत्न हाणून पाडण्याचें वैचारिक हत्यार म्हणून ज्यांनीं तत्वज्ञानाचा आजवर वापर केला किंवा आजहि करताहेत तेच लोक नेमके माणसाचें खरेखुरें अस्तित्व संशयांत घालतात. हे लोक मानवी ज्ञानाच्या गतिशीलतेचा, सापेक्षतेचा किंवा अपूर्णत्वाचा खोटा बाऊ करून त्यांतून मायावादी, संशयवादी, अज्ञेयवादी, निराशावादी, जनतेची दिशाभूल करणारीं भलभलतीं तत्वज्ञानें निर्माण करीत आले आहेत. अशी दिशाभूल सतत होत असल्यामुळें माणसांना ह्या भूतलावरील आपलें स्थान कोणतें तें कळूं शकलें नाहीं.

सृष्टिविषयक शास्त्रीय ज्ञानाचा अभाव व वर्गीय समाजरचनेंत पद्धतशीररीत्या तत्वज्ञान भ्रष्ट करण्याचा प्रयत्न ह्या दोन गोष्टींमुळें आपण फारच गोंधळांत वावरतों. परंतु परिस्थिती बदलत आहे. पृथ्वीच्या एक तृतियांश असलेल्या समाजसत्तावादी जगांत आज एक अब्ज जनता शास्त्रीय तत्त्वज्ञानावर आधारून नवे नवे प्रयोग करीत आहे. तिथलीं माणसें भवभयबाधारहित, निर्भय, उंच मान व छाती पुढें काढून आपल्या नशीबाचे आपण कर्ते आहोंत अशा श्रद्धेनें अग्रेसर होत आहेत. त्यांचें आरोग्य सुधारत आहे. आयुष्य वाढत आहे. ज्ञान, विज्ञान, संस्कृति, सभ्यता, सुख, पराक्रम, प्रेम, मानवता वाढत आहेत. अर्थात् ईश्वराची कल्पना, पुराणे धर्म, खुळ्या रूढी, भोंगळ समजुती आणि शोषणाच्या आगळ्या पद्धति मात्र शीघ्र नाहींशा होत आहेत. निर्भय मानवानें आपलें दैव आपणच घडवायला घेतलें आहे. आयतेबाजीवर जगणारे शोषणखोरसुद्धां चारचौघांप्रमाणें

श्रम करून आपल्या संततीकरतां एक भव्य जग निर्माण करण्याच्या कामांत गढून गेले आहेत. असें तत्वज्ञान, अशी श्रद्धा, असे प्रयोग, एवढं नावीन्य आणि एवढा पुरुषार्थ गतेतिहासाला ठाऊक नव्हता. हरघडीला हें तत्वज्ञान नवनवीन बनत आहे. कारण गतिशीलता व प्रयोगसिद्धता हीं तर ह्या तत्वज्ञानाचीं प्रधान लक्षणें आहेत. ह्या विश्वांतील मानवाचें स्थान सर्वश्रेष्ठ आहे. स्वसुखार्थ वस्तुजाताचा उपयोग करून घेणारा तो कर्ता आणि भोक्ता आहे. त्याचें भवितव्यहि उज्ज्वल आहे. तो महाभोगी आणि महासुखी बनण्याकरतांच निपजला आहे. पुरुषार्थी व्यवहारांतून निर्माण झालेल्या निसर्गाच्या ज्ञानानुसार, निसर्गाच्या गुलामी बंधनांतून मुक्त होणें हें मानवाचें प्रेयस व श्रेयस दोन्ही आहेत. समाज-नियमांचे, निसर्गाचे व उत्तरोत्तर मनाचेहि स्वामी बनून भावी नर अत्युच्च पदापर्यंत मजल मारणार हें निश्चित आहे. चंद्रावर शेती करण्याच्या गोष्टी सोविएत युवक आतांच करूं लागला आहे.

विश्वांतील हें आपलें भव्य, धीरोदात्त व पूर्ण निर्भय असें स्थान आम्ही जितक्या लौकर ओळखूं व तदनुसार कृति व्यवहार करूं तितक्या लौकर आम्ही सुखी होऊं. आज आमच्या संततीला निश्चिंतपणे जगतां येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उद्यांची चिंता जी आमचें चातुर्य, आमचा जीवनोन्मेष व आमचा आंतरिक चांगुलपणा हरघडी जाळून राख करते व मानवाला मानवाचे पायावर मस्तक ठेवायला भाग पाडते ती परिस्थिति इतिहासजमा होऊं लागली आहे. एवढें परम ऐश्वर्य, एवढा उच्च मानवसन्मान शास्त्रीय तत्वज्ञान किंवा मार्क्सवाद-लेनीनवाद माणसाच्या कह्यांत आणीत आहे. मानवाचें विश्वांतील स्थान नीट समजून घेऊन त्याला वास्तवांत नराचा नारायण बनवणारें तें तत्वज्ञान आहे. त्याचप्रमाणें आपल्या सर्वश्रेष्ठ स्थानाची मानवाला तें जाणीवहि करून देतें.

* * *

२

# भौतिक जग

आपण माणसें ज्या विश्वांत वावरत आहोंत तें विश्व अनंत आहे असें आपण धरून चाललों होतों. परंतु आइन्स्टाईनच्या मताप्रमाणें हें विश्व विशाल, अतिविशाल असलें, तरी तें आहे सांतच. अर्थात् आइन्स्टाईननंतर स्पुटनिक, सॅटेलाईस, ल्युनिक, कॉस्मिक वगैरे अजस्त्र साधनांनीं मानवाच्या माहितींत सतत भर पडत असून विश्वावरचा आमचा ताबा वाढतच आहे. असें सतत प्राप्त होत जाणारें नवें ज्ञान व अचूक व्यवहार ह्या गोष्टींमुळें कदाचित विश्वाबाबतींत त्याला अंत आहे किंवा नाहीं असा प्रश्न विचारण्यापेक्षां आम्ही निराळेच प्रश्न विचारूं व हा जुना प्रश्न आमच्या ज्ञानाच्या अपुरेपणामुळें संभवला असें समजूं. विश्वाला अंत आहे किंवा नाहीं ह्या प्रश्नापेक्षां विश्वावर आमचा ताबा किती वाढत आहे त्यावरच आमचें सुख अधिक अवलंबून आहे. ह्या दृष्टीनें अवाढव्य विश्व हे आमच्या ओळखीचें, आमच्या सुखदुःखाशीं संबंधित, आमच्या ज्ञान व कृति प्रदेशांत आणलेलें विश्व आहे. ह्या विश्वालाच जग असें आपण म्हणतों. ह्या जगांत अणु परमाणुपासून धातु, चुना, माती, दगड, पर्वत, जळ, अग्नी, वायु, वनस्पति, प्राणी, चंद्रसूर्य, ग्रहतारे, आकाशगंगा वगैरे ब्रह्मांडापर्यंत, भिन्नभिन्न प्राणी वगैरे हजारों लाखों वस्तुसंग्रह, घटनाप्रवाह, कधीं भिन्न तर कधीं परस्परविरोधी सुद्धां वाटले तरी शास्त्रीय भाषेंत हें सारें अस्तित्व प्रक्रियात्मक आहे.

संपूर्ण वस्तुस्वरूप म्हणजे भौतिक तत्वाचें केवळ अवस्थांतर होय. प्रत्येक अवस्थेला उत्पत्ति–स्थिति–वाढ–ऱ्हास व लय हीं ठरलेलींच आहेत.

सारा निसर्ग अति लहानापासून अति अवाढव्यापर्यंत, वाळूच्या कणापासून सूर्यासारख्या किंवा त्याहूनहि कितीतरी पटीने अधिक अजस्र ताऱ्यांपर्यंत व पुढें शंभर अब्ज आकाशगंगांपर्यंत, प्राथमिक जीवनपशीपासून मानवापर्यंत आपलें अस्तित्व अविरत प्रवाह, अथक गति आणि सतत परिवर्तन अशा रूपानें दाखवीत असतो. सतत वस्तुत्वांत येणें व वस्तुत्वांतून जाणें म्हणजेच असणें होय.

प्रत्येक अवस्थेला आंतरिक विरोधाने नियमीत करून गतिमान केलेलें असतें. विरोध हा प्रत्येक अवस्थेचा अंतर्गर्भ आहे. वस्तुजाताच्या अस्तित्वाचें तें गतिसूत्र आहे. हें गतिसूत्र समजणें म्हणजेच खरें ज्ञान होणें होय. अशा भौतिकवादी विश्व-आकलनाला विरोध विकासी किंवा द्वंद्वात्मक भौतिकवाद ( डायलेक्टिकल मटिरियालिझम ) असें म्हणतात.

मानव, मोर, माणिक, मेण, मणी ह्या साऱ्या भिन्न वस्तूंना जोडणारा समान धागा म्हणजे भूततत्व होय. 'भूतात्मकं जगत्'. ( चार्वाक सूत्र ) जीव चैतन्य सुद्धां भूतापासून होतें. 'भूतेभ्यः चैतन्यम्'.

वास्तविक स्वतः जडवादी असणारे परंतु भौतिकवाद्यांना जडवादी म्हणून निंदणारे अध्यात्मवादी लोकच भौतिक तत्वाला जडतत्व मानून विश्वाच्या पायाभूत तत्वाचें स्थान फक्त चिन्मय आत्मतत्वाला देतात. भूततत्व मृण्मय असून तें आत्मतत्वाचा एक निम्न कोटींतला अंश आहे असें ते समजतात. परंतु हे सगळे लोक अर्थातच एकतत्ववादी आहेत असें मात्र नव्हे. कारण कांहीं आध्यात्मवादी लोक परमात्मतत्व हें वेगळेंच तत्व आहे असें प्रतिपादतातच. शांकरमतवादी तर फक्त ब्रह्म सत्य व बाकी मिथ्या असें मानतात. ह्या बाबतीतले अद्वैतवादी, द्वैतवादी, विशिष्टाद्वैतवादी, शुद्धाद्वैतवादी, खिस्ती द्वैतवादी व इतर आध्यात्मवादी प्रकार व विकार बरेच आहेत. हजारों वर्षे हे वादविवाद भारतांत व जगांत चाललेले आहेत. परंतु धर्ममार्तंडांच्या वादविवादांनीं बहुजन समाजाचें काडी एवढेंही हित झालेलें नाहीं. उलट त्यांचें परतत्ववादी तत्वज्ञान बहुजनसमाजाला दडपून टाकण्याचें एक महत्वाचें हत्यार म्हणूनच आजवर वावरलें आहे.

शास्त्रीय किंवा मार्क्सवादी तत्त्वज्ञान एकतत्त्ववादी आहे. जगांत पाया-भूत अशीं दोन किंवा अधिक तत्त्वं तें मानीत नाहींं. **सारें जग एकाच भौतिक तत्वाचाच अविष्कार आहे व हें भौतिकतत्व माणसाच्या मनाबाहेर, कल्पनेबाहेर मूर्तिमंत अस्तित्वांत आहे. त्याचे विधि-नियमहि आहेत व हे विधिनियम जाणून घेऊन मानव त्याला आपल्या सुखाशीं सुसंवादी बनवूं शकतो अशी त्याची धारणा आहे.**

भौतिकवादाचे विरोधक अध्यात्मवादी लोक भौतिकवादाला करडा विरोध करीत आलेले आहेत. परंतु जगांत व खुद्द भारतांत भौतिकवादाचा विकास पूर्वीसुद्धां बराच झाला होता. कारण उघडच आहे. सत्य चेपलें तरी किती चेपलें जाणार ?

भारतांत निरीश्वरवादी व निरनिराळ्या प्रकारचे नामांकित भौतिकवादी होऊन गेलेले आहेत. परंतु ज्या मानानें वर्ग–संघर्षांत शास्त्या वर्गाची सरशी होत गेली त्या मानाने ह्या वर्गांचें तात्विक अधिष्ठान निखळून काढणारें भौतिकवादी ' लोकायत ' तत्वज्ञान भ्रष्ट करण्यांत आलें.

'लोकायत ' हें फार प्रभावी तत्वज्ञान असून बहुजन समाजाशीं तें संबद्धहि असावें. चार्वाक हा एकटाच नव्हता. किती तरी चार्वाक होऊन गेलें. जैन बुद्धमतामागें निरीश्वरवाद्यांची एक फार मोठी लोकायत परंपराच होती.

आमचें भारतीय तत्वज्ञान बहुतांशानें भौतिक व निरीश्वरवादी आहे असें विंटरनिझ व सोविएत पंडीतांचेंहि मत आहे. परंतु सनातनी प्रचारक व तत्वज्ञानाचे भांडवलदारी प्रवृत्तीचे शिक्षक मात्र असें भासवतात, कीं आमचें तत्वज्ञान आगळें, अभौतिक आणि परलोकवादी असून भौतिकवादाला भारतांत स्थानच नाहीं. जणूं काय व्याज, नफा, धनसंग्रह, भांडवलशाही, जमीनदारी, वेठबिगारी, गुलामगिरी, दासप्रथा, गुन्हेगारी, चोरी, हिंसा, मारामाऱ्या, वेश्याव्यवसाय वगैरे गोष्टी भारताला माहितच नाहींत. गरीब, दुबळे, अन्नाला मोताद झालेले, भुकेनें, दारिद्र्यानें मरणारे, संस्कृतीच्या तहानेनें व्याकुळ झालेले कोट्यवधी लोक भारतीय नसून परकेच आहेत ! जणूं कोट्यवधी पीडित शेतकरी, शोषित कामगार, चातुर्वण्याच्या वज्रचौकटीनें छळले गलेले सारेच आम्ही

मध्यमवर्गीय जीर्णशीर्ण लोक भारतीय परंपरेचे कोणीच नव्हे! ह्यांच्या दृष्टीनें भारत म्हणजे, दिव्य परमात्मा आकाशांत, घनगंभीर ऋषिमुनी हिमालयाच्या माथ्यावर आणि स्थितप्रज्ञ महाजन व सारा सुखीसंसार मूठभर श्रीमंत लोकांच्या रिंगणांत!

भारतीय तत्वज्ञानाचा असा खोटा प्रचार करण्यांत बड्याबड्या पाश्चात्त्य तत्ववेत्त्यांनींही हातभार लावलेला आहे. ज्या पाश्चात्त्यांनीं भारतीय तत्वज्ञानाची ही अबुद्धिवादी बाजू उचलून धरली, त्यांनीं ही गोष्ट विचारपूर्वक केलेली असो किंवा नसो; परंतु पाश्चात्त्य तत्वज्ञानाची ही स्थिति ऱ्हासकालाची द्योतक आहे हें नक्की.

भांडवलदारी समाजरचनेचें रक्षण करण्याच्या हेतूनें तिच्या पोटांत जन्माला आलेल्या समाजसत्तावादी तत्वज्ञानाची बदनामी करणें जरूर होतें. म्हणून मार्क्सवादाच्या उदयाबरोबर गेल्या १०० वर्षांत अध्यात्मवाद, रहस्यवाद वगैरे अशास्त्रीय प्रतिगामी विचारधारांना प्रोत्साहन मिळत गेलें आहे. दुबळ्या बायबलच्या आधार कोसळत्या समाजरचनेला आतां सावरूं शकत नव्हता. म्हणून ह्या ऱ्हासकालीन पाश्चात्त्य तत्वज्ञानानें जगांतील इतर तत्वज्ञानांचाही आपल्या कोसळत्या रचनेला पाठिंबा मिळवावयाचा प्रयत्न केला आहे. बुडत्याला काडीचा आधार ह्या न्यायानें केवळ भारतीय तत्वज्ञानच नव्हे तर साऱ्या जगांतील तत्वज्ञान आध्यात्मिक आहे असें ऊर बडवून सांगणें त्यांना भाग होतें.

विशेषतः पहिल्या महायुद्धानंतर कांहीं सज्जन विचारवंतांना हें स्पष्ट कळून चुकलें होतें कीं पाश्चात्त्य संस्कृतीचा नाश अटळ आहे. अर्थात पाश्चात्त्य संस्कृति म्हणजे भांडवलशाही संस्कृति. ही संस्कृति बहुजनसमाजाचें भलें कदापि करूं शकत नाहीं. अशा परिस्थितींत भांडवलदारी विचारवंतांना पहिल्या महायुद्धापूर्वींच स्वनाशाचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. प्रख्यात जर्मन विचारक स्पेनाल्र ह्यानें १९११ तच 'पश्चिमी संस्कृतीचा ऱ्हास' हें पुस्तक लिहिणें सुरूं केलें होतें. ह्या लोकांना मार्क्सवादाचें शास्त्रीय विश्लेषण पचण्यासारखें नव्हत. कारण त्यांचा वर्गस्वार्थ सुटणें शक्य नव्हतें. जो भांडवलदार वर्ग वर्गीय संस्कृतीच्या कळसाला पोचला होता त्या वर्गाचा ऱ्हास हाच काय तो त्यांना दिसण्यासारखा होता.

ज्यांना संस्कृति ही चीज अजून लाभावयाचीच होती ते कोट्यावधी निम्न-वर्गीय युरोपियन व आशिया आफ्रिका खंडांतील अब्जावधी परतंत्र लोक ह्यांना पाश्चात्य संस्कृतीचा ऱ्हास म्हणजे कोणाचा ऱ्हास तें कळणें शक्य नव्हतें. अर्थात गूढवाद, रहस्यवाद, ढोंगी त्यागवाद वगैरे शब्दजंजाळ दुःखी लोकांच्या चांगल्याच परिचयाचें असतें! हजारों वर्षांचें दुःख दैन्य व त्यांतून निघालेला दुःखवाद दलित पीडितांच्या रक्तांत भिनलेला असतो. दलितांचें हें मानसशास्त्र ओळखून ह्या हुशार लेखकांनीं आपला वर्गऱ्हास, गूढवाद, दुःखवाद वगैरे अशास्त्रीय उपपत्तींच्या बुरख्याखालीं झांकून ठेऊन उलट उठेल्या बहुजन वर्गालाच मानसिक गुलामगिरींत ठेवण्याचा हीन प्रयत्न केला व आजही करीत आहेत. दलित-पीडित परंतु उदयोन्मुख अशा वर्गाला व सत्तासंघर्ष आणि बेदिली यांनी जर्जर झालेल्या वरच्या मध्यम वर्गाला सुद्धा दिलासा देण्याकरतांच तात्विक तर्कजंजाळ आणि शब्दजाळ निर्माण झालेलें असतें. परंतु वास्तवांत संस्कृतीचा ऱ्हास म्हणजे कोणाचा ऱ्हास व ऱ्हास होण्यासारखी अशीं पापें कोणी केलींत व करीत आहेत, तें कांहीं ह्या दलित-पीडित वर्गाला तसेंच मध्यम वर्गाला कळणें शक्य नव्हतें. भांडवलशाहीच्या नाशांतून उदयाला येणारें शोषणमुक्त सोविएत जग भांडवलदारी विचारवंतांना दिसणें शक्य नव्हतें. तसेंच वसाहत देशांत स्वतंत्र उदयाच्या शक्ति निर्माण होत आहेत व युरोपचीं पददलीत खंडें स्वतंत्र होऊन नव जग निर्माण करणार आहेत हेंही भांडवलशाहीच्या ह्या बौद्धिक पहारेकऱ्यांना दिसणें शक्य नव्हतें. मग त्यांना काय दिसलें? भांडवलशाही विरोधानें ज्यांचे आसन नक्की डळमळलें आहे त्या भांबावलेल्या शास्त्या विचारवंतांना मुकीं जनावरें कुणी हांका अशा स्थितींतला भारत दिसला! अति पुराणा, अनेक धार्मिक गुंगींना बळी पडलेला साठ सत्तर कोटींचा चीन दिसला! पुराण्या धार्मिक अफूनें बधिर झालेले अब्जावधी पौर्वात्य दिसले!! शोषण-लालसेनें जिभल्या चाटीत त्यांनीं आमच्याकडे पाहिलें. सोविएत राज्याच्या निर्मितीनें युरोपांत जें ह्या रक्तशोषकांना हरवावें लागलें तें आशियांत गवसल्यासारखें वाटून त्या आनंदाने ते बेहोष झाले. त्यांनीं भारतीय आध्यात्मवादावर वारेमाप स्तुति-सुमनें उधळलीं. आत्मप्रतारणा व परप्रतारणा ह्यांचें हें मासलेवाईक उदाहरण आहे व गंमत अशी कीं आमच्या शहाण्या लोकांनाहि हें कारस्थान उमगलें

नाहीं. आमच्यावर सत्ता गाजविणारे आमचे प्रभु आमची स्तुति करतात, मग काय, शोपनहॉअर महान तत्वज्ञ व मॅक्स मुल्लर मोक्ष मुल्लर ठरले असल्यास नवल नाहीं. हे लोक आमच्या इतिहासाला, आमच्या पराक्रमाला, आमच्या पुरूषार्थाला गौरवणारे खास नव्हते. ह्यांनीं गौरवला आमचा परलोकवाद–आमचा गूढवाद–हें विसरतां कामा नये. त्यांना आमच्यावर ताबा गाजवायचा होता. कर्ममार्गी पुरूषार्थी विचार पैदा होण्याऐवजी दैववादी परलोक-धार्जिणे विचार ह्या देशांत अधिक पिकावे असें त्यांना वाटणें साहजिक होतें. म्हणून त्यांनीं आमचें परतत्ववादी तत्वज्ञान गौरविलें. ह्या तत्वज्ञानानें देशाची मजबूत बांधणी होणें कदापि शक्य नाहीं हें त्यांना नक्की ठाऊक होतें. आमच्या वैचारिक पुढाऱ्यांनाही जनतेच्या अस्सल दृष्टिकोणाचा फारसा परिचय नव्हता व शिवाय आमचा बौद्धिक वर्ग बहुतांशीं शास्त्या वर्गाचा आर्थिक दास असल्यामुळें वैचारिक बाबतींत प्रभावी स्वतंत्र भूमिका त्याला घेतां आली नाहीं. जें प्रभु बोल्ले तेंच आमचे पुढारी घोकत बसले. गोरे प्रभु म्हणाले, कीं सारा नाश स्वार्थबुद्धीनें केला. आमचे पुढारी वदले, हो अगदीं बरोबर ! अहो, त्याग हाच भारतीय परंपरेचा आत्मा आहे ! गोरे प्रभु बरळले, सारा घात यंत्रांनीं केला. आमचे पुढारी म्हणाले, भारतीयांनों, निसर्गाकडे वळा, आमचे ऋषी कुठें यंत्रें चालवित होते ! गोरे प्रभु फुत्कारले, विज्ञान आज नाशाला उद्युक्त झालें आहे, विज्ञान हें फसवें आहे, विज्ञानानें माणसाला निधर्मी बनवलें आहे, विज्ञान मायाजाल आहे. साम्राज्यवादी युरोपच्या विचारांची शास्त्रशुद्ध छाननी करण्याचें कार्य आमच्या फारच थोड्या पुढाऱ्यांना साधल असें म्हणण्यावांचून गत्यंतर नाहीं व शास्त्रीय तत्वज्ञानाच्या आधाराशिवाय तें शक्यहि नव्हतें.

पॉल एर्नेस्ट वगैरे विचारवंत चीनी किसानांना गुरू करावयाला धांवले. कां, तर म्हणे ते थोडक्यांत संतुष्ट राहतात. त्यांना अधिक कांहीं लागत नाहीं. ते आपण श्रम करून दुसऱ्यांना चैन करूं देतात. कैसलिंग ह्या जर्मन विचारवंताला भारतीय फकीर अनुकरणीय वाटले. जर्मन कामगारांनीं, चीनी शेतकऱ्यांचे व हिन्दी फकिरांचे आदर्श गिरवून अर्धपोटी राहून शास्त्या वर्गाचा खजिना अधिक भरला असता तर किती बरें झालें असतें ! परंतु छे, ते तर संप करतात. ते तर स्वतःची आर्थिक स्थिती सुधारूं पाहतात. केवढें हें अब्रह्मण्य !

अर्थात सार्‍या परकीयांनीं अशा वर्गस्वार्थानेंच आमची प्रशंसा केली आहे असें आम्ही म्हणत नाहीं. परंतु हा वरील दृष्टिकोण लक्षांत ठेऊनच साम्राज्यवादी विचारवंतांच्या विचारांचें परीक्षण व्हावयाला हवें होतें नि तरच तें शास्त्रीय ठरलें असतें एवढेंच आमचें म्हणणें.

वास्तविक, तौलनिकदृष्ट्या भारतीय तत्वज्ञान जगांतील इतर तत्वज्ञानापेक्षां अधिक भौतिकवादी आहे हें कोणत्याही निःपक्षपाती अभ्यासकाच्या ताबडतोब लक्षांत येईल. भारतवर्षांतहि भौतिक दर्शन दडपून टाकण्यांत आलें आहे. भौतिक तत्वप्रणेत्यांचे ग्रंथ नष्ट करण्यांत आले. चार्वाक, बृहस्पति वगैरे विद्वानांचे अनीश्वरवादी विचार आज फक्त त्यांच्या विरोधकांच्या ग्रंथांतूनच विकृत स्वरूपांत आम्हाला अभ्यासावे लागतात. कर्मकांडप्रधान वैदिक दर्शनशास्त्राविरुद्ध बंड करून सांख्य, वैशेषिक वगैरे दर्शनें निर्माण होऊं शकलीं. ही दर्शनें भौतिकवादाकडेच झुकणारीं होतीं. अर्थात शासक वर्गात जे अंतर्विरोध व जी चुरस असते त्यामुळें विचारकांना कांहीसें विचार स्वातंत्र्य मिळत असतें व अशा रूपानें सत्य हळूहळू आगेकूच करीतच जातें. तथापि ह्या शास्त्रांच्या बुडाशीं जोरदार अशी जनतेच्या उद्धाराची तळमळ किंवा आंदोलन होतें असें मात्र नव्हे. किंवा तशी ऐतिहासिक कालपक्वताहि नव्हती. कारण उत्पादन-साधनें बहुजनसमाजाला वर्गमुक्त करूं शकण्याएवढीं विकसलीं नव्हतीं. म्हणून हीं तत्वज्ञानें पुढें ब्राह्मणवादाच्या प्रतिहल्ल्याला बळीं पडलीं.

तसें पाहूं गेल्यास सारीं षड्दर्शनें प्रथम अनीश्वरवादी होतीं. खुद्द 'वेदान्त' दर्शनसुद्धां ईश्वरवाद्यांच्या ईश्वर कल्पनेला फारसा दुजोरा द्यायला तयार नाहीं. कॉ. श्री. अ. डांगे यांनीं 'भारत' ह्या आपल्या अत्यंत मौलिक ग्रंथांत दाखवून दिल्याप्रमाणे वेदांचें 'ब्रह्म' हें आर्यांच्या साम्य संघाचें नांव असून 'यज्ञ' ही त्या समाजाची उत्पादन प्रणाली होती व अशा जीवनाचें ज्ञान म्हणजे 'वेद' होय. उपनिषदांचें 'ब्रह्म' हें तर बोलून चालून 'उदासीन' 'निष्कल्प' व 'निष्क्रीय' आहे. उपनिषदांत कांहीं ठिकाणीं प्राणालाच आत्मा किंवा ब्रह्म मानून कांहीं ठिकाणीं जीव ब्रह्माहून श्रेष्ठ मानला आहे. आणि ईश्वरवाद्यांचा ईश्वर तर जीव निर्माण करून बसलेला! जगाचा कर्तुम अकर्तुम अन्यथा कर्तुम असा तो शास्ता!! त्याच्या इच्छेविना झाडाचें पान हालणें अशक्य!

निसर्ग–विज्ञानाच्या अभावीं प्राचीन भौतिकवाद शास्त्रीय तत्वज्ञानाच्या पातळीवर येणे शक्य नव्हतें. त्याचप्रमाणे सृष्टि–शास्त्रांच्या अजस्र प्रगतीमुळें एकदम पुढें आलेला अठराव्या एकोणीसाव्या शतकांतील यांत्रिक किंवा ज्याला फ्रेंच भौतिकवाद असें म्हणतात तोही सर्व ठीक होता असें नव्हे.

भौतिक वादाचा खरा शास्त्रशुद्ध विकास करण्यांत यश मिळालें तें कार्ले-मार्क्स, एंगल्स, डिएझगीन व लेनिन ह्या महान तत्ववेत्त्यांना. त्यांनीं यांत्रिक भौतिक वादांतले दोष काढून टाकले. तसेंच मामुली विकासवादांतले ( व्हल्गर एव्होल्युश-निझम ) दोषही दूर केले व भौतिकवादाला शास्त्रीय बैठक घालून दिली. वरील तत्ववेत्त्यांचे विचारच ऑक्टोबर १९१७ च्या महान सोविएत क्रांतीला यशस्वी चालना देऊं शकले. महान रशियन क्रांतीकारी विचारवंत प्लेखनव व जगांतल्या इतर थोर पुरोगामी विचारवंतांनीं शास्त्रीय तत्वज्ञानांत मोलाची भर टाकली आहे.

भौतिकवादाचे अर्वाचीन विरोधक असें म्हणतात कीं आमची विज्ञान–चिकित्सा जगांत भौतिक असें कांहीं आहे असें मानावयालाच तयार नाहीं. कारण सध्या भूततत्व (मॅटर) अंतर्धान पावलें असून 'ॲटम' फक्त कार्यावरून जाणला जातो. तो प्रत्यक्षपणें अस्तित्वांत नाहीं वगैरे. परंतु हीं सारीं अर्धसत्यें पुरी दिशाभूल करणारी आहेत हें विसरतां नये. पूर्वी हाताला लागणारें, नजरेला दिसणारें, अवकाशांत विखुरलेलें असें जें, तें भौतिक तत्व असें समजत असत. आतां ही कल्पना लुप्त झाली आहे हें खरें आहे. परंतु रसेल, एडींग्टन, जेम्सजिन्स वगैरे वैज्ञानिक लेखकांनीं ह्या बाबतींत तर्कांचे जे फवारे उडविले आहेत ते मात्र त्यांच्या वैज्ञानिक कामगिरीपेक्षां फारच हलक्या दर्जाचे आहेत. अर्थात ह्या बाबतींत बेर्नाल, क्युरी, हाल्डेन आणि इतर कितीतरी विख्यात वैज्ञानिकांना त्यांची वेळोवेळीं कानउघाडणी करावी लागली आहे. लंडन युनि-व्हर्सिटीचे गणितज्ञ प्रो. लेव्ही म्हणतात, "सामान्यतः भौतिक तत्वाचा जमाना गेला आहे. तेव्हां आतां ठोस भारमुक्त वाटणारें भौतिक तत्व अत्यंत वेगवान विद्युतच्या लहान चार्जांचा समूह आहे. हे चार्ज इतके लहान आहेत कीं त्यांच्या-मध्यें तुलनात्मक रूपानें फार प्रचंड असे खुले अवकाश आहेत. तेव्हां आतां ठोस भौतिक तत्वाची पुराणी कहाणी सांगणे निरर्थक आहे. अर्थात इथें भौतिक

तत्वाचा अर्थ, आम्हीं इथे तिथें जे तुकडे किंवा वस्तु उचलतों तें भौतिक तत्व होय असा केला आहे. परंतु जसजशी विज्ञानाची उन्नति होत आहे तसतशी भौतिकतत्वाच्या ह्या तुकड्यांची बनावट व घडण आम्हांला अधिक समजूं लागली आहे. भौतिकतत्वाची छाननी करीत करीत त्याला आतां प्रकाश, उत्ताप, विद्युतपर्यंत भिडवण्यांत आलें आहे. परंतु ह्या छाननीचा अर्थ जर का असा केला गेला कीं ह्या तत्वाला आतां अस्तित्वच उरलें नाहीं तर तें बरोबर नाहीं. कागदाचा तुकडा जेव्हां जळतो तेव्हां तो ज्या अर्थाने नष्ट होतो त्याच अर्थाने भौतिकतत्व हें नष्ट होतें म्हणजे बदलतें. त्याचें रूप बदलतें पण तें नाहींसें होत नाहीं. एका परिवर्तनशीलतेंतून दुसऱ्या परिवर्तनशीलतेंत तें जातें. अंगप्रत्यंगाचे संबंध बदलतात. परंतु एवढ्यावरून भौतिकतत्व आतां पूर्व युगांतील एक निकामी धारणा ठरली आहे असें म्हणणें हें चूक आहे." ( फिलॉसफी फॉर ए मॉडर्न मॅन )

१९ साव्या शतकांत डाल्टनूनें भौतिकतत्व ॲटमचें बनलेलें असतें असें वर्णन केलें आणि ॲटम म्हणजे कठीण ठोस गोळीच्या रूपाचें अशी कल्पना केली. ग्रीक भाषेंत 'एटम' शब्दाचा अर्थ अविभाज्य असा आहे. पन्नास साठ वर्षांपूर्वी असें वाटत होतें कीं ॲटमचें आणखी विभाजन शक्य नाहीं. परंतु त्याचें विभाजन होतें. एव्हढेंच नव्हे तर एलेक्ट्रॉनचे पण विभाजन होतें व हें विभाजन विद्युत तरंगापर्यंत पोचलें आहे.

भूततत्वाची पुराणी कल्पना फार स्थूल होती. ती आतां सूक्ष्म झाली आहे. परंतु शास्त्रज्ञ लेवी म्हणतो त्याप्रमाणे ह्या सूक्ष्मतेचा अर्थ त्याचा लय झाला असें मात्र नव्हे. तर त्याच्या बाबतींत आमचें ज्ञान वाढलें. म्हणजे उलट त्याचें अस्तित्व भरभक्कम झालें आहे.

मार्क्सवाद्यांनीं भौतिकतत्वाची जी कल्पना केली होती ती यांत्रिक भौतिकवादाच्या कल्पनेसारखी किंवा अध्यात्मबद्ध वैज्ञानिकांच्या कल्पनेसारखी अशास्त्रीय नव्हती. ऐंशी वर्षांपूर्वीं एंगल्सनें 'प्रकृतीचा द्वंद्वगर्भ विकास' ह्या आपल्या पुस्तकांत स्वच्छ म्हटलें आहे, 'ॲटम्सना आम्ही अगदीं सर्वांत लहान व भौतिकतत्वाचे अंतिमकरण मानीतच नाहीं.'

तसेंच मार्क्सचा समकालीन व एंगल्सच्या शब्दांत मार्क्सवादी तत्वज्ञानाचा स्वतंत्र निर्माता जोसेफ डिएझ्गीन लिहितो, 'भौतिकतत्वाच्या विभागणीला अंत नाहीं. कारण निसर्गाच्या सर्व भागांना आदि आणि अंत नाहीं.' ( धी नेचर ऑफ ह्युमन ब्रेनवर्क )

लेनिन म्हणतो, 'ॲटम जेवढा विभाज्य आहे तेवढाच इलेक्ट्रॉन पण आहे. निसर्गाला अंत नाहीं. तसाच अस्तित्वालाही अंत नाहीं. दार्शनिक भौतिकवाद ज्या भूततत्वाला ओळखतो त्या भूततत्वाचा एकमेव गुणधर्म म्हणजे त्याचें वास्तविक अस्तित्व-आमच्या मनाबाहेरील त्याचें अस्तित्व.' ( मटीरियालिझम ॲन्ड एम्पिरिओ क्रिटिसिझम, पान २६९ )

सोविएट अकादमीचे एस. आय. वाविलोव आपल्या 'लेनिन व आधुनिक पदार्थ-विज्ञानाच्या समस्या' ह्या निबंधांत म्हणतात, 'न्युक्लियर जगत हें व्यावहारिक जगाहून बरेंच भिन्न आहे असें आढळून आलें आहे. अर्थात तदनुसार आमच्या कल्पना बदलणें व नवीन जगाशीं तन्मय होणे जरूर आहे. परंतु द्वंद्वात्मक भौतिकवादाच्या पायावर मजबूत उभें राहूं शकणाऱ्या पदार्थविज्ञानिकाला निसर्ग गोंधळांत टाकूं शकत नाहीं.'

आइन्स्टाइन्च्या सिद्धान्तानें विज्ञानक्षेत्रांत एक प्रचंड आंदोलन घडवून आणलें. तेव्हांपासून असें म्हणण्यांत येऊं लागलें कीं विज्ञान आणि सर्वसाधारण बुद्धि ह्या दोन वेगळ्या आणि परस्पर विरोधी वस्तु आहेत. आणि असें जर आहे तर ह्यांत कुठे तरी कांहीं तरी रहस्य, गूढ किंवा ईश्वराचा हात असावा अशा तर्कांना वाव मिळाला. परंतु वस्तुस्थिति अशी नाहीं. ज्यामुळें माणसांची दिशाभूल होऊन माणूस गूढवादी बनतो तीं सगळीं गूढें प्रदीर्घ प्रयत्नानें उकललीं जातात व ह्या उकली जेव्हां सामान्य माणसांच्या प्रथमच नजरेला येतात तेव्हां तीं क्षणभर दचकतात. प्रत्येक वैज्ञानिक शोधानें त्या त्या युगांतल्या प्रचलित कल्पनेला जबर धक्का दिलेलाच असतो. चंद्रग्रहणाच्या शास्त्रीय ज्ञानानें आकाशांतून जेव्हां राहू-केतूची उचलबांगडी केली तेव्हां असाच धक्का बसला होता. सोळाशें वर्षांपूर्वी भारतांत जेव्हां सूर्य-सिद्धांत लिहिला गेला तेव्हांही असाच धक्का बसला होता व आर्यभट्टानें जेव्हां पृथ्वीभ्रमणाची कल्पना मांडली तेव्हांही असाच धक्का बसला होता. परंतु वर्गाधिष्ठित समाजाच्या इतिहासांत

प्रत्येक चित्तथरारक नवीन शोधाच्या वेळीं जो घोर विज्ञानविद्रोह दिसून आला त्याचें असा धक्का हें मात्र पुरेसें कारण असूं शकत नाहीं. खरें कारण शासक वर्गाचा चुकीचा दृष्टिकोन हें होय. शासक वर्ग नेहमीच दिवाभीता-प्रमाणें वावरत आला असून ज्ञानज्योतीची प्रखरता त्याला कधींच सोसवली नाहीं. आपल्या फायद्यापुरताच विज्ञानाचा संभाळून वापर करणें हें त्याचें धोरण असतें. आजहि अमेरिकेला मुक्त हस्तानें 'स्वयंचलन'चा वापर करणे परवडत नाहीं. सोविएतच्या आर्थिक आणि वैज्ञानिक प्रगतीच्या मानानें आज जी अमेरिकेची पीछेहाट चालू आहे त्याचें हेंहि एक कारण आहे.

मध्ययुगीन इतिहास कालानंतर कोपर्निकस, गॅलिलेव वगैरेंच्या शोधांनीं प्रस्थापित हितसंबंधांना व ह्या हितसंबंधाचें रक्षण करणाऱ्या धर्ममार्तंडांना गद-गदून हालवून सोडलें होतें व आपल्या प्राणावर गुदरल्याप्रमाणें ते वागले. त्यांनीं वैज्ञानिकांचा नरमेध सुरू केला. कित्येकांना जाळून मारलें. कित्येकांना देशोधडीला लावलें. कित्येकांच्या वृद्ध मातापितरांचा अनन्वित छळ केला. म्हणूनच विश्व-विख्यात फ्रेंच महापंडित दिदेरो म्हणाला कीं 'जोंवर शेवटच्या शासकाला शेवटच्या पाद्रीच्या आंतड्याच्या फांसाने ठार केलें नाहीं तोवर मानवी स्वातंत्र्य धोक्यांत राहील.'

समाजोन्नतीप्रमाणें विज्ञानोन्नतीसुद्धां विरोधविकासी गतिनुसार चालत असते. ह्या गतिसिद्धांतानुसार जें कालपर्यंत रहस्यमय अंधारांत दडून होतें तें आज स्पष्ट होत जातें. समयानुरूप असें नेहमीच वाटतें कीं नवें वैज्ञानिक सत्य अन्तिम सत्य आहे. परंतु कांहीं दिवसांनंतर त्या सत्याशीं निरीक्षित सत्याची संगति पुन्हा जुळेनाशी होते. तेव्हां त्याहून समृद्ध सत्याची जरुरी भासते. ज्याप्रमाणें बालपणांत मुलें कितीतरी भ्रामक कल्पनांना बळी पडतात त्याप्रमाणें विज्ञानाच्या बाल्यावस्थेंत पारा, फ्लॉजिस्टिन, इथर वगैरे नाना कल्पनांना विज्ञान बळी पडलेलें आहे.

मार्क्सवादी विचारवंत भौतिक जगाकडे किंवा निसर्गाकडे यथार्थ दृष्टिकोणां-तून बघत असतात. निसर्गांत जें नाहीं तें तर्काच्या आधारावर ते निसर्गाला चिकटवीत नाहींत. निसर्ग जसा आहे, व्यवहारांत जसा आढळतो, प्रयोगांत जसा सिद्ध होतो तसा ते घेतात. एक ज्ञेय व दुसरा अज्ञेय असे निसर्गाचे दोन

तुकडेहि ते पाडीत नाहींत. ज्ञेय निसर्ग म्हणजे मानवप्रयत्नाला कळूं शकणारा. अज्ञेय म्हणजे जो मानवाला भूतकालांत कळूं शकला नाहीं, वर्तमान काळांत कळूं शकत नाहीं व भविष्य काळांत कळणारच नाहीं अशा प्रकारचा अतिभौतिक निसर्ग मार्क्सवादी बिल्कूल मानीत नाहींत. पारलौकिक, अतिलौकिक हे शब्द मार्क्सवादी शब्दकोशांत नाहींत. मात्र एक गोष्ट ते जरूर मानतात कीं निसर्गाचा कांहीं भाग आतांपर्यंत कळलेला आहे व कांहीं कळत जाणार आहे. निसर्ग अमर्याद असल्यामुळें ज्ञानही अमर्याद आहे. माणसांची वासना अमर्याद आहे. प्रयत्न अमर्याद आहे. पुरुषार्थ आणि त्याला वावही अमर्याद आहे. सत्‌चित् आनंद सारे अमर्याद आहेत परंतु अंतिम मात्र कांहींच नाहीं. कालच्याहून आजचें ज्ञान वास्तवतेच्या अधिक जवळचें व एकामागून एक क्षेत्र पूर्णतेच्या आवाक्यांत आणणारें आहे. आजच्याहून उद्यांचें ज्ञान अधिक समृद्धशाली, अधिक आनंददायी आहे व हीच मानवी प्रयत्नांची, बुद्धीची व पुरुषार्थांची कमाई आहे. ह्यापलिकडच्या अज्ञेय, अतींद्रिय, अतिभौतिक, गूढ, दैवी वगैरे गोष्टी भोंगळ विज्ञान व भोंदू तत्वज्ञानाच्या द्योतक आहेत. तें काल्पनिक गूढगुंजन शास्त्रीय तत्त्वज्ञानाला अफू-समान त्याज्य आहे.

तर मग कांहीं विज्ञानवेत्ते आणि तत्वज्ञ आध्यात्मिक किंवा पारलौकिकाचें एवढें अवडंबर कां बरें माजवून राहिले आहेत? हा प्रश्न कोणीहि विचारील. आमच्या दृष्टीनें ह्या अवडंबराचें कारण एकच. वर्गस्वार्थ. शुद्ध बुद्धिवादी समजतात त्याप्रमाणें फक्त अज्ञान किंवा अपूर्ण ज्ञान हें तें कारण नव्हे. अर्थात हें स्पष्ट करण्याकरतां अध्यात्मवादाची ऐतिहासिक छाननी करणें आवश्यक आहे.

प्रथमच माणसांनीं जेव्हां भोंवतालच्या अस्तित्वाकडे पाहिलें तेव्हां वस्तुजात त्यांना अगदीं सुटें, वेगवेगळें, असंबद्ध, जन्माला येणारें आणि परत नष्ट होणारें असेंच दिसणें साहजिक होतें. म्हणून त्या काळांतलें तत्वज्ञान अस्थिरवादी, क्षणवादी बनणें स्वाभाविक होतें. प्रख्यात ग्रीक तत्वज्ञ हेरक्लिटस् लिहितो, 'संपूर्ण अस्तित्व आहे आणि नाहींहि असें म्हणावयाला हरकत नाहीं कारण तें सतत बदलत असतें.' परंतु पुढें वस्तूंचें पृथक परीक्षण होऊं लागलें व तेव्हांच निसर्ग विज्ञानाची प्रगति झाली. परंतु त्याचबरोबर वस्तुत्वाला पृथकत्व देण्याची

संवय जी एकदां मनाला लागली. त्यामुळें पुढें वस्तुत्वांतील परस्पर संबंध व गति नजरेआड होऊं लागली. नैसर्गिक वस्तु आणि प्रक्रियांचे निरीक्षण पृथकत्वानें करणें हा निसर्ग संशोधन—पद्धतीचा वारसा होय. वातावरणापासून वस्तूंना तोडून काढणें, त्यांतील अंतर्गत संबंध व प्रवाह बाजूला ठेवून त्यांचें अलग विश्लेषण करणें म्हणजे दुसऱ्या शब्दांत वस्तुप्रक्रियांना परिस्थितीपासून—गतीपासून अलग करून स्थितिशीलतेंत त्या तपासणें होय. ह्याचा अर्थ प्रामुख्यानें गतिशीलतेच्या ऐवजी स्थितिशीलता तपासणें असा होय. किंवा वस्तूंचें जिवंत निरीक्षण न करतां त्यांचीं मढीं तपासणें होय. निसर्ग विज्ञानांतील ही प्राथमिक विश्लेषण पद्धति जेव्हां तत्वज्ञानांत घुसली तेव्हां अध्यात्मपद्धति पुढें आली. ह्या पद्धतीचा मुख्य दोष हा, कीं ही विश्व आकलन पद्धति फक्त चिंतनात्मक आहे. परंतु आमचें जग तर प्रामुख्यानें कृतिमय आहे कृतींतूनच ज्ञान उद्‌भवतें व वाढत जातें. सत्य हें कर्मव्यवहार किंवा कृतीच्या परिणामीं प्रकट होत असतें. म्हणूनच बौद्ध तत्ववेत्ता धर्मकीर्ति 'प्रमाणवार्तिक' ह्या पुस्तकांत म्हणतो, 'अर्थक्रिया समर्थ यत् इदत्र परमार्थसत्' जें वास्तवीक व्यवहारांत प्रयोगद्वारा सिद्ध होतें तेंच परमार्थसत् होय. स्वप्नांत पाहिलेल्या बर्फींत अर्थक्रिया नाहीं कारण ती भूक निवारण करूं शकत नाहीं. जागृतींतली बर्फी भूक निवारण करते म्हणून ती अर्थक्रिया समर्थ म्हणजेच पूर्ण सत्य. **प्रगत सामाजिक मानवी व्यवहार सारीं गूढें समाधानकारक रीत्या सोडवीत चालला आहे. केवळ निष्क्रीय चिंतनानें तें काम होणार नाहीं. लोणी ताक घुसळूनच मिळूं शकेल. तें कांहीं पाणी घुसळून निघणार नाहीं. म्हणूनच मार्क्सवाद तत्वज्ञानाला व्यवहाराचा मार्गदर्शक व व्यवहाराला तत्वज्ञानाचा जनक मानतो.**

सारांश, भौतिक जगाच्या वस्तुनिष्ठ भक्कम पायावर आम्ही उभे असून आमचा समाज, आमचा व्यवहार, आमची सामाजिक, सामुदायीक मानवी कृति हीच आमच्या तत्वमीमांसेची जननी आहे. भूततत्व केवळ बुद्धीची निर्मिती नसून खुद्द बुद्धि ही भूततत्वाची उच्चतम परिणति आहे हा शास्त्रीय तत्वज्ञानाचा मूल सिद्धांत आहे.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ................ वि: ................
ग्रंथांक ................ नों दि ................

४

# परमेश्वर

'श्रांताची साऊली अनाथ जीवांची माऊली'—ज्ञानेश्वर

ज्याला आपण परमेश्वर म्हणतों, ज्याला आमच्या पूर्वजांनीं अनंत अपार अशा जगाचें सनातन कर्तुम अकर्तुम कर्तृत्व बहाल केलें आहे, ज्या 'सर्वलोक महेश्वरम्' च्या चरणांवर आपल्या सुखदुःखाची तिलांजली वाहण्याचा अनेकांनीं प्रयत्न केला व कुठें तुरळक अजूनही करताहेत; ज्याच्या इच्छेविना पान हालणें अशक्य असें मानलें जातें, तो परमेश्वर कोण आहे किंवा ती चीज काय आहे हें समजून घेणें आमचें बौद्धिक कर्तव्य नाहीं काय ?

सर्वच्या सर्व धर्मांनीं जरी नसलें तरी बहुतेक धर्मांनीं ईश्वराला मानलें आहे. कांहींनीं तर फक्त ईश्वरालाच मानून बाकी सारें अस्तित्व मायावत् ठरवलें आहे. ईश्वराचा जेवढा आधार आणि भय भाविकांना वाटतें तेवढा आधार आणि तेवढें भय आणखी कशाचेंच वाटत नाहीं. परंतु ईश्वर नांवाचा कुणी प्राणी किंवा निदान शक्ति आमच्या जीवनाचें शासन किंवा नियंत्रण करीत आहे असें समजावयाला कांहीं आधार आहे काय ? हेंच तर आम्हीं तपासून पाहणार आहोंत.

बहुजन समाजाला भले जरी असें वाटलें कीं पृथ्वी स्थिर असून सूर्य फिरतो आहे तरी पृथ्वी सूर्याभोवती फिरते आहे हें शास्त्रीय सत्यच आम्ही मानतों. शास्त्या वर्गाच्या सतत शिकवणुकीनें व पंडिती-पुरोहिती प्रचारानें ह्या जगाचा नियंता ईश्वर वगैरे कोणी पुरुष किंवा अशी एवंगुणविशिष्ट एखादी शक्ति असावी असें बहुजनांना वाटणें साहजिक असलें तरी ह्या बाबतींत शास्त्रीय सत्य काय आहे हें आपण तपासून पाहूनच स्वीकारायला हवें

शास्त्रीय तत्वज्ञान मानणारे लोक बहुजनवादी व लोकशाहीचे पूजक असले तरी ते लोकानुनयवादी नसतात. बहुजनांचें मत हीत सत्याची कसोटी असें ते कधींच मानीत नाहींत. तर बहुजनांचें हित ही सत्याची कसोटी असें ते समजतात. ‘ यल्लोकहितमत्यंततत् सत्यमिति धारणा ’ अशा प्रकारची मानव-हितवादी कसोटी शास्त्रीय तत्वज्ञानांत बसते. परंतु निसर्गज्ञानविषयक बाबतींत सुद्धां वर्गीय समाजरचनेमुळें जे मागासले आहेत त्या मागासलेल्या बहुजनांचें मत तेंच निसर्ग-सत्याचें प्रमाण असली लोकशाहीची बेंगरूळ आणि प्रतिगामी कल्पना शास्त्रीय तत्वज्ञानांत बसत नाहीं. कारण तें तत्वज्ञान ऐतिहासिक असल्यामुळें बहुजन लोक कोणत्या परिस्थितींत वाढले; त्यांची अर्थोत्पादन शक्ति किती होती; तसेंच त्यांच्या संघटनांचा दर्जा काय होता वगैरे प्रश्नांचा विचार त्या तत्वज्ञानांत क्रमप्राप्त असतो. वर्गीय समाजरचनेंत शास्त्या वर्गाच्या तत्वज्ञानाचा प्रभाव बहुजनसमाजावर असल्यामुळें एकादी कल्पना बहुजनांत वावरत असली तरी ती बहुजनसमाजाची व बहुजनांचें कल्याण करणारीच असें ठरत नाहीं. म्हणून वस्तुनिष्ठ मीमांसा करूनच एकाद्या कल्पनेचें सत्यत्व मान्य केलें पाहिजे. ह्या दृष्टीनें ईश्वर ह्या कल्पनेकडे पाहण्याचे बरेच दृष्टिकोन आहेत. परंतु त्यांतले महत्वाचे मुख्य दोन आहेत. एक शुद्ध बुद्धिवादी दृष्टिकोन व दुसरा शास्त्रीय तत्वज्ञानाचा किंवा दुसऱ्या शब्दांत मार्क्सवादी दृष्टिकोन.

मार्क्सवादी दृष्टिकोन संपूर्ण बुद्धिवादी असला तरी शुद्ध बुद्धिवादी दृष्टिकोन मार्क्सवादाहून निराळा आहे. बुद्धिवादी दृष्टिकोन फक्त ज्ञानविज्ञानाच्या सहाय्यानें परमेश्वर या कल्पनेकडे पाहतो व आपल्या बुद्धिसामर्थ्यानें ‘ ईश्वर असिद्धे, ’ परमेश्वर सिद्ध होत नाहीं असें कपिल महामुनींप्रमाणें सांगून मोकळा होतो.

अर्थात शुद्ध बुद्धिवादी मीमांसेंत सुद्धां ईश्वर कल्पनेच्या उत्पत्तीचीं, विकासाचीं व स्थित्यंतरांचीं वेगवेगळीं कारणें दिलेलीं असतात. परंतु शुद्ध बुद्धिवादी मीमांसेचा रोख मानवी अप्रगत बुद्धि किंवा मानवी अज्ञान ह्या एकाच गोष्टीवर असतो.

शुद्ध बुद्धिवाद उत्क्रांतिवाद मान्य करतो परंतु सत्याची ऐतिहासिकता तो ध्यानीं घेत नाहीं. तो शुद्ध बुद्धीने निर्भेळ सत्यें आकलन करूं पाहतो. प्रत्येक काळांतील सद्सद्विवेकबुद्धि त्या त्या काळांतील अर्थसामाजिक रचनेवर अवलंबून रहाते हें तो मान्य करीलच असें नाहीं. ठराविक कालांतील वैयक्तिक बुद्धीच्या प्रतापापेक्षां कालाचा प्रताप अधिक असतो व हा कालप्रताप अर्थोत्पादनाचीं साधनें, अर्थोत्पादक शक्तींचे परस्परसंबंध, समाजसंघटनांची पद्धत, टप्पा किंवा दर्जा वगैरे गोष्टींवर अवलंबून असतो हेंहि शुद्ध बुद्धिवादी मान्य करीत नसल्यामुळें याज्ञवल्क्य, प्लेटो, ॲरिस्टॉटल, सेंट पॉल, प्लुटार्क व कुमारील सारख्या दिग्गज बुद्धिमंतांच्या बुद्धीला गुलामी पद्धतीतले दोष कां दिसले नाहींत ह्याची मीमांसा त्यांना करतां येत नाहीं. ह्याचा परिणाम असा होतो कीं कांहीं वृथा कल्पना, भ्रम किंवा खुळें हीं केवळ मानवी अज्ञानाचीं फळें आहेत असें मानून तो मोकळा होतो.

वृथा कल्पना कशा निर्माण झाल्या, कोणी जोपासल्या व कां जोपासल्या हें तो पाहत नाहीं व पाहिलेंच तर तो एकांगी बुद्धिविकासाच्या दृष्टीनें पाहतो. सामाजिक ऐतिहासिक दृष्टीनें पाहत नाहीं. त्यामुळें चालू वैज्ञानिक युगांत मोठमोठे विज्ञानवेत्तेसुद्धां ह्या खुळ्या कल्पना सिद्ध करण्याची कां लटपट करीत असतात ह्याचा स्पष्ट उलगडा त्या दृष्टिकोनांत आढळत नाहीं.

जिथें जिथें शास्त्या वर्गाचें शासन व शिक्षण जारी आहे तिथें तिथें साऱ्या लोकशिक्षणाच्या साधनांचा उपयोग जनतेला वैचारिक गोंधळांत व आत्मतापाच्या तत्वज्ञानांत गुरफटून टाकण्याच्या उद्देशानें कसा होत असतो व त्याचें मर्म काय हें शुद्ध बुद्धिवादी लोक लक्षांत घेत नाहींत. म्हणून त्यांची मीमांसा अपुरी, प्रभावहीन व इष्टपरिवर्तन घडवून आणायला असमर्थ ठरलेली आहे. त्याला

कारण एकच. समाजविकासाच्या गतींतील अर्थोत्पादन साधनें, अर्थोत्पादक संबंध व वर्गविग्रह ह्यांचें स्थान ते लक्षांत घेत नाहींत हें तें कारण होय.

मार्क्सवादी दृष्टिकोन अर्थातच वेगळा आहे. मार्क्सवादी दृष्टिकोन सर्वांग-परिपूर्ण असून तो वृथा कल्पना, खोटी स्वप्नें, खुळ्या समजुती, विचारांचा मागासले-पणा वगैरे प्रश्नांचा प्रभावी निकाल लावणारा आहे.

मार्क्सवादानुसार ईश्वर कल्पनेचें कारण जनतेचें केवळ अज्ञान हें नसून वर्गविग्रहबद्ध समाजरचनेचा उद्भव हें तें कारण होय. ह्या कारणामुळें बहुजन-समाजच अज्ञानांत राहिला असें नव्हे तर सर्व समाजाचा बौद्धिक स्तरच उंचावूं शकला नाहीं. निसर्गाला आपला गुलाम बनवण्याऐवजीं तो स्वतः निसर्गाचा गुलाम बनून त्याचा पूजक बनला. ह्या निसर्गपूजनांत परमेश्वर कल्पनेचें बीज आहे. शिवाय वर्गीय समाजरचना टिकवण्यांत ज्याचे हितसंबंध गुंतलेले असतात तो शास्ता वर्ग बहुजनसमाजाला ईश्वराच्या विपरीत कल्पनेंत गुंगवून ठेवण्याचे सतत प्रयत्न करीत आला आहे हेंहि विसरतां कामा नये.

वर्गकलहान्वित समाजरचनेच्या परिणामीं बहुजन श्रांत आणि अनाथ राहणार हें ठरलेलेंच. श्रांत आणि अनाथ मन हेंच ईश्वरकल्पनेच्या बीजाला रुजावयाला व फोफावयाला प्रेरक कारण ठरलेलें आहे. 'संसाराच्या तापें तापलों मी देवा । करितां या सेवा कुटुंबाची ॥ म्हणवोनी तुझे आठविले पाय । येई वो माझे माय पांडुरंगे ॥' हें तुकाराम–वचन प्रसिद्धच आहे. वर्गविग्रहबद्ध समाज-रचना हेंच ईश्वर कल्पनेच्या उत्पत्तीचें–विकासाचें कारण, तर वर्गातीत समाज-निर्मितीचें चालू आंदोलन व उगवतें साम्यवादी युग हें ह्या कल्पनेच्या ऱ्हासाचें आणि अखेर मृत्यूचें कारण आहे. अर्थात् निसर्गविषयक अज्ञान किंवा अपुरें ज्ञान वगैरे गोष्टीही जमेला धरल्याच पाहिजेत; पण हीं निर्णायक कारणें होऊं शकत नाहींत.

भ्रामक व घातुक कल्पनांचें उच्चाटन करण्याकरतां शुद्ध बुद्धिवाद ज्ञानप्रसार हा उपाय सांगतो, तर मार्क्सवाद ज्ञानविज्ञानप्रसाराबरोबर ज्या विषमसमाजरचनेनें ह्या कल्पनेला निर्मिलें व वाढविलें त्या विषम समाजरचनेचें निर्मूलनही आवश्यक मानतो. जगांत ईश्वर नाहीं हें मार्क्सवाद दोन तऱ्हांनीं सिद्ध करतो. एक

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रमांक ३४२६९ वि: निबंध
क्रमांक १४२५ नों दि: २१।१।७६

सृष्टिशास्त्राच्या अभ्यासानें व दुसरें मानवी मनाच्या ऐतिहासिक विकासाच्या अभ्यासानें.

सृष्टिशास्त्रानुसार ह्या भूतलावर असा एक काळ निश्चितच होता कीं जेव्हां मनुष्यसृष्टीच अस्तित्वांत नव्हती व असाहि एक काळ होता, जेव्हां जीवसृष्टीच अस्तित्वांत नव्हती. तेव्हां ईश्वर कल्पना, ईश्वर पूजा, ईश्वर मंदिरें, धर्मग्रंथ वगैरे गोष्टी कुठून येणार ?

परंतु एखादा असेंही म्हणूं शकेल कीं तेव्हां दगडमाती जर असेल तर दगडमातीला व दगडमाती नसेल तर त्यापूर्वीचें जें काय असेल त्या अस्तित्वाला सुद्धां ईश्वर माहीत असून ती दगडमाती किंवा तत्पूर्वीचें अस्तित्व आपापल्या भाषेंत आपापल्या पद्धतीनें ईश्वराची उपासना करीत असावींत, मदीरें उभारत असावींत. फक्त त्यांची ईश्वरभक्ति आम्हांला समजत नाहीं एवढेंच. पण आम्हांला समजली नाहीं म्हणून ती नाहीं हें कशावरून, असें ते विचारतील.

अर्थात इथें हें स्पष्ट करायला हवें कीं शास्त्रीय तत्वज्ञान हें मानवी समाजाच्या जाणीवकक्षेंतील गोष्टीबाबतच बोलूं शकेल. ज्याअर्थी आम्ही ह्या जगांतच चर्चा करतों, वादविवाद करतों, खरें खोटें तपासून पाहतो, बरेंवाईट समजून घेऊन त्याप्रमाणें वागतों व ह्या ऐहिक भौतिक उद्योगांप्रमाणें जगतों त्या अर्थी ही जाणीवकक्षाच आमच्या ज्ञानाचा व व्यवहाराचा पाया ठरते. ह्या पायावर उभें तर राहावयाचेंच परंतु जनतेच्या हिताचा प्रश्न आला कीं हा आमच्या मानवी ज्ञानाचा पायाच उखडून टाकावयाचा व समाजसुधारणेच्या कामाला आवश्यक असणाऱ्या जगद्विषयक निष्ठेला सुरुंग लावावयाचा एवढाच हेतु वरील संशयवादी आक्षेपांत अभिप्रेत असतो. कारण संशयवाद मान्य करणारे लोक जेवावयाला बसल्यानंतर अन्न खरें की खोटें, पाणी आहे किंवा नाहीं हें कांहीं चर्चित किंवा संशयीत बसत नाहींत. अन्न खाऊन, पाणी पिऊन ते जगतातच. स्वतःची मिळकत आणे, पैसे मोजून स्वीकारतातच. आजारीपणांत दुखायला लागलें कीं डॉक्टरकडे वळतातच. तेव्हां आम्हां मानवांना न समजणारें जें तेंच सत्य कशावरून नसेल असें वांकडें तत्वज्ञान मांडणारा संशयवाद हा

भ्रामक व वादविवादांत केवळ दिशाभूल करण्याकरतांच येणारा एक वितंडवाद आहे असें समजून त्यापासून दूर होऊं या.

जेव्हां जीवसृष्टी व मनुष्यसृष्टीच नव्हती तेव्हां ईश्वर कल्पनेचा प्रश्नच नव्हता. जीवसृष्टी निर्माण होऊन उत्तरोत्तर विकसत गेली व नाना तऱ्हेचे व नाना प्रकारचे जीव उत्क्रांत होत गेले. जुन्यांतून नवें अशा क्रमानें शेवटीं माकड–एप–गोरीला–वनमनुष्य व मनुष्य निपजला तेव्हांसुद्धां ईश्वराची कल्पना अस्तित्वांत नव्हती. भाषाही नव्हती ! नंतरच माणसामाणसांत जीवनकलहार्थ श्रमसहकारावर आधारलेली उत्पादन-क्रिया निर्माण होऊन भाषा बनली...कल्पना तयार झाल्या, ज्ञान वाढत गेलें...पण ह्या प्राथमिक अवस्थेंतहि ईश्वर कल्पना होती असें दिसत नाहीं. सोविएत भूस्तर शास्त्रज्ञांनीं लाख वर्षांपूर्वींच्या जुन्यांतल्या जुन्या गुहा तपासून पाहिल्या तरी ईश्वर कल्पनेचा थांगपत्ता लागला नाहीं. ईश्वर कल्पनेची उत्पत्ति अधिकांत अधिक मागें रेटली तरी दशसहस्र वर्षांपूर्वीं ती जाऊं शकत नाहीं.

आदिम साम्यवादी रचनेच्या पतनाबरोबर ईश्वराचा जन्म झालेला आहे. मानवाचें मानव या नात्यानें जेव्हां पतन झालें तेव्हां कुठें ईश्वर कल्पना निपजली आहे. अर्थात् ईश्वर कल्पना ही सुद्धां सलग, आणि सर्वत्र तंतोतंत एकच असा प्रकार नसून तीहि अस्थिर आणि वेगळ्या वेगळ्या नैसर्गिक ऐतिहासिक कारणांमुळें इतर भौतिक वस्तूंप्रमाणें परिवर्तनशीलच आहे. तरीपण समाज-रचनेंतील वर्गीयता हें त्याचें समान लक्षण मात्र सर्व धर्मांच्या मुळाशीं एकच आहे. धर्माचार्य जेव्हां सर्व धर्मांच्या बुडाशीं मूळतत्वें एकच आहेत असें सांगून धर्मकल्पना ही नैसर्गिक आहे असें सांगतात तेव्हां ते ह्या समान ऐतिहासिक, सामाजिक लक्षणाची समानता ध्यानीं घेत नाहींत. ईश्वर कल्पना नैसर्गिक नसून वर्गीयतेच्या जन्माबरोबरच ती आकारली आहे, वर्गविग्रह विकासाबरोबर ती विकसली आहे व वर्गविग्रह स्फोटाबरोबर आज ती विकोपाला पोंचली आहे असें सिद्ध करतां येतें. म्हणजे ईश्वर कल्पना ही प्रामुख्यानें ऐतिहासिक–सामाजिक ठरते.

परंतु प्रश्न असा आहे कीं शास्त्रीय ज्ञानाची आज अभूतपूर्वक प्रगति व प्रसार होत असूनसुद्धां ईश्वर कल्पना केवळ अशिक्षित लोकांतच नव्हे, तर

सुशिक्षित लोकांतहि बोकाळलेली दिसते, ती कां? आतां निरक्षर लोकांवर ईश्वर कल्पनेचा प्रभाव किती आहे ह्या बाबतींतलें योग्य संशोधन अजून झालेलें नाहीं व अज्ञ निरक्षर लोक सगळेच्या ईश्वर सगळे कल्पना मानतात हें म्हणणेंहि तितकेंसे खरें नाहीं. ज्या ईश्वर कल्पनेला अज्ञजन चिकटून बसले आहेत असें आम्हांस वाटतें ती त्यांची ईश्वर कल्पना तत्वज्ञानाच्या पातळीपेक्षां निसर्गबाधा व सामाजिक भवभयबाधेनें वेष्टिलेल्या खालच्या पातळीवरीलच अधिक असते. म्हणूनच अबौद्धिक अशा पुरोहितशाहीच्या प्रचाराला त्यांचें मन अधिक बळी पडलेलें दिसतें.

अज्ञजनांची ईश्वर कल्पना ही बरीचशी निसर्गशास्त्रांच्या अज्ञानावरच आधारलेली असते. मानव व निसर्ग यांतील योग्य संबंधांबाबतचें अज्ञानहि त्यांतच येतें. त्यांची ईश्वरविषयक कल्पना ही देवापेक्षां देवचाराच्याच अधिक जवळची असते. हिंदी भाषेंत देव म्हणजे पिशाच्च असा जो अर्थ आहे तो त्याच प्राथमिक कल्पनेचा वाचक आहे. तदनंतर वर्गीय समाजरचनेंत प्रभुत्व कल्पनेच्या उदयाबरोबर देवता कल्पना उत्क्रांत झाली व देवाचें ( पिशाच्चाचें ) देवतेंत रूपांतर झालें.

समाजाच्या लिखित इतिहासालाच आम्ही इतिहास धरून चालतों व ह्या मर्यादित इतिहासकालाचीच आम्ही साक्ष काढणार. इतिहासाच्या ह्या साक्षींतहि ईश्वर कल्पना सर्व प्रभु म्हणून वावरतांना जरी दिसली तरी अस्सल विचारवंतांनीं तिला स्वस्थता अशी फारशी लाभूं दिली नाहीं. ईश्वर कल्पनेविरुद्ध जेवढी बंडखोरी इतिहासाला ज्ञात आहे तेवढी बंडखोरी जगांतल्या एकाहि कल्पनेविरुद्ध कोणी कधीं कल्पिलेलीहि नसेल !

साऱ्या जगांत कोट्यवधी निरीश्वरवादी भाजले, मारले, पुरले आणि छळले गेले ही गोष्ट कोण अमान्य करील? दर उठावावेळीं लाखों लोकांची निर्दय हत्या करण्यांत आली. हे सारे उठाव ईश्वर आणि शोषण ह्या दोनहि गोष्टींच्या गठबंधनाविरुद्ध होत होते. कारण ईश्वर व शोषण ह्या गोष्टी दोन नसून एकाच अर्थ–समाज–मानस प्रक्रियेचीं तीं दोन रूपें होत. डॉयलिंगर हा प्रख्यात धर्मसमीक्षक धर्मपंथसिद्धांतावरील आपल्या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडांत म्हणतो,

" प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहासांत चालू असलेला वर्गलढाच धर्मलढ्याच्या रूपानें वावरला आहे. "

शोषणावर आधारलेली वर्गसत्ता ईश्वर कल्पनेला उचलून धरून त्या-करवीं आपलें काम साधण्याची लकब व चलाखी अंगी असणारा एक वर्गच निर्माण करीत असते. सर्वसाधारणपणें पंडित–पुरोहित वर्गाकडे हें काम आलेलें असतें. वरवर पाहिल्यास आम्हाला सकृद्दर्शनी असें वाटतें कीं धर्मानें ईश्वराचें स्तोम माजवलें. हां. धर्मानें माजवलें हें खरें आहे. परंतु धर्माचें स्तोम कां माजलें हें जर आपण पाहिलें नाहीं तर आपली तत्वमीमांसा शास्त्रीय होणार नाहीं.

वर्गविग्रहाची धग जेव्हां जेव्हां असह्य झाली तेव्हां तेव्हां बहुजनसमाज नव्या धर्माला घेऊन पुढें आला. प्रत्येक नवा धर्म ही बहुजनसमाजाची बंडखोरीच होय. ती अशी बंडखोरी होती म्हणूनच प्रत्येक मानवधर्माचा प्रभाव बलवत्तर ठरला. जुन्या धर्मांना नव धर्म निस्तेज करूं शकले ते ह्याचमुळें. वर्गविग्रहविकासानें वाढणारी विषमता असह्य होऊन जेव्हां बहुजनसमाज तळमळे, वळवळे तेव्हांच ह्या तळमळींतून वळवळींतून ह्या सगळ्या अनर्थमय कारभाराकडे समतेच्या दृष्टींतून पाहूं शकणाऱ्या वर्गातीत अवतारी व्यक्तीच्या कल्पनेची उत्पत्ति जनमानसांत स्वप्नरूपानें निर्माण होई.

अतीव पीडादायक विषमतेच्या परिस्थितींत समतेनें पाहणारा अतिमानव ईश्वर असावा असें पादाक्रांत जनतेला वाटूं लागणें स्वाभाविक होतें. निदान ईश्वराच्या दरबारीं सगळे एक आहेत, तेव्हां ह्या पृथ्वीतलावरसुद्धां तुम्ही आम्हीं सगळे समान आहोंत, असें मानणारा ठराविक धर्म सुरवातीला शास्त्या वर्गाला बोंचतच असे. शास्त्या वर्गाचे बंदे पंडित–पुरोहित नेहमी ह्या नवधर्मावर तुटून पडत. परंतु बहुजनसमाजाचें बंड प्रभावी ठरून शेवटीं शास्त्या वर्गाला एका निराळ्याच मार्गानें बहुजनसमाजाला हतबल करावें लागे. हा मार्ग म्हणजे बंडखोरांचा धर्म स्वतःच स्वीकारून आपल्या पंडित पुरोहितांकडून त्यांतील बंडखोर विचार तेवढे वगळून, म्हणजे तो धर्म शोषणानुकुल बनवून घेऊन तो आपल्या व जनतेच्या पचनीं पाडावयाला लावायचा. अशा क्रांतिशून्य स्वरूपांत एकदां का तो पचनीं पडला कीं फिरून वर्ग कलह तीव्रतर होत असे. फिरून

बहुजनसमाजाचें जीवन असह्य होत असे व त्याबरोबर सर्व समाजाचा नैतिक, शारीरिक, राजकीय स्थर खालावत जाऊन दारुण दुःखें सर्वांनांच भोगावीं लागत असत व शासक वर्गहि त्याला अपवाद असणें शक्य नव्हतें. ‘ जगीं सर्व सुखी असा कोण आहे ’ हा रामदासांचा खडा सवाल अशा वर्गीय समाजरचनेचेंच वास्तविक चित्रण आहे.

सर्व दृष्टींनीं पराभूत झालेली दुर्भागी जनता, सर्वांना समान मानणारा ईश्वर स्वर्गांत आहे, त्याचें राज्य पृथ्वीवर येणार, तो अवतार घेणार, अशा प्रकारच्या आशेवरच दिवस कंठीत असे व अशी आशा दाखवणारें बंड धर्माच्या स्वरूपांत खडें होत असे; नवधर्मांचा प्रभाव विलक्षण वेगानें गोरगरिबांना दिलासा देत असे व फिरून शास्ता वर्ग तो धर्मच स्वीकारीत असे; आणि त्याच्या आश्रयाखालील पंडित–पुरोहितांना त्या नवधर्माला क्रांतिशून्य बनवण्यांत यश मिळत असे. जगांतले मुख्य नवधर्म असेच प्रारंभीं वर्गविग्रहस्फोटक, नंतर वर्गविग्रहशामक व शेवटीं वर्गविग्रहसमर्थक व संरक्षक ठरलेले आहेत व ज्या मानानें ते वर्गविग्रहसंरक्षक ठरले आहेत त्या मानानें ते निस्तेज बनत गेले आहेत. हिंदुधर्म हा तर चातुर्वर्ण्यनिबद्ध झाल्यापासून लौकरच निस्तेज ठरला व इतर सारे नवधर्म हिंदुधर्मांचा जुना पुराणा किल्ला ढसाढस पाडूं शकले व अजूनहि पाडताहेत.

बुद्धधर्म हा मुळांत फारच क्रांतिकारक धर्म. त्या धर्मानें ईश्वरकल्पना सुद्धां नाकारली. परंतु वर्ग–विग्रह त्याला नाहींसा करतां न आल्यामुळें शोषक-वर्गाच्या आहारीं जाऊन आत्म्याचें अमरत्व, बुद्धपूजा वगैरे अनेक अनिष्ट गोष्टींना तो बळी पडला. एक अजब संन्याशी वर्ग त्यानें निर्माण केला व निर्वाणाच्या ऐवजीं जनतेचें शोषणच अधिक वाढलें. ज्या ज्या ठिकाणीं बुद्धधर्मांचा प्रभाव वाढला त्या त्या ठिकाणीं निष्क्रीयता, दारिद्र्य व जीवनदुर्दशा पराकोटीला पोहोंचली.

चीनमध्यें इ. सन ५०७ ह्या वर्षी चीनचा बादशाह बू यानें बुद्धधर्म राष्ट्रीय धर्म बनवला व बुद्धधर्माचें उरलें सुरलें शोषणविरोधी क्रांतितत्व संपुष्टांत आणलें. जें पांचव्या शतकांत ख्रिस्त धर्मांच्या बाबतींत रोमच्या बादशहानें केलें तेंच

नवधर्माचें क्रांतितत्व नष्ट करण्याचें कर्म चीनचा बादशहा वू यानें केलें. क्रांतिकारी धर्म आणि मानवाचें मानवानें केलेलें शोषण एकत्र नांदूं शकत नाहींत. एक तर क्रांतिकारी धर्मानें शोषण नाहींसें केलें पाहिजे किंवा शोषणानें क्रांतिकारी धर्माचें क्रांतितत्व नष्ट केलं पाहिजे. तिसरा मार्ग नाहीं.

अशीच गत ज्यू धर्म, खिस्ती धर्म, इस्लाम धर्म वगैरे प्रमुख धर्मांची झाली. ज्यू आणि खिस्ती धर्मांना जन्म देणारें पॅलेस्टाइन हें तेथील वाळवंटांत टोळ्यांनीं राहाणाऱ्या जनतेची सांघिक समाजरचना आणि इजिप्त व बाबिलोन मधील शोषक साम्राज्यशाह्या ह्यांचें संघर्षक्षेत्र होतें. जनता अति गांजलेली होती. ज्यू आणि खिस्ती हे दोन्ही धर्म सांघिक समाजरचना व शोषणाधिष्ठित वर्गीय समाजरचना ह्यांमधील तडजोडी होत्या. इसवी सनापूर्वी चार शतकें तयार झालेलीं व मोझेसच्या नांवावर खपवण्यांत आलेलीं बायबलचीं प्रथम पांच पुस्तकें (पेन्टाटेवक) ह्या तडजोडींतून निघालीं. ह्या तडजोडींत सुद्धां स्थानिक शोषित जनतेचा फार मोठा विजयच झाला होता व जनतेचा हा विजय हेंच ह्या नव-धर्मांच्या शक्तीचें मूळ कारण होतें.

इसरायली जनतेच्या भटक्या पूर्वजांची देवता ‘ यहवे ’ किंवा ‘ जेवोहा ’ ही होती. ह्या देवतेला ईश्वराचें एकमेव स्थान प्राप्त झालें. देऊळ फक्त एकच व तें जैरुसलेमलाच. मानव-बळीची चाल बंद पाडण्यांत आली. पळून जाणाऱ्या गुलामांना स्वतंत्र उपजीविका साधल्यास जगण्याची सूट मिळाली. श्रमिकांना आठवड्यांतून एक दिवस रजा मंजूर झाली. जगांतल्या श्रमिक जनतेचा हा महान् विजय पॅलेस्टाइनमधल्या श्रमिकांनीं धर्माच्या स्वरुपांत लढून हस्तगत केला होता. साब्बाथ दिवसाची रजा ही भावी नवसंस्कृतीची निशाणी होती

परंतु ज्यू जनतेच्या पोटांतच शोषणरूपानें त्या जनतेचा शत्रू जो सावकारी वर्ग तो वाढत होता. सावकारी वर्गाचें वर्चस्व धर्माच्या पंडेपुरोहितांवर स्थापन व्हावयाला उशीर लागत नसतो. समाजांत जेव्हां एक गबर, धनिक वर्ग निर्माण होतो तेव्हां जनतेचें शोषण नाहींसें करण्याचें धर्माचें कार्य संपुष्टांत आलेलें असतें. म्हणजे धर्माचें क्रांतिकारक स्वरूप नाहींसें होऊन तो धर्म

निरुपयोगी बनलेला असतो व तेव्हां इतिहास दुसऱ्या नवधर्मांची तयारी किंवा मानवशोषण नष्ट करण्याची दुसरी एखादी व्यवस्था सुरू करतो.

अशिरिया, बाबिलोन, पर्शिया, ग्रीस व शेवटीं रोम वगैरे बलाढ्य शोषक साम्राज्यांनीं पॅलेस्टाइनला वारंवार गुलाम केलें. रोमने तर ज्यू लोकांना अति छळलें. चारी दिशांनीं संकटांत रुतलेल्या जनतेने आपल्या शोषण-मुक्तीचें, आपल्या उभाराचें स्वप्न 'मेशिया' किंवा 'खिस्तोस' (ग्रीकभाषी ज्यू लोकांचा हा शब्द व त्याचा प्रेषित किंवा तारक असा भावार्थ.) च्या स्वरुपांत दिसूं लागणें साहजिक होतें.

दुःखी, नागवलेली जनता नेहमीच तारक, उद्धारक, योगी, संत-महंतांच्या शोधांत असते. शोषित समाजाचा बौद्धिक स्तरच निकृष्ट राहात असल्यामुळें व नैतिक भ्रष्टतेच्या कारणांमुळें बाहेरून सुखी व समृद्ध असणारे व समाजाला नागवणारे लोक 'खिस्तोस-मेशिया' संत, महंत, तारक, उद्धारक, ज्योतिषी, गोसावडे, भोंदू, मांत्रिक वगैरे लोकांच्या कच्छपीं लागलेले असतात. आर्थिक अराजकाच्या परिस्थितींत श्रम करणारे दुःखी व फुकट खाणारे सुखी अशी जी स्थिति असते त्याचीं हीं वैचारिक फळें असतात. पुराण्या दीर्घ भूतेतिहासांत असल्या आत्मप्रतारक समाजाचे 'मेशिया' 'खिस्तोस' किंवा अवतारांचे आर्त शोध कालांतराने पुरे झाल्यासारखे त्यांना वाटले आहेत! सारे अवतार, खिस्त, पैगंबर ह्याच पद्धतीनें जन्माला आले आहेत. ह्या समाज-मानसिक प्रक्रीयेंत समाजशास्त्रज्ञाच्या दृष्टीला चमत्कारिक, गूढ वाटण्यासारखें कांहीं नाहीं. वर्गीय समाजव्यवस्थेची असली दुर्दैवी कहाणी सर्वत्र सारखीच आहे.

ज्या खाइस्टनें सुईच्या नाड्यांतून उंट जाईल परंतु स्वर्गाच्या दरवाजांतून धनिक आंत जाऊं शकणार नाहीं ही गगनभेदी क्रांतिकारक घोषणा केली व आपल्या जीवनोद्धारक झेंड्याखालीं विराट मानवता जमा केली तो खिस्त कारागीराचा मुलगा असून प्रतिगामी धनिक वर्गाने हातोड्या खिळ्यांनीं त्याचा खून पाडला असें म्हणतात. चमत्कारांनीं भरलेलें खिस्तचरित्र हा वादाचा विषय असून त्यांत सत्य कथन अल्पांश आहे हेंहि सिद्ध झालेलें आहे. तथापि

खिस्त-चळवळ ही वादातीत आहे. जनतेच्या शोषण-मुक्तीचा तो महान लढा होता. या महान चळवळीच्या क्रांतिकारक तत्त्वांचा खून चौथ्या शतकांत रोमचा बादशहा कॉन्स्टन्टाइननें तो धर्म स्वीकारून पाडला. तेव्हांपासून साऱ्या इतिहास-कालांत तो धर्म प्रतिगामी, विज्ञानद्रोही, वरिष्ठवर्गाचें हित जपणारा धर्म म्हणूनच वावरतो आहे. हीच गोष्ट इस्लामी धर्माची. तपशील वेगळा परंतु वर्गकलहाच्या अगाध करणीचें सर्वव्यापी तत्व तेंच.

अरेबियाच्या बहुजनसमाजाला उन्नतीची दिशा दाखवणारा इस्लाम तुफाना-सारखा पसरला. त्याचें मुख्य कारण एका हातांत कुराण व दुसऱ्या हातांत तलवार हें नसून तो तत्कालीन वर्गजन्य अरिष्टांना शमवणारा धर्म होता हें होय. इस्लामी समाजव्यवस्था ही जिथें जिथें गेली तिथें तिथें त्यांतील गर्भित समतेनें बहुजन समाजाला दिलासा मिळाला. अर्थात् तलवार हेंहि एक कारण होतेंच. परंतु परकीय धर्मप्रभावाला बळी पडलेल्या भारतीय वर्गात जनतेंतले निम्नवर्गीय पददलित वर्गच अधिक होते. जीवन–दुर्दशेमुळें आलेल्या अवकळेनें, अंतर्यामीच्या कळवळ्या वळवळयानें जनमानसांत जें एक विषमताशामक सुखद स्वप्न आकार घेत असतें त्या स्वप्नालाच नवधर्म-संस्थापक, प्रेषित व संत पुष्ट करीत आले आहेत.

बहुजनसमाजानें वास्तवतेऐवजीं स्वप्नाळूपणा कवटाळणें हें गतेतिहासाचें एक खास लक्षण आहे. ह्या वस्तुस्थितीचें खरें कारण सृष्टींत सर्व श्रेष्ठ जो मानव किंवा नरदेह तोच सर्वाहून कनिष्ट, पतित ठरलेला होता हें होय. डोकें खालीं व पाय वर अशा स्थितीला तो पोंचला होता. आपलें श्रेष्ठत्व वास्तवांत आकाराला येणें अशक्य असल्यानें सात चौकांपलीकडे, सृष्टिपलीकडे, खूपच आकाशांत वर दडवून ठेवण्याचा त्यानें प्रयत्न केला व स्वयंकल्पित श्रेष्ठतेच्या चरणांवर तो आपणच नतमस्तक झाला.

पतनाच्या ह्या समाज-मानसिक प्रक्रियेबाबत युगधुरंधर दार्शनिक कार्ल मार्क्स यानें हेगेल-भाष्यावर लिहिलेल्या टीकेंत मोटें मार्मिक विवेचन केलें आहे. तो म्हणतो, 'धर्म ही माणसाला भासलेल्या उलट्या जगाची उलटी जाणीव

आहे; अन्यायानें छळल्या जाणाऱ्या जीवाचा तो न्याय आहे; हृदयहीन जगाचें तें हृदय आहे; आत्महीन जगाचा तो आत्मा आहे.'

माणसाचें सर्वश्रेष्ठ मस्तक नत होऊन तो सर्वांहून खालीं घसरला. मनुष्य-प्राण्याचें पतन कितीहि झालें तरी पतनाची जाणीव त्याला राहातेच. शिवाय मनुष्यप्राण्याला पतनाची खंत असते. मनुष्येतरांना ती असत नाहीं. म्हणून मनुष्य प्राणीच सर्वांआधीं सर्वांखालीं कोसळतो व डोकें खालीं आणि पाय वर असा उलटा जगूं लागतो. ह्या उलट्या संवित्तिदशेमुळें तो जगाकडे उलट्या दृष्टीनें पाहूं लागतो. आपल्या दशेचा आपण विधाता आहे हें त्याला न उमगतां आपण गुलाम असून दुसरा कुणीतरी विधाता आहे असें त्याला वाटतें. ह्या वस्तुस्थितीलाच मार्क्स 'उलट्या जगाची उलटी जाणीव' असें म्हणतो.

ह्या भयंकर पतनाची कहाणी मानवी आक्रोशानें भरलेली आहे. "धर्मादर्थश्च कामश्च स्वधर्मः किं न सेव्यते।" हा महाव्यासांचा आक्रोश प्रसिद्धच आहे. विश्वविख्यात चीनी धर्मसंस्थापक लाओ त्से आपल्या 'ताओ' ह्या सत्यग्रंथांत असाच आक्रोश करतो. तो म्हणतो, "ज्यांच्याजवळ पुष्कळ आहे त्यांच्याकडून काढून घेऊन ज्यांच्याजवळ पुरेसें नाहीं त्यांना देणें हा पुण्यमार्ग किंवा देवमार्ग होय. परंतु माणसें पाहावीं तर ज्यांच्याकडे नाहीं त्यांच्याकडून हरण करून ज्यांच्याजवळ अतिशय भरलें आहे त्यांना कर म्हणून देत असतात." लॅटिन महाकवि व्हर्जील हाच आक्रोश करतो. तो म्हणतो, "सत्याच्या जागीं असत्य. सारें सारहीन. हें सध्याचें जग म्हणजे युद्धें, गुन्हे."

बराच अलिकडचा म्हणजे आठव्या शतकांतला चीनी कवी तू फू म्हणतो, "धनिकांच्या प्रासादांत तर दारू आंबून जाते आणि मांस कुजत पडलेलें असतें. आणि रस्त्यारस्त्यावर गोठलेल्या प्रेतांचा खच पडतो. एकीकडे अपार धन तर समीपच भूके कंगाली!"

अर्वाचीन युगांतील साधुसंतांनीं, सच्च्या साहित्यिकांनीं, कलाकारांनीं असाच आक्रोश केला आहे. शेक्सपीयरचे पुढील शब्द पहा, 'सोनें! पिवळें धमक, चकचकीत मूल्यवान सुवर्ण!! काळयाला गोरें, वाईटाला बरें, अपराध्याला

निरपराधी, नीचाला उच्च, वृद्धाला तरुण, नामर्दाला मर्द बनवणारें हेंच तें सुवर्ण ! देवमाणसांना आणि स्वामीभक्तांना कर्तव्यभ्रष्ट बनवणारें हेंच तें सोनें. धि:कार असो ह्या पृथ्वीला' ! ( तिमोन द अॅथेन्स )

संत नामदेव म्हणतात,

"दु:खाचे डोंगर, पडिले मजवरी ।
शिणलिया न म्हणति बैस घे विश्रांति"

रामदास सांगतात,

"पृथ्वीचा झाला गळाटा, एक लहान एक मोठा ।
कोण खरा कोण खोटा कोण जाणें ।
माणसा खावया धान्य नाहीं, अंथरुण पांघरूण तेंही नाहीं ।
घर कराया सामुग्री नाहीं, काये करिती ।।"

तुकाराम महाराज म्हणतात,

"दुष्काळें आटिलें, द्रव्यें नेला मान ।
स्त्री एकी अन्न अन्न करितां मेली ।।"

जनमानसांत ईश्वर कल्पनेची निर्मिती ही दुर्दैवी जीवनाने जगणें सह्य करण्याकरतां काढलेली क्लृप्ति होय. त्यांत आत्मप्रतारणा, अधोगति आणि दिशाभूल पुरेपूर असली तरी ही घटना मात्र त्या दशेंत अटळ आणि स्वाभाविक होती. पृथ्वीवरील दुर्दशा हेंच स्वर्गांतील देवराज्याचें आकर्षण होय. जोंपर्यंत जीवनांतील वैषम्य आणि नैघृण्य इतिहासजमा होणार नाहीं तोंपर्यंत बहुजन-समाजांतील ईश्वरकल्पना जाणें शक्य नाहीं.

'नेश्वरो जगतः कारणमुपपद्यते वैषम्य नैघृण्य प्रसंगात्' विषमता व नैघृण्य ज्या जगांत आहे त्याचा कर्ता व भर्ता सर्व साक्षी, सर्व शक्तिमान व त्याचबरोबर दयाघनहि असा ईश्वर असणें शक्य नाहीं. कारण ईश्वराला विषमता नैघृण्य दिसत नाहीं म्हणावें तर तो सर्वद्रष्टा ! त्याला माणसाची दया येत नाहीं असें म्हणावें तर तो परमकृपाळू दयाघन ! त्याला दु:खितांचें दु:ख

हरण करण्याची शक्ति नाहीं म्हणावें तर तो सर्व शक्तिमान ! बरें, पूर्वजन्मांतल्या वाईट कर्मामुळें हें फळ मिळतें म्हणावें तर प्रथम जन्मांत वाईट कर्म करण्याची बुद्धीच इश्वरानें माणसाला कां द्यावी हा प्रश्न शिल्लक उरतोच. बरें, 'बुद्धिः कर्मानुसारिणी,' म्हणावें तर प्रथम जन्मांत प्रथम वाईट कर्म करण्याची प्रवृत्ति माणसाच्या ज्ञानकर्मसमुच्चयरूपी स्वच्छ पाटीवर कुठून उमटली ? तो मूळ प्रवृत्तीनेच पापी आहे असें म्हणावें तर असला मूळ प्रवृत्तीचाच पापी माणूस दयाघन ईश्वरानें जन्माला घालून काय साधलें ? पापी जग आणि दुःखी समाज, हेंच ना ?

छे ! ईश्वर मानून तो असला पापी जगाचा मूळ कर्ता मानण्यापेक्षां तो न मानलेलाच बरा असेंच कोणीहि सुहृद माणूस म्हणेल. बरें, आत्मस्वातंत्र्यरूपी कर्म सिद्धांत मानला तर परमेश्वराच्या दयेला वावच रहात नाहीं. सारें कांहीं कर्म नियमानें बद्ध. मग अशा परिस्थितींत परमेश्वराचें दयाघनत्व काय कामाचें ! बरें, थोडें आत्मस्वातंत्र्यहि खरें, थोडी नियतिही खरी असें वामन मल्हार जोशांप्रमाणें म्हणावें तर हा सारा मामला अराजकी ठरून अशा अराजकी मामल्याचा राजा सर्वशक्तिमान ईश्वर कसा ठरेल ?

प्रारब्धवाद, प्राक्तनवाद वगैरे कल्पना कर्मसिद्धांतावरच आधारलेल्या आहेत. कर्मसिद्धांत जर खरा मानला तर जगाच्या सुरवातीपासून परमेश्वराला दयेचा वापर करतां येणें शक्यच नाहीं. कीं वैषम्य नैघृण्याच्या दाहांत युगानुयुगें माणसें पोळलीं जावींत असलें जग निर्माण करण्याची अगाध कृपा त्यानें केली म्हणून त्याला परमदयाघन म्हणावें ? बुद्धानें वर्णन केल्याप्रमाणे 'सब्बं दुःखं' असे जग निर्माण करण्याची दया म्हणावी कीं क्रूरता म्हणावी ! कारण खुद्द महात्मा गांधीजींनीं सुद्धां मरणान्त पीडेने वळवळणाऱ्या गाईच्या वछड्याला जिवंत ठेवण्यापेक्षां ठार करणें हेंच अहिंसेचें व दयेचें लक्षण मानलेलें आहे. तेव्हां सर्वज्ञ, सर्वशक्तिमान आणि परम दयाघन असा परमेश्वर ह्या जगाचा निर्माता असूं शकत नाहीं.

वरीलप्रमाणें तर्कप्रतितर्क हें बुद्धीचें कार्यच असलें तरी मार्क्सवाद बुद्धीची ही कोरडी करामत करून थांबत नाहीं. समाज बदलण्याची कृति करून तो

ह्या कल्पिताच्या मुळावर कुठाराघाव घालतो. म्हणजे पृथ्वीवरील दुर्दशा समाप्त करून माणसाच्या स्वप्न–स्वर्गांतील देवराज्याची किल्ली तो माणसाच्या हवालीं करतो.

अज्ञानाधंकार नाहींसा करणें व ज्ञानप्रकाश फैलावणें हें उत्तमच. परंतु मार्क्सवादी विचारधारा अवलंबल्याशिवाय खरा सार्वजनिक ज्ञान-प्रकाशही फैलावणें अशक्य व जीवन–दुर्दशा संपणेंहि अशक्य व जीवन-दुर्दशा संपल्या-शिवाय जनमानसांतून ईश्वर कल्पनेचें उच्चाटन होणेंहि अशक्य. ह्याचें प्रत्यंतर सध्यां स्पुटनिक युगांत राहणारे चांगले सुशिक्षित डॉक्टर, इंजिनियर, प्रोफेसर, व लेखक नवनव्या खुळांना अधिकाधिक बळी पडत आहेत त्यावरून दिसून येतें.

सर ऑलिव्हर लॉज, जेम्स जीन्स, एडिंग्टन, ॲलेक्सीस कॅरेल व भांडवलदारी प्रवृत्तींच्या इतर बड्या वैज्ञानिकांची पुस्तकें वाचावींत म्हणजे क्रांति-विन्मुख ज्ञानप्रकाश ईश्वरकल्पना अवास्तव ठरवूं शकत नाहीं हें ध्यानांत यायला उशीर लागणार नाहीं.

ज्ञानप्रकाशाबरोबरच समानता, जीवनांतील व्यक्तीचें स्थान, व्यक्तीचें महत्व, व्यक्तीची सुरक्षितता वाढायला हवी. आपल्या मागें सारा समाज उभा आहे हें व्यक्तीला पटायला हवें. आपण सर्वश्रेष्ठ चीज आहोंत, आपण समाजाचे घटक आणि पोषक आहोंत व समाजच खराखुरा कर्तुम अकर्तुम अन्यथा कर्तुम असा असून माझ्या दुर्दैवांत तो माझा पाठीराखा आहे एवढें जेव्हां माणसाला पटेल तेव्हांच त्याचें मनोदौर्बल्य नाहींसें होईल व ही गोष्ट फक्त मार्क्स-लेनिन-वादी समाजच साधूं शकतो.

ज्या शुद्ध बुद्धिवादी विचारवंतांचा उल्लेख वर केला आहे ते स्वतः विज्ञानाचे पुरस्कर्ते असूनहि व ईश्वरकल्पनेचें अयथार्थत्व त्यांना पटलेलें असूनही जनतेवर त्यांचें 'आपणासारिखे करिती तात्काळ' अशा समतावादी स्वरूपाचें प्रेम नसल्यामुळें सुशिक्षित पांढरपेशेच राहतात व जनतासंपर्क आणि जनक्रांतिपासून अलिप्त राहण्याचा ते प्रयत्न करतात. इतकेंच नव्हे तर त्यांचा हा अपुरा बुद्धिवाद कधीं कधी जनक्रांतीला रोखून धरण्याचा प्रयत्न

करण्यांतही मागें पुढें पहात नाहीं व असें करतांना व्यक्तिस्वातंत्र्याच्या अवास्तव कल्पनेमुळें बुद्धिवादाचीं सारी फळें आपण धुळीला मिळवत आहोंत हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं.

**जनताविन्मुख बुद्धिवादापेक्षां जनताभिमुख श्रद्धावाद घटकाभर परवडेल. जनतेकडे तटस्थतेच्या किंवा तुच्छतेच्या दृष्टीनें पाहाणाऱ्या निरीश्वरवादी जाणकारापेक्षां जनप्रेमानें विव्हळणारा टाळकुट्या संत अधिक पुरोगामी असतो हें स्पष्ट आहे.** जनताविन्मुख बुद्धिवादी लोक इप्सित सुधारणा घडवून आणण्यास असमर्थ ठरून शेवटीं निराशावादी कसे बनतात तें महाराष्ट्रांतील कांहीं नामांकित विचारवंतांचीं चरित्रें अभ्यासल्यास स्पष्ट दिसेल. गांठीला पुरेशी जननिष्ठा नसल्यामुळें शुद्ध बुद्धिवादी लोक जनमार्गी न ठरतां आपोआप महाजनमार्गी ठरतात. मार्क्सवाद व शुद्ध बुद्धिवाद ह्यांत हाच मौलिक फरक आहे.

मार्क्सवाद किंवा शास्त्रीय तत्त्वज्ञान हें पराकाष्टेचें जननिष्ठ असल्यामुळें तें तथाकथित ‘ शुद्ध ’ राहूं शकत नाहीं. महाराष्ट्रांतील कोण्या बुद्धिवादी परंपरेला मार्क्सवाद कुठें खटकत असेल तर नेमका इथेंच. शुद्ध बुद्धिवादाची भूमिका वर्गातीत असते तर क्रांतिपूर्व आणि क्रांत्युत्तर संक्रमण कालांतसुद्धां मार्क्सवादाची भूमिका पक्की वर्गनिष्ठ असते. कारण पक्की वर्गनिष्ठ भूमिका हीच वर्गातीत समाजरचनेची हमी आहे. समाज-परिवर्तनाच्या दृष्टीनें यशस्वी ठरलेला मार्क्सवाद व अयशस्वी ठरलेलीं इतर सारीं तत्त्वज्ञानें ह्यांतला हाच मूळ फरक आहे.

तत्त्वज्ञान किंवा सत्यान्वेषण हें आतांपर्यंत तरी पक्षपाताच भूमिका पार पाडीत आल्यामुळें त्याची केवळ वस्तुनिष्ठ चिकित्सा करतां येणें कठीण आहे. आजतागायत थोड्यांनाच तें साधलेलें आहे. वर्गातीत समाजरचनेंतच तें सोपें होईल. तत्वज्ञानाची पक्षपाती भूमिका आम्ही मार्क्सवादी मान्य करतों तर आमचे विरोधक पक्ष घेतातच. पण पक्ष घेतला हें मात्र मान्य करीत नाहींत. आम्ही पक्ष घेतों आणि कबूलही करतों. आमचा पक्ष शोषित वर्गांचा पक्ष

आहे व मार्क्स–लेनिनवाद हें शोषित वर्गाचें तत्वज्ञान आहे. शोषित वर्गच वर्गातीत समाजरचना निर्माण करू शकणार असल्यामुळें ह्या वर्गाचें तत्वज्ञान हेंच मानवतेचें तत्वज्ञान आहे अशी मार्क्सवादाची ठाम भूमिका आहे. ह्याचें कारण हा वर्ग गुणी आहे, बरा आहे किंवा ह्या वर्गाचें नेतृत्व चांगल्या साधु पुरुषांच्या हातांत असतें म्हणून नव्हे, तर वर्गातीत समाजरचना निर्माण करण्यांतच त्या वर्गाचें हित आहे व तें ऐतिहासिक कार्य इतिहासाच्या ओघाबरोबर परंतु जाणीवपूर्वक तो वर्ग करीत चालला आहे आणि मार्क्सवाद ही त्या वर्गाची जाणीव आहे म्हणून. इथें बऱ्या वाईटाचा, नीति अनीतिचा प्रश्न पायाभूत नसून ऐतिहासिक शक्याशक्यतेचा प्रश्न पायाभूत आहे. जें ऐतिहासिक शक्यतेला कालपक्वतेमुळें साधत जातें तें त्या ऐतिहासिकतेमुळें चांगलें ठरत जातें असा नीति व कालौघ ह्यांतील परस्परसंबंध आहे. सामाजिक नीति–अनीति वगैरे कल्पनेंतील वस्तुसत्यें अशा दुहेरी विणींतून बनत जातात. तथापि शक्यतेच्या मर्यादेंत जी वस्तुनिष्ठता सांभाळतां येईल तेवढी सांभाळून ईश्वर कल्पनेच्या तात्विक बाजूकडे मी आतां वळतों.

सर्वसाधारणपणें तत्त्वज्ञानांत गतीचा मुद्दा नेहमींच उपस्थित झालेला आहे. जगताला गति आहे. तुम्ही आम्ही बोलतों चालतों तेव्हां आम्हाला बोलवणारा चालवणारा अधिक शक्तिमान गतिपुंज कुठेंतरी कोणीतरी किंवा एखादी शक्ती तरी असणारच. हा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणून ईश्वरवादी पुढें करीत असतात.

वरील मुद्द्याबाबत दोन गोष्टींचा विचार जरूर आहे. आधीं गति म्हणजे काय तें पाहाणें व ती गति वस्तुत्वाबाहेरून येण्याची आवश्यकता काय ह्या प्रश्नाचा विचार करणें. कांहीं विचारवंत गति मानली तर ईश्वर मानणें कठीण जातें म्हणून गति मानायलाच तयार नसतात. दुसरे लोक गति जर सत्य मानली तर स्थितीची वासलात कशी लावायची व स्थिति नि गति परस्पर विरुद्ध किंवा वदतो व्याघाताप्रमाणें वाटत असल्यामुळें जगाच्या बुडाशीं विरोधी सत्य कसें मानावयाचें ह्या विचारांत पडतात. कारण अध्यात्मबद्ध विचारपद्धतीनें चिंतन करणाऱ्या तत्त्ववेत्त्यांचें सत्य पडलें नित्य, अव्यय, अविकारी, विरोधातीत!

'सत्यं नामाऽव्ययं नित्यमविकारी तथैवच' (म. भा. शांतिपर्व १६२–१०) त्यांच्या म्हणण्याप्रमाणें गति किंवा परिवर्तन ही माया किंवा विवर्त असून नामरूपात्मक सृष्टि किंवा सगुण अगर दृष्य सृष्टि हा एक मूळ नित्य द्रव्याचा म्हणजे ईश्वराच्या मायेचा खेळ किंवा लीला आहे !

आमचे सारे गंभीर उद्योग, आमच्या साऱ्या हालचाली ह्या लोकांना खेळ वाटतात हीच त्या तर्कशास्त्राची सरळ फलश्रुति ! आमचे प्रयत्न, आमच्या उलाढाली, युद्धें हें सारें जर खेळच आहे तर भगवंतानें गीता तरी कां सांगावी ? कीं तोहि खेळच ! मग धर्मराजाचें धर्माचरण, अर्जुनाचा पराक्रम सारें खेळच !

गतिमान भौतिकतत्त्वाचें पायाभूत अस्तित्व मानल्याशिवाय तत्त्वमीमांसेला शास्त्रीय स्वरूपच प्राप्त होणें शक्य नाहीं.

**'स्थिति हा गतिचाच एक खास प्रकार आहे.'** (पहा—गणिती यंत्रविद्या–ले. किरचॉव) म्हणजे जगाला कुठून तरी गति देऊन तें कार्यशील करण्याची किंवा जगांत गति फुंकणाऱ्याची जरूरीच न भासतां गति म्हणजेच स्वयगति असें प्रमाण ठरतें व विश्वाच्या बुडाशीं असलेलें भौतिकतत्त्व किंवा विश्वतत्व हें स्वयंभू व स्वयंगतिमान असावयाला कांहींच हरकत नाही हें स्पष्ट होऊन आम्हांला जी स्थिति गतिहीन भासते ती मिथ्या हें सिद्ध होतें. तेव्हां जी शक्ति ह्या सगळ्या विश्वाचें चालकत्व करते किंवा विश्वाला गति देते, ती शक्ति वस्तुत्वांतच अंतर्गत असून एखाद्या विश्वबाह्य महान् गतिपुंजातून (परमेश्वराकडून) ती वस्तुत्वाला मिळण्याऐवजीं हें सारें वस्तुत्व किंवा विश्व हेंच तो गतिपुंज होय.

ईश्वरवाद्यांचा दुसरा मुद्दा असा : ह्या विश्वांत किंवा जगांत एक प्रकारचें सुसंवादित्व आहे. एक प्रकारची कार्यकारणबद्धता आहे. निसर्गधर्म कां असेना पण निसर्गधर्म म्हणून तरी कांहीं सुसंवादि असें आहे ना ? मग हें सगळें सुसंवादित्व जिथून आलें तें ह्या सुसंवादित्वाचें मूळ कारण म्हणजेच परमेश्वर !

आतां ह्या मुद्द्याबाबत पुढील गोष्टींचा विचार करावयास हवा. आधी सुसंवादित्व वगैरे गोष्टी खरोखरच वस्तुतः निसर्गांत आहेत कीं आमच्या

निसर्गाशी झालेल्या देवघेवीतून देवघेवीच्या परिणामीं त्या आमच्या मनांत निर्माण झाल्या तें पाहिलें पाहिजे.

वरील प्रमाणें संशय घेण्याचें कारण असें कीं शेणांतल्या किड्याला शेणाची घाण येत नाहीं. कारण त्याचें वासाचें माध्यमच शेण असतें. तसेंच विश्वांत एक प्रकारचें विसंवादित्व असलें तरी ज्या अर्थी आम्ही ह्या विसंवादित्वाचेच परिपाक आहोंत त्या अर्थी हें विसंवादित्व आमच्या व सृष्टीच्या देवघेवीच्या प्रक्रियेंत सुसंवादित्व बनलें असणें शक्य आहे. म्हणजे उत्क्रांतीच्या नियमाला धरून आमच्या भोवतालचा सापेक्ष विसंवाद हळूहळू माणसाळत माणसाळत गेला असणें शक्य आहे. किंवा माणूसच ह्या विसंवादित्वाला रुळला असणें शक्य आहे. तेव्हां वस्तु आणि परिस्थिति, मानव आणि त्याचें माध्यम ह्या गोष्टींचा अन्योन्याश्रय किंवा एकमेकांत घुसून परस्पर परिवर्तन घडविण्याची क्रिया चालू असल्यामुळें व ह्या परस्पर परिवर्तनाची जाणीव हेंच आमचें सत्याधिष्ठान असल्यामुळें केवळ वस्तुनिष्ठ सुसंवादित्व सिद्ध करणें कठीण आहे. शिवाय अशा सुसंवादित्वाचा आधार वस्तुत्वाबाहेर शोधण्यापेक्षां वस्तुत्वांतच तो आहे असें मानण्यांत काहींहि आपत्ति नाहीं.

आमचीं मानवी सत्यें केवळ शुद्ध वस्तुनिष्ठ असूं शकत नाहींत. आमची सत्यें वस्तु आणि परिस्थिति ह्यांचा गुणाकार असतात. **'असणें' आणि 'करणें' ह्यांची गुणवृद्धि 'जाणण्यां'त होते.** वस्तूंचें केवळ असणें हें आपाततः जाणणें बनत नाहीं. तर वस्तूंचे असणें आमच्या अटळ कृतीच्या म्हणजे सामाजिक मानव—व्यवहाराच्या मुशींतून जेव्हां जातें तेव्हांच तें आमच्या जाणण्याच्या कक्षेंत येतें व आमचें ज्ञान बनतें—आमचें सत्य बनतें. शिवाय ज्ञान घेणारीं इंद्रियेंही बदलत असतातच. इंद्रियांनाहि इतिहास आहेच. एकावेळीं तीं नव्हतींच मुळीं. तेव्हांहि वस्तुत्व ( मॅटर ) होतेंच.

प्रथम सारी जीवपेशीच सगळ्या इंद्रियांचें काम करीत होती. तदनंतर इंद्रियें फुटत गेलीं. इंद्रिय ही त्या मानानें जीवाची अलीकडची प्रगति आहे. नवनवोत्क्रांतीच्या तत्वानुसार हळू हळू विशिष्ट इंद्रियें बनलीं आहेत व त्यांची शक्तिहि बदलत गेली आहे. परंतु त्याचा अर्थ जग हें सारें मानीव आहे,

जगाच्या बुडाशीं वस्तुनिष्ठ ठोस सत्य बिल्कुल नाहीं असा मात्र होत नाहीं. आमच्या मनाच्या बाहेर वस्तुसत्य जरूर आहे. आमच्या व जीवपेशीच्या उद्भवापूर्वीहि तें वस्तुसत्य होतें ह्यांत संशय नाही. पृथ्वीच्या इतिहासानें तें सिद्ध केलें आहे व आमच्या व्यवहारामार्फत तें आम्हाला अधिकाधिक समजत जातें. विशेष म्हणजे आमच्या गरजांप्रमाणें तें आम्हाला बदलतांहि येतें.

भूकंप, ज्वालामुखी, उल्कापात, ग्रहांची उत्पत्ति, पृथ्वीचें निर्माण, पृथ्वीचें गोठणें, जगबुडत्या, सागरांचें निर्माण, भयानक तुफानें, भौगोलिक मोडतोड, भूखंडांचें विभाजन, भूगोलाचें अधूनमधून खंडन-मंडन वगैरे गोष्टींकडे तसेंच समाजांतल्या आतांपर्यंतच्या प्रचंड घालमेली, भयाण युद्धें, क्रूर रक्तपात, अघोरी अन्याय, काळीज भाजणारें वैषम्य, नैघृण्य, अपमृत्यु, ‘ पतिव्रता ही उपाशी, तिला मिळेना सावली, चंचल नार बांधीत असे नवें घर एक दरसालीं ’ वगैरे परिस्थितीकडे सूक्ष्म दृष्टींनून पाहिल्यास निसर्गांत स्थिर असें आणि समाजांत प्रयत्नाशिवाय ईश्वर-निर्मित असें सुसंवादाचें बौद्धिक तत्त्व कार्यरत सांपडणें कठीण आहे. परंतु आम्ही आमच्या सामाजिक व्यवहार कौशल्यानें मात्र जगांत सुसंवादीत्व निर्माण करूं शकतों व तेवढा पुरेसा नियमितपणा सृष्टींत जरूर आहे.

जगाचें पायाभूत भौतिक तत्त्व हें मनाबाहेर वास्तविक स्वरूपांत अस्तित्वांत असून ह्या भूतलावर किंवा सृष्टींत मनुष्यप्राणी निपजण्यापूर्वी तें अस्तित्वांत होतें हें आजचा शालेय इतिहास सुद्धां सांगूं शकतो. आमचें भौतिकतत्व नियमबद्ध असून त्या नियमाद्वारें माणसाला तें काबूतहि आणतां येतें. ह्या गोष्टीपुरतीच संवादित्व ही वास्तव चीज आहे. परंतु सृष्टींतील संवादित्व कुठून तरी बाहेरून येतें, हा समज निखालस चुकीचा आहे. खरें सुसंवादित्व हें मुख्यतः समाजानें निर्माण केलें पाहिजे व वर्गकलह संपल्याशिवाय बौद्धिक सुसंवादित्व समाजांत निर्माण होणें शक्य नाहीं. सुसंवादित्व ही सामाजिक-बौद्धिक चीज आहे. निसर्गांत नियमीतपणा जरूर मिळतो परंतु बुद्धि मिळणें शक्य नाहीं. बुद्धि ही समाजाची देणगी आहे.

निसर्ग विध्वंसात्मक वाटला तरी तो तसा मात्र नाहीं, कारण बुद्धीचा वापर केल्यास समाजाला निसर्गाचे नियम हुडकून काढण्यांत यश येऊन निसर्गाला

मानव-हिताला जोडतां येतें. परंतु त्याच्यापुढें जाऊन सृष्टींत स्वयंभू बौद्धिक संवादितत्व पाहाणें व तेवढ्यावरून निर्मितींत जर बुद्धि दिसते तर निर्मात्यांत हा सारा बुद्धिपुंज असणारच व हा बुद्धिपुंजच अर्थात ईश्वर आहे, असा उलटा युक्तिवाद करणें हें सर्वथैव दिशाभूल करणारें असून ती एक तत्त्वज्ञानात्मक हातचलाखी आहे.

ईश्वरवाद्यांचा तिसरा मुद्दा असा कीं, प्रत्येक माणसाच्या हृदयात बरें वाईट ह्यांचें युद्ध चाल्लेलें असतें व तूं वाईट करूं नकोस, बरें कर, अशी एक आज्ञा किंवा हांक त्याला ऐकूं येत असते. अर्थात ही हांक परमेश्वराची अस्तित्व-निदर्शक आहे असें त्यांचें प्रतिपादन.

वरील मुद्द्याच्या बाबतींत हें लक्षांत ठेवायला पाहिजे कीं ती आज्ञा, हांक किंवा आंतला आवाज वगैरे गोष्टी सामाजिक मानसशास्त्राच्या अभ्यासानें समजण्यासारख्या आहेत. कारण माणूस हा माणसांतच राहून माणूस बनलेला असतो. तेव्हां एखादी समाजविरोधी मानली गेलेली गोष्ट मग ती चुकीनें कां असेना पण ती करतांना त्याला कठीण जाणें हें साहजिक व नैसर्गिक आहे. तसेंच जें माणसांच्या विचार आणि भावना-क्षेत्रांत पक्कें मुरलेलें असतें तेंच त्यांच्या अंतःकरणांत किंवा मेंदूत आंतल्या आवाजाच्या रूपानें घोळत असणें मानस व्यापाराला धरून आहे. त्यांत विलक्षण असें कांहींच नाहीं. बाज्याचा सूर जर जड अशा बाज्याच्या पेटींतून अगदीं जडपद्धतीनें निर्माण होऊं शकतो व त्यांत गूढ असें कांहीं नाहीं असें आपण मानतों; प्राण जर चैतन्यमय असूनही देहाचाच अंश आहे असें सिद्ध झालें आहे तर मनातीत व इंद्रियातीत वाटणाऱ्या गोष्टींना अतिनैसर्गिक, अतिभौतिक मानणें हें बुरशीच्या तर्कशास्त्राचें द्योतक नाहीं काय ? तेव्हां ह्या युक्तिवादांत तत्त्वज्ञानाचा अंश अल्पसुद्धां नसून केवळ ईश्वरवादी पूर्वग्रहदोषच भरलेले आहेत. **रेने सुद्र** हा विख्यात फ्रेंच प्रायोगिक मानसशास्त्रज्ञ आपल्या अगदीं अलीकडच्या पुस्तकांत म्हणतो, " मनाच्या कांहीं अतिमानवी शक्ति आहेत व त्या बुद्धीच्या पलीकडे असून आत्म्याचें अमरत्व सिद्ध करतात हें मत पूर्वग्रहदोषामुळें निर्माण झालेलें आहे. इंग्रजांचें सारें मानसशास्त्रीय संशोधन ह्या पूर्वग्रहाने दूषित झालेलें आहे. " हाच लेखक पुढें म्हणतो, " विज्ञानाला धार्मिकतेच्या कोंडवाड्यांत

फुलवण्याकरितां इंग्रजजातीचा विक्षिप्तपणा कुठल्याही थराला पोंहोचूं शकतो!" (पहा—त्रेते द पारा सिकोलोजी. ले. रेने सूद्र. पान ४००)

अथर्व वेदामध्यें बरींच विविध प्रकारचीं सूक्तें आहेत. राजास युद्धांत जयप्राप्त्यर्थ, रोगनिवारणार्थ, स्त्रियांस सवतींच्या नाशासाठीं वगैरे अनेक प्रकारचे मंत्र त्यांत आहेत. मंत्र-सामर्थ्य आणि परमेश्वर ह्यांचा कांहीं परस्पर संबंध आहेच असें नाहीं. कारण निरीश्वरवादीहि मंत्र-सामर्थ्य मानूं शकतात. अर्थात मंत्र-सामर्थ्य काय आहें हे समजण्यावर तें अवलंबून राहील. शक्ति, पिशाच्च, पंचाक्षरी वगैरे पंथ मंत्रसामर्थ्याचा वापर करतात. आजचें पाश्चात्य वैद्यक ज्याप्रमाणें मोहनिद्रेचा उपयोग करून घेतें त्याप्रमाणेंच जुनें वैद्यक मंत्र-सामर्थ्याचा उपयोग करून घेत असे. मंत्र सामर्थ्यांतील अतिशयोक्त व अशास्त्रीय भाग सोडल्यास जें तथ्य रहातें त्याची उकल ईश्वरकल्पनेच्या आधाराशिवाय मानसशास्त्र करूं शकतें.

**मंत्र सामर्थ्य म्हणजे शब्द सामर्थ्य.** परंतु शब्दांना सामर्थ्य कुठून येतें! तें शब्दांत असतें का? नाहीं. तें शब्दांच्या माणसांवर होणाऱ्या परिणामांत असतें. 'शब्द हा प्रगल्भ मानवाच्या संपूर्ण भूतकालाशीं निगडित आहे. शब्दांतून मेंदूला बाह्य आणि आंतरिक प्रेरणा मिळत असतात. मेंदूंतील साऱ्या ज्ञानपेशींना तो जागरूक करतो व त्यांत प्राण ओततो. साऱ्या क्रिया प्रतिक्रियांना तो आवाहन करतो.' असें शब्दसामर्थ्याचें किंवा शब्दब्रह्माचें शारीरमानसशास्त्रीय तथ्यनिरूपण विश्वविख्यात रशियन शास्त्रज्ञ पावलोव यानें केलें आहे. (पहा: इंद्रियविज्ञानशास्त्र आणि उपचारशास्त्र यांत शब्दांचें स्थान. ले. प्लातोनोव.)

वरील शब्दांत शब्द—सामर्थ्याची उकल झाली आहे. एकच शब्द एकाच अर्थानें दोन माणसांवर वेगवेगळा परिणाम करूं शकतो व त्याचें कारण ह्या दोन माणसांच्या वेगवेगळ्या मानसिक अवस्थांत असतें. 'विश्वासः फलदायकः' 'मन एव मनुष्याणां कारणं बंध मोक्षयो' 'शब्दपडसाद उठला। म्हणे कोण रे बोलिला॥ रामी रामदास म्हणे। संशयाचीं हीं लक्षणें' 'रामदास सांगे खूण। भितो आपणाआपण॥'

पिशाच्च भूतें खेतें वगैरे प्रकार मानस–तत्वावरच आधारलेले असतात. ह्या मानसिक प्रक्रियेच्या मूळ कारणाला आत्मसूचन (ऑटोसजेस्शन) असें म्हणतात. ठराविक संस्कार व भीति यामुळें माणसाला मिळालेलें परसूचन (हेटेरोसजेस्शन) आत्मसूचनेंत परिवर्तित होऊन तें मेंदूद्वारा इंद्रियांवर व देहावर तदनुसारी परिणाम करतें व मग चमत्कारिक वाटणाऱ्या घटना घडतात. हे चमत्कार शास्त्रीय भाषेंत शरीर-मानासिकच असतात. त्यांचा संबंध अति-निसर्ग, अतिमानव, मनातीत, विश्वातीत वगैरे कल्पित गोष्टींशी बिल्कूल नसतो.

योगाचेंहि असेंच नैसर्गिक, शरीर-मानसिक तथ्य आहे. केवळ पूर्वग्रह-दोषानें कांहीं लोक ह्या शास्त्रीय तथ्यांना परमेश्वराशीं किंवा गूढाशीं वगैरे जोडतात. योग वगैरे साधनांनीं जें विशिष्ट ज्ञान साधकाला प्राप्त होतें तें ज्ञान कितीहिं स्वच्छ, सखोल असलें तरी तें ज्ञान त्याचें स्वतःबाबतचेंच व स्वतःच्या नैसर्गिक शक्तींच्या आवाक्यांतलेंच असतें. तें ज्ञान अतिनैसर्गिक नसतें. भौतिकवादाचे विरोधक प्रो. एअर सुद्धां आपल्या ' भाषा, सत्य आणि तर्कशास्त्र ' ह्या ग्रंथांत हें कबूल करतात कीं ' योगी आपल्या दिव्य दृष्टीचें वर्णन करतांना बाह्य जगाचें कांहीं सांगत नसतो; तो फक्त आपल्या मनाचें अप्रत्यक्ष दर्शन घडवतो. ' एखाद्या पहेलवानानें नियमित व्यायामाने मिळव-लेली शरीरदौलत ही जशी त्याची नैसर्गिक कमाई असते, त्यांत दैवी, आसुरी अतिमानवी असें कांहीं नसतें, तशीच योगाने मनःशक्ति वृद्धिंगत होऊं शकते व ती एक प्राकृतिक कमाई आहे.

ईश्वरविषयक पूर्वग्रहरहित दृष्टीने पाहिल्यास मानसशास्त्र, ज्योतिषशास्त्र, योगशास्त्र व इतर शास्त्रें ईश्वरकल्पनेचा आणि त्यांचा कांहींहीं संबंध नाहीं असाच निर्वाळा देतात व तीं शास्त्रें मानवी जीवन स्पष्ट करण्याच्या मार्गावर असून लाप्लास या शास्त्रज्ञाप्रमाणें ओरडून तींहि हेंच सांगत आहेत कीं आपल्या प्रांतांत आम्हांला ईश्वराची गरज भासत नाहीं.

आत्मसूचन हें एका व्यक्तीलाच होतें असें नसून तें एकदम कितीतरी माण-सांना किंवा समूहाला सुद्धां होऊं शकतें. त्याला सामुदायिक भ्रम (कलेक्टिव

हॅलुसिनेशन ) असें नांव आहे. अर्थात मंत्रसामर्थ्य, भूतपिशाच्च, फलज्योतिष वगैरे गोष्टींचा परमेश्वराशीं संबंध नाहीं हें उघड आहे. उलट ह्या गोष्टींवर विश्वास ठेवणें म्हणजे तत्वतः परमेश्वर न मानण्यासारखेंच आहे. कारण परमेश्वर सर्वशास्ता, सर्वनियंता असा जर आहे तर ह्या अनर्थकारक गोष्टी व त्यांत असणारें अराजक तो कसें बरें चालू देईल ? उदाहरणार्थ, असें घटकाभर समजूं या कीं फल ज्योतिष हें एक शास्त्र आहे. त्या शास्त्राप्रमाणें खऱ्या फलज्योतिष्याला माणसाचें सारें भवितव्य समजूं शकतें व तें तो त्या माणसाला सांगूं शकतो. आतां हा जो 'क' माणूस, ज्याचें भवितव्य त्याला समजलें तो आपलें आत्मस्वातंत्र्य (मग तें अल्प का असेना पण तें त्याला आहे असे तत्वज्ञानाला मानावेंच लागतें. नाहींतर साऱ्या शिक्षणाचा, सुधारणेचा उपयोगच नाहीं. ) वापरून जें होणारें आहे त्याला बदलूं शकतो व तसें झाल्यास जें होणारें विधिलिखित किंवा ईश्वरनिर्णित असतें तें मानवनिर्णित नाहीं का ठरणार ? उदाहरणार्थ 'क' माणसाला अमुक दिवशीं आगगाडीच्या अपघातांत आपलें मरण आहे असें जर का ज्योतिषाकडून समजलें तर तो त्या दिवशीं आगगाडींत निश्चितच बसणार नाहीं. कांहीं झालें तरीं तेवढें स्वातंत्र्य माणसाला आहेच.

भगवद्गीतेनें सुद्धां 'आत्मैव ह्यात्मनोबंधुरात्मैव रिपुरात्मनः' म्हणजे आपणच आपला बंधू व शत्रु हें तत्व मान्य केलें आहे. आत्मस्वातंत्र्यानुसार जर 'क' आगगाडींतच बसला नाहीं तर अपघातांत मरणार कसा ? म्हणजे आगगाडीच्या अपघातांतील त्याचा मृत्यु टळला कीं नाहीं ? टळला. होय ना ? मग आतां प्रश्न असा आहे कीं 'क' चा मृत्यु ठरलेला होता म्हणून तर ज्योतिष्याला दिसला व त्यानें सांगितला. ज्या जगाचा कर्ता परमेश्वर आहे त्या जगांत हें सारें ठरविणे हें ईश्वराच्या इच्छेशिवाय कसें होणार ? परंतु फलज्योतिष्याच्या ज्ञानाप्रमाणे, सांगण्याप्रमाणे व तदनुसारी मनुष्याच्या कृतिस्वातंत्र्यानें ईश्वराचें हें ठरवणेंच मोफत जातें. कारण माणूस आपलें आत्मस्वातंत्र्य वापरून तें टाळूं शकतो. तेव्हां फलज्योतिषाचें कार्य ईश्वर-निर्णयाविरुद्ध जातें, म्हणून बुद्धिमान फलज्योतिष्याला ईश्वर–निर्णय मानणें कठीणच आहे.

ईश्वरवाद्यांना फलज्योतिष मानतां येणार नाहीं व फलज्योतिष मानणाऱ्यांना ईश्वर मानतां येऊं नये. परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं फल-ज्योतिष ( ॲस्ट्रॉलॉजी ) हें शास्त्र नाहीं. ज्योतिःशास्त्र किंवा खगोलशास्त्र ( ॲस्ट्रोनॉमी ) हें शास्त्र आहे व परमेश्वरहि या जगांत अस्तित्वांत नाहीं. तेव्हां हे सारे खुळ्या समजुतीचे व प्रपंच–ज्ञानाच्या चलाखीचे प्रश्न आहेत व ते प्रपंचतापानें पोळलेल्या माणसाच्या मानसशास्त्रावर आधारलेले आहेत. हें मानसशास्त्र दारिद्र्याचें अर्थशास्त्र ( स्कॅरसिटी इकॉनॉमिक्स ) आणि गडगंज दौलतीच्यामध्यें दारूण दरिद्रता (पॉव्हर्टी अमिडस्ट प्लेंटी) असणाऱ्या समाज-रचनेवर आधारलेलें आहे.

दरिद्रता, विषमता, वर्गीयता, संस्कृतिहीनता, लोकभ्रम, फलज्योतिष, अक्षरावरून स्वभावदर्शन (ग्राफॉलॉजी) तोंडावळ्यावरून स्वभावज्ञान ( फिजि-ऑग्नमी ) हस्तसामुद्रिक, दैवशास्त्र व इतर कितीतरी पोटभरू मिथ्याशास्त्रें ( स्यूडोसायन्सीस ) ह्या एकदमच मरणाऱ्या गोष्टी आहेत. कारण त्या पूर्ण अन्योन्याश्रयी व परस्परजन्य आहेत. केवळ शिक्षणप्रसार, सुधारणावाद वगैरे गोष्टींनी मानवी खुळें नाहीशीं होत नाहींत. कारण ह्या खोट्या गोष्टींचा पाया समाजाच्या अर्थरचनेपासून तों मानवाच्या मनोरचनेपर्यंत असलेल्या संपूर्ण जीवनव्यवहारांत पक्का मुरलेला असतो. शास्तावर्ग त्या पायावर आपले हितसंबंध टिकवून धरण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असतो व दुर्दैवानें कांही काल शास्त्यावर्गाच्या कल्पनाच जनतेच्याहि कल्पना बनून वावरत असतात.

मार्क्सवादी पायाशुद्ध क्रांतीच मानवतेला ह्या अंधारांतून प्रकाशाकडे नेऊं शकते. हें भाग्य दुसऱ्या कोणत्याही तत्त्वज्ञानाच्या आणि चळवळीच्या ललाटीं नाहीं. कांहीं पुरोगामी, बुद्धिप्रामाण्यवादी सज्जन ह्या दिशेने जें कार्य करीत आहेत त्याची परिणति शेवटीं मार्क्सवादी क्रांतींत अटळ आहे. कारण ही क्रांतीच ह्या गोष्टींची हमी आहे. अर्थात मंत्रविद्या, पिशाच्चविद्या, फल-ज्योतिषविद्या, योगविद्या, संमोहनविद्या, सहसंवेदन ( तेलेपाथी ) वगैरेंची सविस्तर मीमांसा करण्याचें हें स्थळ नव्हे हें उघड आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ३८२८९

अशीच गोष्ट चमत्कारांची आहे. सगळ्या साधुसंतांचा विश्वासहि चमत्कारांवर नव्हता. तुकाराम महाराजांनी चमत्कार नवसांवर कठोर टीका केली आहे. 'नवसें कन्या पुत्र होती तर का करणे लागे पति' असें त्यांनीं स्पष्ट बजावलें आहे. बुद्धानें चमत्कार मानले नाहींत. ख्रिस्तसुद्धां चमत्कारांविरुद्ध होता व बायबलमधील चमत्कारांचीं रसभरीत वर्णनें हीं नंतरची आहेत हें सिद्ध झालेलें आहे.

चमत्कारांचें खूळ नेहमीच मूर्ख व स्वार्थी अनुयायी पिकवत आलेले आहेत हें इतिहासाच्या जाणकारांना ठाऊक आहे. आमच्या देशांत स्वामी दयानंद सरस्वती ह्यांनी आपल्या 'सत्यार्थ प्रकाश' ह्या पुस्तकांत कितीतरी चमत्कारांचा समाचार घेतला आहे. अर्न्स्ट हेकेलचें 'मिरॅकल्स ऑफ लाइफ,' वेस्टावे यांचें 'ऑब्सेशन्स ऑफ ह्युमन माइंड' व भदंत आनंद कौसल्यायन यांनीं अनुवादित केलेलें इंगरसोल यांचें 'स्वतंत्र चिंतन' हीं पुस्तकें ह्या दृष्टीनें अभ्यासण्यासारखीं आहेत.

लोकमान्य टिळकांनीं भारताला कर्मयोगाचें तत्त्वज्ञान शिकवून भारतीय जीवनांत खरोखरच पुरुषार्थाचा एक प्रचंड ओघ ओतला यांत संशय नाहीं. भारताच्या नवजीवन-जागृति युगांतला तो एक फार मोठा टप्पा होता. घटकाभर मन स्तंभित व्हावें अशी लोकमान्यांची अगाध विद्वत्ता गीतारहस्यांत दिसून येते. परंतु ईश्वराचें अस्तित्व व चातुर्वर्ण्याची महति ह्या दोन गोष्टींचें जिथे जिथे ते समर्थन करतात तिथें तिथें मात्र त्यांच्या पूर्वसंस्कारांची कींव करावीशी वाटते व टिळकांएवढा महाबुद्धि विचारवंत शेवटीं पूर्वसंस्कारांना बळी पडावा ह्याची खंत वाटते.

लोकमान्य म्हणतात, 'ह्या जगांत जर शाश्वत ईश्वर नसता तर माणसांत अमृततत्वाची आस्था दिसली नसती. ज्या अर्थी माणसाला अमृततत्वाची आस्था वाटते त्या अर्थी ईश्वर आहे.' तसेंच आपला अमृततत्वाचा मुद्दा सिद्ध करतांना लोकमान्य टिळक पुढे म्हणतात...... 'बरें, अमृततत्व खोटें म्हणावें तर राजापासून जें इनाम मिळवावयाचें तें आपल्या पुढे आपल्या पुत्र-पौत्रादिकांसह आचंद्रार्क उपभोगावयास मिळावें अशी मनुष्याची इच्छा असते.'

चालू काळांत प्रत्येकाला हें कळून चुकलें आहे कीं, वारसाहक्काचा मालमत्तावादी (बुर्झ्वा) संस्कार हा शाश्वत संस्कार नसून चालू मालकी हक्काच्या युगाचा तो परिणाम आहे. समाजविकासाचे टप्पे व नियम ज्यांना कळले आहेत व शिवाय मानवाच्या इतिहासांत येऊन गेलेल्या प्राथमिक साम्यवादी युगाची ज्यांना कल्पना आहे त्यांना ही मालकीची कल्पना अलीकडची असून ती सामाजिक निर्मिति आहे हे टाऊक झालें आहे. (पहा—ओरिजिन ऑफ फॅमिली, प्रायव्हेट प्रापर्टी अँड स्टेट—ले. एंगल्स ) शिवाय अमृततत्व हें स्वप्न आहे. ह्या स्वप्नाच्या आधाराने ईश्वराची वास्तवता किंवा कसलीही वास्तवता सिद्ध होत नसून वास्तवतेच्या आधाराने स्वप्नें समजूं शकतात. अर्थात आदर्शवादी (आयडीयलीस्ट) तत्वज्ञानपद्धतीच लोकमान्य टिळकांच्या ह्या अनुमान दोषाला जबाबदार आहे. तरी पण एवढा क्षुल्लक मुद्दा लोकमान्यासारख्यांनीं मांडावा हें नवल आहे !

दुसरा एक महत्वाचा मुद्दा म्हणून ईश्वरवादी लोक पुढे करतात. ते म्हणतात कीं हें भौतिक जग आम्हाला समजतें तसेंच आहे असें म्हणवत नाहीं. कारण ह्या खुर्चीचें आमचें ज्ञान म्हणजे ती आम्हांला कशी दिसते, कशी वाटते, किती वजनाची आहे, रंग काय आहे वगैरेचें ज्ञान आहे. आमचें त्या वस्तुविषयींचें ज्ञान म्हणजे कांहीं त्या वस्तूचें सारें वस्तुत्वज्ञान नव्हें. वस्तुसार नव्हे. वस्तुसार (एस्सेंस) आम्हांला अज्ञेय आहे.

ह्यावर आमचें उत्तर असें कीं खुर्चीचें वजन, खुर्चीचा रंग, खुर्चीचें लाकूड, तिची बनावट, तिची उपयुक्तता वगैरे साऱ्या गोष्टींची गोळाबेरीज म्हणजे खुर्चीत्व किंवा खुर्चीचें वस्तुसार !

अध्यात्मवादी विचारवंत ह्या वजन, रंग, रूप वगैरे गोष्टींना बाधा म्हणतात व उपनिषदांतून त्यांना नामरूपें म्हटलेलें आहे. लोकमान्य लिहितात, ' या नामरूपांहून भिन्न व कधींही न पालटणारें असें कांहींतरी द्रव्य असून पाण्यावर ज्याप्रमाणे कसला तरी तवंग यावा त्याप्रमाणे कोणत्यातरी एकाच मूळ द्रव्यावर अनेक नामरूपांचे हे तवंग आहेत. आपलीं इंद्रियें नामरूपाखेरीज दुसरें कांहींच ओळखूं शकत नाहींत. म्हणून या नामरूपांना

१२२९२ २०१

आधारभूत झालेलें पण नामरूपाहून भिन्न असे जें मूळांतलें द्रव्य तें इंद्रियांना कळणें शक्य नाहीं हें खरें पण सर्व जगाला आधारभूत झालेलें हें तत्त्व अव्यक्त म्हणजे इंद्रियांना अज्ञेय असलें तरी तें सत् म्हणजे खरोखरीच सर्वकाल या नामरूपांखालीं व नामरूपांतहि वास करीत आहे. कधींहि नाहींसें होत नाहीं असें आपल्या बुद्धीने निश्चित अनुमान करावें लागतें. ( गीतारहस्य पान २०४)

लो टिळक पुढें म्हणतात, "कोणताहि गुण म्हटला कीं तो इंद्रियांना गोचर होणारा अतएव नामरूपात्मकच असावयाचा. सर्व अधिभौतिक शास्त्रेंहि याचप्रमाणें मायेच्या कोटींत येतात. इतिहास, भूज्ञान, विद्युतशास्त्र, रसायन, पदार्थविज्ञान वगैरे कोणतेंहि शास्त्र घ्या, त्यांत जें विवेचन केलेलें असतें तें सर्व नामरूपांचें म्हणजे कोणत्याही पदार्थाचें एक नामरूप जाऊन त्याला दुसरें नामरूप कसें प्राप्त होतें एवढ्या बद्दलचेंच असतें. उदाहरणार्थ, ज्याला पाणी हें नांव आहे त्याला वाफ हें नाव केव्हां व कसें येतें किंवा एका काळ्या ढुस्स डांबरापासून तांबडे, हिरवे, निळे वगैरे अनेक पुडीचे रंग कसे होतात. इत्यादि नामरूपाच्या फरकाचाच विचार या शास्त्रांतून केलेला आहे."

वर लोकमान्य टिळक विज्ञानाला सत्याच्या पंगतीतून उठवित असले तरी उपनिषदांतहि सत्य म्हणजे इंद्रियगम्य सत्य असेंच बहुधा मानलेलें आढळतें. खुद्द लो. टिळकांनीहि हें कांहींसें मान्य केलेलें आहे. ते म्हणतात, "सत्य हा शब्द सामान्य व्यवहारांत डोळ्यांस प्रत्यक्ष दिसणाऱ्या वस्तूस लावितात हें पूर्वींच सांगितलें आहे. म्हणून 'सत्य' या शब्दाचा हाच व्यवहारिक अर्थ घेऊन उपनिषदांतून कांहीं ठिकाणीं डोळ्यांनीं दिसणाऱ्या नामरूपात्मक बाह्य पदार्थास 'सत्य' व त्या नामरूपांनीं आच्छादिलेल्या द्रव्यास 'अमृत' अशीं नावें दिलेलीं आहेत." ( गीतारहस्य पान २११ )

आतां उपनिषदांपुरतेंच बोलावयाचें झालें तर उपनिषदांची भाषा काव्यमय असून सत्य, आत्मा, जीव, प्राण, ब्रह्म वगैरे शब्दांच्या अर्थाविषयीं पंडितांत एकवाक्यता नाहीं हें आधींच सांगून टाकलें पाहिजे. डॉ. दफ्तरी सारख्या महर्षींनी उपनिषदांचा वस्तुतंत्रात्मक अर्थ लावला असून जीं वचनें परब्रह्माचीं वर्णन करणारीं आहेत असें आजपर्यंतचे लोक मानीत आले तीं

वचनें ब्रह्मविद जीवनाचें वर्णन करणारीं आहेत असें त्यानीं सिद्ध केलें आहे. (पहा–औपनिषदिक जीवन सौख्य. पान १८–१९)

डॉ. राधाकृष्णन् सुद्धा नामरूपांना फक्त माया मानीत नाहींत. ते म्हणतात 'वेदकालीन विचारवंत लोकांनीं 'जग सत्य आहे' ही विचारसरणी मान्य केली आहे. ( पहा-हिंदुधर्माचीं मूलतत्वें आणि पुनर्घटना पान ४८ )

ही सृष्टि म्हणजे केवळ अज्ञ लोकांनाच खरा वाटणारा असा परमात्म्यानें निर्माण केलेला मायावी देखावा हें मत नंतर शंकराचार्यांनी मांडलें व बुद्धोत्तर कालांत त्याचा प्रचार होऊन परिणामीं समाजांत कर्तव्यशून्यता, दैवायत्तता, परावलंबन इत्यादि दुर्गुणांचें प्राबल्य माजलें हें सर्वविदित आहे.

स्वामी विवेकानंद व नवजीवनाच्या इतर जागृतिकार विचारवंतांप्रमाणे लो. टिळकांनीं शंकराचार्यांच्या मायावादाला मुरड जरूर घातली परंतु अध्यात्म विवेचनांत मात्र ते मुळावर घसरले. व त्यामुळें भारतीय तत्वज्ञानाची अमाप हानी झाली. अध्यात्म किंवा परतत्व त्यांना सिद्ध करतां येणें शक्यच नव्हतें कारण तें अज्ञेयच आहे व अज्ञेय काय आहे हें जसें कोणालाच सागतां यावयाचें नाहीं त्याचप्रमाणें अमुक गोष्ट अज्ञेय आहे असें सांगणें हेंहि चुकीचें. कारण ज्यावेळीं आम्हीं एखाद्या गोष्टीला अमुक गोष्ट असें म्हणतों त्यावेळीं तीं केवळ 'ज्ञेय'च नव्हे तर ज्ञात झालेलीं असते व म्हणूनच अमुक गोष्ट असें आम्हीं म्हणतो. आपला ह्या प्रकारें ईश्वर सिद्ध करण्याचा तर्क दुबळा आहे हें टिळकांनीं जाणलें होतें परन्तु येनकेन प्रकारेण ईश्वर सिद्ध करण्याच्या जिद्दीमुळें शेवटीं त्यांना व्यक्तिप्रत्ययाचा अति दुबळा आश्रय घ्यावा लागला. ते म्हणतात, 'केवळ तर्कदृष्ट्या विचार केला तर परब्रह्माचें किंवा आत्म्याचेंहि हें अज्ञेयत्व कबूल केल्याखेरीज मार्ग राहात नाहीं. परन्तु ब्रह्म याप्रमाणें अज्ञेय व निर्गुण असून इंद्रियातीत असलें तरी प्रत्येक मनुष्यास त्याच्या स्वतःच्या आत्म्याची साक्षात प्रतीती असल्यामुळें त्या निर्गुण आत्म्याचें जें कांहीं अनिर्वाच्य स्वरूप साक्षात्कारानें आपण ओळखतो तेंच परब्रह्माचें स्वरूप आहे अशी प्रतीती येऊं शकते.'

लो० टिळक ईश्वर, परब्रह्म आम्हांला अज्ञेय म्हणजे आमच्या ज्ञानकक्षेत

येत नाहीं हें साफ कबूल करूनहि परंत तर्कानें सिद्ध होतो असें मात्र म्हणतातच. परन्तु सुरुवातीला किंवा अखेरीला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष तरी तर्काची अंतिम पारख इंद्रियज्ञानानें जर होत नसेल तर तो तर्क कोरा तर्क असें मानावयास हरकत नसते. शिवाय व्यक्तिप्रत्यय हें जणु कायं एक स्वतः प्रमाण ( ॲक्सिअम ) आहे असा भास उत्पन्न करण्याचाहि प्रयत्न त्यांत दिसतो. **परंतु स्वतंत्रपणे विचार करणाऱ्या सर्वांचें प्रमाणाशिवायहि ज्याविषयीं एकमत आहे तेंच स्वतःप्रमाण ( ॲक्सिअम ) असेंच सर्वत्र समजण्यांत येतें.** रसायन शास्त्र, गणित वगैरे अशा विचार करणाऱ्या सर्वांच्या एकमतावरच अधिष्ठित आहे. ईश्वरसाक्षात्कार ही गोष्ट तशी नाहीं. साक्षात्काराबाबतीत एकमत नाहीं. जेवढे साक्षात्कार तेवढे त्याचे प्रकार म्हणून हा मुद्दा वैयक्तिक असून वस्तुनिष्ठ नाहीं असें ठरलें.

आतां मुद्दा शिल्लक राहिला नामरूपांचा. लो. टिळक म्हणतात, सारीं शास्त्रें केवळ नामरूपाची वर्णनें ! अहो हें ब्रिटिश साम्राज्य सत्य आहे काय ? छे...छे...तें नामरूप आहे. ती माया आहे. हें विवर्त आहे सत्य त्याच्या पलीकडे आहे. अहो, साम्राज्यवाद जगाला छळतो आहे. तें सत्य आहे ना ? छे...छे...राज्यवाद बदलून साम्राज्यवाद आलेला आहे. पाणी बदलून जशी वाफ तसें राज्य बदलून साम्राज्य......फक्त बदल म्हणजे नामरूप. सत्य पलीकडे आहे. अहो, मला भूक लागली आहे परंतु मी बेकार आहे. छे, छे. तें नामरूप आहे. सत्य त्याच्या पलीकडे आहे. राजाची जुलूमशाही, साम्राज्यवादी पिळवणूक भांडवलदारी शोषण, वसाहतवाद, लोकसत्ता, साम्यवाद हीं नामरूपें आहेत. सत्य त्यांच्या पलीकडे आहे. पदार्थविज्ञान, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, वगैरे केवळ नामरूपांचें विवेचन ......सत्य त्या शास्त्रांच्या पलीकडे ! तें कुठें ? अहो, तें अगदी तळचा जो तळचा बिंदू, त्या बिंदूच्या तळचा जो रेणू व तळच्या रेणूचा जो परमाणु व परमाणुच्या तळचा— छे, छे ‘ नेति नेति , सत्य तें नाहीं सत्य तें नाहीं .... सत्य त्याच्याहि पलीकडे !

सुदैवानें लो. टिळक व्यवहारांत असें वागले नाहींत हें आम्हीं जाणतों. उलट त्यांनीं भारतीय नवजीवन जागृतीच्या इतर विचारवंतांप्रमाणें शंकराचार्यांच्या

मायावादाला मुरडच घातली व भारताला कर्मयोग शिकवला. परंतु तत्वमीमांसेंत जो गोंधळ त्यांनीं राहूं दिला त्यामुळें पुढें व आता मार्क्सवादाच्या प्रभावापर्यंत तत्वज्ञानांत अराजकच वावरत आहे. महात्मा गांधींकडून शास्त्रीय विवेचनाची अपेक्षा एकंदरींत कमीच. परंतु लो. टिळकांकडून ती अपेक्षा जरुर करतां येणें शक्य होतें.

अध्यात्म प्रकरणाच्या प्रारंभीं लो. टिळक मोठ्या अभिमानाने लिहितात.... " अर्वाचीन सृष्टीशास्त्रवेत्ते थोडा निराळा क्रम सांगतात व अधिभौतिक शास्त्रांची जसजसी अधिकाधिक वाढ होत जाईल तसतशी या क्रमांत आणखीहि सुधारणा होण्याचा संभव आहे. परंतु एका अव्यक्त प्रकृतीपासूनच सर्व व्यक्त पदार्थ गुणोत्कर्षाने क्रमाक्रमानें निर्माण झाले आहेत या मूल सिद्धांतात फरक पडणें शक्य नाहीं. तथापि हा विषय इतर शास्त्रांचा आहे आपला नाहीं असें समजून वेदान्तकेसरी त्याबद्दल वाद घालीत बसत नाहीं.....सिंहापुढें ज्या प्रमाणें कोल्हीं त्याप्रमाणें वेदान्तापुढें इतर शास्त्रें गप्प होतात.

तावत गर्जन्ति शास्त्राणि जंबुका विपिने यथा
न गर्जति महाशक्तिः यावद्वेदान्त केसरी ॥

वस्तुज्ञानाबाबतची वरील द्वैती पद्धत मुळांतच चुकीची आहे. कारण त्यांत वस्तुसार वेगळें व वस्तुचें नामरुप वेगळें असा समज गृहीत धरलेला असतो. शिवाय वस्तुसाराचें आकलन हें वेदान्ताचें क्षेत्र तर वस्तूंच्या नामरुपाचें ज्ञान हें सृष्टीशास्त्राचें व इतर शास्त्राचें काम असें त्यांत गृहीत धरले आहे. वस्तूंची नामरूपें मृगजलवत आहेत तेव्हां तीं शास्त्रेहि तशीच मायावत्. व त्यांची कोल्हेकुईहि कुचकामी आहे. सर्वश्रेष्ठ जें ज्ञान आहे ते वस्तुसाराचें असें एकंदरींत हे विवेचन आहे. ह्या विवेचन–पद्धतींत विश्वाचें मूलतत्व ( वस्तुसार ) वेगळें व गति वेगळीं असें मानलें जाते व मूलतत्व सत्य असून गति ही माया आहे असा आग्रहहि त्यांत आहे.

ह्या बाबतींत मार्क्सवादाची आकलन पद्धति सरस आहे. मार्क्सवाद विश्वाला एकाच विश्वतत्वाचा किंवा भौतिक तत्वाचा अविष्कार मानतो व भूततत्व व

गतितत्व दोन वेगवेगळीं नाहींत असें मानतो. अर्थात् मग एक ( भूततत्व ) खरें व दुसरें ( गति ) फसवें हा प्रश्नच निर्माण होत नाहीं. तीं दोन नव्हेतच. म्हणूनच मार्क्सवाद किंवा मार्क्सवादी संवित्तिशास्त्र ( एपिस्टेमॉलॉजी ) एकतत्व-वादी ( मोनिस्ट ) आहे. गति ही भूततत्वाची अस्तित्व-पद्धति होय.

वस्तूंचें शास्त्रज्ञान वेगळें तें मिथ्या किंवा कमी दर्जाचें असला द्वैती (?) प्रकार मार्क्सवाद मानूं शकत नाहीं. त्याचप्रमाणें फक्त गतीच आहे भौतिकतत्व असें कांहींच नाहीं असेंहि केवलादर्शवाद्यांप्रमाणें ( सब्जेक्टिव्ह आइडियालिस्ट ) मार्क्सवाद मानीत नाहीं. गतिमान भौतिकतत्व हें एकच तत्व ह्या जगाच्या बुडाशीं आहे असें मानतो. **आमचा व्यवहार आणि ज्ञान हींच गतिमान् भूततत्वाच्या स्वतंत्र अस्तित्वाची ग्वाही असून भूततत्व व गति ह्यांच्या अभेद्यत्वाची तीच हमी आहे असें मार्क्सवाद मानतो.**

आमचें शास्त्रीय ज्ञानच खरें भरंवशालायक ज्ञान असून हळूहळू तें संपूर्ण वस्तुसाराला मानवी ज्ञानाच्या व कृतीच्या कक्षेंत आणून मानवाच्या निर्भय, निरपवाद सुखाची तयारी करीत चाललें आहे. **सिंहगर्जना करण्याची जर कुणाची हिंमत असली तर ती अशा शास्त्राधिष्ठित मार्क्सतत्व-ज्ञानाचीच होय.** परन्तु मार्क्सदर्शन असली भलतीच महत्वाकांक्षा धरण्याइतकें एकांतिक नाहीं !

शास्त्रीय तत्त्वज्ञान तर साऱ्या शास्त्रांवर आधारलेलें असून संपूर्ण मानव-जातीने इतिहासकालांत निर्मिलेल्या साऱ्या साहित्यावरहि तें आधारलेलें आहे. त्यामुळें तें कोणालाच कोल्हा किंवा दुसरें कांहीहि मानीत नाहीं. कारण असा दिवस जवळ आहे जेव्हां सारी शास्त्रें विकसत विकसत तत्त्वज्ञानाचा सारा प्रांत आपल्या देहांत शोषून घेणार आहेत व मग शास्त्रें व तत्वज्ञान हीं निराळी उरणा-रच नाहींत.

युरोपांतहि तत्वज्ञानाला शास्त्रांचें शास्त्र (सिऐंसिया सिऐंसियारूम=सायन्स ऑफ सायन्सिस) असें स्कोलॅस्टिक व पूर्वींचे धर्मपंथी दर्शनाचार्य मानीत होते. परंतु आतां तो तत्वज्ञानाचा बडेजाव राहिलेला नाहीं. शास्त्रें व तत्वज्ञान एकाच

ज्ञान-प्रक्रियेचीं सोईस्कर दालनें असून एकाच जगत् वस्तूला ज्ञानकर्मसमुच्चय व मानवी सुख यांच्या कक्षेंत तीं आणीत असतात.

ईश्वर कल्पना ही पिशाच्च कल्पनेतून उत्क्रांत झाली असल्याचें मागें आम्ही म्हटलें आहे. गुरुवर्य आगरकरहि ह्या मताचे होते. कांहीं देव हे देवपदाला पोहों-चण्यापूर्वी राक्षस कोटींतच वावरत होते. सर्वसाधारण जनतेचे देव अजूनहि कांहीं पूर्ण पिशाच्च योनीतले, कांहीं जरा वर चढलेले, तर कांही अर्धे पिशाच्च, अर्ध-देव वगैरे कोटींतले आहेत. ईश्वरकल्पना इतर कल्पनांप्रमाणें सतत उत्क्रांत होत आल्यामुळें असें असणें नैसर्गिकच आहे. राष्टोळी, देवचार, वेताळ. खळनाथ, काळभैरव, खंडोबा वगैरे शेकडों नांवानीं ईश्वरकल्पना अर्धपिशाच्च, अर्धदेव स्वरु-पांत अजूनहि वावरत आहे. खुद्द महादेव ही दाशीच राक्षस देवता होती असें आगरकरांनीं सुचवलेलें आहे. ते म्हणतात ‘ महादेव हा नररूंड मालधर राक्षसच होता !’ ( पहा-निबंध संग्रह भाग १ )

देवतांची उत्क्रांति ही सर्व देवतांना लागू आहे. त्यांत शाश्वत असें कांहींच नाहीं. शाश्वति ही अगदीं कोरी कल्पनाच असल्यामुळें ती वास्तवाला लागू होणें शक्य नाहीं मनुष्यकल्पित देवताहि अर्थात् उत्क्रांत होणें साहजिकच होतें. गणपति ही शोषित जनतेची देवता. वरिष्ठांनी प्रथम तिला विरोध केला. विघ्नकर्ती, मारा-माऱ्या करणारी, मांडखोर, लाल रक्तानें माखलेली देवता म्हणून तिची प्रथम अव-हेलना केली. मग तिची भक्ति जनतेंत प्रबळ ठरल्यामुळें वरिष्ट वर्गानें त्या देवते-लाच ( किंवा देवालाच ) विघ्नहर्ता व सिद्धिदाता बनवून पचवून टाकलें. ( पहा-लोकायत-ले. देविप्रसाद चट्टोपाध्याय पृ. १३४ )

अशीच स्थिति अर्धपशु हनुमानाची. शेतकरी आणि कुस्तिगीरांचा हा देव. पण मग सामंतशाहीच्या कालांत रामायण काव्याने त्याला सामतांचा एकनिष्ठ आज्ञा-धारक सेवक बनवून टाकलें. आणि त्याबरोबर त्याच्या लाल रंगालाहि चाट मिळाली ( पहा-भारतीय इतिहासाचा परिचय-ले. प्रो. दामोदर कोसंबी पृ. ४० )

ब्रह्मदेवाची दशा याहून वेगळी नाहीं. तो प्रथम हिंसक होता. मग अहिंसक बनला.

देवापूर्वीचा काल देवींचा. कारण मातृसत्ताक पद्धत ही पितृसत्ताकापूर्वीची. लोक जसे टोळ्यांत रहाणारे.......काळे गोरे वगैरे तसे त्यांचे देव बदलत, सुधरत, उत्क्रांत होत आले आहेत ' थिओपियन गॉडस् हॅव गॉट एथिओपिअन लिप्स अँड ग्रीक गॉडस् आर लाइक ग्रीक्स असें महाकवी गटेनें एका ठिकाणी म्हटलें आहे तें ह्या संदर्भांत महत्वाचें आहे. त्याचा अर्थ एथिओपियन देवतांचे ओठें हबशांसारखे व ग्रीक देव ग्रीकांसारखे असा आहे.

जुन्या करारांतील मोझेसच्या नांवावरच्या पांच पुस्तकांत ज्यू लोकांचा देव ' यह्वे ' किंवा जुने नांव ' जीहोव्हा ' हा एक मानवी राक्षस होता असें वर्णन करण्यांत आलें आहे. त्याचा मत्सराग्नि भडकला की तो स्त्री, पुरुष, मुलें आणि पशु यांची सरास कत्तल करण्याचा हुकूम करीत असे. पुढें त्याची उत्क्रांति दयेचा भुकेला देव अशी झाली. आमची काली देवता अशीच उत्क्रांत झाली आहे. प्रथम ती आर्येतर, दारू आणि पशूबली घेणारी होती मग ती परमात्मस्वरूपी दयामयी बनली !

दहा हजार वर्षांपूर्वी ईश्वरकल्पना मानवी मनाला अज्ञात होती असें ढोबळ रीतीनें जें मागें सांगितलें आहे तें मानवी मनाच्या विकासाला कांटेकोरपणे लागू होईलच असें नाहीं. कारण प्रत्येक वस्तूला किंवा अस्तित्वाला उत्पत्ति–स्थिति–विकास–लय असा क्रम असतो. एका वस्तूची उत्पत्ति दुसऱ्या कुठल्यातरी वस्तुत्वांतून किंवा वस्तुसंग्रहातून झालेली असते. व कल्पनेच्या उत्पत्तीलाहि पण हेंच लागू आहे. एक कल्पना दुसऱ्या कल्पनेतून जन्यजनकरूपाने, साहचर्यानें किंवा प्रभावानें उत्पन्न झालेली असते. एखादी कल्पना प्रत्यक्षहि नव्याने निर्माण होणे अशक्य नसतें. परन्तु जुन्याशीं ती संबंधित असणारच. अर्थात नवी कल्पना जेव्हां अगदीं कमजोर असते तेव्हां तिचें अस्तित्व भासत नाहीं. जेव्हां तिचा परिणाम वाढून गुणभेद निर्माण होतो तेव्हां ती कल्पना निर्माण झाली असें आपण साधारणपणें म्हणतो. तेव्हांच तिला गुणतः स्पष्ट स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झालेलें असतें-वेगळेपणा प्राप्त झालेला असतो. व्यक्तित्व प्राप्त झालेलें असते. परन्तु तत्पूर्वी ती वस्तू मुळींच नसते असें मात्र नव्हे. ती असते. परन्तु तिचें अस्तित्व भासमान नसतें. तेव्हां एखाद्या वस्तूचा, किंवा गोष्टीचा नक्की प्रारंभ केव्हां झाला हें सांगणें शास्त्रीय

दृष्ट्या सोपें नसतें. त्यांतल्यात्यांत एखाद्या कल्पनेचा प्रारंभकाल ठरवणें तर महा-कठीण. जवळ जवळ अशक्यच.

शिवाय मानवी वंशहि वेगवेगळ्या परिस्थितींत, वेगवेगळ्या देशकालांत विकसलेले. उत्पादन–साधनांतले व उत्पादन संबंधांतील फरक वगैरे गोष्टींमुळें एकाच कालाच्या समान धाग्यांत त्यांना बांधतां येणें शक्य नाहीं. विषमतेच्या भिन्नतेमुळें ईश्वरकल्पनेच्या उत्क्रांतीचीं इतकीं भिन्नभिन्न स्वरूपें आहेत की त्यांतला नक्की समान दुवा फारच अल्प असा सांपडतो. व म्हणून ईश्वर कल्पनेचा उद्भव व विकासकाल ठरवणें सोपें नाहीं. परन्तु ह्या कल्पनेला पोषक परिस्थिति म्हणजे वर्गविग्रह निर्मिती हें मात्र नक्की. ईश्वरकल्पनेच्या विकासाची रूपरेषा मानसशास्त्रीय इतिहासाला दीर्घ संशोधनाने खुलासेवार सांगतां येईल.

प्रथम मानव असहाय होता, हतबल होता. म्हणून तो भ्याला व त्याने ही कल्पना जन्माला घातली असें कांहीं विद्वान म्हणतात परन्तु तें अंशतःच खरें आहे. माणसाच्या निसर्गविषयक घोर अज्ञानाची व हतबलतेची योग्य दखल घेऊनहि आम्हांला असें सुचवावेसें वाटतें कीं माणसाची सामाजिक हतबलता व वैषम्य हींच ह्या कल्पनेच्या वाढीला अधिक कारणीभूत झालेलीं आहेत.

निसर्गविषयक भीति ही ईश्वरकल्पनेची जननी आहे असें टेरान्सिओ ह्या प्राचीन लॅटिन कवीने म्हटलें असलें ( देवुश इन तिमोरे नेस्सित–भीतिमुळें ईश्वराची उत्पत्ति. ) तरी इतर कारणांपैकींच तें एक कारण असें मानणे अधिक शास्त्रशुद्ध ठरेल.

गुस्ताव्ह ल बाँ ह्या प्रख्यात फ्रेंच तज्ञाची ईश्वर-समीक्षाहि मानवाच्या निसर्ग अज्ञानावर भर देणारीच आहे. एखादी कल्पना जरी कितीहि स्वप्नमय, अमूर्त व स्वैर असली तरी तिचाहि धागा जीवनाशींच जोडलेला असतो. मग तो वेडा वांकडा, उलटा सुलटा, रूपरंग, आकार, प्रकृति वगैरेंच्या दृष्टीनें विकृत, अतिशयोक्तियुक्त वगैरे कसाका असेना परन्तु तो रुजतो जीवनभूमीतूनच. माणसांचें भौतिक जीवन असो, वैकारिक असो किंवा वैचारिक असो, तें परिस्थितीपासून पूर्ण विलग असूंच शकत नाहीं. ह्याच दृष्टीने

ईश्वरकल्पना कितीहि अवास्तव असली तरी ती जीवनभूमींतूनच निपजलेली ! म्हणून सत्यशोधकाने भूतकालांतल्या ग्रंथपरीक्षणापेक्षां जीवनपरीक्षणाकडे अधिक लक्ष पुरवलें पाहिजे. भूतकालांत माणूस कसा जगला तें अभ्यासून पाहिलें पाहिजे.

प्रथम मातृसत्ताक व मग पितृसत्ताक कुटुंबपद्धति निर्माण झाल्या. महामाता व महापितर ह्यांच्या सत्तेंतून जुलूमाचा उदय झाला. कृषिउत्पादनावर आधारलेल्या कृषक संस्कृतींत धान्य संग्रह शक्य झाला. वेगवेवळीं मोठमोठालीं एकत्र कुटुंबें बनूं लागलीं. नायकवर्ग तयार झाला व तो अतिरिक्त उत्पादनावर ऐश्वर्यानें राहूं लागला. अशा परिस्थितींत ऐश्वर्यसंपन्न शास्त्या ईश्वरांच्या कल्पनेची एक पुसट रेषा निर्माण झाली. कारण ईश्वर ह्या शब्दाचीं उत्पत्ति ऐश्वर्याच्या, धनाच्या कल्पनेतून झाली आहे. आमच्या राजा महाराजांना ' राजाधिराज परमेश्वर ' अशा पदव्या अजूनहि होत्या. जर्मन तत्ववेत्ता नित्शे याने ईश्वर शब्दाची फोड अशीच केलेली आहे (पहा. जिनिऑलॉजी ऑफ मॉरल–नित्शे)

प्रथम बरेच देव होते. कारण मानवसमाजांत बरेच नायक निर्माण झाले होते. मग जेव्हां अधिराज्य पद्धतींत एक चक्रवर्ती राजा बनला तेव्हां अर्थात त्याचा प्रतीक एक परमेश्वर बनला. प्रो. जॉर्ज थॉम्सन ' एस्किलस आणि अथेन्स ' ह्या आपल्या पुस्तकांत लिहितो, ' देवप्रमुखाची कल्पना एकछत्री राज्याच्या वस्तुस्थितीपासून निघालेली आहे. दुभंगलेल्या समाजाच्या मानवी जाणीवेमुळें राजा आणि परमेश्वर कल्पना ह्यामधील संबंध उलटा दृष्टोत्पत्तीस येतो. आणि राजावरून परमेश्वर कल्पना निघाली आहे असें वाटण्याऐवजीं परमेश्वर कल्पनेपासून राजसत्ता निघाली असें वाटतें ' (पहा–सोशॅलिझम एन्ड रिलीजीयन–ले.–ए. रॉबर्टसन)

एका बाजूला ऐश्वर्य तर दुसऱ्या बाजूला भयानक दरिद्रता अशा मानसिक परिस्थितीपासून ऐश्वर्यसंपन्न अशा एखाद्या मनकामना पुरी करणाऱ्याची कल्पना निघणे अशक्य नाहीं. प्रथम नैसर्गिक घडामोडीनांच देव मानण्याची प्रथा होती. जलदेवता, अग्निदेवता, वरुणदेवता वगैरे ह्या प्रथेचीं प्रत्यंतरें आहेत. आपल्या आणि निसर्गाच्या व्यवहारांत आपलें स्थान काय ह्याविषयक

अज्ञान हें नैसर्गिक कारण तर दरिद्री नसणारा जसा आपणाहून समर्थ आहे तसा सर्वांहून समर्थ कुणीतरी असावा हें सामाजिक कारण आहे. आतां आणि इथे ह्या जगांत मी समर्थ होऊं शकत नाहीं तर मग पुढे आणि दुसऱ्या जगांत मी समर्थ होईन ह्या आशेतून मरणोत्तर म्हणजे कालदृष्ट्या पलीकडे व आकाशांत म्हणजे स्थलदृष्ट्याही पलीकडे अशी ईश्वराची विश्वातीत कल्पना संभवली आहे.

निसर्गजीवन आणि समाजजीवन मिळून मनाच्या धाग्याची प्रत्येक वीण बनत असते. निसर्गाचा ताणा आणि सामाजिकतेचा बाणा मिळून मनाचें वस्त्र तयार होतें. मनाच्या नानाविध कल्पनांच्या जाळ्यांत डोकावून जर ईश्वरकल्पनेचे धागेदोरे विसकून पाहिले तर निसर्गाबरोबर चाललेल्या युद्धांत माणसाची हतबलता तसेंच सामाजिक संघटनेंत कांहींनीं आघाडी मारून बहुजनांना आणखीनच हतबल करणें ह्या गोष्टी दिसतील. चोहोबाजूंनी घेरल्या गेलेल्या जीवांच्या मानसपिंडाला, इथें नाहीं, आतां नाहीं, सभोवताली नाहीं, तर पल्याड आकाशांत, कुणातरी सर्व-समर्थ व्यक्तीचें अस्तित्व मानण्याची जरूरी भासणे शक्य झालें. नव्हे मानवी मनाने-जीवन-सफलतेचा कल्पनारम्य आणि सोपा असा तो प्रयत्न करून पाहिला आणि ईश्वरनिर्माण झाला.

मानवाचें हतबल आणि दिशाभूल मन नानारूपांनीं ईश्वरकल्पनेपासून बळ घेत आलें आहे. अगदी शेवटीं शेवटीं म्हणजे जवळ जवळ अखेरच्या दोन हजार वर्षांत ईश्वरकल्पनेचे तात्विक स्वरूपांत परिवर्तन होऊन त्याचें अध्यात्म बनण्याइतपत ही कल्पना शास्त्या वर्गाला आवश्यक वाटूं लागली हें स्पष्ट दिसतें व ही गरज भागविण्यासाठीं अध्यात्मवाद जन्माला आला. परन्तु हा अध्यात्मवाद-सुद्धां सगळ्याचा सगळा ठाम ईश्वराला मानणारा आहे असा प्रकार नाहीं. अध्यात्मवाद हा मूळांत अशास्त्रीय असला तरी त्याचाहि विकास होत गेलेला आहे. सतराव्या शतकांत होऊन गेलेला स्पिनोझा हा विख्यात अध्यात्मवादी तत्ववेत्ताहि ईश्वराला नाममात्रच मानणारा होता. कारण ईश्वर म्हणजे निसर्ग अशीच त्याची कल्पना दिसते.

हेगेलची ईश्वर मानण्याची तऱ्हाहि चमत्कारिकच आहे. खुद्द कान्ट ह्या तत्ववेत्त्याने तर अध्यात्मवादी विचारपद्धतीवर जबर हल्ला चढवला आहे. तो

परमेश्वर अनुक्रम ३४२६९ वि. १११
क्रमांक ९६२६ नों. दि.

म्हणतो ' अध्यात्म हें एक अलग आणि केवळ तर्कांचे तारे तोडणारें शास्त्र असून तें साऱ्या अनुभव–ज्ञानाविरुद्ध जातें. व केवळ कांहीं कल्पनांवर आधारून बुद्धीला गुलाम बनवतें. शास्त्राच्या पातळीवर येण्याचें भाग्य अजून त्याला लाभलें नाहीं. आतांपर्यन्त केवळ अंधारांतच तें चाचपडत आहे. आणि विशेष दुर्दैवाची गोष्ट ही की तें केवळ कल्पनांच्या अंधारातच चांचपडत आहे. '

ह्या विख्यात तत्ववेत्याने अध्यात्मवादी विचार पद्धति चुकीची ठरवली असली तरी ईश्वरकल्पनेच्या आहारी तो शेवटी गेलाच आहे. अशा उदाहरणावरून निष्कर्ष निघतो तो हाच कीं, कान्ट आणि गटे यासारख्या दिगंत बुद्धिवन्तांनासुद्धां स्ववर्गीय दृष्टिकोनांतून सुटतां आलेलें नाही. एवढे आमचे संत रामदास परन्तु उच्च जातीने नीच जातीला गुरु करूं नये, त्यामुळें वर्णाश्रमधर्माला बाध येतो असें त्यांना वाटेच ! वामन पंडितांचीहि तीच स्थिति !

वैष्णव धर्म अल्पांशानें कां होईना पण जनमार्गी होता हें खरें आहे. आत्मोद्धारापुरती जातिविषमता दूर करण्याचा प्रयत्न भागवत धर्मानें केला होता. ह्या दृष्टीनें गीतेचेंहि कांही पुरोगामी कार्य होतें. त्यामुळें संत बहिणाबाईचे कर्मठ वडील घरांत गीता वाचूं देत नसत. ' गीताशास्त्र वैरी कुळीं आम्हां ' असें त्या म्हणतात परन्तु गीताशास्त्राची तत्त्वमीमांसा मात्र दिशाभूल करणारी आहे.

गीतेंतील भगवान म्हणतो, ' मी शुद्ध, निर्गुण, मी निरवयव, मी निर्विकार, अचिंत्य आणि अनादी असा आहे. लोक आपणाला मानीत नाहींत, परन्तु लोकांनी आपणाला मानावें अशीच त्याची खटपट आहे. परन्तु ती सारी खटपट व्यर्थ आहे. कारण आपल्या म्हणून ज्या गुणांचें तो वर्णन करतो ते गुण अस्तित्वाला लागत नसून नास्तित्वालाच लागतात. कारण नास्तित्व हें नसण्याच्या गुणामुळें कितीहि कसेंहि, कुठेंहि, केव्हांहि, अफाट व बेफाट वर्णनाचा विषय होऊं शकतें. वस्तूंचें सकारात्मक वर्णन विशिष्ट असतें तर नकारात्मक वर्णन अनंत असूं शकतें. माझ्या खोलींत जें घड्याळ आहे त्याचें वर्णन करतांना कांहीं विशिष्ट मर्यादा पडतीलच. कमीतकमी अस्तित्वाच्या ज्या मर्यादा आहेत त्या तरी पडतील कीं नाहीं ? परन्तु माझ्या खोलींत जें घड्याळ नाहींच त्याचें

वर्णन अर्थातच अनंत होऊं शकेल. तुम्ही कांहींहीं अर्थशून्य बडबडा अनंताला तें लागू होईलच होईल.

ईश्वर अचिंत्य आहे ह्याचा अर्थ तो फक्त चिंत्यच असून आणखीन कांहीं नाहीं असा आहे. म्हणजे ईश्वरावर ज्या अस्तिपक्षी गुणांचा आरोप आम्ही करतों ते फक्त आमच्या मनांतील पूर्णतेचें जें स्वप्न त्या स्वप्नांतील आहेत. म्हणजे ईश्वर फक्त मनाचा विषय आहे. मनापलीकडे त्याला अस्तित्व नांहीं- मला ऑलिंपिक गोल्डमेडल मिळालें असें मी चिंतू शकतों परन्तु तें माझ्या बाबतींत फक्त चिंत्यच. माझ्या चिंतनाबाहेर त्याला बिलकूल अस्तित्व नाहीं. त्याचप्रमाणें ईश्वर फक्त चिंत्यच. वास्तवांत त्याला अस्तित्व नाहीं. परन्तु शब्दार्थानें अचिंत्य शब्द घेतल्यास त्याचा अर्थ विपरीत होतो. व त्यानुसार जें चिंततांसुद्धां येत नाहीं असें तुम्हींच म्हणतां तें तुम्हांला तरी कसें चिंततां आलें हा प्रश्न उभा राहतो व अचिंत्याचें चिंतन कोणी कसें करावयत्चें व कां करावयाचें तेंहि सांगणें कठीण जातें.

‘ अचिन्त्याः खलु ये भावा न तांस्तर्केण साधयेत
प्रकृतिभ्यः परं यत्तु तद चिन्त्यस्य लक्षणम् ’

--वेदान्तसूत्र--

अर्थः–‘इंद्रियातीत असल्यामुळें ज्या पदार्थाचें चिंतन करणें अशक्य त्याचा निर्णय केवळ तर्कानें किंवा अनुमानानेच करूं नये, सर्व सृष्टीच्या मूळ प्रकृतीच्या पलीकडला जो पदार्थ तो याप्रमाणें अचिंत्य होय ’

इंद्रियज्ञानाच्या पलीकडे ईश्वर असल्यामुळें त्याला कोणी पाहिलें असणें शक्यच नाहीं. बरें केवळ तर्कानें तो सिद्ध करूं म्हटलें तरी त्यांत धोका आहे हें वेदान्तसूत्रालाहि मान्य आहे. कारण कधींतरी व कसातरी शेवटीं प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इंद्रियज्ञानाद्वारेंच तो तर्क तपासून घेणें जरूर असतें. कारण इंद्रियज्ञान हेंच आमच्या तर्कज्ञानाचेंहि मूळ आहे. इंद्रियज्ञानाशीं किंवा व्यवहाराशीं निबद्ध नसलेला तर्क कोरी तर्कबाजीच राहील. तेव्हां अशा परिस्थितीत ईश्वर सिद्ध होत नाहीं असेंच प्रामाणिकपणाने कुणीहि सांगितलें असतें. परंतु शेवटचा एक

आधार घ्यायचें सूत्रकाराने ठरवलें. बरें, तो आधार कोणता ? तर ईश्वर मनुष्य चिंतनाच्याच पलीकडे आहे असें जाहीर करावयाचें. मग तो आहे असे तरी कां म्हणा ? एका मार्मिक तत्वचिंतकाने ह्या व्यापाराचें पुढीलप्रमाणें मोठ्या खुबीदार शब्दांत वर्णन केलें आहे. तो म्हणतो, 'ईश्वरवाद्यांचा ईश्वरशोध म्हणजे काळ्याकुभिन्न खोलींत आंधळ्यानें काळें मांजर जें तिथें नाहीं तें शोधण्याचा प्रयत्न होय.'

जें तुम्हाला समजत नाहीं, जें मानवाला चिंतता येत नाहीं असें तुम्ही कबूल करतां, तें सरळ नाहीं म्हणा कीं, **परंतु मार्क्सवाद्याला सूत्रकाराची आपत्ति समजूं शकते. ईश्वर कल्पनेविना शोषक वर्ग जगूं शकत नाहीं ही ती आपत्ति होय. व जसा शोषक वर्ग तगूं शकत नाहीं तसा शोषण-संस्कृतींत अडकलेला शोषितहि ईश्वर कल्पनेच्या आधाराशिवाय नीट उभा राहून दारूण संसारताप निभाऊं शकत नाहीं. संपूर्ण लिखित इतिहासकालांतील वैचारिक जीवनाच्या आकलनाचा हा मार्गदर्शक सिद्धांत आहे.**

वरील वेदान्तसूत्रांत तर्कावर आघात आहे. तर्कावर तसा आम्हीहि आघात करतों पण तो अनुभवशून्य कोऱ्या तर्कावर व तोही घवघवीत टवटवीत अस्तित्वाच्या बाजूने. पण हा आघात आहे नास्तित्वाच्या बाजूने, कल्पिताच्या बाजूने. आधुनिक कालांतहि तर्कावर जबरदस्त आघात होत आहेत. सृजनशील उत्क्रांतीचा (क्रिएटिव्ह इव्होल्युशन) जनक प्रख्यात फ्रेंच तत्ववेत्ता बर्गसाँ यानेहि तर्कावर जबरदस्त आघात हाणला आहे. पण तत्वज्ञान मिथ्या आहे हें ठरवायचें कुणी ? तर तत्वज्ञानानेंच ! तर्क मिथ्या आहे हें ठरवायचे कुणी ? तर तर्कानेंच ! आमचें म्हणणे असें की तर्काचा जिथें वास्तवाशीं मेळ जुळत नाहीं तिथे आम्ही वास्तवाबरोबर राहावे कारण वास्तवता ही तर्काची जननी. तर्कांतून वास्तवता जन्माला येत नाहीं. वास्तवांतून तर्क जन्माला येतो. वास्तवाबाबतची कसोटी सामाजिक शास्त्रशुद्ध व्यवहार ही आहे. हा प्रत्यक्ष व्यवहाराबाहेरच्या गोष्टी आम्ही कधी कधीं जमेस धरतों. परंतु त्या सिद्धांत कल्पना (हाइपॉथिसिस) म्हणून. म्हणजे त्या सिद्धांतकल्पना जमेस न धरतां कांहीं अडत असेल व धरतां कांहीं सुटत असेल तर. परंतु ईश्वरकल्पनेचें तथ्य मानून आजवर एकहि प्रश्न

सुटलेला नाहीं. उलट हें मिथ्यातत्व सोडूनच कितीतरी प्रश्न सुटूं शकतात व धरून कितीतरी प्रश्न बिकट होऊन बसतात. ह्या कल्पनेचें मिथ्यात्व मानून मानवतेचें अभूतपूर्व कल्याण साधलें जात आहे ह्याचें सोवियत रशिया हें जिवंत टवटवीत उदाहरण आमच्यासमोर आहेच.

अर्थात वेदान्त सूत्रकाराचें मन्तव्य जर का असें असेल कीं ईश्वर हा तर्कानें सिद्ध होत नसून काहीं विशाल दृष्टीच्या, सखोल ज्ञानाच्या, व हिमालयीन श्रद्धेच्या महात्म्यानांच त्याचा साक्षात्कार होऊ शकतो तर आमचें त्याला असें उत्तर आहे कीं हे साक्षात्कारी महाजन आणि त्यांची ईश्वरकल्पना व साक्षात्कार हें सारें वैयक्तिक असून तें शास्त्रांत बसत नाहीं. शिवाय साक्षात्कारी महात्मे जेवढे विशाल दृष्टीचे, सखोल मनाचे व पर्वतप्राय श्रध्देचे असूं शकतात तेवढेच सखोल मनाचे, विशाल दृष्टीचे व ज्ञानविज्ञानावर पर्वतप्राय श्रध्दा असणारे अनेक श्रेष्ठ प्रज्ञावंत लोक ईश्वर मानावयाला बिलकूल तयार नाहींत हेंहि विसरतां कामा नये. उलट सृष्टीचा कर्ता ईश्वर मानणें हें ध्वस्त प्रज्ञेचें लक्षणहि समजलें गेलें आहे. प्रख्यात भारतीय तत्ववेत्ता धर्मकीर्ति जड बुद्धीची पुढील पांच लक्षणें सांगतोः ' वेदप्रामाण्यं, कस्यचित्कर्तृवादः स्नाने धर्मेच्छा, जातिवादाव लेपः। संतापारंभः पापहाना चेति **ध्वस्त प्रज्ञानां** पंचलिंगानि जाडये॥ अर्थः 'वेद प्रामाण्य' सृष्टि कर्ता ईश्वर मानणे, स्नानाला धर्मकर्म मानणे, जातीयवाद मानणे, पापनिवारणाकरतां उपास तापास करणें ही पांच मूर्खपणाचीं लक्षणें आहेत.' तेव्हां या परिस्थितींत खरें कुणाचें मानावयाचें व कुणाचे नाहीं ?

कांहीं पूर्वग्रहदूषित सज्जनांच्या आत्मप्रतितीची मातब्बरी अधिक, की शास्त्रशुद्ध ज्ञानाची थोरवी अधिक ? बरें साक्षात्कारी लोकांच्या वर्णनांत तरी एकवाक्याता असावी पण तेंहि नाहीं. परस्परविरुद्ध वर्णनेंही थोडीथोडकी नाहींत. इतर धर्माचार्यांचें सोडाच पण खुद्द भारतीय धर्माचार्यच काय म्हणतात पहा— वेदा विभिन्नाः स्मृतयोविभिन्नाः नैकोमुनिर्यस्य वचःप्रमाणम् श्रुतिस्मृतीमध्यें, ऋषि-लोकांमध्यें कुठें आहे एकवाक्यता ?

आमचे श्रेष्ठ बुध्दिवादी विचारवंत आगरकर लिहितात. " आपल्या

लोकांत कांहीं प्रकृतीच्या मनुष्यास धोतरा चारल्याने किंवा उद घातल्याने अतिंद्रियज्ञान प्राप्त होऊन भूत भविष्य बिनचूक सांगता येतें असा मूर्खपणाचा समज आहे. देवऋषी, पंचाक्षरी वगैरे लबाड लोकांचा धंदा यथास्थित चालण्यास व नरसोबाची वाडी, औदुंबर वगैरे क्षेत्रांचें महात्म्य इतकें वाढण्यास हाच मूर्खपणाचा समज कारण झाला आहे." (पहा–निबंध संग्रह भाग १)

आमचे वामन मल्हार जोशी आपल्या 'नीतिशास्त्र प्रवेश' ह्या पुस्तकांत म्हणतात "ईश्वराचें अस्तित्व तर्कानें सिद्ध करतां यावयाचें नाहीं. खरी स्थिति अशी आहे कीं ईश्वर असावा असें आपणांस वाटत असतें. म्हणून ईश्वर आहे असें सिद्ध करून दाखविणारे सदोष देखील युक्तिवाद बऱ्याच लोकांना पटतात." (पहा-नीतिशास्त्र प्रवेश. पान ३८)

परंतु लोकाना ईश्वर असावा असें तरी का वाटावें तें वामनराव सांगूं शकले नाहींत म्हणूनच ते अज्ञेयवादी राहिले. प्रख्यात फ्रेंच लेखक व्होल्तेर म्हणतो 'ईश्वर नाहीं हें जाणणाऱ्यालाहि पन्नास शेतकऱ्यांस जबरींत ठेवायचें असेल तर नसणारा ईश्वर पुन्हा निर्माण करावा लागेल' वर्गीय संस्कृतींतल्या तत्वमीमांसेची ही कळ आहे. श्रमणारा शोषित म्हणून श्रांत अनाथ व त्यामुळें ईश्वरकल्पना त्याचा जीवनाधार बनते, तर दुसऱ्यांच्या श्रमांवर चैन करणाऱ्या शोषकाला स्वतः दुःखी कष्टी समाजाचा घटक म्हणून व शोषण कायम टिकवायला सुद्धां ईश्वराचाच मुख्य आधार घ्यावा लागतो. **म्हणूनच परमेश्वरकल्पना ही अशा ह्या वर्गीय पतित समाजाची फलनिष्पत्ति असा आमचा सिद्धांत.**

आत्यंतिक व्यक्तिवादामुळें वर्गीय समाजाचें कृतिसामर्थ्य फारच मर्यादित झालेलें असतें. व ज्या समाजाचें कृतिसामर्थ्य अत्यल्प असतें त्या समाजाचें कल्पनासामर्थ्य अचाट असणें शक्य असतें. शोषित दुर्बल समाजाचीं स्वप्नें अतिबफाट असूं शकतात. माणसाचें अमृतत्वाचें स्वप्नहि असेंच एक अचाट स्वप्न आहे. परंतु कार्ल मार्क्स यानें म्हटल्याप्रमाणे मानवप्राणी आपल्या स्वप्नांनासुद्धां आज ना उद्यां साकार बनविल्याशिवाय रहाणार नाहीं हेंहि तितकेंच खरें आहे. शास्त्रीय समाजवाद हें आज मानवाच्या स्वप्नांना साकार बनवण्याचें साधन

बनलें आहे. खुद्द मार्क्सवाद हें इतर तत्वज्ञानांप्रमाणे केवळ एक तत्वज्ञान नसून आतांपर्यंतच्या साऱ्या तत्वज्ञानांची ती परिपूर्ती आहे. आतांपर्यंतच्या तत्वज्ञानांनी वेगवेगळया तऱ्हांनीं जीवनाचा अर्थ सांगितला आहे. परंतु मार्क्सवादाला तो अर्थ जीवनांत आणावयाचा आहे. त्याला जीवन बदलावयाचें आहे. इतकेंच नव्हे तर मानवाचें अमृतत्वाचें दुर्लभ स्वप्नहि एका वेगळ्या तऱ्हेनें मानवाच्या पुरुषार्थ क्षेत्रांत आणावयाचें आहे.

अमृतत्वाची ओढ ही पारमार्थिक असावी. असें सकृद्दर्शनी वाटतें. जें जे ह्या जगांत आहे ते क्षणिक आहे. 'यत् सत् तत् क्षणिकं' शाश्वत चिरतन असें या जगांत कांहींच नाहीं. सारें क्षणभंगुर. त्यामुळें मनुष्यप्राणी विव्हळतो. हळहळतो. व रामदासांनीं म्हटल्याप्रमाणें 'सुख नाहीं कदा शाश्वतावांचूनी' अशा स्थितींत तो निरंतर परमार्थाच्या, शाश्वताच्या, अमृताच्या नादीं लागतो असें घटकांभर वाटणें साहजिक आहे. परंतु वरील कल्पना चित्र वरवर दिसतें तसें नाहीं. प्रपंचतापाचा, सांसारिक भवभय बाधेचा व जीवनसौख्याच्या आंतरिक ओढीचा सूक्ष्म विचार केल्यास शाश्वताची ही ओढ नैसर्गिक नसून कृत्रिम आहे असें आढळून येतें. माणसांचे संसार-सुखाप्रित्यर्थ होणारे ऐहिक प्रयत्न जेव्हां शोषणमय वास्तवतेच्या खडकावर आदळून चक्काचूर होतात तेव्हांच माणसें किंवा त्यांचे विचार परावर्तित किरणांप्रमाणे मार्गच्युत होऊन उलट्या चालीने चालूं लागतात. ही उलटी चाल म्हणजेच आकाश पुष्पासमान असणाऱ्या शाश्वताच्या मागें लागणे होय. शिवाय चिरशाश्वत म्हणून जें काय हे लोक आळवत बसले आहेत तें कृत्रिम तर आहेच पण त्याचबरोबर तें जीवनाचा मार्ग बंदिस्त करणारें व कंटाळवाणेंही आहे हें हे लोक विसरतात.

रास्त ऐहिक सुखाच्या आड येणारा दुःखी वास्तवतेचा पर्वत मानव संघटन जर दूर करूं शकलें तर केवळ चिंतनाने अमृतत्व प्राप्त करून घेण्याचें आड स्वप्न माणसाला बिलकूल रूचेनासें होईल. व आजहि प्रत्यक्ष व्यवहारात कितीशा परमार्थ बहाद्दराना तें रूचतें हा प्रश्नच आहे !

वास्तव जगांत माणूस जर कर्मसाफल्याचा धनी झाला तर तो वस्तूंच्या व प्रक्रियांच्या क्षणभंगुरत्वाचा किंवा परिवर्तनशीलतेचाहि स्वामी बनून अमृतत्वाचा शाश्वत भोक्ता बनू शकेल. नव्हे-तेंच त्याचें प्रेयस व श्रेयस आहे. **माणसाला**

**हवी असणारी शाश्वति म्हणजे सुखाची शाश्वति होय. ही शाश्वति केवळ वस्तूंच्या किंवा प्रक्रियांच्या परिवर्तनशीलतेमुळें किंवा अशाश्वतीमुळें नाहींशी होत नसून वस्तूशीं किंवा प्रक्रियांशीं माणसांचा जो कर्मात्मक संबंध येतो त्या कर्माच्या असफलतेमुळें ती नाहीशी होते.** वस्तूंच्या किंवा माणसांच्या बदलण्याने माणसाचें सुख व त्याची शाश्वति नाहींशीं होतें हें चुकीचें सुखशास्त्र आहे. मानवाची संघटित बुद्धि व सामुदायिक सामर्थ्य ह्यांच्या जोरावर वस्तूंच्या व स्वतःच्या परिवर्तनशीलतेचा वेध घेऊन त्या परिवर्तनशीलतेवर मानव विजय मिळवूं शकतो. इतकेंच नव्हे तर उलट परिवर्तनशीलतेमुळेंच सुख वृद्धिंगत होऊं शकतें. सुख नाहींसे होतें तें कर्माच्या असफलतेने,-वस्तूंच्या क्षणभंगूरतेनें किंवा चंचलतेनें नव्हे वस्तूंच्या क्षणाक्षणाला बदलणाऱ्या स्वरूपानें कर्में असफल होतातच असेंहि नव्हे. जगत्‌वस्तु सतत परिवर्तनशील असूनहि कर्मसाफल्य शक्य आहे.

जगाचें मार्क्सवादी आकलनच अशा प्रकारचें आहे कीं त्या आकलनाने व तदनुसारी कृतीनें मानवाचें कर्मसाफल्य निश्चित होऊन वाढत जातें व माणसाची अनासक्त कर्मावरचीच आस्था व श्रद्धा वाढते असें नव्हे, तर पूर्णासक्त कर्मयोगावरची आस्था व श्रद्धा सहस्र पटीने वाढत जाते. **कर्मफळावरची अशी पूर्ण श्रद्धा हेचि जीवनाच्या अमृतत्वाची गुरुकिल्ली होय.**

जीवनांत पदोपदीं असफल ठरणारी कर्मश्रद्धा किंवा कर्मसाफल्यश्रद्धा व मृत्युबाबतची चुकीची जाणीव ह्या गोष्टींमुळें अमृतत्वाची तृष्णा मानवांत जागृत झाली व पुढें मालमत्ताप्रधान संस्कृतीच्या विकासाबरोबर ह्या कल्पनेला भरपूर खतपाणी मिळून ती बरीच शाखारली व सहस्रदलांनी विस्तारत गेली.

आत्यंतिक व्यक्तिवाद हा मालमत्ताप्रधान संस्कृतीचा गाभा. मालमत्ताप्रधान संस्कृतीने निर्माण केलेली जीवनमूल्यें समाजद्रोही व परिणामीं घोर मानवद्रोही ठरलेली आहेत. ह्या संस्कृतीत मानवाचा व्यक्तिगंड विकृत मर्यादेपर्यंत पोहोंचून त्यातून वंशपरंपरा, वारसाहक्क वगैरे अनर्थकारक कल्पना उद्‌भवल्या.

ह्या संस्कृतिकालांतील सारीं जीवनमूल्यें मृत्यूची भीति किंवा मृत्यूच्या दडपणाच्या वातावरणांत तयार झाली आहेत.

वास्तविक, व्यक्तिजीवन स्वतःच्या प्रत्यक्ष मृत्यूला कधींहि पाहूं शकत नाहीं- मरण जीवनाला प्रत्यक्ष स्पर्श करूं धजत नाहीं. **ज्या रेषेवर मृत्यु उभा असतो त्या रेषेवर जीवन संपत असल्यामुळें जीवन आणि मरण ह्यांची दृष्टादृष्ट कधींहि होऊं शकत नाहीं. ह्या दृष्टीनें जीवनाला मरण असें नाहींच मुळीं असें म्हटलें तरी चालेल.** मृत व्यक्तीचें मरण भोंवतालच्या प्रियजनांना विरहाच्या रूपानें किंवा आर्थिक परावलंबनाच्या रूपानें व समाजाला कर्तृत्वाभावाच्या रूपानें जरूर छळूं शकतें. परन्तु मरणाऱ्याला मरणाचें प्रत्यक्ष भय असण्याचें मुळींच कारण नाहीं. जीवन कालांत मृत व्यक्ति जर निर्भय, पुरुषार्थी व सुखी समाजाचा लायक घटक असेल तर ती नेहमींच अमृत राहील. अमृताप्रमाणें वागेल व अपार सुख भोगूं शकेल. तिचें जीवन खरेंखुरें अमर जीवन असेल. अशा समृद्ध समाजांत केवळ उदरंभरणाकरतां मृत व्यक्तीचे प्रियजन तिच्यावर अवलंबून असण्याचा प्रश्नच उरलेला नसतो. उदरंभरणाची विवंचना, शिक्षण, पालन वगैरेची 'व्यवस्था हा प्रश्न चिंतेचा प्रश्न उरत नसून तो श्रमाचा व समाजवादी उत्पादनाच्या विकासाबरोबर' प्रत्येकाला कमीत कमी श्रम व अधिकात अधिक सुख व शाश्वति देणारा प्रश्न बनतो. अशा प्रकारें माणसाला याच देहीं याच डोळां अमृतत्व उपभोगावयाला मिळाल्यानंतर मृत्यु म्हणजे काय तें त्या व्यक्तीला समजणेंच शक्य नसतें.

भाग्यशाली पुरुषार्थी जीवनाला मृत्यु कस्पटासमान असतो, हें गतेतिहासांतील वीर व्यक्तींच्या भव्योन्नत जीवनचरित्रानें सिद्ध केलें आहे. मृत्यूचें भय, कीर्तीची लालसा, आपल्या भव्यतेसमोर इतरांचे लोटांगण, आपण अद्वितीय व्हावें ही आकांक्षा वगैरे गोष्टी भविष्यावर वर्तमानाचा व वर्तमानावर भूतकालाचा ताबा दृढ करणाऱ्या गोष्टी असून ह्या साऱ्या भावना व विचार मृत्यूच्या सावटांत वाढलेल्या संस्कृतीचीं लक्षणें आहेत.

मार्क्सवादी विचारसरणी जो नवा माणूस घडवीत चालली आहे तो माणूस मृत्यूचें सावट व तज्जन्य भावनाकोष ह्यापासून दूर जात आहे. रानटी

कालांतील व नंतर शोषणकालांतील सुधारलेल्या व्यक्तीला सुद्धां मृत्यु खरोखर काय आहे तें प्राकृतिक व सामाजिक दृष्ट्याहि ठाऊक असणें शक्य नव्हतें. काय झालें म्हणजे माणूस नक्की मेला असें समजावें किंवा मृत्युप्रक्रिया काय आहे हें अजूनहि फारच थोड्या माणसांना ठाऊक असेल. माणूस श्वास घेईनासा झाला म्हणजे सर्वसाधारण तो मेला असें अजूनहि आपण मानतों. फारच तर आपण जरा हृदयाची गति पाहूं; डोळे, श्वास वगैरे पाहूं. अशा मृत्यूला डॉक्टरी मृत्यु ( क्लिनिकल डेथ ) म्हणतात. पूर्वी ह्या मृत्यूलाच अंतिम मृत्यु समजत असत. श्वास जाणें हें मृत्यूचें कारण समजन श्वास किंवा प्राण म्हणजे कांहींतरी गूढशक्ति समजून ज्या क्षणीं तो माणसाला सोडून गेला त्या क्षणी माणूस मेला, म्हणून त्या विद्युतमय गूढ-शक्तीलाच ' प्राण ' किंवा आत्मा असेंहि समजण्यांत आलें. संस्कृतमध्येंहि आत्मा ह्या शब्दाचा संबंध श्वास घेण्याशीं आहे. जर्मन भाषेंतहि त्याचा संबंध श्वासाशींच आहे. ज्या मूळ लॅटिन शब्दावरून आत्म्याचा इंग्रजी प्रतिशब्द ' स्पिरिट ' आला आहे तो ' स्पिरितुम ' शब्दहि ' स्पिरारे ' ( श्वास घेणें ) ह्या लॅटिन क्रियेवरून आला आहे. इन्सपिरार, एक्सपिरारे, रेसपिरारे वगैरे सारे शब्द श्वासाशींच संबंधित आहेत. फ्रेंच भाषेंतील ' आम ' व पोर्तुगीज भाषेंतील ' आल्मा ' हे आत्मावाचक शब्दहि ' ॲनिमा ' ह्या दुसऱ्या शब्दावरून आले आहेत. ' ॲनिमल ' ह्या इंग्रजी शब्दाची व्युत्पत्ति तीच आहे. ' अनिमा ' ह्या शब्दाचा अर्थ श्वास असाच आहे. ' प्राण ' ह्या आपल्या संस्कृत शब्दाशीं तो अधिक जुळतो. इतर भाषा जाणणारे पंडित वेगवेगळ्या शब्दसिद्धीवरून आत्मा शब्दाच्या आशयसिद्धीवर प्रकाश पाडूं शकतील. परतु ह्या पद्धतीच्या कांहीं स्वतःसिद्ध मर्यादा आहेतच. तौलनिक भाषाशास्त्राचा उपयोग पूर्वग्रहाने प्रेरित होऊन केल्यास अनर्थकारक निष्कर्ष निघतात हेंहि विसरतां कामा नये. परंतु भूस्तरशास्त्र, मानववंशशास्त्र, सृष्टिशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र व सर्व शास्त्रांची जननी–आमचा जिवंत सामुदायिक व्यवहार जर कोणती एकच गोष्ट निक्षून सिद्ध करीत असेल तर ती ही, कीं ह्या जगांत ईश्वर कल्पना असली तरी ईश्वर नाहीं.

कांहीं लोक असें म्हणतात कीं ईश्वर तुम्हाला दिसत नाहीं म्हणून तुम्ही

नाहीं म्हणतां. पण कितीतरी न दिसणाऱ्या वस्तु अशा आहेत कीं त्या तुम्ही नाहीं म्हणूं शकणार नाहींत. उदाहरणार्थ, परमाणु. परमाणु कुणी पाहिला आहे काय ? परंतु तो आहे असें तुम्ही मानतां ना ? तसाच ईश्वर माना. तुमच्या डोक्यावर जर कुणी जखम केली तर तुम्हाला दुखतें. तें दुःख तुमच्या डोळ्याना दिसतें काय ? नाहीं ना ? मग ईश्वरहि अगदीं तसाच आहे. तो दिसत नाहीं. पण आहे. वगैरे वगैरे.

आतां प्रथम परमाणूंची गोष्ट घेऊं या. आज आम्ही परमाणुयुगांत वावरतों आहोंत परंतु हा परमाणु कुणीहि पाहिलेला नाहीं. तो एवढा लहान आहे कीं पाण्याच्या एका थेंबांत तेहतीसशें ह्या संख्येवर अठरा शून्यें लिहिलीं असतांना जेवढी संख्या होते तेवढे परमाणु आहेत. म्हणजे दर सेकंदाला एक याप्रमाणें जर तुम्ही रात्रंदिवस हे परमाणु मोजत बसलांत तर ते मोजण्यास तुम्हाला युगानयुगें लागतील.

परमाणु कोणत्याहि यंत्रानें अजून पाहातां आलेला नाहीं हें सारें खरें आहे. परन्तु आम्ही जेव्हां वस्तूंचें किंवा वस्तु-प्रक्रियांचें अस्तित्व मानतों तेव्हां फक्त इंद्रियानेंच प्राप्त होणारें त्याचें प्रत्यक्ष प्रमाण मानतों असें नव्हे, तर त्या वस्तूचें अस्तित्व तिच्या गुण, प्रभाव, परिणाम, कार्य वगैरे गोष्टींवरून ठरवायलाहि आम्ही कबूल असतों. परन्तु हे गुण, प्रभाव, परिणाम व कार्य अंतीं आमच्या इंद्रियांतर्फेंच आम्ही पाहाणार किंवा ऐकणार. अमेरिका माझ्या इंद्रियांनीं प्रत्यक्ष पाहिलेली नाहीं परन्तु कुणीतरी ती स्वतःच्या इंद्रियांनींच प्रत्यक्ष पाहिलेली आहे हें निश्चित व ज्या परिस्थितींत तो अमेरिका पाहूं शकला त्या परिस्थितींत मीच नव्हे तर कोणीहि दुसरा इसम ती पाहूं शकेल ह्याची मला खात्री आहे व प्रत्येकाला ही खात्री आहे. तसेंच अमेरिकेच्या अस्तित्वाचे परिणाम आम्ही पाहूं शकतों. म्हणजे अस्तित्वाचा कुठला तरी गुण, परिणाम किंवा कार्य शेवटीं कुणाच्या तरी इंद्रियांनींच व तेंहि सर्वसाधारणपणेंच आकलन केलेलें व प्रत्येकाला त्या साधारण परिस्थितींत तें आकलन होणारें असलें पाहिजे. परंतु ईश्वर केवळ डोळ्यांनीं दिसत नाहीं एवढेंच नव्हे तर त्याचा गुण, परिणाम, कार्य, कशानेंच जाणवत नाहीं. बुद्धीने तर नाहींच नाहीं.

म्हणून तर ईश्वरवाद्यांची नेहमी तिरपिट उडत आली आहे. म्हणून 'नायमात्मा प्रवचनेन लभ्यः न मेधाया' ( अर्थात दफ्तरींप्रमाणें मेधाचा अर्थ बुद्धि नसून यज्ञ असा जरी धरला तरी त्याचा चुकीचा अर्थ लावणाऱ्या अनेक प्रज्ञावंतांना तर ईश्वर बुद्धीने समजण्यासारखा नाहीं असें वाटलेंच ना ? ) म्हणजे ईश्वर बुद्धीचा विषय नाहीं, असें तें आधींच सांगत सुटतात. म्हणजे मग पंचाईत नको.

ईश्वरवाद्यांचा दुसरा जो युक्तिवाद आहे तो अमूर्त अस्तित्वाबद्दलचा. डोक्याला लागलें तर दुखतें. पण तें दिसतें का ? नाहीं. तसेंच ईश्वराचें अमूर्त अस्तित्व आहे. तो दिसत नाहीं पण असतो. हा युक्तिवाद अगदींच अजागळ आहे. कारण अमूर्त अस्तित्वाला वस्तुत्व नसून तें परिणाम किंवा कार्यरूपानेच फक्त असतें. परंतु अमूर्त अस्तित्वाचा परिणाम, कार्य, भासतें, दिसतें व तेंहि एखाद्या भाग्यवानालाच दिसतें असें नाहीं तर तें सर्वांना, बऱ्या वाईटांना, पुण्यवान व पातक्यांना, सानथोरांना दिसत, भासत असतें व त्याच्या अस्तित्वाविषयीं बुद्धि बिलकूल साशंक असत नाहीं. एकदां कां तें अमूर्त अस्तित्व बुद्धीच्या आवाक्यांत आलें कीं सारे तें एकमुखाने मान्य करतात. दुःखाचा आवेग सहन करण्याकरतां लागणारी सहनशक्ति, प्रतिक्रिया वगैरे प्रत्येकाच्या वेगवेगळ्या असूनहि दुःखाची वास्तवता सर्वसाधारण मान्य आहे. परंतु ईश्वराच्या बाबतींत मामला बिलकूल उलटा आहे. ईश्वराचें अस्तित्व किंवा त्या अस्तित्वाचे गुण, परिणाम, प्रभाव, कार्य आमचे कान, डोळे, स्पर्श वगैरे इंद्रियांवर तर संस्कार करूं शकत नाहीं-, परंतु मनाला, चित्ताला, बुद्धीला व अंतरात्म्यालाहि बिलकूल भासत नाही. ईश्वराच्या बाबतींत जर बिलकूल कशाचा पत्ता नसेल तर तो त्याच्या गुणाचा परिणामाचा-प्रभावाचा-कार्याचा. आणि ह्या सर्व समूळ अभावामुळें ईश्वर नाहीं असें आम्ही म्हणतों. केवळ इंद्रियवाद ही गोष्ट तत्वज्ञानाच्या इतिहासांतून किंवा मंवित्तिशास्त्रांतून ( ग्नोजिऑलॉजी ) केव्हांच बाद झालेली आहे. मार्क्सवादी भौतिकवाद किंवा गत्यात्मक भौतिकवाद हा चार्वाकवादाहून किंवा यांत्रिक जडवादाहून कसा निराळा आहे हें आमचे प्रामाणिक विरोधक जर समजून घेतील तर त्यांचें आणि आमचें सर्वांचेंच त्यांत हित होईल.

वरील दोन युक्तिवाद इथें तपासण्याचें कारण हें कीं असले युक्तिवाद नामवंत तत्वज्ञहि मांडायला पुढें सरसावतात. असले शेंकडों युक्तिवाद ईश्वरवाद्याच्या संग्रहीं सदैव हजर असतात; तथापि केवळ नमुन्यादाखल म्हणूनच वरील दोन युक्तिवादांची दखल आम्ही घेतली आहे.

ईश्वराबाबतच्या पक्क्या मुरलेल्या संस्कारांमुळें व पूर्वग्रहदोषांमुळें हे असले ढोबळ युक्तिवाद पुढें येतात. येनकेन प्रकारेण ईश्वर सिद्ध करण्याच्या इरेला पेटूनच सूज्ञ ईश्वरवादीसुद्धां कधीं कधीं निकस बौद्धिक साधनांचा वापर करीत असतात. परन्तु आम्हांला हें माहीत आहे कीं परिस्थितीमुळें जगाचें तथ्यच जेव्हां मिथ्यारूप ठरलें तेव्हां ह्या मिथ्या किंवा सारहीन जगात बाहेरून कल्पित तथ्य किंवा सार भरावें लागलें कारण तथ्य हेंच जीवनाचें प्रेरक तत्व आहे. भौतिक गतिमत्ता जेव्हां जीवनाच्या पातळीवर येते तेव्हां ती तथ्यानुसारी प्रेरणा बनूनच कार्य करूं शकते व वास्तव जीवनतथ्य मिथ्यारूप ठरल्यास ती प्रेरणा कल्पित तथ्याच्या मागें लागते. जीवनाच्या गतिमत्तेचाच स्वभाव आहे तो. ही तथ्यानुसारिणी गतिमान प्रेरणा वास्तवांत ओळखून त्यांतुन समाजसाधनाद्वारें सुखनिष्पत्ति निर्माण करणें हा तत्वज्ञानाचा हेतु असला पाहिजे. हा हेतु स्पष्टपणें न धरल्यामुळें कुठलें तरी खोटें कल्पित तथ्य ( ईश्वर, ब्रह्म वगैरे ) ह्या जगाच्या आधारस्थानीं कल्पिणे अशास्त्रीय तत्वज्ञानाला जरूर पडलें. अर्थात् हें तथ्य ( ईश्वर ) परकी आहे ह्याचा अंदाज आमच्या कांहीं पूर्वाचार्यांनाहि थोडाबहुत लागला होता.

हिंदु आचार्यांचे आचार्य जे आद्य शंकराचार्य त्यांनीं सुद्धां शेवटीं आपला कौल ह्या कल्पित तथ्याविरुद्ध दिलेला आहे. ‘ निरीश्वरोहं निरहंच निर्ममः ’ ( मी निरीश्वर आहे कारण मी निरहंकार व निर्भय बनलों आहे ) ते आणखी पुढें जाऊन सांगतात कीं प्रयत्नशील असा जो माझा अंतरात्मा त्याचीच मी उपासना करतों. ( तस्मै यतते नमो नमो मह्यम )

महाराष्ट्रांतल्या अर्वाचीन महर्षींनीहि असेच उद्गार काढलेले आहेत. शंभर वर्षांपूर्वीं होऊन गेलेले महाराष्ट्राचे वैरागी संत विष्णुबुवा ब्रह्मचारी

म्हणतात, 'शंकराचार्य कांचेचा रस प्याले हें खोटें पण ते वेदान्तवर्गात प्रवीण असून पूर्ण साधु होते हें खरें. ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरी लिहिली हें खरें. रेड्याच्या तोंडून वेद वदवले हें खोटें. नानकाने करामती केल्या नाहींत, सुमार्ग दाखविला...तुकारामाने वह्या तरवल्या हें खोटें. पण तुकाराम हा मोठा सत्वधीर व वैराग्यशील साधु होता हें खरें.' ('विवेक-मंडन.' ले. प्रा. श्री. म. माटे)

बुद्धिवादी विचारवंत आगरकर लिहितात, 'जुन्या वेदान्तापलीकडे वेदान्त नाहीं; जुन्या गणितापुढें गणित नाहीं; जुन्या अलंकाराहून अलंकार नाहींत; जुन्या व्याकरणापुढें व्याकरण नाहीं; जुन्या न्यायापेक्षां दुसऱ्या न्यायांत अर्थ नाहीं असल्या भ्रमामुळें आमचे डोळे बांधल्यासारखे होऊन आज कित्येक शतकें तेल्याच्या बैलांप्रमाणें आम्ही जुन्या शास्त्रांच्या आणि पुराणांच्या घाण्याभोंवती घिरट्या घालीत आहों.'

ह्याच पुरोगामी विचारसरणींतून आमचे ज्ञानकोशकार डॉ. केतकर लिहितात, 'सामाजिक विचारांची मालिका तत्ववेत्त्यांनीं देशासमोर ठेवली व सामाजिक ध्येयें लोकांस कशीं बशीं जरी समजूं लागलीं तरी त्याचा एक महत्वाचा परिणाम होतो तो हा कीं, अदृष्ट व पारलौकिक कल्पनांमुळें मनुष्य बहकून जात नाहीं व अतींद्रिय द्रष्ट्यांचा सुकाळ जरासा कमी होतो.'

महाराष्ट्राचे महान कर्मयोगी महर्षि कर्वे तर स्पष्टच सांगून टाकतात, 'आत्मा आणि परमेश्वर ह्या केवळ कल्पना असाव्यात. प्राणी जन्माला येतां, तो पूर्वजांच्या पापपुण्याचें गांठोडें बरोबर घेऊन येत नाहीं. तो आईबाप ह्यांच्या उभयकुलांतील पूर्वजांपासून आनुवंशिक संस्कार बरोबर घेऊन येतो. जन्म आणि मरण ह्यांच्या मधला काळ एवढेंच त्यांचें आयुष्य. त्याला मागेंपुढें धागादोरा नाहीं.'

माणसाचें मृत्युघटनेविषयींचें अज्ञान हेंहि ईश्वरकल्पनेचें एक मुख्य कारण होय. आजचें सर्वसाधारण माणसाचें मृत्युप्रक्रियेचें ज्ञान फार कोतें व पूर्ण अशास्त्रीय असतें. वास्तविक आम्हीं समजतों त्याप्रमाणें माणूस आत्मा निघाला कीं त्या क्षणाला मरत नाहीं. मरण ही एक प्रक्रिया आहे. तिला काळ हा लागतोच. कित्येकि

त्वरित अपघाती मृत्यु असला तरी कमीतकमी चौदा मिनिटें तरी लागतातच. तसेंच सारा देह, सगळे अवयव एकदम निकालांत निघतात ही कल्पना खोटी आहे. मरणानंतर कांहीं काळ–कांहीं दिवस सुद्धां प्रेतांत कुठें कुठें जिवंतपणा असूं शकतो. प्रेताची दाढी वाढूं शकते. नखें वाढलेलीं आढळतात. डोळ्यांचा उपयोग होतो. प्रेताचें रक्त रक्तदानाला अधिक चांगलें असतें. तें सात आठ पटींनीं अधिक मिळतें. तसेंच तें तीन आठवडेपर्यंत गोठत नाहीं. प्रेताच्या रक्तांत फॅगोसाइटिक गुण शाबूत असतात. तें प्राणवायुवाहक काम अधिक चांगलें करतें. ( पहा–पाथ्स ऑफ सायन्स– ले. फ्रिडलांड )

अपघाताने झालेले मृत्यु परत जिवंत होऊं शकतात. दुसऱ्या महायुद्धाच्या कालांत सोविएटमध्ये हजारो लाखो मृत सैनिकांना प्रो. नेगोव्हस्की व त्यांच्या सहकाऱ्यांनीं जिवंत केलें आहे. सहा मिनिटानंतर मात्र खरा मृत्यु सुरू होतो. मज्जातंतूंवर घातक परिणाम सुरू होतो. ह्या दृष्टीने बरेंच संशोधन सोविएटमध्यें चालू आहे. मरण प्रक्रियेचा अभ्यास मृत्युंजयाच्या श्रद्धेने तिथें चालू आहे सोविएट जीवशास्त्रज्ञ मिचुरिनने म्हटलें आहे, ' निसर्गाची कृपा होईपर्यंत थांबण्यांत अर्थ नाहीं. आमचे प्रयत्न निसर्गाकडून आम्ही हिसकावून घेतले पाहिजे.' ह्या दृष्टीनें मॅक्झीम गॉर्की लिहितो, ' मृत्यूचा अभ्यास झालाच पाहिजे...... अध्ययन म्हणजे विजय '

लोकमान्य टिळक जर का आजच्या स्पुटनिक युगांतल्या माणसाचा समाजवादी शांतिप्रिय पुरुषार्थ पाहाते व कुणाची कृपा न भाकतां, कुणाकडे भिक्षा न मागतां, कुणाची प्रार्थना न करतां शांतीच्या महाध्येयाने प्रेरित होऊन मानव मृत्युंजयाकडे आगेकूच करीत आहे तें पाहाते तर खचित ज्या जगाकरता आपण ' कर्मयोग ' सांगितला त्या जगाने आपलें विचार सर्वस्व आत्मसात करून घेऊन केवळ टरफल फेंकून दिल्याबद्दल मार्क्सवादी आंदोलनाला धन्यवाद दिल्याविना राहिले नसते.

मागें सांगितल्याप्रमाणें ईश्वर कल्पना वर्गीय समाजाची फलनिष्पत्ति असली तरी ती वर्गीय समाजाची शाश्वति मात्र नाहीं. कारण ईश्वर कल्पनेला बगल देऊ

शोषणमुक्तीची क्रांति यशस्वी होऊं शकते. महान सोविएत-क्रांतीच्या अरुणोदयकालीं कामगार राज्य विरोधी मोहीम जर रशियन चर्चने उभारली नसती तर त्या महान क्रांतीचा रोष त्या चर्चवर ओढवला नसता.

मार्क्सवादी तत्वमीमांसा वास्तवतेच्या भक्कम पायावर अधिष्ठित असल्यामुळें व्यक्तींच्या धर्मस्वातंत्र्याविरुद्ध कारवाई करण्याची गरज मार्क्सवादी राज्यसत्तेला भासत नाहीं. मार्क्सवाद ईश्वरकल्पनेच्या बीजावरच कुठाराघात घालतो, समाजांतील वैषम्य, नैघृण्य निर्माण करणाऱ्या मूळ कारणाविरुद्ध तो युद्ध पुकारतो. मानवाने मानवाचें चालवलेलें शोषण उपटून काढून फेकून देण्याचे कार्यक्रम तो त्वरित आंखतो.

ईश्वर कल्पना काय आहे, त्या असत्य कल्पनेमुळें मानवतेची किती भयंकर हानी होते व ती कल्पना नष्ट कशी करावयाची ह्याचें सूत्र मार्क्सवादाच्या हातीं आहे व हें करण्याकरतां व्यक्तींच्या धर्मस्वातंत्र्याचें अपहरण करण्याची गरजहि मार्क्सवादी सत्तेला भासत नाहीं. ईश्वर नाहीं हें सत्य आहे. परंतु तो ज्याला आधारभूत वाटत असेल त्याच्याविरुद्ध मार्क्सवाद जाऊं इच्छित नाहीं. व्यक्तीचें धर्मस्वातंत्र्य मानणें हा मार्क्सवादी राजकारणाच्या सौदेगिरीचा किंवा मुत्सद्देगिरीच सवाल नसून मार्क्सवादी तत्वमीमांसेचें तें फळ आहे.

जे लोक मार्क्सवादी जगांत धर्मस्वातंत्र्य नाहीं असें आक्रंदन करतात त्यांनी मार्क्सदर्शन किंवा शास्त्रीय तत्वज्ञान अभ्यासलेलें नसतें व शिवाय तसा अपप्रचार ते बुद्धिपूर्वकहि करीत असतात. वर्गस्वार्थी लोकांचा तो एक डाव आहे. साम्यवादी समाजरचनेच्या जागतिक सूर्योदयाबरोबर ह्या स्वार्थी लोकांचे सारेच डाव धुळीला मिळणार आहेत. त्यांचा ईश्वर कांहीं त्यांना आतां तारूं शकत नाहीं हें निश्चित. कारण तो नाहींच.

卐 卐 卐

५

# गत्यात्मक भौतिकवाद

गत्यात्मक भौतिकवाद ही एक विशिष्ट विचार पद्धति आहे. सर्वसाधारण विचारपद्धति किंवा तर्कपद्धति जी रूढ होती ती वास्तव सर्व आकलन करण्याच्या कामांत अपुरी पडूं लागल्यामुळें गत्यात्मक भौतिकवादी विचारपद्धति अंमलांत आली आहे. प्रत्येक नवीन गोष्टीची उत्पत्ति प्रथम अगदीं अल्प दृश्यमान् अशीच असते. हळूहळू त्याची वाढ होत जाऊन त्यांतील उणीवा दूर होत जातात. दोन हजार वर्षांपूर्वीपासूनच ह्या विचारपद्धतीचा सुगावा कांहीं विचारवंतांना लागला होता. अनेक प्राचीन विचारवंतांच्या तात्विक मांडणींतसुद्धां गत्यात्मक भौतिकवादी पद्धतीची बीजें सुप्तावस्थेंत आढळून येतात.

गत्यात्मक भौतिकवादी विचारपद्धती आज जरी फक्त मार्क्सवादालाच प्राणभूत असली तरी इतर लोकसुध्दां आपल्या सोयीनुसार तिचा वापर करीत आले आहेत. शोषक वर्गाच्या तत्वज्ञानांतहि तिचा उपयोग करण्यांत आला

आहे. विश्वांतील गतीचे योग्य आकलन करण्याऐवजी **गतिमानतेच्या नत्वावरच शोषक तत्वज्ञानें किंवा त्यांचें अध्यात्म आधारलेलें असतें.** बौध्द, जैन वगैरे तत्वज्ञानांच्या पायांत किंचित वेगळेपणा दिसला तरी लख्ख व सत्य, अशा गतितत्वावर आधारलेलें शास्त्रीय तत्वज्ञान मात्र फक्त मार्क्सवादच निर्माण करूं शकला आहे.

अमार्क्सवादी गत्यात्मक भौतिकवाद म्हणून सुध्दां एक प्रकार अस्तित्वांत आहे. विशेषतः खाजगी मालमत्ता हा ज्याचा पाया आहे तें कायदेशास्त्र किंवा कायदेपांडित्यहि खऱ्याचें खोटें व खोट्याचें खरें करण्याकरितां ह्या विचार-पध्दतींचा उपयोग करीत आलें आहे. तसेंच वकीली बाण्याचें राजकारणहि त्या विचारपध्दतीचा अवलंब करीत असतें. पुरातन ग्रीक रोमन वगैरे संस्कृतींच्य कालापासून तों प्रख्यात कायदेपंडित जीनापर्यंत ह्या पध्दतीचा राजकारणांतहि वापर झालेला आहे. फायदेशीर व्यवहारापुरता बिनदिक्कत कशाचाहि उपयोग करून घेण्याची मुर्दाडखोरी शोषक संस्कृतींत पुरेपूर भरलेली असते तिचाच हा एक प्रकार आहे. परंतु मार्क्सवादी गत्यात्मक भौतिक विचारपध्दति ही अशी खास नव्हे. मार्क्सवादाचा तात्विक पाया असणारी ही गत्यात्मक विचारपध्दति माण-सांना विश्वाच्या व्यवहारांच्या सर्वांत अगदीं जवळ नेऊन सोडणारी आहे. म्हणून ती मानवहिताला अधिक उपयुक्त ठरत असते. ह्या पध्दतीचा उपयोग व्यवहारांत, ज्ञानविज्ञानांत, सिध्दांतांत जेवढा अधिकाधिक होईल तेवढा मान-वाचा व्यवहार शास्त्रशुध्द व अखेर सुखदायी ठरत जाईल. कारण वस्तुस्थितीचें आमचें आकलन जेवढें अधिक वास्तविक असतें तेवढा आमचा व्यवहार अधिक निश्चित असतो. म्हणून ह्या विचारपध्दतीचा जास्तींत जास्त अभ्यास व विकास करणें हें प्रत्येक बुद्धिवाद्याचें कर्तव्य आहे.

**जग म्हणजे बदल. दिवसामागून रात्र व रात्रीमागून दिवस. ऋतुमागून ऋतु. माणसें जन्मतात, मोठीं होतात आणि मरतातहि. गति ही सर्वोपरी, सर्वव्यापक, ठसठशीत असें सत्य आहे. त्याकडे कानाडोळा करणें हें आत्मघातकीपणाचें लक्षण आहे.**

परंतु बदल म्हणजे काय व तो कसा होतो आणि त्याची निर्णायक कारणें काय वगैरे प्रश्नांचा विचार हा शास्त्रीय तत्वज्ञानाचा गाभा आहे व ह्या दृष्टीनें आतांपर्यंत झालेलें ह्या प्रांतांतलें संशोधन अपुरें आहे. सर्व शास्त्रें व विज्ञानें गत्यात्मक भौतिकवादी आकलन पद्धतीवर कशीं अवलंबून आहेत तें सोदाहरण सिद्ध केल्याशिवाय ह्या पद्धतीची श्रेष्ठता व सकसपणा पटणें कठीण आहे. तसेंच हें शास्त्र सामान्य माणसाच्या आवाक्यांत येईल एवढें सुस्पष्ट व सुलभ झालेलें नाहीं, हेंही कबूल करावयालाच पाहिजे. हा विषय अत्यंत कठीण आहे म्हणून त्याची उपेक्षा करण्याची जी सवय किंवा जें बौध्दिक जाड्य बुध्दिवाद्यांत दिसतें ते गर्हणीय आहे. हें बुध्दिमांद्य जर आम्ही दूर केलें नाहीं तर जगाला सत्याच्या अधिकांत अधिक जवळ नेण्याच्या प्रयत्नांत आम्ही दिरंगाई केली असें ठरेल.

आमच्या भगवद्गीतेंत व इतरत्र गतिविषयीं कांहीं विचार आलेले आहेत. 'गतिर्भर्ता प्रभुःसाक्षी निवासः शरणं सुहृत । प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजमव्ययम् ॥ (गीता-अध्याय ९-१८) अर्थः-सर्वांची गति मी, सर्वांचा पोषक मी, प्रभु, साक्षी, निवास, शरण, सखा, उत्पत्ति, प्रलय, स्थिति, निधान आणि अव्यय बीजहि मी. अशी प्रौढी गीतेचा भगवान मिरवतो खरा! परंतु ह्या प्रौढीला आणि भगवानाला शास्त्रीय तत्वज्ञानांत काडीचाहि आधार नाहीं हें आम्ही अनेक दृष्टींनी विचार करून ह्या पुस्तकाच्या चौथ्या भागांत स्पष्ट केलें आहे, परंतु ईश्वराचें अयथार्थत्व ज्यांना उमगलें आहे असें कांहीं सूज्ञ लोक ईश्वराच्या जागीं निसर्गाची स्थापना करून मोकळे होतात. या लोकांना आपण निसर्गवादी म्हणूंया. साहित्य, कला, शास्त्रें, तत्वज्ञान वगैरे सगळ्या प्रांतांत निसर्गवाद्यांचा धुडगूस चालू आहे. ईश्वर नाहीं ही गोष्ट मान्य आहे परंतु त्या जागी निसर्ग ठेवा असें त्यांचें म्हणणे असतें. आतां पहिली गोष्ट ही कीं ईश्वराची जागा आमच्या आकलनांत निसर्ग घेऊं शकत नाहीं. कारण ईश्वर कल्पनेची व्याप्ति व निसर्ग कल्पनेची व्याप्ति ह्या भिन्न आहेत, ईश्वर कल्पनेबाबत माणसाचें जें आकलन व तज्जन्य व्यवहार असतो तसा निसर्गाबाबतीत असूं शकत नाहीं. अर्थात निसर्गालाच ईश्वर समजून तसा व्यवहार केला तर मात्र तें शक्य आहे. परंतु मग जो मुद्दा ईश्वराला लागू तोच निसर्गाला लागू

होईल. म्हणून निसर्ग काय आहे त्याची योग्य कल्पना असणें आवश्यक आहे.

एका अर्थाने जें जें जन्माला येतें तें तें निसर्ग होय. परंतु अशी गोलमोल व्याख्या तत्वज्ञानांत कुचकामींच आहे. माणसाने निसर्गाची प्रथम काय कल्पना केली होती तें पाहाण्याकरतां निसर्ग शब्दाची व्युत्पत्ति पाहाणें जरूर आहे. व्युत्पत्तीने नेहमीच प्रचलित अर्थबोधावर प्रकाश पडतो असें नव्हे. परंतु शब्दार्थांचा ऐतिहासिक विकास ध्यानीं येतो व अर्थबोधाला मदत जरूर होते. ह्या दृष्टीने इंग्रजी 'नेचर' ( निसर्ग ) हा शब्द तपासून पाहूं या. 'नास्सेरे' ह्या लॅटिन क्रियेवरून तो शब्द आला आहे. जन्मणे हा ह्या क्रियेचा अर्थ आहे. ख्रिस्तजन्माला 'नाताळ' किंवा विलायतेंत न जन्मलेल्या एतद्देशीयाला युरोपियन लोक 'नेटिव्ह' म्हणतात तें त्याचमुळें. ह्या शब्दाच्या घडणीच्या वेळीं जन्मजात तत्वाला अधिक महत्व मिळून वस्तूच्या वाढीला दुय्यम महत्व मिळालें होतें हें स्पष्ट आहे. वास्तविक जन्म व वाढ ह्यांनीं त्या त्या वस्तूचा स्वभाव 'नेचर' बनत असतो. परंतु नेचर ह्या संज्ञेंत फक्त जन्मजातपणाच अंतर्भूत होतो. ह्याचा अर्थ पूर्वीच्या 'स्वभाव' परीक्षणांत विकासाचें महत्व फारच कमी मानलें गेलें हें होय.

खरें पाहिल्यास प्रत्येक जन्म किंवा नवजन्म हा विकासाचाच एक परिणाम असतो. बीजाची वाढ व विकास रोपांत होतो. रोपाची वाढ व नंतर त्याचें झाडांत गुणांतर होतें. तसेंच झाडाचें फुलाफळांत व फळांतून पुनरपि एक किंवा एकाहून अधिक ( व ह्या अधिकांतच चक्रनेमिक्रमाच्या बाहेर जाणारा खरा विकास आहे. ) बीजांत विकास होतो. आमच्या पूर्वीच्या विश्व-आकलनांत वस्तूच्या जन्मजातपणालाच फक्त महत्व मिळाल्यामुळे वस्तूच्या स्वभाव-परीक्षणांत परिवर्तनशून्यता निर्माण झाली. उदाहरणार्थ, राष्ट्रभक्ति ही भावना घ्या. राष्ट्रभक्ति ह्या भावनेचा सूक्ष्म अभ्यास केल्यास मानवी अंतःकरणात ह्या भावनेची जी पैदास झाली तिला इतिहास आहे व ती सतत बदलत आली आहे हें स्पष्ट दिसेल. प्रथम प्रथम राष्ट्रभावना म्हणजे आपल्या आईवडिलांवर प्रेम, आपल्या घरादारावर प्रेम, जमीनजुमल्यावर प्रेम, आपल्या टोळीवर प्रेम, जमातीवर प्रेम, जंगलांत जो रहाण्याचा आवाठ, त्या आवाठावर प्रेम अशी प्राथमिक

अवस्थेतल्या माणसाची कल्पना होती. मग आपल्याजी वन पध्दतीवर प्रेम, समाज-धारणेची धर्म वगैरे जी जुनी व्यवस्था, त्यावर प्रेम अशा वेगवेगळ्या प्रकारच्या संमिश्र भावनांत राष्ट्रभक्तीची भावना विखुरलेली आढळून येते. परंतु राष्ट्रभक्ति म्हणजे एका सीमाबध्द भूभागावर प्रम, अशी जी कल्पना, ती फार अलीकडची आहे व ठराविक इतिहासामुळें ती बनलेली आहे. भांडवलशाही निर्माण होऊन साम्राज्यवादी सत्तेनें चारी खंडें जेव्हा पादाक्रांत केलीं व साम्राज्यवादी शोषण सुरू झालें तेव्हां ह्या शोषणाच्या प्रतिकारार्थ राष्ट्रभक्तीच्या भावनेने ज्वलज्जहाल स्वरूप धारण केलें. राष्ट्रभक्ति ह्या भावनेचा शेवटच्या तीनशें वर्षांचा हा इतिहास आहे. शोषणाच्या पार्श्वभूमीवर ह्या भावनेच्या हा अविष्कार आहे. साम्राज्यवादाच्या व भांडवलशाहीच्या नाशाबरोबर राष्ट्रभक्तीचा हा जहाल आशयही बदलत चालला आहे. आज जग समाजवादाच्या युगांत पदार्पण करीत आहे. समाजवादाच्या परिसरांत राष्ट्रभक्ति ही भावना शिल्लक उरली तरी तिचा आशय आमूलाग्र बदललेला असणार. भांडवलशाही शोषण, भांडवलशाही स्पर्धा, राष्ट्रभक्तीच्या नांवावर एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राची केलेली खांडोळी वगैरे गोष्टींचा परिसर व समाजवादी सहकार्याचा, समाजवादी मानवता-वादाचा जागतिक शांतीचा परिसर ह्यांत महदंतर आहे स हें अंतर राष्ट्रभक्तीच्या आशयाला आरपार बदलून टाकतें. परंतु हें समजण्याला राष्ट्रभक्ति ही एक ऐतिहासिक उपज असून तिला प्रारंभ बदल व परिसर आहे ह्या गोष्टी लक्षांत घ्याव्या लागतात. म्हणजे भावनांचा गत्यात्मक व ऐतिहासिक अभ्यास करावा लागतो. व नेमकें हेंच काम गत्यात्मक भौतिकवादाचें असतें. गत्यात्मक भौतिकवादाला ऐतिहासिक भौतिकवाद असें म्हणतात.

**निसर्ग म्हणजे भौतिकतत्वाच्या गतीचा आतांपर्यंतचा इतिहास किंवा भूततत्वाच्या परिवर्तनशीलतेचा इतिहास होय.** निसर्गाच्या पेटीबंद कल्पनेमुळें आमच्या आकलनाची अशी स्थिति झाली कीं माणूस दुःखी कां तर त्याचें कारण निसर्ग ..दुःख हें म्हणे नैसर्गिकच आहे ! अरे नॅचरलच ं ! अधिकच खोल विचार असला तर माणूस स्वार्थी म्हणून दुःखी असें तो

म्हणेल. आणि स्वार्थी कां तर माणसाचा निसर्गच स्वार्थी. तो त्याचा स्वभावच. जिथें सर्वसाधारणपणे समाजविकासाच्या नियमांचें अज्ञान अधिक तिथें निसर्ग-कल्पनेचा बाऊ अधिक दिसून येतो. खेदाची गोष्ट ही की बुध्दिवादी म्हणवणारे लोक ह्या स्वयंनिर्मित झूट कल्पनेमुळें मानवी भवितव्याच्या बाबतींत घोर निराशावादी बनून वैफल्याचे विचार फैलावित आहेत.

वास्तविक माणसाचा स्वभाव स्वभाव म्हणजे काय ? माणसाचा आहे तसाच स्वभाव कां बनला ? दुसऱ्या तऱ्हेचा कां बनला नाहीं ? स्वभावाला इतिहास आहे कीं नाहीं ? बदल आहे कीं नाहीं ? आनुवंशिकता म्हणजे काय ? आनुवंशिकतेलाहि इतिहास आहे कीं नाहीं ? ती बदलते कीं नाहीं ? व ती कोणत्या परिस्थितींत बदलते ? परिस्थिति आणि आंतरिक गति ह्यांचा संबंध काय ? वगैरे प्रश्न उपस्थित करून त्यांची योग्य उत्तरें देण्याऐवजी, त्याचप्रमाणें जनतेला सामुदायिक कृति करण्याला प्रोत्साहित करण्याऐवजी अशास्त्रीय तत्वज्ञान माणसाला परकी असा जो ईश्वर किंवा तदनुसारी इकडच्या तिकडच्या गतिशून्य, कृतिशून्य कल्पना त्यांत गुरफटून राहिलें. अध्यात्मवाद ईश्वरांत गुरफटला तर शुध्द बुध्दिवाद निसर्ग वगैरे पेटीबंद कल्पनांत गुदमरून गेला.

कांहीं लोक निसर्गाच्या अनुषंगाने सहज प्रवृत्तींचा बाऊ करतात. परंतु सहज प्रवृत्ति म्हणजे काय ? सहज प्रवृत्ति कशा बनतात ? मनुष्य स्वभावांत सहज प्रवृत्तींचा भाग किती ? सर्वसाधारण मानवांच्या बाबतींत कोणत्या समाजपरिस्थितींत त्या योग्य तऱ्हेने बदलूं शकतात व मानवी पातळीवरील जीवनांत सहज प्रवृत्तींची बनावट कशी झाली आहे ? जीव पातळीवर त्या कशा वावरतात ? सर्व भूततत्वाची प्रकृति व प्रवृत्ति काय व तसेंच ह्या प्रकृति—प्रवृत्तींत परिवर्तनशीलतेचें स्थान काय वगैरे गोष्टींची चर्चा जिथें करावयाची नसते तिथें स्वभाव, निसर्ग आणला जातो. हा शब्द दुसऱ्याला गप्प करणें व स्वतः दिग्मूढ होण्यासाठीं वापरण्यांत येतो. शास्त्रीय तत्वज्ञानाला निसर्ग, स्वभाव वगैरे शब्दांत काडीचेंहि तथ्य दिसत नाहीं. शास्त्रीय तत्वज्ञान वस्तु आणि वस्तुत्व ह्यांच्या अंतरंगांत शिरून त्यांची अंतर्गति तपासून पाहातें. अशी तपासणी करणारा शास्त्रीय तत्वज्ञानाचा जो

**भाग त्याला गत्यात्मक भौतिकवाद असें मार्क्सवादी परिभाषेंत म्हणतात.** ह्या आकलनपध्दतीची कांहीं उदाहरणें पाहूं या.

स्वतंत्रता ही संज्ञा, कल्पना किंवा सत्य घ्या. स्वतंत्रता ह्या सत्याचें आकलन करण्याकरतां गत्यात्मक भौतिकवाद त्याचा खरा खुरा सामाजिक इतिहास पाहतो. इतिहासकालांत स्वतंत्रता शब्दाचा आशय मूर्त परिस्थितींत कसाकसा व कोणत्या परिस्थितीच्या कारणाने बदलत गेला किंवा सामाजिक स्थित्यंतरांत सापाच्या कातीप्रमाणे जुना आशय झडला जाऊन नवा आशय कसा प्राप्त होत त्याला गेला हें गत्यात्मक भौतिकवाद लक्ष देऊन पाहील. तसेंच ह्या कल्पनेची विरोधी कल्पनाहि तो तपासून पाहील. त्याचप्रमाणें स्वतंत्रता व परतंत्रता ह्या द्वद्वांत दिसणारे त्या युगांतले मुख्य आधारही तो पाहील. स्वामीत्व आणि गुलामी, सरंजामदारी आणि दास प्रथा, भांडवलदारी आणि मजूरी वगैरे परिस्थितींत परतंत्रता विरुध्द स्वतंत्रता कशी गतिमान होत राहिली किंवा बदलत राहिली तेंहि तो पाहतो. अशा प्रकारें चालू विवक्षित परिस्थितींत स्वातंत्र्य शब्दांतील नव्या आशयाचें मर्म किंवा गति शोधून काढून त्याचा पुढें होणारा विकासहि तो हेरतो व तशी दिशा तो दाखवतो. ह्या दिशेला पुरोगामी दिशा असें म्हणतात. स्वातंत्र्य ह्या संज्ञेचा ऐतिहासिक आशय समजून घेऊन कोणत्या आशयसिद्धीकरतां स्वातंत्र्य चळवळ दोलायमान होत असते वगैरे गोष्टींचा विचार जसा गत्यात्मक भौतिकवादी पध्दतीने होतो तसा इतर पध्दतींनी होऊं शकत नाहीं.

हुकुमशाही ही कल्पना घेऊं या. त्याचा साधा सरळ अर्थ सर्वांनाच ठाऊक आहे. परंतु त्याचा ऐतिहासिक अर्थ समजून घेतला पाहिजे. एकतंत्री राज्यकारभार किंवा पुराणी राजेशाही, तदनंतरची भांडवलदारी लोकशाहीतील अल्पशोषक वर्गांची बहुजनांवर हुकुमशाही व मग क्रांतिकालांतील कामगार बहुजनांची शोषकवर्गांवरील तात्पुरती हुकुमशाही, वगैरे गोष्टी निरानिराळ्या इतिहासकालांतील सामाजिक गतिनुसार व गरजेनुसार ठरवण्यांत आल्या पाहिजेत. एका पार्श्वभूमीवर चांगली किंवा पुरोगामी ठरणारी चीज वेगळ्या पार्श्वभूमीवर वाईट व प्रतिगामी ठरूं शकते. एका टोकावरून दुसऱ्या टोकावर नेणारी ही

अनुक्रम ३४२६५ दि:
क्रमांक ९२२६ नों दि: २५

वास्तवतेची गति गत्यात्मक भौतिकवादी तर्कपध्दतीने स्पष्ट होते. कारण ह्या तर्क पध्दतींत साधा, नर्म विरोध, परस्पर विरोध व परस्पर विनाशक विरोध आणि त्यांची गति ह्यांचा पूर्ण विचार केलेला असतो. म्हणून ह्या शास्त्रीय तर्कपध्दतीला विरोधविकासी तर्कपध्दति असेंहि म्हणतात.

आता समता ही संज्ञा घेऊं या. जगांत एकाच झाडाचीं, एकाच फांदीची दोन पानेंसुध्दां अगदीं शास्त्रीयदृष्टया समान नसतात. तसेंच कुठल्याहि दोन परस्पर विरुध्द टोकावरच्या दोन गोष्टीहि पूर्ण दोन म्हणजे पूर्ण भिन्न नसतात. त्यांतसुध्द कुठें ना कुठेतरी समान धागा असतोच. अशा ह्या पूर्ण भिन्न नाहीं व पूर्ण अ भिन्न नाहीं अशा वस्तु व प्रक्रिया असणाऱ्या जगांत समता हें काय प्रकरण आहे असें कुणालाहि वाटणे साहजिक आहे.

खरें सांगावयाचें म्हणजे साम्यवाद हा समतावादी नाहीं, तो संधिसमतावादी आहे व त्यांत अनुस्यूत असलेली समता वैज्ञानिक पायावर आधारलेली आहे.

समता ही मुख्यत्वेकरून आमच्या सामाजिक मनाची उपज असली तरी निसर्गात किंवा वास्तवांत सुध्दां तिला खंबीर पाया आहे. निसर्गाच्या उत्पत्ति-श्रेणींत जातीला ( स्पिसिस ) फार महत्व आहे. अर्थात ह्या जातीचा आमच्या भारतीय जातिसंस्थेशीं काडीइतकाहि संबंध नाहीं हें उघडच आहे. एका जातीच्या सर्व प्राण्यांत जातीय समानता असते. ही जातीय समानता हीच मानवाच्या समतेचा नैसर्गिक किंवा वास्तविक पाया होय. एकाच जातीचे कितीहि भिन्नभिन्न प्राणी घेतले किंवा शेवटच्या श्रेणीवरील प्राण्याची उच्चतम श्रेणी-वरील प्राण्याशीं तुलना केली तर त्यांत कितीहि इतर भेद दिसले तरी गुणभेद दिसणार नाहीं. जसें, एक रबराचा तुकडा घेतला व तो ताणला तर त्याची तुटण्यापर्यंतची लांबी किंवा लवचिकता व सैल सोडल्यानंतर मूळ स्वरूपांतली लांबी रुंदी समान राहील. म्हणजे त्याची लवचिकता ठराविक असेल व मूळ लांबी रुंदी ठराविकच असेल. ( अर्थात ताणलेली लांबी रुंदी ताणाप्रमाणे बदलत राहील ) तसेंच जातीय समानतेचें आहे. त्यांत मूळ गुणांची समानता असेल. फक्त वाढींत फरक असेल, विकसनांत फरक असणार नाहीं. म्हणूनच ती एक जात. नाहींतर त्या दोन किंवा

अनेक जाती ठरतील. एका जातीच्या प्राण्यात वेगळेपणा असूं शकतो. परंतु हा वेगळेपणा इतका वेगळा नसतो की तो वेगळा गुण ठरावा. माणसांत कमी शूर व अधिक शूर माणसें असतात, परंतु एक सिंह व दुसरा ससा असें आढळणें अशक्य. कारण सिंह व ससा ह्या दोन जाती आहेत, तर मनुष्याची जात एकच आहे. अलंकारिक भाषेंत भले आम्ही एखाद्या पुरुषाला सिंहासारखा शूर व दुसऱ्याला सशासारखा भित्रा असें म्हणूं परंतु शास्त्रीयदृष्ट्या तें चुकीचें आहे. सिंहाची हिंमतता सशाला यावयाची नाहीं व सशाची सावधानता सिंहाला यावयाची नाहीं. कारण त्यांत जातीय भिन्नता आहे. परंतु माणसाची तर एक जात आहे. वेळ परिस्थितिनुसार एखादा भित्रा वाटणारा पुरुष वेगळ्या परिस्थितींत अस्सल शूरासारखें वर्तन करूं शकतो व एखादा शूर पुरुषसुद्धां भित्र्यासारखे वर्तन करूं शकतो. एखादा निर्बुध्द शिक्षणाने वगैरे सुबुध्द बनूं शकतो व एखादा सुबुध्द विरुध्द परिस्थितीमुळें कालांतरानें गंजलेल्या बुध्दीचा निर्बुध्द ठरूं शकेल. जातीय समानता म्हणजे भावनाक्षमता, ज्ञानक्षमता व कृतिक्षमता यांची समानता असें म्हणावयास हरकत नाहीं व ही समानता हीच मानवतावादी किंवा सामाजिक समतेचा वस्तुगत पाया आहे.

हाताची पांच बोटेंहि समान नसतांना समतेचा उदोउदो करणें हें निव्वळ थोतांड आहे किंवा खुळ आहे असें समताविरोधी लोक म्हणतात व निसर्गातील 'जोरदाराचा कारभार' ह्या तत्त्वाचा हवाला देऊन सबलाने दुर्बलावर राज्य करणें, प्रगत राष्ट्रानें अप्रगत राष्ट्रावर हुकमत गाजवणें, पुढारलेल्या जमातीने मागासलेल्यांना चेपून टाकणें, सुशिक्षितांनीं अशिक्षितांना पुढे येण्याची संधी नाकारणे, वगैरे गोष्टी बरोबर आहेत असें भासवतात. परंतु या असल्या रानटी विचारांत तत्त्वज्ञानाचा गंधहि नसतो कारण केवळ निसर्ग म्हणजे मानव नव्हे. **मानव हा निसर्गमातेचा बाळ असला तरी त्यानें केव्हांच आपले विचार, आपली बुद्धि, आपलें मन, आपला अंतरात्मा व समाज बनवला आहे. म्हणजे त्यानें आपला वेगळा संसार थाटला आहे व हें करीत असतांना तो निसर्गमातेपासून कित्येक कोसांनीं दूर गेला आहे. स्वतःच्या जीवनांत त्यानें बौद्धिकता निर्माण केली आहे व**

**न्याय, करुणा, समता वगैरे तत्वांची पूजा बांधावयाला सुरवात केली आहे. हें सारें भव्योदात्त कुठून तरी, आकाशांतून वगैरे मनुष्याच्या डोक्यांत येऊन पडलें असें नसून प्रकृतीच्या नवनवोन्मेषशालिनी विकसनाची ती निर्मिती आहे हें गत्यात्मक भौतिकवाद स्पष्ट करतो.**

मानवांचें सारें आदर्श, उदात्त व दिव्य, आंतरिक जगत क्रमाक्रमानें निसर्गांतूनच आलें आहे. परंतु तें केवळ निसर्ग नव्हे. मनुष्याचें सामाजिक जीवन हा निसर्गाचा विकास आहे. हा विकास सरळ गणिती श्रेणीनें झाला आहे. म्हणूनच इतिहास, मग तो विश्वाचा असो, निसर्गाचा असो किंवा समाजाचा असो, आतांपर्यंत तो रक्ताच्या शाईने बरबटलेला राहिला. **परंतु आतां मानवी बुद्धीनें अत्यंत गूढ व रहस्यमय अशी ही विरोध विकासाची यंत्रणा जाणून घेऊन स्वपराक्रमाने त्याच्यावर ताण करण्याचा पद्धतशीर प्रयत्न चालविला आहे. साम्यवादी आंदोलन हें त्या शास्त्रिय व पद्धतशीर आंदोलनाचें नांव आहे व गत्यात्मक भौतिकवाद हें त्या आंदोलनाचें तर्कशास्त्र आहे.**

हाताचीं पांच बोटेंहि समान नाहींत हें म्हणणाऱ्यांनीं हें विसरतां नये कीं त्या बोटांना रक्ताचा पुरवठा करणारा हात किंवा देह त्या बोटांना त्यांच्या त्याच्या स्थानावर त्यांच्या गरजांप्रमाणे सारखेच रक्त पुरवित असतो. बोटांचें काम भले वेगवेगळें असेल. अंगुठ्याचें काम करंगळीला व करंगळीचें काम अंगुठ्याला न जमेल परंतु रक्ताचा म्हणजे जीवन समृध्दीचा पुरवठा समानच असतो. साम्यवादी जग नक्की ह्याच दिशेनें पावलें टाकीत आहे. जीवनशक्तीच्या साधनांचा पुरवठा प्रत्येकाच्या गरजेप्रमाणे व प्रत्येकाकडून काम त्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणे हें तत्व येत्या वीस वर्षांत सोविएत देश अंमलात आणणारा आहे.

'भौतिक जग' ह्या प्रकरणांत म्हटल्याप्रमाणें जग हें गतिमान भूततत्वाचा अविष्कार होय. हें भूततत्व स्वयंभु म्हणून स्वयंगतिमान व स्वयंगतिज्ञान

म्हणून स्वयंभू होय हें निराळें सांगावयास नको. कारण स्वतः होणें गतिंचा परिणाम आहे. होणे व बदलणें ( बिंग अँड बिकमिंग ) ह्याची एकता तिथें दिसून येते. जग हें नुसतें आहे. ( इज ) असें नव्हे. तर तें होतें. ( बिकम्स ) जगाला विरोध नाहीं कारण तसें असतें तर जगच राहिलें नसतें. जगाला विरोध जो आहे तो त्याच्या एका प्रकारच्या स्थायी असण्याला. म्हणजे दुसऱ्या प्रकारच्या होण्यांत नेण्यापुरता–बदलण्यापुरता. ' असणें ' ला विरोधी ' नसणें ' जें आहे तें त्या वस्तूला पूर्ण नष्ट करणारें नसणें नव्हे, तर त्या वस्तूला वेगळ्या व बहुधा उच्चावस्थेंत नेतांना त्याचें असणें त्या स्थायी स्वरूपांत नाहींसें करणारें असतें. बीज, बीज म्हणुन अनुकूल परिसरांत फुटतें व त्यांतून अंकूर निघतो तेव्हां बीज बीज म्हणून नाहींसे होतें. म्हणजे बीजाचें बीज म्हणून जें काय स्थायी रूप असतें तें नष्ट होतें व बीज म्हणून संपण्याच्या क्रियेतून बीजाच्या उच्चावस्थेंत म्हणजे रोपावस्थेंत तें पदार्पण करतें. हें **अशा प्रकारचें परिवर्तनशील नष्ट होणें हें वस्तुतः संपूर्ण नष्ट होणें नसून तें सार्थक होणें** होय. **ह्या नसण्याला आपण मृत्यु असें म्हणूं या. तत्वज्ञान दृष्ट्या मृत्यु म्हणजे पूर्ण संपणें नव्हे. मृत्यु म्हणजे बदलणें. हा बदल पुनर्जन्माच्या स्वरुपाचा असतो.** परन्तु आमच्याकडे पुनर्जन्माची कल्पना ज्या भ्रष्ट स्वरुपांत घेतली जाते तशी ती न घेतां शास्त्रीय स्वरुपांत घेतां येण्यासारखी आहे. परन्तु पुनर्जन्माच्या कल्पनेंतला जुना आशय बदलून ती शास्त्रशुद्ध करून स्वीकारावी लागेल. इथें पुराण्या कल्पनेशी पुराण्या स्वरुपांत, पुराण्या आशयाने तडजोड नाहीं. पुराण्या कल्पनेवरून आम्हांला एवढेंच दाखवायचें आहे कीं शास्त्रीय तत्वज्ञानाकरितां लागणारी सामुग्री आमच्या भारतीय व इतर पुराण्या तत्वज्ञानांत भरपूर उपलब्ध आहे. फक्त तिचा शास्त्रीय समन्वय करून त्यांतून एक नवें, पुराण्या तत्वज्ञानाहून बिलकूल निराळें समाजाच्या सुखनिर्मितीचें तत्वज्ञान बनवणें भारताला जमलें नाहीं. **खऱ्या तत्वज्ञानाला लागणारी सामुग्री भारताने व साऱ्या मानवतेनें केव्हांच निर्माण करून ठेवली आहे. परन्तु जीवनाचें उत्थान करण्यास लागणारा त्या विरोधी सामुग्रीचा सहयोग ( सिंथेसिस ) मात्र फक्त मार्क्सवाद किंवा शास्त्रीय तत्वज्ञानांत मिळतो इतरत्र नाहीं.** जेव्हां जेव्हां

आम्हाला बऱ्याच महत्वाच्या गोष्टींचा सुगावा पुराण्या संस्कृतींत मिळतो तेव्हां पुराणे मानवी अनुभव किंवा मानवी ज्ञानाचा तो खजिना व शास्त्रीय तत्वज्ञानानें दाखवून दिलेलीं नवीन दिशा ह्यांचा योग्य संबंध लक्षांत ठेवला पाहिजे. नाहींतर पोकळ समन्वयवाद, जुन्या तत्वांचा पुनरुज्जीवनवाद वगैरे अशास्त्रीय विचारधारांचा भोंगळ सुकाळ सुरू होतो व मग प्रकाशापेक्षां अंधारच अधिक फैलावत जातो. म्हणून जुनें व नवें ह्यांतील संबंधांची स्पष्ट कल्पना प्रत्येक शास्त्रीय विचारकाच्या नजरेसमोर असणें जरूर आहे.

शब्दांची कसरत करून सर्वांचें समाधान होईल असें तत्वज्ञान मांडण्याचा एक प्रकार आपल्याइथें व इतरत्र रूढ आहे. हा सर्वसंग्राहक ( इक्लेटिक ) प्रकार अगदीं दिशाभूल करणारा आहे. ह्या प्रकाराने लेखक लोकप्रिय होतो परंतु ' रामायस्वस्ति रावणाय स्वस्ति ' रामा तुझें भलें, रावणा, तुझेंहि भलें. असला प्रकार तत्वज्ञानांत तरी बिलकुल चालतां नये. तेव्हां वरील पुनर्जन्माची कल्पना भारतीय तत्वज्ञानाचें गुणगान करणारी नव्हे. ती वस्तुत्वाची गति पुनर्जन्मात्मक कशी आहे हें दाखवण्यापुरतीच लागू आहे. वस्तूंतील पुनर्जन्मात्मक गति विरोधात्मक आहे व विरोधांतून ही गति बहुधा प्रगति बनत जाते आणि म्हणूनच गत्यात्मक भौतिकवादाला विरोधविकासवाद म्हणतात.

इतिहास म्हणजे गति. गति नाहीं तर इतिहास नाहीं. तेंच तेंच म्हणजे इतिहासाचा अभाव. नव्यानें लिहिली जाणारीं पानेंच इतिहास बनतात. जर नवें कांहींच नाहीं तर इतिहासाचीं पानें नाहींत व अर्थातच कधीं इतिहासच नाहीं हें उघड आहे.

गत्यात्मक भौतिकवादांतला द्वंद्वविकास एकदां समजला कीं ह्या विश्वांत जी गति आहे, जें चलन आहे त्याचें कारण विश्ववस्तुबाहेर शोधण्याची गरज उरत नाहीं. मग गति ही ' विश्वात्म्याची अद्भुत लीला ' किंवा कल्पनावादी जीवशास्त्रज्ञाची ' जीवशक्ति ' ( एलान व्हायटल ) असें म्हणण्याचीही गरज उरत नाहीं.

जगांत दोन तर्कशास्त्रें आहेत. एक हिश्शाचें किंवा अंशाचें तर्कशास्त्र व दुसरें संपूर्णाचें तर्कशास्त्र. गत्यात्मक भौतिकवादी तर्कशास्त्र हें संपूर्णाचें तर्कशास्त्र आहे. कारण वास्तवता ही ह्या तर्कशास्त्राची कसोटी आहे. वास्तवता ही संपूर्णाची फलनिष्पत्ति असते. कुठेंहि हिश्शाची अशी तुकडेबंद वास्तवता असूं शकत नाहीं. सध्यां हे शब्द लिहितांना माझ्या खोलींत जी हवा आहे ती हवा, संपूर्ण विश्वांतील वातावरण, अधिक मुंबईचें वातावरण, अधिक आसमंतांतील वातावरण अधिक माझ्या खोलींतील वातावरण. वगैरे कितीतरी गोष्टी व इतर सर्व कारणांचा अंतिम परिपाक आहे व हा परिपाक ही वास्तवता आहे. **गत्यात्मक भौतिकवादी तर्कशास्त्राचे निष्कर्ष केवळ त्या शास्त्राच्या प्रमेयांवर पारखले न जातां वास्तवतेच्या निकषावर पारखले जातात.** आम्हाला प्रतीत होणारी ही वास्तवता केवळ इंद्रियगम्यच असते असेंहि नव्हे. त्यांत इंद्रियज्ञानाचें महत्व जरूर आहे. परंतु केवळ इंद्रियज्ञान म्हणजेच सर्वज्ञान असें समजलें जात नाहीं. तर इंद्रियज्ञान हा आमच्या ज्ञानाचा पाया व त्या बरोबर अप्रत्यक्षज्ञान-प्रयोगज्ञान-बौद्धिकज्ञान वगैरे साऱ्या गोष्टींना महत्व आहेच. त्यामुळें केवळ इंद्रियज्ञान व त्यांत असूं शकणारा फसवेपणा प्रगत ज्ञान-प्रक्रियेंतून निघालेला असतो. म्हणून गत्यात्मक भौतिकवादी विचारपद्धति ही भौतिक असली तरी केवळ इंद्रियवादी व त्या दृष्टीने ज्याला जडवादी असें म्हणतात तशी जडवादी नांहीं. उलट ती अत्यंत सूक्ष्म, सचेतन, सजीव व वस्तूंतील क्षणाक्षणातलें कणाकणाचें आंतरिक परिवर्तन व विश्वांतील प्रचंड खगोलांचें युगानुयुगांचें परिवर्तन व भौतिक सातत्यहि टिपून घेऊन त्याचा मानवी मनःपिंडावर होणारा परिणाम सापेक्ष व निरपेक्ष दोन्ही दृष्टींनी आकलन करूं शकणारी विचारपद्धति आहे. परंतु ह्या सर्व गहन विचारांच्या सत्यतेचा निकष मात्र मानवी व्यवहारच. गत्यात्मक भौतिकवादी विचार-मंथन कुठल्यातरी आकाश पाताळांतल्या पोकळींत भिरभिरत किंवा भरकटत राहात नाहीं. त्याला व्यवहारांतच उतरावें लागतें व हा व्यवहारही फक्त इंद्रियांपुरताच मर्यादित नसतो. इंद्रियांना पृथ्वी स्थिर वाटून सूर्य फिरत आहे असें वाटलें तरी आम्ही पृथ्वीला स्थिर मानीत नाहीं. कारण पृथ्वीशीं होणाऱ्या आमच्या वाढत्या सलगीने

( ज्यामुळें दुर्बीण सांपडली व अनेक विज्ञानांचा विकास झाला ) म्हणजे सामाजिक व्यवहारानें पृथ्वीच सूर्याभोवती फिरते असें ठरवलें आहे.

**गहन सत्यें न्याहळतां न्याहळतां जेव्हां आम्ही विचार-विलासांत टांगत राहतों तेव्हां फिरून त्या टांगत्या तार्किकांचा निकषहि वास्तविक सामाजिक व्यवहार ठरतो व त्यामुळें हीं तार्किकें परत ताळ्यावर येतात आणि तीं मानवी जिवनव्यवहाराचें सौकर्य व सुख वाढवणारीं ठरतात. फक्त शास्त्रीय तत्वज्ञानच अशा प्रकारें व्यवहार व तत्वज्ञान ह्यांतील सुवर्णमध्य साधू शकलें आहे.**

ज्ञान हें एक संक्रमण आहे. ती एक प्रक्रिया आहे. ती ईश्वराची लीलाही नाहीं किंवा प्रभुची कृपाहि नाहीं. मानवी पातळीवर आलेल्या जीवाच्या प्रयत्नांचें तें फळ आहे. आमच्या जीवनें व्यवहाराचा, निसर्गाशी चाललेल्य देवघेवीचा, समाजविकासाचा; आमच्या इतिहासाचा तो अटळ परिणाम आहे. म्हणून आमचें ज्ञान हें केवळ आमच्या मनाचें किंवा आत्म्याचें फळ आहे हें जसें निखालस चुकीचें, तसेंच तें केवळ वस्तु किंवा भौतिक जग जसें आहे तसें तंतोतंत आमच्या मनावर संस्कार करीत जातें, ही यांत्रिक जडवादी समजूत्हि अत्यंत धोक्याची आहे. ह्या समजुतीनें एक दोन शतकाच्या भौतिकवादी, पुरोगामी व बुद्धिवादी विचारधारेला निष्प्रभ व खोटें पाडलें आहे. **कार्ल मार्क्सनें भौतिक तत्वज्ञानांत टाकलेली अत्यंत महत्वाची भर म्हणजे भौतिक-वादांतील जडता किंवा वर सांगितलेली यांत्रिकता त्यानें दूर केली ही होय.** आमचें वस्तुज्ञान हें निव्वळ वस्तूंचें प्रतिबिंब नसून तें ज्ञेय व ज्ञाता ह्यांच्या व्यवहाराचें म्हणजे इतिहासाचें फळ होय हें त्यानें दाखवून दिलें. म्हणून ह्या तत्वज्ञानाला ह्या दृष्टीनें **ऐतिहासिक भौतिकवाद** असेंहि म्हणतात.

आंबा आंबट आहे. परंतु कांहीं आंब्यांत आंबटपणा इतका कमी व गोडपणा इतका अधिक कीं आंबे गोड आहेत हें म्हणणेच रास्त ठरतें व काहींत गोडपणा इतका कमी व आंबटपणा इतका अधिक कीं त्यांना आंबटच म्हणायला पाहिजे. मनुष्य ताकदवान आहे. परंतु केव्हां ? तो जवान असतो तेव्हा

कीं बालपणीं ? की वृद्धावस्थेंत ? पाणी थंड असतें. पण तें केव्हां ? किती डिग्री उष्णता किंवा थंडी असतांना ? अर्थात हें उष्णतेच्या किंवा थंडीच्या प्रमाणावर अवलंबून आहे. सारांश वरील विधानांत जें सत्य म्हणून आहे तें गतिबद्ध आहे. म्हणजे तें सतत परिवर्तित किंवा एका अवस्थेंतून दुसऱ्या अवस्थेंत, एका टोका-हून दुसऱ्या टोकापर्यंत दोलायमान होत असतें. बाह्य स्थिरतेच्या अवस्थांत तें फक्त नामाभिधान घेण्यापुरतें प्राधान्येंकरून कांहीं लक्षणें व कांहीं संभावना व्यक्त करीत असतें. वस्तूंची प्रत्येक दशा जशी गतिगर्भ असते तशी ती विरो-धगर्भहि असते. एका अवस्थेंतून ती सतत दुसऱ्या अवस्थेंत स्थित्यंतर करीत असते. जेव्हा ती एका अवस्थेंत स्थिर असते असें वाटतें तेव्हां त्यांतल्या गर्भित गतीचा वेग अल्प असून त्याला उत्क्रांति म्हणतात व टराविक गतींचें प्रमाण वाढल्यानंतर किंवा सर्वसाधारण विरोध विनाशक बनून जेव्हां अरिष्ट काळ येतो तेव्हां जें परिवर्तन होतें त्याला क्रांति म्हणतात. अर्थात क्रांतिपूर्व जो अरिष्ट बिंदु ( क्राइसिस ) येतो त्यानंतर वस्तुत्व क्रांतिकारक झेप घेत असतें. उदाहरणार्थ पाणी घेऊं या. पाण्याला एक डिग्री उष्णता, दहा डिग्री उष्णता, नव्याण्णव डिग्री उष्णता व १०० डिग्री उष्णता मिळाली कीं त्याचा अरिष्ट बिंदु निर्माण होऊन तें पाणी एक उडी घेऊन वाफ बनतें. म्हणजे त्याचें एका अवस्थेंतून भिन्न अवस्थेंत संक्रमण होतें. ही अवस्था गुणलक्षणांनीं भिन्न असल्यामुळें इथें गुणभेद झाला असें आम्ही म्हणतों. हा गुणभेद होण्याचें कारण अर्थात् उष्णतेच्या डिग्रीचा संख्याभेद किंवा उष्णतेचें परिमाण. म्हणजे उष्णतेच्या परिमाणभेदाने गुणभेद निर्माण झाला. 'अ' ह्या व्यक्तीला दाढी आली असें आम्ही म्हणतों. पण ती अमुक दिवशीं अमुक घटकेला आली असें म्हणतां येईल काय ? नाहीं. तर दाढी येण्याची क्रिया कितीतरी दिवस, कितीतरी महिने व वर्षें चालू होती असेंच म्हणावें लागेल. परन्तु दाढीच्या केसांचें प्रमाण जेव्हां पुरेसें वाढलें तेव्हां बिनदाढीचा मुलगा दाढीवाला जवान बनला. **म्हणजे हा गुणभेद दाढीच्या केसाच्या परि-माणभेदांतून निर्माण झाला.** आतां गुणभेदांतूनहि परिमाणभेद होत असतो समजा कीं एक मासिक आहे. हें मासिक एका टराविक गुणाचें आहे. म्हणजे त्या मासिकांत चारच मसालेदार लघुकथा असतात व बाकीची पानें इतर रद्दी

मजकूर असतो. आतां त्या मासिकांत आठ आकर्षक लघुकथा व आकर्षक बहिरंग सजावट आली म्हणजे त्या मासिकाचें त्या दृष्टीनें गुणांतर झालें. ह्या गुणभेदाच्या परिणामीं वाचकांची संख्याहि वाढली. म्हणजे गुणवृद्धींतून संख्या-वृद्धि झाली असें म्हणावयास हरकत नाहीं.

निसर्गात नाना तऱ्हेचे भेद व त्यांतून निर्माण झालेली भिन्नता दिसते. परन्तु ह्या सर्वांत जी एक प्रकारची गति आहे, त्याच्या अंतरंगांत एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जी दोलायमानता आहे ती दोलायमानत विरोधी आहे व हा विरोध त्या वस्तूला एका अवस्थेंतून दुसऱ्या अव. स्थेंत खेंचीत असतो. हें कर्षण समग्र निसर्गगति तपासली तर खालून वर, कमी समृद्धींतून अधिक समृद्धीकडे जाणारें असल्यामुळें ह्या गतीला विकसन म्हणतां येतें. हें विकसन विरोधी गतींतून निर्माण होतें. प्रथम गतीचा वेग अल्प असतो तेव्हां ती वस्तु आहे तशीच भासते व त्याचा रंग, रूप, आकार, शक्ति, तेज वगैरे अचल आहेत असें वाटतें परंतु त्या वस्तूचें मूक अदृश्य संक्रमण चालूच असतें. त्या वस्तुत्वाचा विरोध त्यांत वाढत असतो व विरोधी तत्वाचा प्रकर्ष होत गेला म्हणजे त्यांत अरिष्ट बिंदु दिसूं लागतो. एका उडीने किंवा झेपेने किवा एका झटक्यांत ती वस्तु दुसऱ्या अस्तित्वांत संक्रांत होते. ही खुर्ची घ्या......ही खुर्ची कांहीं काल अशीच खुर्ची राहील......प्रथम त्यावर धूळ जमेल......मग त्याची मोडतोड किंवा खुर्ची म्हणून ती जीर्ण होईल व अंतर्गत खुर्ची विरोधी किंवा लाकूड विरोधी गतिमुळें ती कधीतरी लाकडाच्या रूपांतून जाईल. त्यावेळीं तिचा भूसा होईल. खुर्चीला ह्या नाशापासून वाचवणारी कोणतीच शक्ति नाहीं. अंतर्गत विरोधाचे परिणाम फक्त त्याचे नियम जाणूनच मानवी बुद्धीला मानवी कृतीने टाळतां येतील, एरवीं नाहीं.

ही द्वंद्वात्मक तर्कपद्धति असामान्य कठीण असून ती चाकूचें एक बांधलेलें बंडल हवेंत फिरवण्यासारखें आहे असें मार्क्सवादाचे विरोधक समजतात. दुसरे कांहीं गत्यात्मक भौतिकवाद हा बोलून चालून भौतिक निरीक्षण करणारा, जडाचें निरीक्षण करणारा, त्यांत सूक्ष्म, सखोल किंवा श्रेष्ठ ज्ञान कोठून येणार असें समजतात. ह्या विरोधकांची ही उथळ समजूत निराधार आहे. ती मार्क्सवादी भौतिकवादाला लागू होत नाहीं. **गत्यात्मक भौतिकवाद किंवा विरोध–**

**विकासवाद हें अशा प्रकारचें शास्त्र आहे कीं जें वस्तु, कल्पना व त्यांची प्रतीकें ह्या सर्वांना आपल्या परिसरांत ठेवून त्यांच्या परिसरासकट ऐतिहासिक क्रमाकडे; वास्तविक संक्रमणाकडे; त्यांतील अंतर्विरोधांकडे व त्यांतून उद्‌भवणाऱ्या नवनिर्मितीकडे लक्ष पुरवतें.** ही विचारपद्धति सर्वोपरी असलेल्या गतीचें कारण वस्तूंच्या आणि प्रक्रियांच्या आंत पाहाते. उदाहरणार्थः—समाजवादी क्रांतीची कारणें कांहीं महापुरुषांच्या विचारांत किंवा आचारकृत्यांत ( ते महापुरुषहि अंतीं समाजप्रेरित–समाजांतर्गत शक्ति असतात हें जमेला धरूनहि ) न शोधतां भांडवलशाही समाजरचनेच्या अन्तर्विरोधांत ती शोधते. आतांपर्यंत होऊन गेलेल्या थोर साधुसन्त व महापुरुषांच्या जगदुध्दारक स्वप्नांमुळें जग बदलत आहे असें नसून ( त्यांचीं कांहीं स्वप्नें महान व आदर्श होतीं असें मानूनहि ) नवसमाजाची निर्मिती जी होत चालली आहे तिचें कारण भांडवलशाही समाजरचनेंतले त्या रचनेला न सुटणारे अंतर्विरोध व तिने निर्माण केलेली उत्पादनाच्या विपुलतेची शक्यता व प्रगत विज्ञान हीं होय असें ही विचारपद्धति मानते.

विश्वसाहित्यांत विश्वचलनाच्या वेगवेगळ्या कल्पना आढळतात. विश्व हें सतत चक्रनेमिक्रमांत फिरणारें यंत्र असून ' पुनरपि जननं पुनरपि मरणं ' हेंच विश्वांतील प्रत्येक वस्तूचें संचित आहे व त्यांतून सुटण्याचा मोक्ष किंवा निर्वाणाचा मार्गहि बनलेला आहे. असें मानण्यांत येतें. इतरहि कमी अधिक महत्वाच्या कल्पना रूढ आहेत. परंतु अशा प्रकारच्या विश्वचलनाच्या विचारधारांत एक गोष्ट निश्चित असते ती ही कीं गति किंवा बदल आधीं मानावयाचाच नाहीं–मानला तर तो बाह्य तात्पुरता क्षणभंगूर मानावयाचा. अधिकच तर चक्राकार पुनरपि पुनरपि अशा स्वरूपाचा मानावयाचा. किंवा सारें परिवर्तन ईश्वर नियंत्रित आधीच लिहून पूर्ण केलेल्या पुस्तकाच्या एकामागून एक उघडल्या जाणाऱ्या पानासारखें असें मानावयाचें. शिवाय उत्क्रांति मानणे आज भागच असल्यामुळें बरेच विचारवंत क्रमाक्रमाने उघडत उघडत जाणाऱ्या पुस्तकाच्या नाविन्याप्रमाणें उत्क्रांति आहे व क्रांति हें संकट आहे, अनैसर्गिक आहे अशा शब्दांत परिवर्तनाची हजेरी घेतात. कांहीं विचारवंत गति मानली तर झिनो ह्या ग्रीक तत्वंवेत्याच्या बाणाप्रमाणें ( भात्यांतून सुटलेला बाण एका ठराविक ठिकाणीं

ज्यावेळीं असतो त्याच वेळी तो पुढें जात असल्यामुळें तिथें नसतोहि ) परस्पर विरोधी गति मानावी लागेल म्हणून तिचें अस्तित्वच मान्य करायला कबूल होत नाहींत. सरळ गति किंवा बदल न मानण्यामधील हेतु एकच. परिवर्तनावर श्रद्धा ठेऊन जगाला बदलणाऱ्या जनतेच्या पुरुषार्थावर पाणी फेंकावयाचें. जग हें आहे तसेंच दु:खी, वाईट, सहानुभुतिशून्य, अराजकीयच राहाणार, तें बदलण्याची खटपट व्यर्थ व मोफत आहे असें भासवायचें. वास्तविक प्रचलित समजरचनेमुळेंच निर्माण होणारें हें श्रद्धाहीन तत्वज्ञान आतां वेशीवर टांगणें जरूर आहे. शाश्वत सनातन तत्वज्ञानाच्या गांभीर्याच्या दडपणाखालीं असलीं नहरीं तत्वज्ञानें जनतेला पाजण्याची बहुतेक बुद्धिजीवी खटपट करीत असतात. अशा लटक्या तत्वज्ञानाचा बुरखा फाडून त्यांतलें कथील उघडे पाडण्याची वेळ आतां निश्चित येऊन ठेपली आहे.

खरें म्हणजे बदल ही गोष्ट अगदीं साधी आहे व सामान्य माणूसहि ती चटकन समजूं शकतो. एवढे अवाढव्य तारे पण तेहि बदलतातच. नवीन ताऱ्यांचा केवळ शोधच लागतो असें नव्हे तर नवीन नवीन तारे बनतहि असतात. सूर्यमाला टप्प्याटप्प्याने बनत गेली आहे. ज्या मानानें पृथ्वी थंड होत गेली आहे, त्या मानानें रासायनिक द्रव्यें बनत गेलीं आहेत व बनताहेत. उष्णता कमी झाल्यानंतर भूततत्वानें नवीन परिसरांत नवीन गुण व्यक्त केले आहेत. ( हें उष्णतेच्या परिमाण भेदामुळें निर्माण झालेल्या गुणभेदाचें उदाहरण आहे. )

कार्बन द्रव्याच्या परमाणुंच्या संश्लिष्ट संयोगानें प्रथम कार्बोज यौगिकें उद्भवली. ह्या कार्बोज पदार्थांतून पहिल्या वस्तू तयार झाल्या, ज्यांत जीवनाचीं लक्षणें दिसूं लागली. सजीव जीवाणूंतून प्रदीर्घ उत्क्रांतीनंतर मानवाचा प्रादुर्भाव झाला व मानव समाजाचा जन्म झाला. अशा रीतीने जुन्यातून नव्या प्रक्रिया, नवे नियम, नव्या संस्कृति उत्पन्न झाल्या हें बौद्धिक आकलन गत्यात्मक भौतिकवादी विचार पद्धतीचें फळ आहे.

**प्रत्येक वस्तूंत योग, प्रतियोग व सहयोग किंवा वाद, प्रतिवाद संवाद अशी प्रक्रिया दिसून येते.** बीजाची बीज अवस्था हा योग. त्या बीजाचाच नाश होणे हा प्रतियोग. त्या नाशातून योग्य परिसर किंवा अनुकुल परिस्थिति मिळाल्यास रोपाची निर्मिति हा सहयोग. प्रतियोग

योगाला नाहीसा करतो परंतु तो नाश समूळ नसून त्या नाशांतून सहयोग म्हणजे रोप निर्माण होतें व प्रतियोगाचा प्रतियोग होतो. ( निगेशन ऑफ निगेशन ) विरोधं विकासाचा हा एक नियम आहे.

प्रत्येक वस्तूंत त्या वस्तूची विरोधी त्या वस्तूंचा नाश करणारी प्रक्रिया चालू असते. परन्तु ती त्या धर्मानुसार चालल्यास त्या नाशांतून नव्याची निर्मितीही सार्थकात्मक असते. तहान लागणे म्हणजेच तहानेच्या नाशाची तयारी होणें होय. तहान लागणे व तहानेच्या नाशाची तयारी चालू असणे ह्या विरोधी तत्वांत एकता व सुसंगतिहि असते. **विरोधी तत्वांचा एकता हाहि विरोध विकासाचा एक विजय आहे.** विरोध हा नेहमीच परस्पर नाशक असतो असेंहि नव्हे. ठराविक परिस्थितींत तो परस्पर विरोधी बनणें अटळ असतें. असें जेव्हां घडतें, तेव्हां त्यांत अरिष्टाची परिस्थिति निर्माण होते व मग क्रांति होऊन त्यांतून सहयोग निर्माण होतो. तहानेच्या नाशांतून तहानेचा क्षण नष्ट झाला ( पाणी पिण्याचें वेळीं ) तरी तो सार्थक होऊन नष्ट होतो व समाधानकारक सहयोग त्या प्रतियोगात्मक तृष्णानाशांतून निर्माण होतो.

कामगारवर्ग व धन हे विरोधी आहेत परंतु त्यांची एकताहि आहे. खाजगी मत्ता खाजगी राहाण्याकरतां खटपट करते. म्हणजेच ती आपला शत्रु ( खाजगी मालमत्तेचा बळी ) जो कामगार वर्ग त्याला शाबूत ठेवते. ही झाली विरोधाची होकारार्थी बाजू. परंतु कामगार वर्ग स्वतःला कामगारवर्ग म्हणून नाहीसा करण्याकरतां खटपट करतो ही झाली विरोधाची नकारार्थी बाजू. म्हणजे विरोधाच्या दोन्ही बाजूची एकता आहे. बराच काळ हा विरोध भांडवलशाही समाजरचनेंत टिकून राहूं शकतो. परंतु स्वयंगतींनें तो परस्परविरोधी बनत जाऊन शेवटीं भांडवलशाहीचा बळी घेतल्याशिवाय राहात नाहीं. ह्या योग प्रतियोगांतून साम्यवादी सहयोगाचा उदय होतो. अशा तऱ्हेने ह्या विरोध विकासी तर्कपद्धतीच्या उपयोगाने कठीण प्रक्रियांचा उलगडा करतां येतो. विकास म्हणजे केवळ साध्यवादीची क्रिया नव्हे. परंतु ती एक अशी प्रक्रिया आहे, कीं प्रमाणभेदांतून स्पष्ट पायाभूत अशा गुणभेदांत प्रविष्ट होते आणि प्रमाणापासून गुणांत होणारे परिवर्तन हें विरोधी गतीच्या परिणामी होतें.

ह्या वस्तुस्थितीचा पाया हा आहे कीं सर्व वस्तूंच्या आणि प्रक्रियांच्या

अंगीं अंतर्विरोध असतो. तो प्रथम मंद, उपकारक, मग तीव्र, स्फोटक व अंतीं परस्परविरोधी, विनाशक परन्तु सहयोगात्मक म्हणजे श्रेष्ठ नवीनाला जन्म देणारा असा आहे. साधें परिवर्तन म्हणजे फक्त नवीनीकरण, गुणविकास नव्हे. ह्या जगांत नेहमी नवीन कांहींतरी निर्माण होतें. उत्क्रांतीने बदलतें. क्रांतीने विकसतें. परन्तु हें होत असतांना कांहीं तरी नेहमीच ऱ्हास पावतें आणि मरून जातें. जेव्हां वर येणारें आणि विकसणारें फळाला येतें आणि सडणारें व मरून जाणारें नाहींसें होतें तेव्हां नवीन गुणाचा उदय होतो. अंड्यांतील बलकाचें संरक्षण करणारें कवच, परन्तु तें च फुटल्याशिवाय नष्ट ती झाल्याशिवाय बलकाचें गुणांतर पिल्लूंत होणे शक्य नसतें. कवच नष्ट होतें, परन्तु पिल्लूंचा उदय होतो.

विरोध–विकासवाद म्हणजे आंतरिक गतीचें किंवा विकासाच शास्त्र असेंहि म्हणतां येईल. केवळ परिवर्तन आणि विकास ह्यांत फरक आहे. **विकास म्हणजे असें परिवर्तन कीं जें आपल्या आंतरिक नियमांनीं टप्प्या–टप्प्यानें चालतें** तसेंच वाढ आणि विकास ह्यांत फरक आहे. जीवन-शास्त्रांत वाढ आणि विकास ह्यांतील फरक स्पष्ट केलेला असतो. वाढ म्हणजे केवळ मोठें होणे. केवळ प्रमाणाने किंवा संख्येनें वाढणें. परन्तु विकास: म्हणजे गुणतः नविनांत रूपांतर. निसर्ग आणि इतिहासांत केवळ वाढच नव्हे तर विका-सहि असतो. **विरोध विकास शास्त्राचें ध्येय विकासाचे सर्वसाधारण नियम शोधून काढून आमचें आकलन सुधारणें हें होय. ही केवळ बौद्धिक कसरत नव्हे. तर्कटांची भरमार नव्हे. हें सारें वस्तूंतला व प्रक्रियांतला विकास समाजाच्या हिताला जुपण्याच्या हेतूनें केलें जातें.**

‘ प्रमाण भेदांतून गुणभेद होतो ’ हा गत्यात्मक भौतिकवादाचा एक नियम आहे. ह्या नियमाचीं उदाहरणें स्वयंपाकशास्त्रांत नेहमीचींच आहेत. पदार्थांत मीठ मुळीच नसलें तर अळणी. अधिक असलें तर खारट. म्हणजे मीठाच्या प्रमाणावरून पक्वान्नाचा गुण ठरतो. रसायनशास्त्रांत तर द्रव्यांच्या परिणामा-वरच निरनिराळ्या वस्तूंची बनावट अवलंबून असते. एखादे द्रव्य हें औषध आहे किंवा विष आहे हेंसुद्धां त्या द्रव्याच्या परिमाणावरून ठरतें. विरोधविक-साचा सिद्धांत साऱ्या शास्त्रांना लागू होतो. अंड्याचें कोंबडींत गुणांतर झाला

म्हणजे त्यानें परिमाण किंवा वजन बदलतें. हें गुणभेदांतून झालेल्या परिमाण-भेदाचेंच एक उदाहरण होय.

लाओत्से आपल्या 'तावो' ग्रंथांत विरोधाच्या अटळंतचीं कांहीं उदाहरणें देतो. तो म्हणतो,'जगांतल्या साऱ्या लोकांना जेव्हां सौंदर्य सौंदर्य म्हणून प्रतीत होतें त्याच क्षणीं कुरुपतेला अस्तित्वाचा दाखला मिळतो. जेव्हां साऱ्या लोकांना चांगलं चांगलें म्हणून समजतें तेव्हांच वाईटाचे अस्तित्व सिध्द होते. असणे आणि नसणे ही दोन्ही वाटण्यांवर अवलंबित असतात. ' कविवर्य टागोर लिहितात, प्रेमांत ' होय ' आणि ' नाहीं ' ' निर्गुण' व ' सगुण ' हीं दोन्ही विरुद्ध टोकें एकत्र येतात. " ( सामंजस्य-शांतिनिकेतन ) तसेंच ' उत्सर्ग ' ह्या आपल्या काव्यांत ते म्हणतात, ' स्वतंत्रता ' ' परतंत्रतेंत ' बिऱ्हाडाची भीक मागते. ' लॅटिन भाषेमध्ये एक म्हणच आहे, ' सुमाजुस सुमा इन्जुरिया ' म्हणजे ' न्यायाची परमावधि अन्यायाच्या परमावधींत होते. ' कारण एका गोष्टीची अति ही नेमकी विरोधीतत्वाच्या अतीला जन्म देत असते. ह्या उदाहरणांवरून वस्तूंतील विरोधतत्व कसें नेहमीं वस्तूंत कार्यमग्न असतें त्याची कल्पना येते. परंतु वस्तूंच्या अंतरंगांत सर्वसाधारण विरोधांपेक्षां जे विशिष्ट विरोध असतात त्यांचा अधिक अभ्यास होणे जरूर असतें. ह्या विरोधांचा अभ्यास झाला तरच आम्हाला वस्तूंच्या परिवर्तनात हात घालून त्या आमच्या सामूहिक हिताकरत बदलतां येतात. समाजरचनेंतील बदलही ह्याच प्रकारांत येतात.

जीवन म्हणजे प्रत्येक क्षणीं तेंच व दुसरेंहि. जीवन म्हणजे प्रत्येक क्षणीं जगणें व मरणेंहि. जीवनांत जगणें आणि मरणें ह्यांचें सतत द्वंद्व चालू असतें. ह्या द्वंद्वांत जीवनाचा वेग अधिक असेतोंवर त्याला जीवन असें आम्हीं म्हणतों व पुढें मृत्यु सुरू होतो. परंतु वस्तूंत अंतर्विरोध कायमचे आहेत हें खरें असले तरी ते सुटणारेहि आहेत. कधींहि न सुटणारा मरण हा जीवनांतील अंतर्विरोध घ्या. हा अंतर्विरोधसुद्धां सुखेनैव सोडवतां येईल. मात्र त्याकरतां जीवनाचा बिरोध विकास समजून घेतला पाहिजे. हें केवळ एका किंवा कांहीं व्यक्तींचें काम नसून ती मानवसमाजाच्या एका टप्प्याची करामत आहे.

आजच्या आमच्या बुद्धीला मृत्यु ह्या अंतर्विरोधाच्या दोन ठळक बाजू दिसतात. ह्या दोन्हीं बाजूंनीं मानवी बुद्धि आणि मानवी सामाजिक पुरुषार्थ हा

अंतर्विरोध सोडवूं शकेल. हा प्रश्न युगानयुगांचा असला तरी तत्वज्ञानाच्या कक्षेंत तो आजहि येऊं शकतो.

सूक्ष्म दृष्टीने विचार केल्यास मानवसमाजच अमर आहे असें नव्हे तर व्यक्तिहि एका अर्थानें अमर आहे. जेव्हां जीवनक्रिया आटोपते तेव्हांच व्यक्ती मरते. जीवनाने प्रत्यक्ष मृत्यूला कधींहि पाहिलेलें नसतें. जीवन आणि मृत्यु ह्यांची दृष्टादृष्ट किंवा गाठभेट कधींहि झालेली नसते वगैरे उहापोह मागच्या भागांत आला आहे तरी गत्यात्मक भौतिकवादाच्या दृष्टीनें हा अंतर्विरोध कसा सोडवावा हें पाहाणें अगत्याचें आहे.

मृत्यु ह्या घटनेचा एक एक पापुद्रा काढून माणसावर होणारे त्या घटनेचे दुष्परिणाम कसे कमी करतां येतील तेंहि पाहातां येण्यासारखें आहे. प्रीति, स्नेह व विरह ह्या बाबतींत सकृद्दर्शनीं आम्हांला असें वाटतें कीं प्रीतिविरहाचा चटका मानवाचें मन जोपर्यंत आहे तसें आहे तोंपर्यंत बदलणें शक्य नाहीं. परन्तु मानवाचें मन ही एक घडण असल्या मुळें तें तसें राहतच नाहीं मुळीं. फक्त त्यांतला बदल मानवाला दुःखमुक्त कर- णारा कसा ठरेल एवढेंच आम्हांला पहावयाचें आहे. सध्याच्या दूषित समाज- रचनेमुळें व्यक्ति आतांपर्यंत आपलें प्रीतिस्थान अगदीं ठराविक व्यक्तींपुरतें मर्या- दित किंवा केंद्रित करीत असल्यामुळें ह्या विकृत तऱ्हेनें केंद्रित झालेल्या प्रीतीमुळें उद्भवलेला विरहदाह अत्यंत दाहक ठरणें स्वाभाविक आहे. परन्तु माणूस हा वसुधैव कुटुंबकम म्हणजे विश्वांत राहून विश्वावर प्रेम करूं शकणारा असा प्राणी आहे. साम्यवादी उच्च समाजरचनेंत एकदां का मानवानें पदार्पण केलें कीं त्याची प्रीतिस्थानें विकृत स्वरुपांत केंद्रित होऊन तो खुज्या मानव न बनतां, एखाद्याला अनेक मित्र असावेत व त्यांतल्या एखाद्याचा विरह झेलून घेण्याक- रितां इतरांनीं स्पर्धा करावी अशा स्वरूपाचें समाजसंघटन करून मृत्यूची ही दुःखमय बाजू निश्चित हलकी केल्याशिवाय रहाणार नाहीं. व्यक्तीला स्वतःचा मृत्यु नाहीं. जो आहे तो दुसऱ्याचा. स्वतःला दुसऱ्याचा विरहात्मक व स्वतःचा दुसऱ्यांना विरहात्मक व हा विरहाचा प्रश्न मानवप्रेमावर आधारलेल्या उच्च समाज रचनेंत हलका होणें अशक्य नाही. अशा उच्च समाज रचनेंत समाजरचनेंत आर्थिक परावलंबनाचा प्रश्न संभवतच नाहीं. शिवाय आजार, दुर्घटना वगैरे कारणांमुळें-

१२२९२

येणारा मृत्यु मुबलक हवापाण्याची व्यवस्था, पुष्ट आहार, औषधोपचारांची मोफत सोय, प्रगत वैद्यक व विज्ञानाची मदत वगैरे सहाय्यानें हटतं जाऊन मानव दीर्घायुषी किंवा पूर्णायुषी बनणें शक्य आहे.

शास्त्रज्ञ माणसांचें पूर्णायुष्य १६५ वर्षे असल्याचें सांगतात. माणसाला जर आपलें पूर्णायुष्य उपभोगावयाला मिळालें तर त्याला एक प्रकारचा पूर्ण जीवन–सार्थक्याचा आनंद होऊन मरणाची अवास्तव भीति किंवा छाया त्याला छळणार नाहीं. अकाली मृत्यूच्या भीतीनें टॉलस्टॉयसारख्या पुरुषांना छळलें होतें हें विसरतां कामा नये. अकाली मृत्यूची कल्पना किंवा आगंतुक मृत्यूशीं जीवाला द्यावा लागणारा सामना भयाण असणें साहजिक आहे, आम्हां सग. ळ्यांना आगंतुक मृत्यूशींच झगडावें लागतें. साम्यवादी युगांत माणसें पूर्णायुषीच होतील असें नव्हे तर पूर्णायुष्याची मर्यादाहि पुढेंपुढे नेली जाईल ह्यांत शंका नाहीं. सोविएतनें अवघ्या चाळीस वर्षांत सरासरी आयुमर्यादा जी क्रांतिपूर्वी ३१ वर्षांची होती ती ६७ वर्षांपर्यंत आतांच नेली आहे. सारांश, साम्यवादी युगांतील मानवी बुद्धी व सामाजिक प्रयत्न वेगवेगळ्या दिशांनीं व तऱ्हांनीं मृत्यूवर मात करून त्याला मागें हटवूं शकतील.

मार्क्सवादी गत्यात्मक भौतिकवादाचा आश्रय घेऊन भावी मानव मृत्युंजयी ठरेल असा आमचा विश्वास आहे. म्हणजे तो कधींहि मरणार नाहीं असें नव्हे. कारण प्रत्येक वस्तूला त्या त्या स्थितींत उत्पत्ति-स्थिति आणि लय हीं ठरलेलीच असतात. परन्तु जीवनप्रक्रियेंतून जातांना निर्माण होणारे विरोध सोडवणें ही तर विजयाची खुबी आहे. जीवनावर, जीवनतत्त्वज्ञानावर व प्रपंचावर पसरलेली मृत्यूची गडद सावली नाहींशी करणें म्हणजेच मृत्युंजयी होणें होय. मृत्यूची भीती नसणें, मृत्यूचे दुष्परिणाम नष्ट होणें, मृत्यु ही सहज स्वाभाविक चीज ठरणें हें अंतीं जीवनसार्थक्यावर अवलंबून असतें व त्या दृष्टीनें साम्यवादी मानव मृत्युंजयी ठरणार आहे. तत्वज्ञानी गंभीर मीमांसा, पौरुषाचा भाग्यशाली अविष्कार, जीवनसार्थक्याची हमी व खऱ्या अमृततत्वाची कुपी मार्क्सवादी गत्यात्मक भौतिकवाद आमच्या हातीं देत आहे. हीं महान तत्त्वें प्राणपणानें ह्या जन्मभूमींत उभवणें हें आमचें पवित्र कर्तव्य नाहीं काय ?

卐卐

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १५ | १९ | सदव | सदैव |
| २३ | १२ | घडधाकड | घडधाकट |
| २४ | २१ | दुःखनवारणाचा | दुःखनिवारणाचा |
| २५ | ३ | टाकता | टाकतो |
| ३४ | २ | खर | खरें |
| ३४ | २८ | अथिक | अधिक |
| ३९ | १० | मार्क्सवादा | मार्क्सवाद |
| ३९ | २४ | तत्वज्ञानाच | तत्त्वज्ञानाचे |
| ४२ | १३ | मानवसंस्कृति | मानव संस्कृतीच्या |
| ४८ | २१ | घासाग्राशीपेक्षां | घासाग्रिसीपेक्षां |
| ५२ | १६ | पूर्व ग्रह | पूर्वग्रह |
| ६० | ६ | सॅटेलाइस, ल्युनिक कॉस्मिक | सॅटेलाईटस्, ल्यूनिकस्, कॉस्मिकस् |
| ६१ | २ | उत्पत्ति-स्थिति-वाढ | उत्पत्ति-स्थिति-विकास |
| ६२ | ३ | तत्त्वाचाच | तत्त्वाचा |
| ६७ | १९ | जेम्सजिन्स | जेम्स जीन्स |
| ७४ | ८ | हीत | हीच |
| १०७ | ३ | थिओपियन | एथिओपीयन |
| १११ | २२ | कितोहि | कितीही |
| ११३ | २४ | हा | हां |

| | | | |
|---|---|---|---|
| ११६ | ७ | सकृद्दर्शनीं | सकृद्दर्शनीं |
| १२५ | २ | विरोफी | विरोधी |
| १२५ | ६ | कुटाराघात | कुठाराघात |
| १२७ | १ | गतिमानतेच्या | गतिहीनतेच्या |
| १२९ | १५ | हें होय | हा होय. |
| १३० | १६ | आहेस हें | आहे. व |
| १३३ | ९ | अ भिन्न | अभिन्न |
| १३५ | ९ | आहे | नाहीं |
| १३५ | २२ | आणणारा | आणणार |
| १३६ | १ | होणें गतिचा | होणें हा गतीचा |
| १४३ | २ | मायाला | मानावयाला |
| १४४ | २५ | साध्यत्राढीची | साध्या वाढीची |
| १४५ | ५ | भरून | मरून |
| १४५ | ८ | नष्ट ती झाल्याशिवाय | नष्ट झाल्याशिवाय |
| १४५ | २७ | झाला | झालें |
| १४६ | ११ | सुमाजुस | सुमा जुस |

REFBK-0012292

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३४२८८ दि.
क्रमांक १४२६ नों. दि.
२५।१।६३